म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. नं. २४९

# महाराष्ट्र महोदय

नारायण गणेश गोरे, आचार्य शं. द. जावडेकर, महर्षी डॉ. धों. के. कर्वे, प्रा. व. ग. देशमुख, वीर वामनराव जोशी, ना. स. बापट, ना. गो. चापेकर, शं. वा. किर्लोस्कर, दिनकर साक्रीकर, वि. श्री. मराळकर, रियासतकार गो. स. सरदेसाई, 'एक महाराष्ट्रीय', मा. ग. बुद्धिसागर, गणेश वासुदेव मावळंकर, न. म. जोशी, डॉ. [redacted] डॉ. धा. रा. गाडगीळ, आचार्य काका कालेलकर, तर्कतीर्थ [redacted] र नियोगी, डॉ. सुमंत खंडेराव . . . एम., . श्रीकृष्ण व्यंकटेश पुणतांबेकर, . . . दादा म. दत्तो वामन पोतदार, मधु गजानन कर्णिक.

RFFBK-0008539

किंमत सव्वा रुपया

१६५५

# महाराष्ट्र-महोदय

'या महाराष्ट्राचें काय होणार ?' ही
'मौज' साप्ताहिकांतील समग्र चर्चा

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0008539

किंमत सव्वा रुपया

९ फेब्रुवारी १९४९ च्या “मौजे ’च्या अंकांत साथी ना. ग. गोरे यांचें महाराष्ट्रीय विचारवंतांना अनावृत पत्र प्रसिद्ध झालें. त्यांत त्यांनीं महाराष्ट्राची तसूतसूनें पिछेहाट होत आहे, परिस्थिति अगदींच हाताबाहेर गेली नाहीं तोंच उपाययोजना केली पाहिजे व त्यासाठीं महाराष्ट्रांतील सर्व मतपंथांच्या विचारवंतांनीं एकत्र येऊन पंथपक्षभेदातीत विचार केला पाहिजे, असें मत अतिशय कळकळीनें मांडलें. आपल्या मतानें महाराष्ट्राच्या अवनतीची मीमांसा करून त्यांनीं उपाययोजनाहि सुचवली होती; पण या महाराष्ट्रासंबंधींच्या अतिशय जिव्हाळ्याच्या प्रश्नावर सर्वांनींच विचार करावा, आणि परिस्थितीचें गांभीर्य ओळखून कामाला लागावें, यावर त्यांचा जोर अतिशय होता. श्री. गोरे यांनीं उपस्थित केलेला प्रश्न मला फार महत्त्वाचा वाटला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या पार्श्वभूमीवर त्याचें स्वरूप अधिकच उठून दिसलें. तेव्हां वृत्तपत्राच्या भूमिकेप्रमाणें या विचारमंथनाला मदत करावी म्हणून या लेखमालेची योजना आखली. श्री. गोऱ्यांचें पत्र महाराष्ट्रांतील सर्व पक्षांच्या व मताच्या प्रमुख विचारवंतांकडे पाठविलें व त्यांचें या विषयावरील मत ‘ या महाराष्ट्राचें काय होणार ? ’ या लेखमालेंतून मांडण्याची विनंति केली. बहुतेकांनीं ती मानली. त्यांचे लेख व मौजेच्या वाचकांनीं एतत्संबंधीं व्यक्त केलेले विचार हे सर्व ता. ९ मार्च १९४९ ते २१ सप्टेंबर १९४९ पर्यंत मौजेंतून क्रमशः प्रसिद्ध झाले. ‘ मौजे ’च्या दिवाळी अंकांत साथी गोरे यांनीं या लेखमालेचा समारोप केला.

या प्रश्नासंबंधीं ज्यांना म्हणून जिव्हाळा आहे, त्यांना एकदम उपलब्ध व्हावी, नियतकालिकांत ती लेखमाला पडून राहूं नये, म्हणून प्रत्येक लेखाच्या कांहीं सुट्या प्रती काढून त्या येथें एकत्र केल्या आहेत. साथी मा. ग. बुद्धिसागर यांचा लेख प्रत्यक्षपणें नसला, तरी त्यांत संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या भवितव्याचा विचार असल्यानें अप्रत्यक्षपणें या लेखमालेशीं संबद्ध आहे असें वाटल्यावरून तोहि या संग्रहांत घेतला आहे.

—वि. पु. भागवत
संपादक ‘ मौज ’

८६३१
१८४०६
दि. १९
दि. १३।११।५४

# महाराष्ट्रांतील विचारवंतांना अनावृत पत्र

लेखक : नारायण गणेश गोरे

काहीं दिवसांपूर्वी पुणें विश्वविद्यालयाचे कुलगुरु श्री. जयकर यांनीं लोणावळ्यास भाषण करीत असतां महाराष्ट्राला सध्यां प्राप्त झालेल्या अवनतदशेबद्दल विषाद व्यक्त केला होता. देशाच्या राजकारणामध्यें महाराष्ट्राला कांहीं स्थान राहिलेलें नाहीं, महाराष्ट्र चें नाव मागें पडत चाललें, अशा अर्थाचे निराशेचे उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडले असावेत, असें त्यांच्या भाषणाचा जो त्रोटक अहवाल मी वाचला त्यावरून समजून आलें. श्री. जयकरांचें महाराष्ट्राच्या परिस्थितीसंबंधींचें हें मत त्यांचें एकट्याचेंच आहे कीं काय? मला वाटतें कीं, महाराष्ट्राच्या उत्कर्षाची आस्था ज्यांच्या ज्यांच्या चित्तांत वसत असेल, ते सर्व श्री. जयकरांच्या मतांशीं सहमत होतील.

## तसू तसू पिछेहाट !

महाराष्ट्रावर आघात तर सारखे होतच आहेत. दार कमिशनचा अहवाल, श्री. मुनशींनीं आपल्या वक्तव्यांतून सूचित केलेल्या आगामी घटना या आमचें नशीब उत्तरोत्तर अधिकच खडतर होत जाणार असें स्पष्ट दर्शवीत आहेत. परप्रांतांतून आणि मध्यवर्ति सरकारांतून महाराष्ट्रीयांबद्दलची साशंकवृत्ति वाढत चालल्याचें सुज्ञांच्या प्रत्ययास आलें असेलच पण नुसती हळहळ व्यक्त करून यांतून मार्ग निघणार कसा ? **आमची वर्तमान दुरवस्था संपून महाराष्ट्राचें पाऊल पुढें कसें पडेल याच्या विचाराला आम्ही जोंपर्यंत नेटानें लागलों नाहीं, तोंपर्यंत आहे ही परिस्थिति सुधारण्याची आशा करणें व्यर्थ आहे.** महाराष्ट्रांत विद्वान व विवेकी पुरुष कांहीं थोडेथोडके नाहींत. त्यांना हा प्रांत तसू तसू मागें हटत चाललेला आहे याची जाणीवहि झालेली असेल. परंतु या जाणीवेमुळें त्यांच्या मनाला घोर लागलेला दिसत नाहीं. या शतकाच्या प्रारंभीं आमचीं विद्वान माणसें अल्पायुषी कां याचा मोठा खल सुजाण व थोर मंडळींनीं केला होता. तसा खल पुनरपि करण्याचा समय आतां आलेला आहे असें मला मनापासून वाटतें.

आपली पिछेहाट होत असल्याची जाणीव झाली कीं, तिच्यापासून दोन प्रकारच्या प्रतिक्रिया संभवतात. एक वैतागाची, निष्फळ व पिसाट प्रतिकाराची किंवा दूरदर्शी, व्यापक व विधायक उपाययोजनेची. यापैकीं दुसऱ्या प्रेरणेनें महाराष्ट्र भरावा ही गोष्ट मला इष्ट वाटते. महाराष्ट्रांतील थोर बुद्धीच्या व थोर विचाराच्या मंडळींनीं एकत्र येऊन या गंभीर प्रश्नाच्या निदान विचाराला तरी लागावें म्हणून पुढील चार शब्द लिहीत आहें. माझ्या प्रतिपादनांत समाजवादी दृष्टिकोण आढळला, तर तो मी माझ्या पक्षाचें राजकारण पुढें घुसडण्यासाठीं मांडीत आहें असा गैरसमज कोणी करून घेऊं नये. प्राप्त परिस्थितीचें चित्र मला कसें दिसतें आणि त्यांतून बाहेर पडण्याचा संभाव्य मार्ग कोणता तें सूचित करावें इतक्याच हेतूनें हें लिहिलेलें आहे. विचारविमर्शानंतर कांहीं नव्या विचारांची यांत भर पडेल हें सांगावयास नकोच.

## राजकारणाची मिरासदारी

१९२० सालापासून, म्हणजे लोकमान्यांच्या निधनापासून, महाराष्ट्राचें राजकारणांतलें अग्रेसरत्व संपुष्टांत आलें, असें सर्वसामान्यपणें समजण्यांत येतें; आणि तें बहुतांशीं योग्यच आहे. अर्थकारणाच्या बतींतली महाराष्ट्राची गाडी, सरंजामदारी संपून नव्या धर्तीची भांडवलशाही अर्थव्यवस्था

हिंदुस्थानांत निर्माण होऊं लागली, तेव्हांच चुकली होती. पण इंग्रजांविरुद्ध मोर्चे उभारण्याची हिंमत मांडवलवाल्यांत नव्हती आणि जनतेचा 'थंड गोळा' होऊन पडलेला होता. त्या जमान्यांत देशाच्या मध्यम वर्गावरच इंग्रजी सत्तेविरुद्ध मवाळ, जहाल अथवा उग्रजहाल अशा ज्या कांहीं चळवळी होत्या त्या करण्याची जबाबदारी आलेली होती. हिंदुस्थानांतील सर्व प्रांत पाहिले तर मध्यम वर्गाचें बळ ज्या प्रांतामध्यें विशेष होतें त्या बंगाल व महाराष्ट्राकडेच तीस चाळीस वर्षें राजकारणाचीं सूत्रें होतीं असें दिसून येतें. या दोन प्रांतांपैकीं देखील महाराष्ट्रांतला मध्यमवर्ग कमी भावनावादी, राजकारणाला अधिक सरावलेला, अधिक धीमा व कणखर असल्यामुळें रानडे, गोखले व टिळक यांच्या नेतृत्वाखालीं त्यानें हिंदी राजकारणाचीं सूत्रें महाराष्ट्रांतून हालवलीं. ठोकळ मानानें १८८० ते १९२० पर्यंत अव्याहत टिकलेली ही राजकीय मिरासदारी कायमचीच आपल्याकडे राहील अशा भ्रमांत महाराष्ट्रीय होते. इतक्यांत लोकमान्यांचें देहावसान झालें आणि सूर्य मावळल्यावर त्याच्या प्रकाशांत झगझगीत दिसणारें वस्तुजात काळवंडून जावें तशीच कांहींशी स्थिति महाराष्ट्राचीहि झाली.

## राजकीय मन्वंतराची घडी

**१९२० सालच्या सुमाराला लोकमान्य न वारते तरी देखील महाराष्ट्राच्या हातची ही राजकीय मुखत्यारी टिकली नसती, असें माझें नम्र मत आहे. कारण तोंपर्यंत देशांतील समाजघटनेचें अंतरंगच बदललें होतें.**

स्वदेशीच्या निवाऱ्याखालीं मूळ धरलेला देशी कारखानदार वर्ग १९१४ ते १९१८ च्या महायुद्धांतील तेजीचें खतपाणी खाऊन चांगला पुष्ट झालेला होता आणि युरोपांतील रशियन क्रांतीची चाहूल येथें येऊन थडकल्यामुळें, लोकमान्यांच्या अव्याहत प्रयत्नांनीं डोळ्यावरची झांपड उडालेला जनताजनार्दन देशांतील घडामोडीकडे कान टवकारून पाहूं लागला होता. राजकीय मन्वंतराची ती घडी होती. त्या परिस्थितींत देशी भांडवलदारांच्या वाढत्या आकांक्षांना व नवजागृत जनतेच्या मगदुराला एक पाऊल पुढें नेणारी वाट जो दाखवील त्याच्याकडे पुढारीपण जाणें क्रमप्राप्त होतें. जो अप्रस्तुत वर्गकलह चेतवणार नाहीं आणि साम्राज्य सरकारवरचें दडपण सतत दाटसीत नेईल अशा नेत्याची जनता वाट पाहात होती. महात्मा गांधींच्या रूपानें या सर्व अपेक्षा पुऱ्या करणारा नेता जनतेला लाभला आणि मग भगीरथाच्या मागोमाग पूर्वसागरापर्यंत गंगाप्रवाह गेला त्याप्रमाणें या आधुनिक भगीरथाच्या मागोमाग १९२० सालापासून १९४७ सालापर्यंत सतत सत्तावीस वर्षें ही जनता जान्हवीसारखी वहात राहिली आणि स्वातंत्र्यसागराला मिळाली.

## महाराष्ट्रीय राजकारणाच्या तीन फळया

पण या घटनेच्या वेळीं महाराष्ट्रांतील राजकीय दृष्ट्या जागृत गटामध्यें तीन फळया पडल्या. राष्ट्राच्या राजकीय जीवनाचा मुख्य प्रवाह कोणत्या गतीनें, कोणत्या दिशेनें, कोणत्या अंतस्थ प्रेरणेनें वाहात चालला आहे हें ज्यांनीं जाणलें ते कॉंग्रेसमध्येंच राहिले; पण हें ज्यांनीं जाणलें नाहीं ते एकांतिक डावी भूमिका घेऊन कम्युनिस्ट पक्षांत तरी गेले किंवा एकांतिक उजवी भूमिका पत्करून प्रतिसहकार पक्षांत तरी गेले. आणि या दोन्ही पक्षांनीं राष्ट्रीय नेत्यांना विरोध, कॉंग्रेसची कुचेष्टा आणि राष्ट्रीय लढ्याविषयीं जनतेचा बुद्धिभेद करण्याचें कार्य सतत चालविलें. रानडे, गोखले व टिळक यांच्या अमदानींत कॉंग्रेसपासून जरा फटकूनच राहिलेला महाराष्ट्रातील बहुजन असा मराठा शेतकरी समाज मात्र स्थूलमानानें १९२४ सालानंतर कॉंग्रेसकडे आकृष्ट होऊं लागला आणि १९३०-नंतर तर तो कॉंग्रेसशीं एकजीव झाला. पण आपल्या प्रांतांतील पांढरपेशा मध्यमवर्गीयांचें संपूर्ण हार्दिक पाठबळ राष्ट्रसभेला कधींच मिळालें नाहीं, ही मात्र वस्तुस्थिति आहे.

विशेष आश्चर्याची आणि दुःखाची गोष्ट अशी कीं, १९४७ सालीं स्वातंत्र्य पदरात पडल्यानंतर

तरी आत्यंतिक उजव्या व डाव्या गटांतील महाराष्ट्रीय पुढारी आपल्या भूमिकेंत व कार्यपद्धतींत फरक करतील आणि आपल्या विरोधाच्या लाटा लोकशाहीच्या सीमा तोडून पलिकडे जाणार नाहींत अशी खबरदारी घेतील अशी आशा वाटत होती. पण तीहि फोल ठरली.

## संघसैनिक, कम्युनिस्ट व भांडवलदार

स्वतःला टिळकांचे सच्चे अनुयायी म्हणवणाऱ्यांच्या मनोवृत्तींतून जी कार्यप्रणाली वाढत गेली तिच्यांतून गांधी--वधासारखें पितृहत्येचें पाप जन्माला आलें आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघटनेसारखी स्वातंत्र्यलढ्यापासून संपूर्ण पराङ्मुख आणि स्वातंत्र्योत्तर लोकशाहीस संपूर्ण विघातक अशी संघटना अवतीर्ण झाली. महाराष्ट्रांतील शेंकडों तरुण आज त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणालाहि न समजणाऱ्या अशा ध्येयासाठीं श्री. गोळवलकर गुरुजींच्या आज्ञेनुसार दिव्यावर झडप मारून स्वतः जळून जाणाऱ्या कीटकाप्रमाणें आपली बुद्धि-शक्ति जाळून घेत आहेत.

तिकडे कम्युनिस्टांचा विरोधहि कळसाला पोंचला असून भाई रणदिव्यांच्या आदेशानुसार नेहरू सरकारविरुद्ध 'तेलंगणी पद्धतीचें' सशस्त्र युद्ध खेळण्यात कम्युनिस्ट पक्ष स्वतःला धन्य समजत आहे आणि आपल्या मताचे जे कोणी नाहींत त्या इतर पक्षांच्या कार्यकर्त्यांना गोळ्या घालण्यासहि त्यांना दिक्कत वाटत नाहीं. १९०८ सालीं चेम्सफर्डसाहेबांच्या कारकीर्दीत जीं हत्यारें वापरलीं व जें तत्त्वज्ञान आपण घेतलें तेंच नथूराम, त्याचे सहकारी व त्याचे चहाते अजून सांगत आहेत.

१९२० सालापासून १९४५ पर्यंत इटली, जर्मनी व जपान यांचा फाशीवाद जन्मला, वाढला व सर्व देश बरोबर घेऊन रसातळालाहि पोंचला, तरी आमचे संघसैनिक आपल्या संघटनेचा फेरविचार करण्यास तयार होत नाहींत; आणि हुकूमशाहीमुळें एकाद्या पक्षाला सत्ता उपभोगतां आली, तरी खरा समाजवाद प्रस्थापित होणें शक्य नाहीं, हें गेल्या तीसपस्तीस वर्षांच्या इतिहासानें दाखविलें असूनहि आमचे कम्युनिस्ट मित्र लोकसत्तेचा मार्ग बुद्धिपुरःसर टाळीत आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, या दोन्ही गटांचे मुखंड व प्रमुख चळवळ्ये महाराष्ट्रीय आहेत.

भांडवलशाहीचा भरभराटीचा काळ संपलेला असून तिचा अस्तकाळ समीप आलेला आहे हें देशांतील व दुनियेंतील अर्थव्यवहाराकडे लक्षपूर्वक पाहाणाऱ्यांना सहज समजण्यासारखें असताहि आमचे महाराष्ट्रांतील किरकोळ भांडवलदार मात्र मारवाडी, गुजराथी व पारशी भांडवलदारांचे कित्तेच नव्या जोमानें गिरवूं पहात आहेत.

## गोंधळलेला, हतबुद्ध व तर्कटी

त्यामुळें आजचा महाराष्ट्र विचारानें गोंधळलेला, निराशेनें हतबुद्ध झालेला, चुकीच्या दृष्टिकोणामुळें तर्कटी बनलेला, मनानें दरिद्री व कर्मानें बेफाम असा दिसत आहे.

माझ्या ठिकाणीं खरोखरच प्रांतीय दुरभिमान नाहीं. पण हिंदुस्थानांतील इतर सर्व प्रांतांत फिरून आल्यावर मला ही गोष्ट मनोमन पटलेली आहे कीं, महाराष्ट्रांतील अस्पृश्य वर्गापासूनच्या सर्व थरामध्यें जितकीं बुद्धिमान, कर्तृत्ववान, त्यागी, कामसू व जागृत माणसें आढळतात तितकीं इतरत्र नाहींतच. एवढी शक्ति असलेला प्रांत मागें कसा पडला असें कोणी म्हणतील. त्यावर इतकेंच उत्तर आहे कीं, ज्ञानाची घमेंड, सहकारी प्रयत्नांचा अभाव, वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांच्याकडे पाहण्याची चुकीची दृष्टि यांच्या योगानें अनेक कर्तृत्ववान देशहि धुळीस मिळालेले आहेत. जर्मनी व जपान हीं या प्रकारच्या अवनतीचीं उत्कृष्ट व ताजीं उदाहरणें होत.

## मीमांसा म्हणजे उपाययोजना नव्हे

महाराष्ट्रात लोकमान्यांच्यानंतर बौद्धिक अराजक माजल्याकारणानें महाराष्ट्र मागें पडला अशी महाराष्ट्राच्या पिछेहाटीची मीमांसा श्री. माडखोलकर यानीं केलेली आहे. पण मीमांसा म्हणजे उपाययोजना नव्हे. दुसरे लोकमान्य निर्माण होई-

पर्यंत हात जोडून वाट पहात बसणेंहि शहाणपणाचें ठरणार नाहीं. मग प्राप्त स्थिति म्हणजे आमच्या सामुदायिक शहाणपणाला व कर्तृत्वाला आव्हान आहे असें मानून महाराष्ट्रांतील विचारवंतांनीं आपल्या प्रांताचें घसरलेलें व कलंडलेलें गाडें सावरून तें चालवण्याचा यत्न करावयास नको काय ?

देशामध्यें पुन्हां एकवार मनु पालटत आहे. हिंदुस्थानात इतःपर स्थापन होणारी समाजरचना शक्य तितकी आपल्या वर्गाला अनुकूल व्हावी म्हणून देशांतील धनिक व श्रमिक वर्गांमध्यें कसोटीचा सामना सध्यां चालू आहे. अशा या संधिकालात महाराष्ट्राचें स्थान काय? महाराष्ट्र समाजांत पांढरपेशा मध्यमवर्ग व शेतकरी मध्यमवर्ग हेच खरे बलशाली गट आहेत. देशाच्या या संक्रमणावस्थेंत हे मध्यम वर्गीय गट जी भूमिका पत्करतील, ज्या मार्गानें ती भूमिका पार पाडावयाचें ठरवतील, त्यावर महाराष्ट्राचें भवितव्य अवलंबून राहील असें मला वाटतें.

## समाजवादाच्या मार्गानें जाणार कीं-?

एक गोष्ट महाराष्ट्रानें पक्की ठरवली पाहिजे. ती अशी कीं, डाव्या अथवा उजव्या गटाच्या अतिरेकी मार्गाचा अवलंब आपण केला, तर केवळ प्रांतघाताच्या पातकाचेंच नव्हे तर राष्ट्रघाताच्या पातकेचेंहि आपण धनी होऊं; म्हणून यानंतर यावच्छक्य लोकसत्ताक मार्गानींच आपणाला जावयाचें आहे.

ही साधनांची मर्यादा ठरल्यानंतर आम्हांला पुढचा विचार केला पाहिजे. तो हा कीं, आम्ही "बहुजनसुखाय-बहुजनहिताय" अशा समाजवादाच्या मार्गानें जाणार, कीं प्रस्तुनची विषमतेवर आधारलेली समाजरचना टिकवून धरण्यासाठीं जो धनिक वर्ग प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे त्याला आम्ही स्वतःच पिळले जात असतांहि सहाय्य करीत राहणार ? म्हणजे भांडवलदाराच्या कारखान्यांत मजूर व हमाल, त्याच्या घरीं रामा गडी व आचारी, त्यांच्या कचेऱ्यांतून क्लर्क व हेडक्लार्क आणि त्यांच्या वृत्तपत्रांतून सागकामे संपादक व बातमीदार म्हणून आम्ही राहणार आहोंत, कीं जनतेचे सेवक म्हणून राष्ट्रांतील इतर नागरिकांच्या बरोबरीचे नागरिक म्हणून येथें मानानें वागतां येईल असें नवराष्ट्र व असा नवसमाज बनवण्यासाठीं आमची बुद्धि व कार्यशक्ति वेचणार आहों ? **कारखाने, छापखाने, वृत्तपत्रें, शेती इत्यादि सर्व उद्योगधंदे सहकारी पद्धतीनें चालवण्यास अनुकूल अशीच महाराष्ट्राची आर्थिक व सामाजिक रचना आहे. कारण येथें जशी आत्यंतिक आर्थिक विषमता नाहीं, तशीच आत्यंतिक सामाजिक विषमताहि नाहीं.** म्हणून लोकसत्ताक आणि समाजवादी हिंदुस्थान स्थापण्याच्या कार्यांत महाराष्ट्रानें अग्रसर व्हावें आपला भविष्यकाळ उज्ज्वल करावा, अशी माझी इच्छा आहे.

तें महाराष्ट्राला न पटलें तर १८८० च्या सुमारास उद्योगधंद्याच्या बाबतींत महाराष्ट्राची गाडी ज्याप्रमाणें चुकली, १९२० च्या नंतर आमची राजकीय गाडी जशी चुकली, त्याचप्रमाणें आतां आमची भवितव्याची गाडीच कायमची चुकून, इतरांच्याकडे खटपटये, आचारी, पहारेकरी म्हणून राहाण्याची पाळी आमच्यावर येईल असें मला वाटतें.

## एकोप्यानें विचारविनिमय करूं या

परिस्थिति पार बिघडली नाहीं तोंच आपण सर्व विचारवंतांनीं एकत्र येऊन अंतःकरणाच्या तळमळीनें विचार करावा. एवढ्याच हेतूनें हें पत्र लिहिलें आहे. कांहीं किमान बाबतींत तरी आमच्यात एकमत होतें कीं नाहीं तें आम्ही न कचरतां पहावयास हवें. **पुढच्या पांचपंचवीस वर्षांत देशाची प्रगति कोणीकडे होइल त्याची स्थूल आंखणी नजरेसमोर आणून आपल्याला महाराष्ट्राचा मार्ग निश्चित करावा लागेल. एवढेंहि होणार नसेल आणि पेशवाईतील सैन्याप्रमाणें आमचा साराच कारभार बेताल व बिनमेळ राहाणार असेल तर पुढें काय वाढून ठेवलें आहे तें दिसतच आहे.**

गांधीवधानंतर प्रक्षोभ उठला कीं, थोडा विचार होतो. संयुक्त महाराष्ट्राची मागणी धुडकावून लावली कीं, जरा मनस्ताप होतो. मुंबई तुम्हाला मिळणार नाहीं असें म्हटलें कीं, जरा चीड येते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघांतले आपले सगेसोयरे तुरुंगांत अडकले कीं, सरकारकडे मध्यस्तीसाठीं धांवपळ सुरू होते. इकडे परप्रांतीय भांडवलदार आम्हाला पिळतात म्हणून जिवाचा संताप होतो, तर तिकडे संयुक्त महाराष्ट्र झाला तर बहुजन-समाज आपणाला खाऊन टाकील कीं काय ही भीति वाटते. त्यांतल्या त्यांत कोकणच्या मनांत देशाबद्दल अढी, विदर्भी बंधूंच्या मनांत पुण्याबद्दल शंका हे प्रकार आहेतच. या सर्व गोष्टींचा मूलभूत कांहीं विचार व्हावयास हवा कीं नको ? या सर्व घडामोडींच्या व हेव्यादाव्यांच्या बुडाशीं ज्या गोष्टी असतील त्याचा नुसता विचार नव्हे तर त्या नष्ट करण्यासाठीं कोणता आचार केला पाहिजे त्याची रूपरेषा ठरवावयास हवी कीं नको ? हें सर्व आपणांसारख्या सुज्ञांनीं स्वर्थानीत दृष्टीनें केलें नाहीं तर दुसरें कोण करील ? म्हणून हें पत्र लिहिण्याची धृष्टता करीत आहें

ना. ग. गोरे

ग्रंथ संग्रहालय ठाणे
८६३८

: १ :

# संयुक्त महाराष्ट्राचें राजकारण

लेखक : शं. द. जावडेकर

श्री. संपादक मौज यांसः

स. न. वि. वि.

वरील विषयावर लेख लिहिण्यासंबंधीं आपलें पत्र व श्री. गोरे यांचा सोबतचा लेख योग्य वेळीं पोहोंचलें. या विषयासंबंधींचे माझे विचार थोडक्यांत पुढें देत आहें.

(१) श्री. ना. ग. गोरे यांचा लेख मला सर्वस्वीं पसंत आहे. विशेषतः महाराष्ट्रानें लोकशाही समाजवादी भारत निर्माण करण्यांत अग्रेसर बनण्याचा निर्धार करावा; म्हणजे महाराष्ट्र पुनः अखिल भारतीय नेतृत्व करूं लागेल व त्याला भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार आपल्या प्रांताचीहि घडण बनविण्यांत यश येईल, अशी त्यांची विचारपद्धति मला फार बरोबर वाटली.

(२) १९०५ सालीं वंगभंगाचा प्रश्न बंगालपुढें उभा राहिला. त्यावेळीं बंगालमधील राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं त्या संकुचित चळवळींतून हिंदी स्वातंत्र्याची चळवळ उभारली, आणि अ. भा. राजकारणात अग्रस्थान पटकाविलें. त्यांत त्या पुढाऱ्यांचें बुद्धिचातुर्य, मुत्सद्देगिरी व राष्ट्रीय क्रांतिकारक दृष्टि प्रकट झाली. तसाच प्रसंग आज महाराष्ट्रावर आला आहे. यावेळीं महाराष्ट्रानें संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींतून भांडवलशाहीविरोधी समाजवादी क्रांतिशक्ति निर्माण केली पाहिजे. मात्र श्री. गोरे यांनीं म्हटल्याप्रमाणें ही क्रांतिशक्ति कम्युनिस्टांच्या किंवा हिंदुत्वनिष्ठांच्या सशस्त्र क्रांतिवादापासून व दहशतवादापासून पूर्णपणें अलिप्त ठेविली पाहिजे. तिला आग्रहपूर्वक व निष्ठापूर्वक लोकशाहीच्या व अनत्याचाराच्या मार्गावरच ठेविलें पाहिजे.

(३) श्री. गोरे म्हणतात कीं महाराष्ट्रांतील ब्राह्मणापासून महारापर्यंतचे समाजाचे सर्व थर जितके जागृत आहेत तितके इतर कोणत्याहि प्रांतांतील लोक जागृत नाहींत. हें मला मान्य

आहे. पण यांत एक गोम आहे. महाराष्ट्रांतील ब्राह्मण-मराठे-महार हे तीन सामाजिक थर एका सूत्रात गोवणारा राजकीय पक्ष निर्माण होऊं नये, अशाच पद्धतीनें ही महाराष्ट्रांतील जागृति झालेली आहे. महाराष्ट्राच्या मार्गांतील खरी अडचण ही आहे.

( ४ ) वरील अडचण नसती तर काय झालें असतें, त्याचा आपण थोडा विचार करूं. डॉ. आंबेडकर, श्री. जेधे-मोरे, डॉ. धनंजयराव गाडगीळ हे चारहि लोक लोकशाही समाजवादाचेच पुरस्कर्ते आहेत. या सर्वांचा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीस पूर्ण पाठिंबाहि आहे. हे चौघे आणि मुंबईतील श्री. ना. म. जोशी, अशोक मेहता आणि युसुफ मेहेरअली हे तिघे असे सात इसम एकत्र येतील, व एक पक्षासारखे वागूं लागतील, तर त्यांना सर्व मुंबई इलाख्यांत आपल्या मताचें मंत्रिमंडळ स्थापण्याइतकें बहुमत मुंबई प्रांतिक असेंब्लींत मिळवितां येईल, अशी माझी कल्पना आहे. मुंबई इलाख्याचें मंत्रिमंडळ जर अशा प्रकारें समाजवादी बनलें, तर महागुजरातवाले " आम्हांस स्वतंत्र प्रांत द्या, आम्ही मुंबई-इलाख्यांतून बाहेर पडतों " असा आग्रह धरतील. तात्पर्य महाराष्ट्रातील महार, मराठे व ब्राह्मण लोकशाही समाजवादाच्या भूमिकेवर एक होतील, तर संयुक्त महाराष्ट्राचें राजकारणहि यशस्वी होईल आणि महाराष्ट्र अ. भा. राजकारणात पुनः आघाडीवर येईल. आहे तसा मुंबई इलाखा समाजवादी निष्ठेच्या लोकांनीं हस्तगत केला कीं, आज जे भाषावार प्रांतरचनेस विरोध करीत आहेत, तेच त्या रचनेस अनुकूल बनतील. पण ही घटना घडण्यास वरील सर्वांनीं एक दिलानें वागून राष्ट्रसभापक्षाचा पाडाव या इलाख्यापुरता केला पाहिजे. या सर्व गोष्टी घडण्यास कोणताहि बेमनदशीर किंवा आततायी मार्ग स्वीकारण्याचें कारण नाहीं. शुद्ध सनदशीर लढ्यानेंच हें घडेल.

(५) संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळतून अ. भा. समाजवादी राजकारण प्रभावी बनविण्याचा हा मार्ग जर श्री गोरे यांना पटेल, तर त्यांनीं वरील सात व्यक्तींचें एक इलाखा निवडणूक मंडळ स्थापन करण्याचा प्रयत्न करावा व इलाख्याचें राजकारण या मंडळाकडे देऊन त्याचा पाठिंबा अ. भा. राजकारणांत समाजवादी पक्षास मिळवावा. ज्यांना काँग्रेसच सर्व प्रश्नांप्रमाणें संयुक्त महाराष्ट्राचाहि प्रश्न सोडवील असें वाटतें, त्यांना अर्थात् वरील सूचना पटणार नाहीं. त्यांनीं आपल्या श्रद्धेप्रमाणें कार्य करावें व निवडणुकीपूर्वी हा प्रश्न सोडवून दाखवावा. या कामीं इतर पक्षांनीं त्यांच्या प्रयत्नांस पाठिंबा द्यावा. त्यांनीं या मुद्यावर काँग्रेस सोडावी अशी अपेक्षा कोणी करूं नये. तसेंच त्यांनीं निवडणुकीपूर्वी संयुक्त महाराष्ट्र मिळवून दिला म्हणजे इतर पक्षीयांनीं आपले पक्ष सोडून काँग्रेसपक्षालाच पाठिंबा द्यावा अशी अपेक्षा काँग्रेसवाल्यांनीं धरूं नये. संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला तरी त्याची आर्थिक गुलामगिरी समाजवादाच्या स्थापनेवाचून नष्ट होणार नाहीं. म्हणून संयुक्त महाराष्ट्र मिळो किंवा न मिळो, हा प्रांत समाजवादी बनला, तरच त्याचें दास्य नष्ट होईल. यासाठीं वरील प्रकारची लोकशाही समाजवादी आघाडी निर्माण केलीच पाहिजे. जोंपर्यंत समाजवाद मान्य नसणारांना त्या पक्षांतून बाहेर काढण्यांत आलें नाहीं, तोंपर्यंत महाराष्ट्रानें काँग्रेसपक्षाविरुद्ध समाजवादी आघाडी लढविलीच पाहिजे.

( ६ ) प्रामाणिक मतभेदावर उभारलेले पक्षभेद असल्यानें महाराष्ट्र मागें पडेल, ही भीति भ्रामक आहे. गोखले–टिळक यांच्या मतभेदामुळें महाराष्ट्र मागें पडला नाहीं. पण जमातवादी अधिष्ठानावर पक्षभेद माजले तर महाराष्ट्र मागें पडेल, किंबहुना तो नामशेषहि होईल ! काँग्रेस पक्ष व समाजवादी पक्ष असे दोन पक्ष आज सर्व प्रांतांत आहेत, व तसे ते या प्रांतांतहि असावेत. या दोनहि पक्षांचें धुरीणत्व महाराष्ट्रानें मिळविलें, म्हणजे अर्थातच महाराष्ट्र पुढें येईल. त्यासाठीं श्री. देव किंवा

(पान १२३ पहा)

: २ :

९५४०७ ४१:१ ३/१/५४

# सर्वपक्षीय महाराष्ट्रीयांनीं एकत्र विचार करावा

लेखक . डॉ. धों. के. ऊर्फ अण्णासाहेब कर्वे

मी 'मौज' साप्ताहिकाचा नेहमींचा वाचक नाहीं. मुम्बईस असतां सहजगत्या तो अंक माझ्या नजरेस पडला व चाळून पाहतां हा लेख आढळला. तो मीं समग्र वाचला. त्यावेळीं आपण कांहीं त्या संबंधानें लिहावें असें मनांत आलें नाहीं. मात्र महाराष्ट्राच्या अवनत दशेची पुन्हां जाणीव होऊन वाईट वाटलें. राजकारण, अर्थकारण, व्यापार वगैरे क्षेत्रांतील महाराष्ट्रीय पुढाऱ्यांचे लेख मिळवून ते एकत्र करून प्रसिद्ध केल्यास लोकमत बनण्याचे कामीं त्यांचा उपयोग होईल असें मला वाटतें; व मौजेच्या संपादकानीं तो उपक्रम केल्याचें पाहून मला आनंद झाला. वास्तविक एका संकुचित क्षेत्रांत अल्पस्वल्प काम करणारा मी. ह्या प्रांगणांत उतरण्याचें आपलें सामर्थ्य नाहीं हें मी जाणून आहें. परन्तु मौजेच्या संपादकांचें त्या लेखाच्या कात्रणासहित विनंतिपत्र आल्यामुळेंच पुढील चार ओळी लिहित आहें.

## मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र

कोणत्याहि पक्षाशीं एकरूप न होतां तटस्थ वृत्तीनें राहून सहजगत्या वाचनांत आलेल्या व ऐकलेल्या गोष्टींवर आधारलेले माझे समज आहेत. ते साधकबाधक गोष्टींची माहिती मिळवून बनवलेले नाहींत. भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. कलकत्ता शहर बंगाल प्रांतापासून वेगळें करावें असें कोणी म्हणत नाहीं. त्याच प्रमाणें मद्रास तामीळ प्रांतांत व मुंबई महाराष्ट्रांत राहिली पाहिजे. भाषावार प्रांतघटना राष्ट्राच्या उत्कर्षास पोषकच ठरतील. त्यामुळें प्रत्येक प्रांताचा उत्कर्ष होऊन राष्ट्राच्या उत्कर्षालाहि मदतच होईल. त्यामुळें निरनिराळे प्रांत आपापसांत भांडतील हें म्हणणें निरर्थक आहे. आज मात्र भिन्न भाषिक गट एकत्र झाल्यामुळें तसें घडून येत आहे. पाकिस्तान वजा करून राहिलेल्या हिंदुस्थानचें संघराज्य बनलें आहे. हे घटक जितके एकजिनसी बनतील तितकें इष्ट आहे.

दुबळ्या बनलेल्या हिंदुसमाजाला स्व-संरक्षण-क्षम करण्याचें उत्कृष्ट कार्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून घडत होतें. हिंदूंमध्यें स्वभावतःच आक्रमक वृत्ति नाहीं. स्वतःच्या संरक्षणाची पात्रता अंगीं असणें आवश्यक आहे, आणि ती पात्रता मध्यम वयाच्या माणसांनाहि लाठी-काठीचें शिक्षण देऊन त्यांच्या अंगीं आणण्याचें संघीयांकडून होत होतें. संघावरील बंदी उठवून त्याजकडून पुन्हां हें कार्य सुरू झाल्यास फार चांगलें होईल.

## सरकारी तत्त्वावर कारखाने हवेत

महाराष्ट्रांत मोठाले महाराष्ट्रीय भांडवलदार नाहींतच असें म्हटलें तरी चालेल. जे थोडेसे कारखाने डोकें वर काढताहेत, त्यांना उत्तेजनच मिळालें पाहिजे. अनेकांच्या पोटापाण्याचा प्रश्न त्यामुळें सुटत आहे. सहकारी तत्त्वावर जितके नवीन कारखाने निघतील, तितके पाहिजेतच.

अलीकडे महाराष्ट्रीय उद्योगधंद्यांत व व्यापारांत मन घालूं लागले आहेत, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. एकमेकांपासून फटकून वागण्याची महाराष्ट्रीयांची प्रवृत्ति कमी होईल, तर फार चांगलें होईल; व त्यांना उद्योगधंद्यांत यश मिळूं लागेल.

आजची देशाची स्थिति काळजी करण्यासारखी झाली आहे. राज्याचीं सूत्रें ज्यांच्या हातांत आहेत, त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावें लागत आहे. सद्हेतूनें कां होईना, पण त्यांच्या अडचणी आज वाढवणें घातक आहे. एक दोन वर्षें दम धरून स्थिरस्थावर होईपर्यंत कांहीं प्रश्न थोपवून धरणें इष्ट होईल. विधायक टीका व सूचना जरूर कराव्या, पण उतावळेपणानें हातघाईवर येऊं नये.

कम्युनिस्ट चळवळ सगळ्या जगावर पसरत आहे; व महाराष्ट्रांतहि तिनें मूळ धरलें आहे. त्यांच्या ध्येयाबद्दल तक्रार नाहीं. पण त्यांचे मार्ग आजच्या परिस्थितींत बिघाड उत्पन्न करणारे आहेत.

### जातिभेदाचा शाप

वेगवेगळ्या पक्षांतील लोक आपापल्या परीनें राष्ट्राच्या हितासाठींच झगडत आहेत. प्रत्येक पक्षांत स्वार्थ साधण्यासाठीं धडपडणारे कांहीं असतील, पण प्रामाणिकपणें देशहिताच्या बुद्धीनेंच विचारपूर्वक त्यांत पडलेले असे बरेच असणार. जन्मावर आधारलेला जातिभेद हा आपल्या देशाला शाप आहे. हा भेद महाराष्ट्रांत जितका तीव्र आहे तितका दुसऱ्या कोठेंहि नसेल. भाषावार प्रांतरचनेसंबंधानें ज्याप्रमाणें भिन्नप्रांतीय व भिन्नपक्षीय लोकांनीं एकत्र होऊन कार्याचा उठाव केला, त्याप्रमाणें महाराष्ट्राविषयीं आपुलकी असणाऱ्या भिन्नपक्षीय व भिन्नजातीय विचारवंतांनीं व कार्यकर्त्यांनीं एकत्र येऊन जर विचारविनिमय केला, व महाराष्ट्राच्या उत्कर्षाचा मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न केला, तर त्यापासून थोडी तरी कार्यनिष्पत्ति झाल्यावांचून रहाणार नाहीं.

## : ३ :

# राजकारण पुरे, सामाजिक सहकारी चळवळ पाहिजे

लेखक : व. ग. देशमुख

महाराष्ट्रांतील प्रसिद्ध समाजवादी कार्यकर्ते साथी ना. ग. गोरे यांनीं 'मौजे'च्या ९ फेब्रुवारीच्या अंकांत महाराष्ट्रांतील विचारवंतांना उद्देशून लिहिलेलें पत्र ज्यांना ज्यांना महाराष्ट्राच्या उन्नतीबद्दल कळकळ आहे, आस्था आहे, त्यांना त्यांना, त्या पत्रांतील महाराष्ट्राच्या उन्नतीच्या कळकळीमुळें, हृद्य वाटेल यांत शंका नाहीं. त्यांत सांगितलेली आणीबाणीची परिस्थिति सर्वांना पटावी आणि अकर्मण्यांतून उठून उन्नतीच्या मार्गानें सहकार्यानें कांहींतरी करायच्या तयारीला लागण्यासाठीं मारलेली हांक ऐकूं यावी. मात्र यावेळीं वादळें आणि चर्चा पुरेत. नाहींतर कसलेंहि निमित्त दीर्घकालपर्यंत वादांना पुरावें इतकी आमची बुद्धि तल्लख आहे. कसल्यातरी निमित्तानें वादाचा धुरळा उडून बुद्धिवंतांच्या वादपटुतेची रग जिरावी, वृत्तपत्रांनाहि चांगला खुराक मिळावा आणि वर्षे

सहा महिन्यांनीं धुरळा शांत झाला कीं आम्ही पुन्हां स्थितप्रज्ञाप्रमाणें सर्व वादांतून अंग झटकून जिथल्या तिथें रहावें, ही आमची परंपरा! परंतु यावेळीं महाराष्ट्राच्या जीवनांत परिस्थिति खरोखरच फार गंभीर आणि आणीबाणीची आहे हें थोडें उघड्या डोळ्यांनीं आजूबाजूला पाहिल्यास कळण्यासारखें आहे.

## त्रिदोष झालेला महाराष्ट्र

राजकारणांत महाराष्ट्र अगदीं पराभूत झालेला आहे. त्यांत त्याचें कांहीं स्थान राहिलेलें नाहीं. आणि त्यामुळेंच राज्यव्यवथेंतहि! यामुळेंच महाराष्ट्राच्या संयुक्त महाराष्ट्रासारख्या न्याय्य, योग्य व जीवनमरणाइतक्या महत्त्वाच्या मागण्याहि दडपण्याचीं कारस्थानें यशस्वी होत आहेत. परप्रांतांत महाराष्ट्रीय द्वेषपूर्ण, मत्सरयुक्त व तुच्छ दृष्टीनें पाहिले जात आहेत. या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं आमचीं सामाजिक व आर्थिक अंगेंहि धड नाहींत. त्यांतहि मोठालीं भगदाडें पडून तीं निकामीं झालीं आहेत. कारण सामाजिक क्षेत्रांत ब्राह्मण–अब्राह्मणवाद किळसवाणेपणानें धुडगूस घालीत आहे; त्यामुळें कुठलाहि परप्रांतीय आमच्या या दुहीचा फायदा घेऊन आमच्या वर्मावर बोट ठेवतो नि आम्हाला खालीं पहावयास लावतो. त्यांतच महाराष्ट्रांतील प्रातिनिधिक बुद्धिवादी व पुढें आलेला वर्ग, राजकारणांतला अपयशी वर्ग आणि बहुजन अब्राह्मणांचा द्वेषविषय झालेला वर्ग एकच असल्यामुळें ही जखम अंतर्बाह्य अधिक तीव्र झाली आहे. आर्थिक बल तर बोलून चालून आमच्या जवळ नाहींच. बहुसंख्य समाज सारा पांढरपेशा मध्यमवर्ग! त्याचें नोकरींतलें हातापोटावरचें जीवन! कोणीहि आमच्याकडे थालीलोटा घेऊन यावें नि आम्हीं त्याला कोट्याधीश करावें. आम्हीं मात्र कर्जाचें व काळजीचें ओझें वहात आणि नसलेल्या बुद्धिवादाचा अभिमान बाळगीत जीवनाचा प्रवास संपवावा. ही आमची परंपरा! या युद्धानें आणि महागाईनें तर मध्यमवर्गाचें नुसतें चिपाट वळलें आहे. उलट याच महागाईनें आणि युद्धानें इतर प्रांतियांना राज्यसत्तेवरहि प्रभुत्व गाजविण्याइतकें आर्थिक बल दिलें आहे. मग त्रिदोष झालेला महाराष्ट्र कसाहि कोणाकडूनहि दडपला गेला तर नवल काय? मात्र आम्हीच आमच्या प्रमादांनीं इतरांना ही संधि दिल्यामुळें उगाच 'अन्याय, अन्याय' म्हणून ओरडा करण्यांत अर्थ नाहीं. अशा वेळीं आम्ही सर्वत्रांनीं नीट विचार करून पुढील नवा मार्ग ठरवायला हवा नि तावडतोब त्या वाटेनें जायला हवें. परंतु आहे त्याच मार्गानें जात राहिलों, तर यापुढें महाराष्ट्राचें भवितव्य खरोखरच भयानक ठरेल. कारण ही वेळ साऱ्या राष्ट्राच्याच इतिहासांत अत्यंत महत्त्वाची आहे. साऱ्या राष्ट्राची पुनर्रचना या वेळीं चालू आहे. अशा वेळीं केवळ मागेच नव्हे तर आमचा न्याय वांटा घेण्यासाठीं दडपले गेलों तर कायमचे दडपले जाऊं, आणि श्री. गोरे म्हणतात त्याप्रमाणें आचारी-पाणकेपणच नशिबीं येईल. यांत कसलीहि अतिशयोक्ति नाहीं. तेव्हां श्री. गोरे यांच्या सूचनेप्रमाणें यावेळीं सर्व विचारवंतांनीं एकत्र येऊन व विचारविनिमय करून पुढील मार्ग आंखणें जरूर आहे.

## संयुक्त महाराष्ट्र परिषदेची आवळ्यांची मोट

पण हें व्हावें कसें? मांजराच्या गळ्यांत घांट कशी बांधली जाणार? महाराष्ट्राच्या दुर्दशेची मीमांसा करतांना श्री. गोरे यांनींच म्हटलें आहे कीं, महाराष्ट्र ज्ञानाची घमेंड, सहकार्याचा अभाव वगैरे गोष्टीमुळेंच मागें पडला. अशा स्थितींत आज या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं तरी सर्व विचारवंत एकत्र कसे येणार? आज महाराष्ट्रांत सर्वांना एकत्र येण्यास एक व्यासपीठ तरी कोठें आहे? संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या निमित्तानें सर्व जण एकत्र आले होते हें खरें आहे, तरी पण तो सर्वपक्षीय एकोप्याचा व एका व्यासपीठाचा केवळ देखावाच होता. कारण त्यांत एकाच प्रश्नाकडे पहाणाऱ्या सर्वांच्या दृष्टि भिन्न होत्या आणि

त्या दार कमिशनच्या अहवालानंतर सुचविण्यांत आलेल्या भिन्न भिन्न उपाययोजनांमुळें व मार्गांमुळें अधिक स्पष्ट झाल्या आहेत. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या श्री. मोरे, श्री. गोरे, श्री. भाऊसाहेब हिरे व व्यंकटराव पवार या निरनिराळ्या पक्षपुढाऱ्यांच्या पत्रकांवरून हें सहज कळण्यासारखें आहे. प्रत्येकाचा मार्ग ज्याच्या त्याच्या राजकीय पक्षाच्या दृष्टिकोनांतून निघालेला. आणि आपापल्या राजकीय पक्षाचा दृष्टिकोन केवळ एवढ्यासाठीं कोण सोडणार? संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या वेळची एकी म्हणजे एका गोणत्यांत भरलेल्या गोट्यांप्रमाणें होती. आणि ही आंवळ्याची बांधलेली मोटहि आतां सुटूं पहात आहे. महाराष्ट्राच्या उत्कर्षाचा विचार करण्यासाठीं जरी सर्व जण जमले तरी प्रत्येकजण आपापल्या राजकीय दृष्टीकोनासहच येणार. आणि आज महाराष्ट्रांतील राजकीय पक्ष किती परस्परविरुद्ध आहेत व त्यामुळें महाराष्ट्र किती भंगला आहे हें सर्वांना माहितच आहे. अशा स्थितींत सर्वानुमतें मार्ग तरी काय ठरणार? या सर्व गोष्टींचा श्री. गोरे यांनीं विचार करावा आणि त्यांनींच यांतून मार्ग सुचवावा. नाहींतर त्यांच्या कळकळीच्या सूचनेचा कांहींच उपयोग होणार नाहीं. उलट त्यांना पुढील सारी परिस्थिति माहीत असूनहि सूचना करतांना ती विचारांत न घेतल्यास आत्मवंचना केल्याप्रमाणें होईल. आणि सूचना केवळ भ्रामक ठरेल.

## महाराष्ट्राच्या राजकारणाचीं कडु फळें

एकंदर परिस्थिति अत्यंत उत्साहभंग करणारी, निराशाजनक वाटणारी असली, तरी त्यांतून मार्ग निघायला हरकत नसावी. आमच्या ऐक्याच्या आड जें राजकारण येतें आहे त्याच्या विरहित एक सामाजिक व्यासपीठ महाराष्ट्रांत निघाल्यास त्यावर सर्व पक्षांतील व क्षेत्रांतील विचारवंत अधिक जवळ येऊं शकतील व सहमत होऊं शकतील. त्यासाठीं एकच गोष्ट आवश्यक वाटते. आणि ती म्हणजे कांहीं दिवस तरी महाराष्ट्रानें राजकारणांतून अंग काढून घ्यावें. ही सूचना सर्वांनाच अव्यवहार्य व हिडिस वाटण्याचा संभव आहे; परंतु थोडा खोलवर विचार केला तर ती पटावी असें वाटतें. नीट विचार केला तर स्पष्ट दिसून येईल कीं, आज महाराष्ट्र राजकारणांत पूर्णपणें अपयशी ठरला आहे. महाराष्ट्रांत अनेक राजकीय पक्ष असले, तरी महाराष्ट्राचें प्रातिनिधिक राजकारण असें बनलेलें आहे; आणि याच राजकारणामुळें परप्रांतांत व राज्यव्यवस्थेंत महाराष्ट्र रोषाचा विषय झाला आहे. याच राजकारणाचा विशेष उल्लेख करावयाचा आहे. आमच्या अधःपतनाची पुष्कळ मीमांसा झालेली आहे. आणि त्या मीमांसेचा निष्कर्ष हाच निघतो कीं, टिळकांपर्यंत बऱ्याच कालपर्यंत महाराष्ट्राकडे राहिलेली राजकारणांतील पुढारीपणाची मिरासदारी दुसरीकडे गेल्याचें महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांना, महाराष्ट्राच्या जातिवंत अहंमन्यतेमुळें व ज्ञानाच्या घमेंडीमुळें, सहन झालें नाहीं; व त्यांनीं पुढील नव्या अभिनव हिंदी राजकारणाला साथ न देतां हिडिस आणि हीन असा विरोध केला; त्याला तात्त्विक गोंडस स्वरूप देण्यासाठीं जगांत अपयशी आणि घातक म्हणून सिद्ध झालेल्या जुनाट व प्रतिगामी तत्त्वप्रणालींना त्यांनीं अंधपणानें आणि हटवादीपणानें कवटाळलें. तसेंच धर्म आणि संस्कृतीच्या नांवाखालीं जनतेचीहि फसवणूक केली. महाराष्ट्रांतला बहुसंख्य प्रातिनिधिक बुद्धिवादी वर्ग या राजकारणामागें होता म्हणून हें राजकारणहि महाराष्ट्राचें प्रातिनिधिक बनलें. याच राजकारणाचे कडु दुष्परिणाम म्हणजे महाराष्ट्रांतील जवळजवळ दोन पिढ्या काँग्रेस आणि तिच्या पुढाऱ्यांच्या विषारी द्वेषावर पोसल्या गेल्या; इतकेंच नव्हे तर त्यांची मजल महात्म्याच्या वधापर्यंत गेली. याच राजकारणाच्या तत्त्वप्रणालीचीं हीं कडुतम फळें होत. त्यानें साऱ्या राष्ट्राचा अक्षम्य घोर प्रमाद केला आणि रोष ओढवून घेतला. सारा महाराष्ट्र देशद्रोही, पितृद्रोही आणि कृतघ्न ठरवला. यावरून इतरांच्या मनात आमच्याविषयीं तिरस्कृत भावना झाल्यास त्यांत वावगें काय आहे? परप्रांतांत त्या भावना कशा आहेत हें परप्रांतांत

नुसता प्रवास करतांनाहि अनुभवास येतें. पण यापेक्षांहि परदेशांत आमच्याबद्दल काय भावना आहेत हें फेब्रुवारीच्या 'किर्लोस्करां'त प्रसिद्ध झालेल्या एका पत्रांतील आफ्रिकेंतील अनुभवावरून दिसेल. यापेक्षां या राजकारणाचें अपयश काय हवें ? पण अजूनहि तें थांबलेलें नाहीं ही दुःखाची गोष्ट होय. सत्याग्रहाच्या नांवाखालीं भोंगळ प्रतिगामी वृत्तीचा अट्टाहास अजूनहि चालू आहे आणि त्याचें आमच्याकडून आत्मनाशी समर्थन होत आहे. यामुळें आम्ही इतर प्रांतीयांना आणि राज्यसत्तेला आम्हाला दडपण्यास कारण व संधि देत आहोंत. याचें प्रत्यंतर पहायचें असल्यास संघसत्याग्रहाबद्दल सुरवातीस दिल्लीहून निघालेल्या अहवालाचा सूर पहावा आणि मध्यंतरीं नागपुरास संघविरोधी सभा झाली होती त्यांत कोणी कोणी कोणाबद्दल कशीं कशीं भाषणें केलीं होतीं हें पहावें. याशिवाय संयुक्त महाराष्ट्राला होणारा यशस्वी परंतु स्वार्थी विरोध आहेच.

## कॉंग्रेसविरोध थांबवा

आज महाराष्ट्रानें याच राजकारणाचा त्याग करायला हवा. अर्थात् हें सहज शक्य नाहीं, याची जाणीव सूचना करतांना आहेच. राजकारण सोडायचें म्हटलें तरी तत्त्वांचा प्रश्न येणार. आणि आपल्याला हीं तत्त्वें प्रतिगामी वाटलीं तरी तीं मानणाऱ्यांना तीं तशीं कोठें वाटतात ? आणि तीं त्यांनीं कां सोडावीं ? तत्त्वें चूक कीं बरोबर, प्रतिगामी कीं पुरोगामी यांचा वाद अखंडच चालू रहाणार. पण हें सारें बाजूला टेऊन त्यांना एकच गोष्ट सांगावीशी वाटते कीं, तुमचीं तत्त्वें एक वेळ बरोबर असलीं तरी आणि कॉंग्रेसचीं चूक असली तरी, कॉंग्रेसच्या मागें गांधी-नेहरू-पटेलाची इतकी जबर पुण्याई आहे कीं, तुम्ही कॉंग्रेसविरुद्ध कितीहि डोकें आपटलें तरी कांहींहि होणार नाहीं; उलट तुमचें कपाळ मात्र फुटेल, नि फुटत आहेच, आणि त्याबरोबरच सारा महाराष्ट्रहि कलंकित होत आहे. कृपा करून त्यांनीं डोळे उघडे ठेवून महाराष्ट्राच्या दृष्टीनें थोडा तरी विचार करावा. आणि कॉंग्रेसद्वेषाचें हीन आणि प्रतिगामी राजकारण सोडून द्यावें. आणि आपला राजकीय दृष्टिकोन बदलावा. ही सूचना म्हणजे वाघाला आपला क्रूरपणा सोडावयास सांगण्यासारखी ठरण्याचा संभव आहे. परंतु तरीहि या लोकांनीं महाराष्ट्राला एवढी भीक घालावी. केवळ याच पक्षास नव्हे तर सर्वच पक्षांनीं कॉंग्रेसविरोधी धोरण कमींत कमी महाराष्ट्राच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें ठेऊं नये. संयुक्त महाराष्ट्राच्या बाबतींत करबंदी वगैरे प्रतिकाराच्या सूचना पुढें आल्या आहेत. त्या महाराष्ट्राच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें तरी हितावह नाहींत व त्याचा अवलंब करूं नये.

## विधायक कार्य हातीं घ्या !

राजकारण—विशेषतः कॉंग्रेसविरोधी राजकारण सोडणें म्हणजे अन्यायाचा प्रतिकार करणेंहि सोडून देणें नव्हे किंवा क्रियाशून्य होणें नव्हे. आज राजकारणविरहित करण्याची विधायक कामें कितीतरी पडलीं आहेत. तीं शांतपणें केलीं तर आमचें बळ कितीतरी वाढेल व आमच्यांत इतरांकडून होणाऱ्या अन्यायाच्या प्रतिकाराची शक्तीहि येईल. महाराष्ट्रांतील सर्वच राजकीय पक्षांनीं आपलें विरोधाचें धोरण सोडून विधायक कार्यासाठीं आपली शक्ति खर्च केली, तर महाराष्ट्राचाच नव्हे तर साऱ्या राष्ट्राचा कितीतरी मोठा फायदा होईल. या सर्वच राजकीय पक्षांचें एक उघड व कडु गुपित बोलून दाखवायचें म्हणजे प्रत्येकाची येत्या निवडणुकींत थोडयाफार जागा मिळवायची सारी धडपड चालू आहे. परंतु या निवडणुकींत त्यांना जागा मिळण्याची यत्किंचितहि आशा त्यांनीं ठेवूं नये. मध्यंतरीं समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते साथी अच्युतराव पटवर्धन यांनीं या निवडणुकींत समाजवादी पक्षास जागा मिळणार नसल्याचें सांगितलें होतें. याचा अर्थ सर्वांनींच नीट लक्षांत घ्यावा. तेव्हां उगीचच राजकारणाच्या धुळवडींत पडण्यापेक्षां आपापल्या पक्षाला साजेलसें विधायक कार्य केल्यास पक्षाचेंहि बल अधिक वाढेल

आणि देशालाहि फार उपयोगी पडेल. प्रचलित राज्यसत्तेविरुद्ध पक्ष असूंच नये असें माझें म्हणणें मुळींच नाहीं. लोकशाहींत असा पक्ष आवश्यक असतो. पण त्याची भूमिका अधिक उच्च, भरीव आणि विशुद्ध असावी लागते; महाराष्ट्रांतील काँग्रेसविरोधी गटांप्रमाणें नव्हे. तेव्हां महाराष्ट्रानें सध्यां तरी असल्या भानगडींत पडूं नये; विधायक कार्याच्या मार्गानें आपलें बल व शुद्धता वाढवूनच मग त्यांत पडावें.

## राजकारणनिरपेक्ष वृत्तीनें एकत्र या

अशा रीतीनें महाराष्ट्रानें आपलें राजकारण बदललें तर आजच्या राजकीय पक्षांतील परस्पर-विरोध, कटुता आणि दृष्टींतील अंध तीव्रता कमी होऊन केवळ महाराष्ट्राच्या उत्कर्षासाठीं राजकारण-निरपेक्ष असे एक व्यासपीठ तयार होणें सुलभ होईल. महाराष्ट्राच्या नांवासाठीं सर्वजण एका ठिकाणीं जमतात हें संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या वेळीं दिसून आलेंच आहे. तेथील एकोप्यांत, एक वाक्यतेंत जी राजकीय पक्षदृष्टीची तीव्रता आड येत होती, ती निवळल्यास महाराष्ट्राच्या उत्कर्षा-साठीं सर्व विचारवंतांना एका व्यासपीठावर येऊन एकमुखानें कांहीं निर्णय घेणें आणि पुढील मार्ग आंखणें कठीण पडणार नाहीं. अर्थात ही गोष्ट सहज शक्य नाहीं, ही जाणीव असल्याची प्रथमच कबुली दिलेली आहे. तरी पण ज्यांना ज्यांना महाराष्ट्राच्या उत्कर्षाची खरीखरी तळमळ आहे त्यांनीं सर्वांना महाराष्ट्राच्या अतीव प्रेमानें, उत्कर्षाच्या तळमळीनें भारून व त्यांच्या राजकीय दृष्टीची तीव्रता कमी करून राजकारणनिरपेक्ष अशा व्यासपीठावर आणण्यचे प्रयत्न केल्यास ते यशस्वी व्हावयास कसलीही हरकत नसावी.

## महाराष्ट्र सामाजिक परिषद

तेव्हां आज महाराष्ट्रांत सर्व क्षेत्रांतील प्रमुख विचारवंतांची संयुक्त महाराष्ट्र परिषदेप्रमाणेंच परंतु राजकारणनिरपेक्ष अशी महाराष्ट्र सामाजिक परिषदेसारखी एक प्रमुख व मध्यवर्ती संघटना असावी. त्यांत सर्व राजकीय पक्ष, पत्रकार संघटना, साहित्यसंस्था, सामाजिक संस्था, धार्मिक संस्था वगैरे सर्वांनीं भाग घ्यावा. तिच्या गांवोगांव शाखा काढून संघटना मजबूत व प्रचंड करायला हवी. यांतहि साहित्यसंमेलनासारख्या ठिकाणांप्रमाणें राजकीय पक्षांच्या दृष्टीचा अंकुश राहून एकमेकांत ओढा-ताण होण्याचा संभव आहे; नाहीं असें नाहीं. तरीपण महाराष्ट्राचा उत्कर्ष करण्यासाठीं राजकारण सोडून फार मोठें सामाजिक क्षेत्र परिषदेसमोर पसरलेलें आहे. तेव्हां राजकारणनिरपेक्षतेचा कडक दंडकच परिषदेनें घालून घ्यावा. आणि केवळ महाराष्ट्राचा उत्कर्ष हेंच एकमेव ध्येय परि-षदेनें समोर ठेवल्यास हा दंडक पाळणें प्रयत्नांतीं शक्य होईलहि. दरवर्षी ही परिषद १ ऑगस्टला बोलवावी; म्हणजे लो. टिळकांचेंहि तें एक खरेंखुरें स्मरण होऊन त्यांतून सर्वांनाच योग्य स्फूर्ति मिळेल. या परिषदेनें नुसते वादविवाद, चर्चा, मीमांसा, आणि ठराव मात्र इतर परिषदां सभां-प्रमाणें करूं नयेत. महाराष्ट्राच्या उन्नतीसाठीं कांहीं तरी निश्चित कार्यक्रम ठरवून तो अंमलांत आणा-वयाचाच,या निश्चयानेंच सार्‍यांनीं जमून कांहीं तरी निर्णय निश्चितपणें घेऊन गांवोगांवच्या शाखां-मार्फत ते अंमलांत आणण्याच्या ताबडतोब तयारीस लागावें. दरवर्षी वर्षभराच्या कामाचा आढावा घेऊन पुढील वर्षासाठीं नवा कार्यक्रम घ्यावा.अशा-प्रकारें अत्यंत तळमळीनें प्रचंड प्रयत्न सुरू झाले, तर ज्याप्रमाणें काँग्रेसच्या अहर्निश व दीर्घ प्रय-त्नांनीं चाळीस कोटी लोकांना स्वातंत्र्य मिळविण्या-इतक्या अत्यंत बिकट कामांतहि यश मिळविलें, त्याप्रमाणें या परिषदेलाहि जरूर यश येईल व महाराष्ट्राचा उत्कर्ष झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

## एक कार्यक्रम

परिषदेच्या पुढील कामाचें स्वरूप अधिक स्पष्ट होण्यासाठीं मी एकदोन कार्यक्रम सूचवूं इच्छितों. सामाजिक क्षेत्रांत महाराष्ट्राला जडलेली ब्राह्मण–अब्राह्मणवादाची किळसवाणी जखम गेल्या वर्षी

पासून पुन्हां उघडी पडून वाहूं लागली आहे. त्यानिमित्तानें वाद, चर्चा, मीमांसा अगदीं उतूं येऊन थंडहि झाल्या. परंतु त्यांचा काय उपयोग झाला? त्यापासून आम्हीं काय बोध घेतला? यांत दोष केवळ ब्राम्हणांचा नसून उभयपक्षीं असल्याचें स्पष्ट असलें, तरी ब्राह्मणांची अहंमन्य संकुचित वृत्ति सिद्ध झालेली आहे; तेव्हां ती दूर करून आपल्याकडून तरी अडसर काढण्याचा प्रयत्न झाला काय? आम्ही एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणें साऱ्या वादचर्चेतून आणि त्यांतील निष्कर्षांतून अंग झटकारून पुन्हां जिथल्या तिथेंच आहोंत. पूर्वीप्रमाणेंच फक्त देशस्थ आणि फक्त चित्पावन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यासाठीं जाहिराती, अमक्या शाखेच्या ब्राह्मण वरास त्याच शाखेची (सुशिक्षित, सुस्वरूप, घरकामांत कुशल वगैरे) वधू पाहिजे असल्याच्या जाहिराती! आतां नुकताच लोणावळ्याच्या धर्मनिर्णय मंडळानें सर्व ब्राह्मण संस्थांच्या एकत्रीकरणाचा अत्यंत योग्य प्रयत्न चालू केला आहे. परंतु शांतपणें खरें सांस्कृतिक काम करणाऱ्या या संस्थेला धर्म आणि संस्कृतीच्या नांवाचा नुसता फसवा व्यापार नि कोरडा कंठशोष करणाऱ्या राजकीय संस्थांइतका पाठिंबा मिळण्याचें कुठें भाग्य आहे? परंतु असे कार्यक्रम महाराष्ट्र परिषदेसारख्या मध्यवर्ती संस्थेनें हातीं घेतले तर त्यांना वजनदार पाठिंबा मिळून ते लवकर अंमलांत आणतां येतील व यशस्वी होतील. अशा रीतीनें आमच्या सामाजिक क्षेत्रांत फार मोठी प्रगति होऊन त्याला बळकटी येईल.

## सहकारी चळवळ

हीच गोष्ट आर्थिक क्षेत्रांतली! या क्षेत्रांतली आमची दुर्बलता घालविण्याचा व भांडवलदारांच्या आक्रमक प्रभुत्वाचा प्रतिकार करण्याचा एकच एक उपाय आहे सहकारी चळवळीचा. रोजच्या लागणाऱ्या उपयोगी वस्तूंच्या सहकारी दुकानांपासून तर सर्व उत्पादकांच्या सहकारी संस्था व सहकारी शेतीपर्यंत शहरोंशहरीं व खेडोंपाडीं प्रचंड प्रमाणावर सहकारी चळवळ चालविली पाहिजे. त्यामुळें केवळ आमच्याच आर्थिक क्षेत्रांत नव्हे तर साऱ्या राष्ट्राच्या पुनर्रचनेंत आम्ही मोठी आघाडी मारूं, पण ही चळवळ कोणी करायची? फक्त भाषणांतील व निवडणुकीच्या जाहिरनाम्यांतील उल्लेखाशिवाय हा कार्यक्रम कोणत्याच राजकीय पक्षाच्या कक्षेंत येत नाहीं! परंतु राजकारणनिरपेक्ष अशा आपल्या मध्यवर्ति महाराष्ट्र सामाजिक परिषदेनें हा कार्यक्रम हातीं घेतला व आपल्या शहरोंशहरींच्या व खेड्यांतील शाखांमार्फत त्याचा प्रचार केला तर हीं चळवळ फार लवकर यशस्वी होईल.

अशा रीतीनें महाराष्ट्रांत मध्यवर्ती सामाजिक परिषदेच्या रूपानें राजकारणनिरपेक्ष असें व्यासपीठ निर्माण झाल्यास त्यावर सर्वपक्षीय व सर्व क्षेत्रांतील विचारवंत एकत्र येऊं शकतील व एकमतानें निर्णय घेऊ शकतील. याच परिषदेनें पुढें अगदीं कटाक्षानें राजकारण निरपेक्ष अशीं सामाजिक विधायक कार्यें निश्चयानें हातीं घेतल्यास महाराष्ट्राचा उत्कर्ष फार दूर रहाणार नाहीं. महाराष्ट्राच्या उन्नतीची खरोखरच कळकळ आहे अशा कार्यकर्त्यांनीं हें हातीं घेतल्यास तें यशस्वीहि होईल. तेव्हां श्री. गोरे यांच्यासारख्या निष्ठावंत व कळकळीच्या कार्यकर्त्यांस याबद्दल विचार करून हें कार्य हातीं घेण्यासंबंधीं विनंति केल्यास ती योग्यच ठरेल असें वाटतें.

# : ४ :

# महाराष्ट्र राजकारणांत मागें कां पडला ?

लेखक : वीर वामनराव जोशी

गेल्या ता. ९ फेब्रुवारीच्या "मौजेच्या"—अंकांत महाराष्ट्रांतील समाजवादी पक्षाचे एक पुढारी भाई ना. ग. गोरे यांनीं "महाराष्ट्रांतील विचारवंतांना" उद्देशून एक "अनावृत पत्र" लिहिलें आहे. त्यांत त्यांनीं हिंदुस्थानच्या राजकारणांत महाराष्ट्राचा दर्जा आज जो पूर्वीपेक्षां फारच खालीं घसरला तो कां ? याचीं कारणें शोधून काढून त्यावर योग्य उपाययोजना करण्यासंबंधानें महाराष्ट्रांतील विचारवंतांना कळकळीची सूचना केली आहे. या त्यांच्या कळकळींत महाराष्ट्रासंबंधाचा त्यांचा अभिमान व्यक्त होत असला तरी तो हिंदुस्थानसंबंधाच्या अभिमानाला हानिकारक होणारा दुरभिमान नाहीं याबद्दल आम्हांस मुळींच शंका नाहीं. उलट शरीराचा एखादा महत्त्वाचा भाग कमजोर राहिल्यास त्या योगें सर्व शरीरासहि कमजोरी येते. त्या प्रमाणें राष्ट्रांतील एखादा घटक दुर्बल राहिल्यास त्याचा राष्ट्राच्या सामर्थ्यावर एकंदर परिणाम होतो. या राष्ट्रीयबुद्धीनेंच महाराष्ट्र मागें राहणें चांगलें नाहीं असें त्यांना वाटत असलें पाहिजे अशी आमची खात्री आहे. हिंदुस्थानच्या राजकारणांत एका काळीं अग्रेसरत्वाच्या मानास पात्र झालेला महाराष्ट्र आज खालीं घसरलेला पाहून इतर प्रांतीयांनाहि वाईट वाटतें; मग एखाद्या महाराष्ट्रीयास त्याबद्दल खेद वाटत असल्यास त्यांत अस्वाभाविक काय आहे ? अगर गैर तरी काय आहे ? भाई गोरे यांच्यासारखे महाराष्ट्राचें हें दौर्बल्य पाहून हळहळणारे हजारों लाखों महाराष्ट्रीय असतील व आहेत ही गोष्ट कोणीहि नाकबूल करणार नाहीं. आणि अशा हळहळणाऱ्या लक्षावधि महाराष्ट्रीयांपैकीं जे विचारवंत आहेत त्यांना भाई गोरे यांनीं ही विनंती केलेली आहे.

## आपापले विचार तरी जाहीर करा !

अर्थात् भाई गोरे यांनीं आपल्या अनावृत पत्रांत सूचना केल्याप्रमाणें हे विचारवंत केव्हां एकत्र येऊन या विषयाचा गंभीरतेनें विचार करतील आणि त्यांच्या या विचारविनिमयामधून उपयुक्त असें काय निष्पन्न होईल हें कांहीं आम्ही आज सांगूं शकत नाहीं. तथापि भाई गोरे यांच्या या पत्रामुळें महाराष्ट्रीय विचारवंत या गोष्टीचा काळजीपूर्वक विचार करण्यास प्रवृत्त झाले तरी आम्ही म्हणतों या पत्रानें पुष्कळच कार्य केलें. भाई गोरे यांनीं महाराष्ट्राच्या या पिछेहाटीची मार्मिक मीमांसा केली आहे. पण ती सर्वांनाच पटेल असें नाहीं. तेव्हां ज्यांना ती पटणार नाहीं त्यांनीं आपलें म्हणणें लोकांपुढें मांडणें म्हणजे सर्व कारणांचा तर्कशुद्ध पद्धतीने विचार करून त्यांतील ग्राह्य कोणतीं व त्याज्य कोणतीं याचा निर्णय करणें सोपें होईल. व या निर्णयानंतर त्या कारणावर योग्य ते उपाय शोधून काढणें व ते अमलांत आणणें या दोन गोष्टींच्या मागें लागतां येईल.

## टिळकोत्तर बौद्धिक अराजक

लो. टिळकांच्या निधनानंतर महाराष्ट्रांत बौद्धिक अराजक माजल्यामुळें महाराष्ट्र मागें पडला असें

श्री. माडखोलकरांचें मत असल्याचें भाई गोरे यांनीं लिहिलें आहे. परंतु लोकमान्यांच्या मृत्यूनंतर हें बौद्धिक अराजक कां माजलें यांच्या कारणाचें निदान जोंपर्यंत अचुक होत नाहीं तोंपर्यंत उपाय-योजना कशावर करावयाची ? सेनापति रणांगणावर पडला कीं सैन्य सैरावैरा पळूं लागतें असा जसा अनुभव आहे, तसा सेनापतीच्या पतनानंतरहि सैन्यानें शिकस्तीनें लढून शत्रूला पराजित केल्याचीं उदाहरणेंहि युद्धाच्या इतिहासांत मुळींच नाहींत असें नाहीं. छत्रपति संभाजी महाराजांच्या मरणानंतर राजाराम महाराज जंजीला असतांना राजाच्या आश्रयावांचून मराठे सरदारांनीं औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूशीं सारखीं वीस वर्षे झुंज देऊन त्याला जेरीस आणलें हा महाराष्ट्राच्या इतिहासांतील अत्युज्ज्वल काल महाराष्ट्रीयांच्या स्मृतींतून केव्हांहि जाण्यासारखा नाहीं. तेव्हां लोकमान्यांच्या निधनानंतर महाराष्ट्रांत बौद्धिक अराजक माजलें तें कां याची शहानिशा होणें अवश्य आहे.

## अधिनायकत्व लोकमान्यांचें होतें

आमचें तर असें निश्चित मत झालेलें आहे कीं, लोकमान्यांच्या हयातींत महाराष्ट्राला देशाच्या राजकारणांत अग्रेसरत्व प्राप्त झालें होतें ही कल्पनाच चुकीची आहे. वास्तविक तें अधिनायकत्व लोकमान्यांचें होतें—महाराष्ट्राचें नव्हतें. लोकमान्यांच्या आप्तपणामुळें तें आमच्या गळ्यांत पडलेलें होतें. लोकमान्यांच्या असामान्य कर्तृत्वामुळें इतर प्रांतांतील पुढारी दिपून जात आणि आम्ही त्यांचे अत्यंत निकटवर्ति अनुयायी म्हणून आमच्याकडे भाबडेपणानें व आदरदृष्टीनें पहात. बाकी त्यांचे प्रांतिक पुढारी व लोकमान्य यांच्यांत जितकें अंतर होतें तितकें कांहीं ते आणि आम्ही महाराष्ट्रीय यांच्यांत खास नव्हतें. आम्ही जवळजवळ सारख्याच दर्जाचीं माणसें होतों. लोकमान्य हयात होते तोंपर्यंत त्यांच्या प्रखर तेजानें आम्ही लकाकत असल्यामुळें त्यांच्या–आमच्यामधील हा बहुतांश सारखेपणा त्यांच्या त्यावेळीं लक्षांत येऊं शकला नाहीं. परंतु लोकमान्यांच्या निधनानंतर त्यांच्या तेजानें उठावदार दिसण्याची आमची सवलत नाहींशी होऊन जेव्हां आपल्याच तेजानें प्रकाश पाडण्याची पाळी आमच्यावर आली तेव्हां त्यांचे डोळे उघडले व आम्ही कोणत्या प्रतीचे तेजोगोल आहोंत हें त्यांना कळून येऊन त्यांच्याजवळची आमची पूर्वीची पत कमी झाली. परंतु दुर्दैव असें कीं इतरांच्या डोळ्यावरील भ्रमपटल दूर झालें तरी आमच्या डोळ्यावरचें दूर झालें नाहीं. आम्ही त्याच भ्रमजालांत गुरफटून राहिलों व लोक आम्हाला विचारीत नाहींत म्हणून चडफडूं लागलों.

## गांधीजी व त्यांच्या राजकारणासंबंधींचें आमचें विकृत ज्ञान

म. गांधी हे लोकमान्यांचेंच राजकारण पुढें नेत आहेत ही साधी गोष्टहि आमच्या लक्षांत येईना. त्यांच्या शिकवणीनें देशांतील निर्भयता व पराक्रम सारखा वाढत आहे हें प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहात असतांहि लोकमान्यांचें राजकारण महात्मा गांधी मारून टाकीत आहेत असा आमचा आक्रोश चालूच होता. खुद्द लोकमान्यांनाहि जी शंका स्वप्नांतहि कधीं शिवली नाहीं त्या शंकेनें त्यांच्या अनुयायी म्हणविणाऱ्या महाराष्ट्रीयांना आपादमस्तक भारून टाकलेलें होतें. यावरूनच लोकमान्यांची असामान्य राजकीय बुद्धिमत्ता आणि आमची बुद्धिमत्ता यांच्यांत केवढें महदंतर होतें याची कोणासहि सहज कल्पना होण्यासारखी आहे आणि इतकें असूनहि लोकमान्य स्वत: ज्या आदरानें महात्मा गांधींसंबंधानें बोलत त्या आदरानें तर आम्ही बोललोंच नाहीं; पण उलट त्यांच्या संबंधानें अक्षम्य अनादर आम्ही दाखविला ही गोष्ट महशूर आहे. इतर प्रांतांतील पुढाऱ्यांनींहि ज्या महापुरुषाचें श्रेष्ठत्व मान्य केलें त्याच्या संबंधानें जर आम्ही आपला तिरस्कार व्यक्त केला तर त्याचे मागें श्रद्धेनें आणाऱ्या इतर प्रांतांतील लोकांच्या मनांत आमच्याविषयीं अनादर उत्पन्न झाल्यास व त्यामुळें अखिल भारतीय राष्ट्रमहासभेंत आमचा

भाव उतरल्यास त्यांत आश्चर्य काय ? लोकमान्य टिळकांची राष्ट्रीय लोकप्रियता जसजशी वाढत गेली तसतशी त्यांच्या विरोधकांची राष्ट्रावरील पकड सुटत गेली व दहा वर्षांपूर्वी ज्यांनीं लोकमान्यांना त्यांच्या अनुयायांसह कॉंग्रेसमधून हद्दपार केलें होतें त्यांनाच सन १९१८ सालीं अपमानानें कॉंग्रेसमधून बाहेर पडावें लागलें हा अनुभव त्यापूर्वी आलेलाच होता.

## सशस्त्र किंवा निःशस्त्र प्रतिकारच स्वातंत्र्यप्राप्तीचा एकमेव मार्ग

जो अनुभव लोकमान्यांच्या बाबतींत आला तोच महात्मा गांधींच्या बाबतींत येणें अगदीं अपरिहार्य होतें. लोकमान्यांच्या शिकवणीमुळें महाराष्ट्रांतीलच नव्हे तर सर्व भारतांतील लढाऊ वृत्ति जागृत होऊन वाढीस लागली होती व त्या वृत्तीस पटेल तो कार्यक्रम व ती तत्त्वप्रणाली हीच पुरोगामीपणाची कसोटी होऊन बसली होती. ही गोष्ट लोकमान्यांच्या हयातींतच अनुभवसिद्ध होऊन बसली होती. बंड–मग तें सशस्त्र असो वा निःशस्त्र असो– हा एकच स्वातंत्र्यप्राप्तीचा एकमेव मार्ग आहे व तें घडवून आणावयाचें असल्यास प्रथम लोकांच्या मनांत बंडखोर वृत्ति प्रज्वलित करावी लागते हा सिद्धान्त लोकमान्यांना पूर्णपणें पटलेला होता व सारा जन्म त्यांनीं ही वृत्ति लोकांच्या ठिकाणीं जागृत करण्याच्या उद्योगांत घालविला ही गोष्ट कांहीं आतां जगापासून छपलेली नाहीं. महात्मा गांधी यांनाहि बंडावांचून स्वातंत्र्य नाहीं हा सिद्धान्त पटलेला होता आणि म्हणूनच आपला अहिंसा–धर्म प्रतिपादित असतां असहकाराच्या मार्गानें ते देशांत ही बंडखोर वृत्तीच वाढवीत होते. असहकार–सत्याग्रह इत्यादि पराक्रमाची अभिवृद्धि करणारे मार्ग अव्हेरून त्यांनीं नुसत्याच अहिंसेचा उपदेश घसा फोडून केला असता तर त्याचा विशेष उपयोग झाला असता असें आम्हाला मुळींच वाटत नाहीं. शिवाय महात्मा गांधी यांनीं प्रवर्तिलेल्या अहिंसाधर्माचें यथार्थ पालन पराक्रमी शूर पुरुषांच्या हातूनच होणें शक्य असल्यामुळें आणि पारतंत्र्याची पराकाष्ठेची चीड ही एक या उच्च दर्ज्याच्या शौर्याची कसोटी असल्यामुळें राजकारणांत लोकमान्यांनीं सुरू केलेलें बंडखोर वृत्ति वाढविण्याचें कार्य पुढें चालविण्यावाचून महात्मा गांधींना गत्यन्तरच नव्हतें.

## महात्माजींना ना. गोखल्यांचें नव्हे, लोकमान्यांचें राजकारण चालविलें

लोकमान्य टिळकांच्या विरोधकांच्या म्हणजे कै. ना. गोखले यांच्या उदारमतवादी ऊर्फ नेमस्त पक्षाच्या नादीं जर ते लागले असते तर त्यांनीं आज जें स्थित्यंतर देशांत घडवून आणलें आहे त्याच्या शतांशहि कार्य त्यांच्या हातून घडलें नसतें याबद्दल आम्हांला मुळींच शंका नाहीं. त्यांच्या अहिंसाधर्माचें त्यांच्याप्रमाणें तंतोतंत पालन करणारे आज देशांत फारच थोडे लोक उत्पन्न झाले आहेत हें जरी खरें असलें तरी त्यांनीं प्रवर्तिलेल्या महान् धर्माचें श्रेष्ठत्व कळणारे व त्याबद्दल खरा आदर बाळगणारे शूर लोक आज या देशांत उत्पन्न झाले आहेत हीहि गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. महात्मा गांधींनीं आजचें अभूतपूर्व यश संपादन केलें त्याचा मूळ पाया लोकमान्यांनीं केलेलें कार्य हाच होता व पुढें सर्वस्वी नसलें तरी मुख्यत्वें करून लोकमान्यांच्या पराक्रम–संवर्धनाच्या दिशेनेंच जाण्यांत त्यांनीं दाखविलेलें चातुर्य हेंच त्यांना विशेष उपयोगी पडलें हें कोणाहि निष्पक्षपाती मनुष्यास मान्य करावेंच लागेल. " मी लोकमान्यांचेंच कार्य पुढें चालवीत आहें " हें महात्मा गांधी यांनीं अनेकवार जाहीरपणें सांगितलें आहे व तें प्रामाणिकपणें सांगितलें आहे. असो.

## लोकमान्यांच्या सद्‌गुणांचा अभाव

हा एवढा विस्तार करून लिहिण्याचें कारण असें कीं अखिल भारतीय राजकारणांत महाराष्ट्राची जी पिछेहाट झाली तिचें खरें कारण तें कितीहि अप्रिय असलें तरी महाराष्ट्रीयांच्या लक्षांत नीट

भरावें. महाराष्ट्रांत अगदीं खालच्या वर्गापासून वरच्या वर्गापर्यंत बुद्धिमान् व कर्तबगार लोकांची संख्या इतर प्रांतापेक्षां अधिक आहे हें भाई गोऱ्यांचें म्हणणें आम्हासहि मान्य आहे. परंतु असें असूनहि केवळ फाजील अहंमन्यतेनें अंध बनल्यामुळें बुद्धि असून पुढील काळाचें स्वरूप आम्हांस बरोबर आकलन करतां आलें नाहीं व कर्तृत्व तर आत्मघाताच्याच उपयोगी पडलें. या गोष्टींचा उल्लेख भाई गोरे यांनीं आपल्या पत्रांत केलेलाच आहे व त्या बाबतींत आम्ही त्यांच्याशीं सहमत आहोंत. त्याचप्रमाणें विचारवंतांनीं विचार करण्याची आतां वेळ आली आहे याबद्दलहि आमचें त्यांचें दुमत नाहीं. परंतु उपयुक्तपणें हा विचार होण्यासाठीं या बुद्धिमान् विचारवंतांच्या ठिकाणीं जें निरहंकार प्रांजलपण पाहिजे तें त्यांच्या ठिकाणीं गेल्या दोन तपांच्या प्रत्यक्ष अनुभवानें आलें आहे किंवा नाहीं याबद्दल आमचें मन साशंक आहे. आम्हाला असें वाटतें कीं हे विचारवंत सहसा एकतर लौकर एकत्र जमावयाचे नाहींत आणि जमलेच तर त्यांचा अहंकार त्यांना निर्मळ मनानें विचारविनिमय करूं देणार नाहीं. लोकमान्यांच्या अतिनिकट सान्निध्यामुळें त्यांचें बुद्धिवैभव थोडेंबहुत वाढलेंहि असेल, त्यांच्या शौर्यातहि कमी अधिक भर पडली असेल हें आम्हांस कबूल आहे. परंतु लोकमान्यांचें औदार्य, त्यांची निरभिमान वृत्ति, त्यांचें परमतसहिष्णुत्व इत्यादि गुण या विचारवंतांच्या ठिकाणीं कितपत विकास पावले आहेत हें आम्हांस माहीत नाहीं. आणि त्यामुळें हा प्रयत्न सफल होण्यास किती काल लागेल हें आम्ही सांगूं शकत नाहीं.

## महाराष्ट्राची प्रसिद्ध एकांडेशिलेदारी

भाई गोरे यांच्या शुभेच्छेप्रमाणें असें कांहीं घडून येऊं शकलें नाहीं तरी अशा विचारवंतांनीं या विषयाची वर्तमानपत्रांच्या द्वारें जाहीर चर्चा केली तरीहि पुष्कळ कार्यभाग होईल असें आम्हांस वाटतें. भाई गोरे यांनीं वस्तुस्थितीची केलेली कारणमीमांसा अगर आम्ही त्या बाबतींत प्रगट केलेले विचार सर्वच विचारवंतांना पटतील असें आम्ही मुळींच म्हणत नाहीं. इतकेंच नव्हे तर आमचे विचार वाचून कित्येकांचा आमच्यावर रोषहि होण्याचा संभव आहे हें आम्ही जाणून आहोंत. तथापि त्यांनीं आपले विचार प्रगट केले आणि त्यापासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं तरी हा एकच विचारविनिमय शक्य आहे किंवा नाहीं आणि असल्यास त्याला युक्तकाल कोणता याचा तरी निर्णय खास लागूं शकेल. आणि असें होणें अशक्य आहे असें आढळून आल्यास जो तो आपल्या मार्गानें आज जसा स्वतंत्र आहे तसाच पुढेंहि राहील. अशक्यतेच्या कोटीस जाऊन पोहोंचलेल्या निर्णयांच्या बाबतींत अखेरचा हा एकच मार्ग शिल्लक रहातो.

ग्रंथालय stamp

: ५ :

# महाराष्ट्राची अवनति व अभ्युदय हीं देशाहून वेगळीं नाहींत !

लेखक : श्री. ना. स. बापट

'मौजे'च्या संपादकांनीं श्री. ना. ग. गोरे यांचा महाराष्ट्राच्या सांप्रतच्या अवनतीवर भाष्य करणारा लेख प्रसिद्ध करून त्याच विषयावर इतर कांहीं व्यक्तींना आपले विचार प्रदर्शित करण्याची संधि दिली आहे. या चर्चेत उद्‌भूत होणारे विषय समाजाच्या सुखदुःखाचे असल्यानें प्रत्येकानें या चर्चेत भाग घेऊन ती उद्‌बोधक करण्याला हातभार लावला पाहिजे.

## महाराष्ट्र वेगळा नाहीं !

पहिली गोष्ट मी ही नमूद करतों कीं, जगांतील निरनिराळ्या समाजांची परस्परावलंबित्वाची आजची परिस्थिति पाहिली कीं, तितक्या प्रमाणांत 'महाराष्ट्र' वा कोणताच प्रांत यांच्या अभ्युदयाचा विचार निराळा असा करतां येणार नाहीं. तो तसा करतां येईल असें श्री. गोरे म्हणतात असें मला म्हणावयाचें नाहीं. पण त्यांचे विचार वाचतांना उपरिनिर्दिष्ट परस्परावलंबित्वाची वस्तुस्थिति जितक्या महत्त्वपूर्णपणें लक्षांत ठेवली पाहिजे तितकी ठेवलेली नाहीं असें मला वाटतें. आतां एक मुद्दा मांडतों तो असा कीं, भूतकालांत जितकें मागें जावें तितकें अधिकाधिक प्रमाणांत महाराष्ट्राचा अलग विचार करणें अधिक सुलभ जातें किंवा समर्थनीय ठरतें. बहुतेक सर्व भूविभागाविषयीं असें म्हणतां येईल. मग तें राष्ट्र, प्रांत वा जिल्हा कांहींहि असो.

महाराष्ट्राचा वा अन्य कोणत्याहि प्रांताचा इतिहास विशिष्ट भूविभागांत घडलेला आहे. हा मानवांचा इतिहास मानवांनीं प्राप्त भौगोलिक व सामाजिक परिस्थितींत प्रतिपन्न ज्ञानाच्या वा भौतिक साधनांच्या साह्यानें घडविला आहे.

## खरोखरच महाराष्ट्र पुढारलेला होता ?

ऐतिहासिक वा सांप्रत काळांतील प्रगत समाजांची प्रागतिकता आपण ज्या मानदंडांनीं मोजतों, त्याच मानदंडांनीं आज महाराष्ट्र म्हटल्या जाणाऱ्या भूप्रदेशांतील लोकांचा इतिहास, महाराष्ट्रीयांची सर्वसामान्य समजूत असते तितका, प्रगत नव्हता. त्याच्याहून अधिक सांस्कृतिक विकास व भरभराट प्राचीन वा ऐतिहासिक काळीं पंजाब, संयुक्तप्रांत, बिहार इत्यादि ठिकाणींच आढळून येते. उत्तरेकडील सांप्रतचे हिंदचे प्रांत जेव्हां राष्ट्रें होतीं तेव्हांचें त्यांचें अंतर्गत जीवन व प्रसंगीं त्यांनीं आचरलेलें साम्राज्यवादी शासनाचरण महाराष्ट्रांतील बहुजन समाजाला लाभण्यासारखी कधीं परिस्थिति नव्हती; व अलिकडच्या पेशवाईतल्या मराठ्यांच्या राज्यविस्तारांत प्रगतीचें प्रतिबिंब खुद्द महाराष्ट्रांतील अंतर्गत जीवनांत वा चौथाई सरदेशमुखी आम्ही वसूल करूं त्या प्रदेशांत, पडलें होतें असें मला दिसत नाहीं. कृषिवल, उद्योगधंदे, कलाकुसर, उच्च प्रकारचा ज्ञानव्यासंग व कलोपासना हीं महाराष्ट्राबाहेरच

झालीं आहेत. यांत तत्कालीन महाराष्ट्रीयांचा दोष अजिबात नसून त्याचीं कारणें भौगोलिक, आर्थिक व कित्येक प्रकारें सामाजिक आहेत.

पहिली गोष्ट म्हणजे आर्यांच्या वसाहती पहिल्यानें उत्तरेकडे झाल्या व नंतर मुसलमान राज्यकर्त्यांच्या राज्यकारभाराचा केंद्रबिंदू उत्तरेंतच राहिला. त्यामुळें संस्कृतिसंचय महाराष्ट्रांत फारसा झालेला नव्हता. अजिबात झालेला नव्हता असें मला म्हणावयाचें नाहीं. इतकेंच काय पण एका काळीं महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील प्रांतांतसुद्धां संस्कृतीचे दैदीप्यमान किरण कांहीं फांकलेले आढळतात.

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक मंद प्रगतीचें रहस्य त्यांच्या अतिप्राचीन व भौगोलिक परिस्थितींत जें आहे तें विसरणें म्हणजे इतिहासाच्या विश्लेषणाचें साधन हातांतून गमाविण्यासारखें आहे. पहिली गोष्ट ही कीं, महाराष्ट्रांतील कांहीं भाग अलिकडे कांहीं शतकांत वसले. त्याला शेंकडों वर्षें झालीं, तरी तीं हजारांत मोजतां येईलसें वाटत नाहीं. दुसरें म्हणजे महाराष्ट्रांतले थोडे प्रांत जरी सुपिक असले, तरी गंगासिंधूनजीकच्या भूमीची सुपीकता तींत नाहीं; व पुष्कळ महाराष्ट्राचे भाग तर नापीक आहेत. त्यामुळें मानवी जीवनाला संपन्नता आणणें तितकेंसें शक्य नव्हतें.

## सामाजिक प्रगतीचा अर्थ

पण याचा अर्थ ती कधींहि आणतां येणार नाहीं असा मुळींच नव्हे. कारण अन्य मानवबंधू निसर्ग जिंकतात, शास्त्रें वर्धित करतात, यंत्रें बनवितात, वहातुकींत क्रांति करतात, त्यांचे परस्पर हितसंबंध उत्पन्न करणारीं कारणें घडतात व सर्व समाज म्हणजेच निरनिराळ्या ठिकाणीं रहाणारे लोक प्रगतीचा मार्ग चोखाळूं लागतात. महाराष्ट्र हिंदच्या इतर प्रांतांबरोबर तोच मार्ग चोखाळीत आहे. अखिल हिंदहि इतर देशांबरोबर तो मार्ग चोखाळीत आहे.

सामाजिक विकासाचीं अंगें पुष्कळ आहेत. जशा व्यक्तीच्या विकासाच्या शक्यता असतात तशींच. म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत व विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत महाराष्ट्र आघाडीवर होता असें म्हणणाऱ्यांनीं त्याचा असा अर्थ स्पष्ट समजून तसें जरूर म्हणावें. जसा व ज्यांत महाराष्ट्र पुढें होता तसा व त्यांत व त्याच वेळीं बंगालहि पुढें होता. आपल्याकडे व बंगाल्यांत साक्षरता तौलनिक दृष्टीनें जास्त होती. इथें एक गोष्ट उल्लेखितों. मुंबई हें मोठें शहर औद्योगिक वाढीमुळें बनलें. बंदरहि असल्यानें त्याच्या प्रगतींत भर पडली. किनाऱ्यावरहि तें मध्यवर्ती असल्यानें व्यापाराचें व राजकारभाराचें तें केंद्र बनलें. महाराष्ट्र, बंगाल्यांत साक्षर वर्ग पुढें आलेला दिसतो, तर इतर बाबतींत इतर ठिकाणें पुढें चाललीं होतीं. अहमदाबादला औद्योगीकरण वाढीस लागलेलें होतें व आतां तर तें हिंदचें मँचेस्टर झालें आहे. जमशेटपूरचें औद्योगिक महापर्व लिहिलें गेलें व आज हजारों मजूर तिथें उत्पादक काम करीत आहेत. सारांश नोकरीवर महाराष्ट्र-बंगाल मधला मध्यमवर्ग पुढें आला, तर इतर कांहीं ठिकाणीं व्यापारीवर्ग पुढें आला. आतां शिकून पदवी मिळवून मध्यम स्थितींत राहणारा मनुष्य व्यापारांत संपन्न होऊन इतर बाबतींत अद्यावत् जीवन घालविणाऱ्यापेक्षां अधिक प्रगत असतो असें म्हणणें एकांगीपणाचें आहे.

पण बहुजनसमाजाचें काय ? तो बहुधा सर्वत्रच दडपलेला व मागासलेला दिसतो. तो जर समाजाचा कणा तर महाराष्ट्र पुढें होता हें कशाच्या गमकावर म्हणावयाचें ? महाराष्ट्र अवनत आहे हें खरेंच. पण त्याची कारणमीमांसा निरनिराळी देण्यांत येते.

## कारणमीमांसा नव्हे, स्पष्टीकरण

" ज्ञानाची घमेंड, सहकारी प्रयत्नांचा अभाव, वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांजकडे पहाण्याची चुकीची दृष्टि " हीं कारणपरंपरा श्रीयुत गोऱ्यांच्या मतें महाराष्ट्राच्या मागासलेपणाला जबाबदार

आहेत. माझ्या मतानें श्री. गोऱ्यांनीं दिलेल्या कारणपरंपरेला कार्यकारणस्वरूप अजिबात नसून मागासलेल्या परिस्थितीचीं कारणें सांगतांना त्यांनीं फक्त मागासलेपणा म्हणजे काय हेंच विस्तारानें सांगितलें आहे. सहकारी प्रयत्नांचा अभाव महाराष्ट्रांत आहे असें म्हणणें म्हणजे महाराष्ट्राच्या पिछेहाटीचें कारण देणें नव्हे; फक्त परिस्थितीचें वर्णन करणें येवढाच त्याचा अर्थ आहे. सहकारी प्रयत्न कोण व कशाकरतां करणार? स्वतंत्र लहान लहान शेतकरी सारा भरतो व कसें तरी जगत असतो. मालगुजारी व खोती यांत राबणारा शेतकरी निरनिराळ्या खेड्यांत विभागला गेलेला व सामाजिक परिस्थितीचें किमान ज्ञानहि मिळेल वा मिळवील अशी त्याची कुवत नाहीं. मध्यम वर्गाला पूर्वी सहकारी संघटनेची जरूर वाटली नाहीं. पण त्याच शेतकऱ्याचा मुलगा शहरांत गेला कीं, युनियनचा सभासद होऊन सहकारी प्रयत्न करावयास लागूं शकतो. त्याचे शहरांतील पुढारी व तो अजून महाराष्ट्रांत खुद्द ग्रामीण शेतकऱ्यांना सहकारी प्रयत्न करावयास प्रवृत्त करण्यांत फारसा यशस्वी झालेला नाहीं. मागेंपुढें मात्र होऊं शकेल. सारांश उद्योगधंद्यांच्या वाढींतून कामगार सहकारी प्रयत्न करण्यास शिकला व मध्यम वर्गाला प्रस्थापित पद्धतीचे चटके लागूं लागले कीं, हे दोन्हीहि वर्ग मिळून शेतकऱ्यांत सहकार्याचें लोण पोंचवितात असें जे म्हणतात त्यांच्या म्हणण्यांत फार तथ्य दिसतें. ज्ञानाची घमेंड व वर्तमानकाल व भविष्यकाल यांजकडे पहाण्याची चुकीची दृष्टि हें रोगाचें कारण नसून लक्षण आहे. त्यांच्यावर उपाय भौतिक वा आर्थिक किमान इतक्या भरभराटींतून निर्माण करतां येणें शक्य असलेली ज्ञानाची पातळी वा लालसा हेंच आहे. हें रोगाचें लक्षण कळून येणें ही सुद्धां प्रगतीची पायरीच असून समाजांतील अधिक लोकांना ज्ञान मिळवण्याइतकें स्वास्थ्य व ज्ञानप्रसार करण्याची शक्यता होईल तसतशी ती दृष्टि निवळत जाईल. एकूण ज्ञानाच्या पातळींत भर पडण्यासाठीं परिस्थिति व प्रयत्न केल्याखेरीज ज्ञानलव व दुर्विग्धता, पूर्वग्रह व भावनाप्रधानपणा कमी होणार नाहीं. माझा प्रयत्नांवर पूर्ण विश्वास आहे. पण प्रयत्नांचें स्वरूप व यश इतर परिस्थितीनेंहि मर्यादित होत असतें हें मला पूर्ण मान्य आहे.

## पाकिस्तान व संयुक्त महाराष्ट्र

संयुक्त महाराष्ट्राविषयीं मला कांहीं विचार उल्लेखावयाचे आहेत. मला असा अनुभव आहे कीं, सर्वसाधारण मुसलमान ज्या भावनाप्रधानपणामुळें 'पाकिस्तान' एकदम मंजूर करी वा हिंदुसभावादी 'अखंड हिंदुस्तान' मंजूर करी तसेंच वर्तन बरेचजण 'संयुक्त महाराष्ट्रा'विषयीं करतात. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीविरुद्ध मी नसून ती अधिक डोळसपणानें व बुद्धिवादानें चालली तरच तिचा कांहीं उपयोग होईलसें वाटतें. यांत एका गोष्टीकडे मी जरा बोट दाखवितों. ती म्हणजे अशी कीं महाराष्ट्रांतील मोठमोठे कारखानदार व मध्यम वर्ग वा शेतकरी संयुक्त महाराष्ट्रासाठीं एके ठिकाणीं येऊं शकतील काय व तसे आले तर त्याचीं कारणें समान असतील काय? माझें प्रांजल मत असें आहे कीं या चळवळीचें योग्य तें महत्त्व नीट उमजून देऊन ती चालविण्यांत यावी. म्हणजे सत्य परिस्थितीचें ज्ञान 'सत्याच्या प्रयोगाद्वारें' होऊन नवीन नवीन प्रकाश सामाजिक प्रश्नांवर पडेल. मला आणखी एका गोष्टीचा इन्कार करावयाचा आहे. तो म्हणजे जातीयता म्हणतात तो कांहीं महाराष्ट्राचा विशेष दुर्गुण नसून प्रत्येक प्रांतांत जातीयता आहे. सिंधमध्यें राष्ट्रीय स्वयंसेवक संघ महाराष्ट्राइतकाहि तौलनिक दृष्ट्या अधिक होता हें मी प्रत्यक्ष पाहून आलों आहें. दिल्लीचे व्यापारी शेंकडा कितीतरी प्रमाणांत संघवादी आहेत. बिहारांत संघ कमी जोरदार नाहीं. सारा पाकिस्तान जातीयवादी आहे. सारांश महाराष्ट्राला काय तें आत्मपरीक्षण करतांना जातीय म्हणण्याची टूम मला तर्कशुद्ध वाटत नाहीं. जातीयता हें एकूण

सामाजिक पद्धतींच्या कार्यकारणासंबंधींच्या अज्ञानाचें राजकीय स्वरूप आहे. तीच गोष्ट दहशतवादाची. महाराष्ट्रांतच काय ते दहशतवादी आहेत म्हणावें तर परवां डमडमला काय घडलें ? अल्लाबक्षांचा सिंधमध्यें मागें खून कसा झाला ? जयप्रकाशांवर महाराष्ट्राबाहेर सभेंत दगड कसे आले ? सारांश या अनिष्ट गोष्टी खास ' महाराष्ट्रीय ' पॅटर्नच्या नसून सर्वसाधारणच आहेत. त्या झेकोस्लाव्हिया, इजिप्त, पॅलेस्टाईन वगैरे ठिकाणींहि घडत आहेत.

## महाराष्ट्रीयांनीं काय करावें ?

यापुढें हिंदसुद्धां सर्व राष्ट्रांचा अभ्युदय जसा परस्पर सहकार्यावर अवलंबून आहे तसा महाराष्ट्राचा अभ्युदयहि इतर प्रांतांशीं समान दर्जावरून सहकार्य करून पुढें जाण्याचा प्रयत्न करण्यांत आहे. दुसरें म्हणजे समाजवादानें महाराष्ट्राचाच फक्त फायदा होणार नसून सर्वच देशांचा व हिंदमधील इतर प्रांतांचाहि फायदा होणार आहे. महाराष्ट्रानें आपल्याला पुरून उरेल तें इतर प्रांताला द्यावें व त्याबद्दल त्यांचेकडून जरूर तें घ्यावें. ज्या ठिकाणीं महाराष्ट्रीय व महाराष्ट्रीयेतर एका ठिकाणीं काम करतात तिथें महाराष्ट्राचा खास असा प्रश्न नाहीं. अन्यत्र इतर प्रांतांप्रमाणेंच महाराष्ट्राचेहि प्रश्न आहेत. ते त्यानें परिस्थिति अभ्यासून धैर्यानें व परिश्रमपूर्वक सोडवावे. त्यांनीं व्यापार, नोकरी, शिक्षण वगैरे करतां प्रांताबाहेर वा देशाबाहेर जाण्याची संधि दवडूं नये. खेड्यांतील शेतींत, पाणी–पुरवठ्याच्या वा वीज–पुरवठ्याच्या कार्यांत, लहान मोठे उत्पादक धंदे काढण्यांत लोकांनीं उत्साह दाखवावा. जें कमी पडेल तें खपून मिळवावें. याचा अर्थ आपली लूट करूं द्यावी असा नव्हे. मात्र सरदेशमुखी, चौथाईचे दिवस संपले हें जरूर समजावें. महाराष्ट्राला आज कितीतरी हवें आहे. तें शब्दांत किती मावणार ? त्याला आदर्श शेतकरी हवेत, लढाऊ शेतकरी हवेत, कष्टाळु कामगार हवेत–शिस्तीचे कामगार हवेत, यंत्रज्ञ हवेत–तंत्रज्ञ हवेत. शिक्षक हवेत–संशोधक हवेत–परप्रांतांत व परदेशांत प्रेम घेऊन जाणारे शांतिदूत हवेत. संघटक हवेत. आणि हें सर्व होऊन ज्ञानाच्या प्रकाशाबरोबर सुखासमाधानाचें वातावरण सर्वत्र निर्माण झालें पाहिजे.

: ६ :

# महाराष्ट्राच्या सर्वांगिण पिछेहाटीची मीमांसा

लेखक : ना. गो. चाफेकर

श्री. नारायणराव गोरे व श्री. शंकरराव जावडेकर यांचे लेख वाचले. गोरे यांच्या अंतःकरणाची तळमळ, विचारांचा संयमपणा व बुद्धीची कुशाग्रता हीं महत्त्वाच्या विषयाची चर्चा करण्यास अवश्य अशा शांत वातावरणाची निर्मिति करण्यास अनुकूल आहेत.

## जयकरांचा कांगावा

आजच्या राजकारणांत महाराष्ट्राला स्थान नाहीं, राजकारणाच्या दृष्टीनें महाराष्ट्र मागें पडला आहे हें सत्य आहे. या विषयीं बहुधा दुमत होणार नाहीं. असें होण्यास महाराष्ट्राचे अवगुणच जबाबदार आहेत असें गोरे यांस वाटतें. महाराष्ट्रि-

यांची कोती मनोवृत्ति हा एक अवगुण त्यांनीं निर्दिष्ट केला आहे. मात्र ज्या डॉ. जयकरांचा आधार त्यांनीं घेतला त्या जयकरांचें मत तसें नाहीं. जयकरांचा राग कॉंग्रेसनिष्ठांवर आहे. अधिकारारूढ कॉंग्रेसजन महाराष्ट्रियांना हटवादीपणानें, आक्रसानें, कांहींशा खुनशीपणानें दडपताहेत, असा जयकरांच्या भाषणांतून ध्वनि निघत होता. निदान मी तरी तसें समजलों. हें जयकरांचें मत प्रातिनिधिक स्वरूपाचें आहे म्हणून त्याचा थोडा अधिक ऊहापोह करणें अवश्य आहे. माझ्या मतें जयकर ज्या अवस्थेबद्दल तक्रार करीत आहेत ती एक वैचारिक क्रांति आहे. जयकरांनीं कॉंग्रेसविरुद्ध कांगावा केला त्याप्रमाणें त्यांच्याच शेजारीं बसलेल्या रँ. परांजप्यांना जयकरांविरुद्ध करतां आला असता. नेमस्त पक्षाला टिळकपक्षानें नेस्तनाबूद केलें. तोच प्रसंग टिळकपक्षावर कॉंग्रेसनें आणला. उद्यां समाजवादीपक्ष फोफावून कॉंग्रेस नामशेष होईल. हें वैचारिक प्रगतीचेंच द्योतक समजलें पाहिजे.

रानडे, टिळक, गांधी हे स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गांवरील ठळक टप्पे होत. तथापि अहिंसेच्या तत्त्वामुळें गांधी अलग पडतात. गांधींकडे आलें कीं, सांधा तुटतो. इंग्लिशांच्या सद्धेतूवर रानड्यांचा विश्वास होता. त्यांची राज्यशासनपद्धति हिंदुस्थानला अपायकारक होत आहे हें त्यांनीं जाणलें. त्यांचे दोष त्यांना पटविले म्हणजे राज्यकारभार सुधारेल अशी त्यांना आशा वाटत होती. लेखांच्या व व्याख्यानांच्या द्वारें ते लोक व राज्यकर्ते दोघांना राज्यकारभाराच्या घातक परिणामांची जाणीव करून देत. ह्यांपैकीं, सरकारवर कांहींहि परिणाम होणें शक्य नव्हतें. कारण सरकारची कृति हेतुपुरःसर होती. उलट रानड्यांचीं व्याख्यानें ऐकून वासुदेव बळवंत निर्माण झाला. टिळक रानड्यांच्या पुढें जाऊन त्यांनीं सरकार वेविश्वासु ठरविलें आणि कायद्याची मर्यादा न उल्लंघितां करतां येईल तितकी लोकजागृति व सरकारची अडवणूक करण्याचा प्रयत्न केला. लोकांत असंतोष माजविला. स्वराज्य कसें मिळेल ह्याची त्यांना निश्चित कल्पना नसावी. परंतु त्यांतून वासुदेव बळवंताची पुनरावृत्ति निघालीच. साहेबांचे खून झाले. हिंसेवर महाराष्ट्राची श्रद्धा. मराठी वीरांनीं तरवार गाजवलेली. हिंदुस्थानांतील कोणत्याहि लोकांकडून त्यांस हार खावी लागलेली नाहीं. "ततो युद्धाय युज्यस्व" हें आमचें महावाक्य. ह्याचे स्वाभाविक परिणाम म्हणजे बलोपासना, जेतृत्वाचा ताठा आणि परप्रांतीयांविषयीं तुच्छता.

## महाराष्ट्राची पाटी भरलेली !

इतक्यांत गांधींचा राजकारणी क्षितिजावर उदय झाला. मुत्सद्दीपणानें व निष्ठा म्हणून त्यांनीं हिंसावादाची हिंसा आरंभिली आणि अहिंसेचा पुकारा केला. महाराष्ट्रांत अहिंसावादाचा उपहास होऊं लागला; गांधीवादाची विटंबना होऊं लागली; प्रत्यक्ष गांधींची टर उडविण्यांत आली. महाराष्ट्राचा राजकारणांत वडिलकीचा मान. गांधी केवळ पोरसौदा. रानडे, गोखले, टिळक, ह्यांचे आम्ही वारसदार हा डौल. अखेरीस अनेक वर्षांचें राजकारणी पुढारीपण हातांतून निसटून जात चाललें. ह्याखेरीज रानडे–टिळकांचा काळ असा होता कीं, मुंबई, पुणें व कलकत्ता ह्या व्यतिरिक्त इतरत्र सर्व अंधार. मद्रास म्हणजे अज्ञानांधकारांत बुडालेला प्रांत. (ॲनी बिझँटनें मद्रासला राजकारणी बनवलें.) गुजराथी दामजोड; राजकारणाविषयीं त्यांची बेफिकिरी. (गांधीमुळें ते राजकारणांत ओढले गेले.) पंजाब, संयुक्त प्रांत वगैरे ठिकाणीं सर्व शुकशुकाट होता. बंगालमध्यें राजकारणवृत्ति निपजली होती. परंतु बंगाली लोक चंचल वृत्तीचे. त्यामुळें विद्वेत ते महाराष्ट्राच्या पुढें असूनहि त्यांस पुढारीपण लाभलें नाहीं. एकट्या महाराष्ट्राकडे–अर्थात् पुण्याकडे–सूत्रधारकत्व आलें व तें गांधीयुगाला प्रारंभ होईपर्यंत टिकलें. हें सर्व वैभव गांधींच्या उदयाबरोबर एका क्षणांत मावळलें. गांधींना असंख्य अनुयायी मिळाले. "गांधाळांची झाली भरती" पर प्रांतांनीं गांधींचें

शिष्यत्व स्वीकारलें. कारण त्यांची पाटी कोरी होती. उलट, महाराष्ट्राची पाटी भरलेली. ती पुसून नवा धडा कोण व कसा घेणार ? आपलें तें खरें ह्या आढ्यतेनें महाराष्ट्रानें गांधींना कसून विरोध केला. पण अखेरीस गांधीचळवळीच्या सोसाट्यांत महाराष्ट्र कोलमडून पडला. हें आमच्या मनाला डांचल्याविना कसें राहील ? :-

## संयुक्त महाराष्ट्रामागोमाग भगवा झेंडा, जरीपटका...

रानडे-टिळकांच्या वेळेस समाजापुढें मतपरिवर्तनाचा एकच प्रश्न होता. स्वराज्यप्राप्तीनंतर मतपरिवर्तन लुप्त होऊन प्रत्यक्ष राज्यकारभाराच्या पद्धतीचा-प्रकाराचा-प्रश्न उत्पन्न होत आहे. देशांत काँग्रेसचें बहुमत आहे. काँग्रेसच्या हातांत प्रथमच राज्यकारभार आला तो कारभारविषयक विशिष्ट मताकरतां म्हणून नव्हे, तर केवळ संख्येच्या बलावर. आजपर्यंत काँग्रेस हा पक्ष नव्हता. ह्या नंतर होईल-होत आहे. सत्तारूढ पक्षानें विरुद्ध पक्षाला राज्यकारभारांत सामील करून घ्यावें हें म्हणणें अव्यवहार्य आहे. कोणताहि स्वाभिमानी विरोधी पक्ष तशी अपेक्षाहि करणार नाहीं. ह्यास्तव महाराष्ट्र गांधीतत्त्वांशीं जोंपर्यंत समरस होत नाहीं तोपर्यंत तो मागें पडणार हें उघड आहे. महाराष्ट्राचा हा वैचारिक मृत्यु होय. हिंसावादाचा उद्धार करण्याची आशा करीत बसणें वेडगळपणाचें आहे. पण हें आम्हांला अद्यापि समजलें नाहीं. पूर्वजांच्या पराक्रमांचे जलसे करण्यांतच आम्ही गढून गेलों आहों. आमच्यांतील कांहीं व्यक्ती गांधी तत्त्वज्ञान पटवून घेऊन काँग्रेसमध्यें सामील झाल्या हें खरें, पण त्यांच्यांतहि 'महाराष्ट्र' मधून मधून डोकावतोच. तसें नसतें तर गाडगीळ-देवांनीं शिस्तीला धाब्यावर बसवून भाषावार प्रांतरचना, संयुक्त महाराष्ट्र, इत्यादिकांचें तुणतुणें वाजविलें नसतें. दुर्दैवानें अखंड, एकजिनसी देशाचें ध्येय फारच थोड्या लोकांपुढें आहे. भाषा अखंड देशाची आणि कृति संयुक्त राष्ट्राची ! संयुक्त महाराष्ट्राचा अभिमान धरला कीं, त्याच्या मागोमाग भगवा झेंडा, जरीपटका, मराठी भाषा ह्यांचा गौरव आलाच. अखंड देशांत आपणांस स्थान कदाचित् लाभणार नाहीं ही अन्तस्थ भीति आपणांमध्यें असते हें आपल्या मनाचा कानोसा घेतला तर सहज समजेल.

## तिभंगलेला महाराष्ट्र

महाराष्ट्र आज तिभंगला आहे. महासभावादी पत्रें अज्ञानांना अधिक अज्ञानी करीत आहेत; रा. स्व. से. संघ बुद्धिमान तरुणांना निष्क्रिय बनवीत आहे आणि कम्युनिस्ट सर्वांचाच विध्वंस करीत आहेत. अशा परिस्थितींत विचारी माणसाला निराशेनें ग्रस्त केल्यास नवल नाहीं. रा. जावडेकरांनीं म्हटल्याप्रमाणें महाराष्ट्राला ब्राह्मण, मराठे व महार ह्या तिघांनीं तूर्त ग्रासलें आहे. ह्या तिघांच्या झटापटींत महाराष्ट्र पिरगळून निघत आहे. कितीहि सोंग घेतलें तरी एकाचा दुसऱ्यावर विश्वास नाहीं ही गोष्ट लपली जाणें शक्य नाहीं. अभिमानानें ब्राह्मणांचा विवेक सुटला, त्यास्तव विघ्नें निर्माण करण्यावाचून त्यांच्या हातून कोणतेंच सत्कृत्य होणें शक्य नाहीं. मराठ्यांना सुज्ञ नेता नाहीं म्हणून त्यांच्याबद्दलहि आशा बाळगण्यास जागा नाहीं. राहिले महार. ते मात्र सुसंघटित होऊन विनीवर येण्याचीं चिन्हें दिसतात. डॉ. आंबेडकर यांच्या सारखा धीमान्, चतुर व देशद्रोह न करणारा पुढारी त्यांना लाभला आहे. सध्यांचें त्यांचें वर्तन मुत्सद्दीपणाचें असून देशाला विघातक नाहीं. महाराष्ट्र त्यांचा सदैव ऋणी राहील. तुटेपर्यंत ते ताणीत नाहींत, हा त्यांचा गुण अत्यंत प्रसंसनीय आहे. हें जरी आशादायक लक्षण असलें, तरी आज महाराष्ट्राचीं तीन दिशांना तीन तोंडें आहेत ह्यांत शंका नाहीं. ही स्थिति शोचनीय आहे.

## महाराष्ट्राचा अधःपात

महाराष्ट्राचा हा अधःपात राजकारणापुरतांच आहे असें मानणें मात्र बरोबर होईल

असें मला वाटत नाहीं. शास्त्र, कला, विद्वत्ता ह्यांतहि आमच्या पुढें इतर प्रांत गेले आहेत. रवीन्द्रनाथ टागोर, राधाकृष्ण, चन्द्रशेखर रामन, जगदीशचन्द्र बोस, ह्यांच्या तोडीचीं माणसें महाराष्ट्रांत नाहींत. मद्रासनें भाष्यम् आयंगारसारखे कायदेपंडित निर्माण केले; आणि आम्ही ? कलकत्ता विद्यापीठांत अशुतोष मुकर्जीनें क्रांति केली. निरनिराळ्या शाखांत संशोधन करणारे बंगाली पंडित आज बहुसंख्य आहेत. भांडारकर प्राच्यविद्यामंदिराच्या सांवत्सरिकांत लेखकांचीं नांवें पाहा. थोड्या काळापूर्वीपर्यंत परप्रांतस्थांच्या लेखांनींच अंक भरलेला असे. मद्रासच्या हिंदूसारखें इंग्रजी दैनिक आम्हांला काढतां आलें नाहीं. आजचे कुलेतिहासलेखक हे आमचे संशोधक ! आमच्यामध्यें विश्वेश्वर अय्या तरी सांपडेल काय ? ह्या सर्वांचा निर्विकार मनानें विचार केल्यास महाराष्ट्राला बुद्धीची घमेंड मारण्याचें कारण पडणार नाहीं. महाराष्ट्राला ज्ञानाची घमेंड आहे असें गोरे म्हणतात तें बरोबर आहे. परंतु ज्ञान नसतें तेथेंच घमेंड असते हें त्यांना सांगावयास नको. या घमेंडीमुळें सहकार्य होत नाहीं. " वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांच्याकडे पाहण्याची चुकीची दृष्टि" काय सुचविते ? माझ्या मतें विवेकाचा अभाव अथवा अज्ञान.

## समाजवादांतील अडचणी

ह्यावर समाजसत्तावाद हा उपाय सुचविण्यांत आला आहे. विद्यमानकालीं प्रत्येक विचारी मनुष्य समाजसत्तावादी तत्त्वतः असला पाहिजे अशी माझी समजूत आहे. परंतु हीं तत्त्वें व्यवहारांत आणण्यास फार मोठ्या अडचणी आहेत. प्रथमतः राष्ट्रांत किमान नीतिमत्ता पाहिजे, तिचा पूर्ण अभाव आहे. ह्या खेरीज अवश्य त्या गुणांची कमतरता आहे. समाजसत्तावादांत समानतावादाचाहि अन्तर्भाव होतो. परंतु महाराष्ट्राच्या मनाची ठेवण अद्यापि जुन्या जमान्यांतील आहे. ती एकदम बदलणें अशक्य आहे. सर्व संपत्ति राष्ट्राची करावयाची म्हणजे उद्योगधंदे राष्ट्रानें, म्हणजे सरकारनें, आपल्या हातीं घ्यावयाचे. परंतु सरकारला इतकीं दक्ष, कर्तबगार व प्रामाणिक माणसें मिळतील काय, हा मुख्य प्रश्न आहे. सरकारला फसवणें म्हणजे आपण आपल्याला फसवणें ही जाणीव पदवीधरांतहि उत्पन्न झाली नाहीं. संपत्तीच्या वाटणीपेक्षां संपत्ति निर्माण करण्याचा प्रश्न आज राष्ट्रापुढें आहे. हा प्रश्न सोडवण्यांत सर्वांचें सहकार्य मिळालें पाहिजे. ज्या थोड्यांजवळ संपत्ति आहे तिच्यावर सरकारनें झडप घालण्याचें ठरविल्यास ती संपत्ति भूमिगत होणार व तें स्वाभाविक आहे. ह्या बाबतींत महाराष्ट्राची स्थिति अनुकूल आहे हें खरें; कारण महाराष्ट्रांत उद्योगधंदे, कारखाने वगैरे म्हणण्यासारखे नाहींत. महाराष्ट्राची जमीन आहे. हें राष्ट्रधन म्हणून पूर्वींच इंग्रज सरकारनें ठरविलें आहे. नवीन कारखाने निघतील ते सरकारच्या मालकीचे असतील, हें सरकारचें धोरण निश्चित झालें आहे. एकंदरींत सरकार समाजवादाच्या मार्गावर आहे ह्यांत संशय नाहीं. सरकारचें पाऊल सावधगिरीनें पडणें स्वाभाविक आहे. हिंदुस्थानची आज अशी स्थिति आहे कीं, कोणत्याहि परकी राष्ट्रानें स्वारी करून तो काबीज करावा. आंतरराष्ट्रीय कारणांमुळें व काळ बदलला आहे म्हणून हें घडलें नाहीं एवढेंच. अशा परिस्थितींत परराष्ट्र संबंध सांभाळण्याचें काम अत्यंत महत्त्वाचें ठरतें. ह्याबाबतींत पंडित नेहरूंची कामगिरी वाखाणण्यासारखी आहे.

## खेड्यांची उन्नति हें एकच कार्य

खेड्यांच्या उन्नतीचें कार्य महाराष्ट्रांतील जनतेला हातीं घेतां येईल. त्या कामाला कोणत्याहि सरकारचें सहाय्य मिळेल, कायद्याची आडकाठी नाहीं. एक दोन इसम आपल्या निवडीचें खेडें घेऊन तेथें राहिले व आपल्या कल्पनेप्रमाणें सरकारी संस्था स्थापून सर्व प्रकारच्या सुधारणा करूं लागले तर तें एक मोठें देशकार्य होणार आहे. खेड्यांच्या उन्नतीचा प्रश्न पक्षातीत आहे.

कोणत्याहि वादाचें नांव न घेतां हें काम करतां येईल. रा. स्व. सेवक संघानें खेड्यांची उन्नति हेंच आपलें ध्येय ठरवावें. निदान सर्व पक्षांचा एकोपा होण्याला हाच एक उपाय आहे. सत्ता-लोलुप सत्ता काबीज करतील. त्यांना तसेंच सोडून द्यावें. किती झालें तरी मंत्री हे नोकर आहेत. नोकर होण्याऐवजीं सुबुद्ध धनी होण्याची महत्त्वाकांक्षा प्रशंसनीय ठरेल. सध्यां चालू असलेल्या सर्व चळवळी सत्ता पटकावण्याच्या हेतूनें होत आहेत. निरपेक्ष सेवा करूं इच्छिणारे थोडेच महाभाग सांपडतील. शेतकरी कामगारी पक्ष वगैरे संज्ञा टाकून ग्रामोन्नति संघ स्थापन करतां येईल. असें न झाल्यास स्वार्थसाधु लोक पुढारी बनून खेड्यांतील अज्ञ लोकांना आपल्या कच्छपीं लावतील; आणि आपल्या फायद्याकरतां त्यांचें अज्ञान टिकवण्याचा प्रयत्न करतील. समाज-सत्तावादी जनांच्या कार्यक्रमांत सहकारी संस्था, ग्रामसुधारणा ह्या बाबी आहेतच. ह्याच्यापुढें कार्यालाच किंमत चढणार आहे. नुसत्या पोकळ वक्तृत्वाला अगर लेखनाला कोणी भीक घालणार नाहीं.

## निराशेचें कारण नाहीं

महाराष्ट्र पुढें गेला होता म्हणून मागें पडला हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. हिंदुस्थानाच्या इतिहासांत मराठ्यांचें नाव चिरस्मरणीय राहील हें निर्विवाद आहे. परंतु कालानुसार ध्येयें बदलतात व कार्य करण्याची चाकोरीहि बदलावी लागते हें जर आपण शिकलों नाहीं तर आपली धडगत नाहीं. पूर्वजांचा अभिमान अवश्य बाळगावा, परंतु त्यांच्या परिस्थितींत त्यांनीं जें केलें तेवढ्या पुरता. बदलत्या स्थितींत तोच आदर्श घेऊन वागणें वेडेपणाचें होईल. आजची कामगिरी पार पाडण्याची जबाबदारी ह्यात माणसांवर आहे; मृतांवर नाहीं हें आम्ही ओळखलें पाहिजे. ओळखूं लागलोंहि आहों. भविष्यकाळाचें दर्शन घेऊन वर्तमानकाळाचा विचार करणारे गोऱ्यांसारखे तरुण महाराष्ट्रांत निर्माण होत आहेत. मग निराश होण्याचें कारण काय ?

## संयुक्त महाराष्ट्राला विरोध

श्री. देशमुख ह्यांच्या विचारांशीं मी सहमत आहे. माझा मतभेद संयुक्त महाराष्ट्राच्या अभिमानासंबंधानें आहे. मी अखण्डदेशवादी आहें. एक राष्ट्र, एक भाषा, एकजीवी समाज हें माझें ध्येय आहे. महाराष्ट्रियांनीं व्यापारांत शिरावें हा उपदेश मला मानवत नाहीं. गुजराथ्यांनीं व्यापार पतकरला आहे ते आमच्याच देशांतले ना ? त्यांचा व्यापार तो आमचा नव्हे का ? आम्ही आपल्या बुद्धीला जें वळण लावलें आहे तें बदलण्याचें कारण नाहीं. प्राचीन काळीं ह्या देशांत लहान लहान राष्ट्रें होतीं त्यामुळेंच परकीयांना आक्रमण करण्याची संधी मिळाली आणि आम्ही गुलाम बनलों. हें सर्व विसरून जावयाचें काय ? संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही आमच्या आकुंचित वृत्तीची ध्वजा आहे. गुजराथी व कानडी आमच्यासारखेच आहेत हें मला मान्य आहे. फार काय, आमचे आजचे राष्ट्रीय सभापति तसेच आहेत. आज नेहरू आम्हांला आदर्शभूत आहेत. राजकारणांत त्यांचें शिष्यत्व पतकरणें आपल्या हिताचें आहे. मुनशी महागुजराथची चळवळ करतात म्हणून आम्ही संयुक्त महाराष्ट्राची करावी, हें आत्मघातकीपणाचें आहे. मुनशी चुकतात त्यांना दोष द्या; पण त्यांचें अनुकरण तोडीस तोड म्हणून करूं नका. देशांत सध्यां सर्वत्र फुटीर वृत्ति बोकाळली आहे. संयुक्त महाराष्ट्र देशाला उपकारक होईल हें मला पटत नाहीं.

: ७ :

# महाराष्ट्राची दुर्दशा कशी थांबेल ?

◆ लेखक : शं. वा. किर्लोस्कर ◆

हिंदुस्थानाला स्वातंत्र्य लाभलें असलें, तरी या देशांत शांततेचें व सुबत्तेचें युग अद्याप सुरू व्हायचें आहे. ब्रिटिशांचें पाऊल हिंदुस्थानांतून निघण्यापूर्वी स्वराज्याबद्दल जनतेच्या मनांत खूप मोठ्या अपेक्षा निर्माण केल्या होत्या. स्वराज्य म्हणजे गुलामगिरींतील खडतर व दरिद्री जीवनाचा शेवट, स्वराज्य म्हणजे नव्या, रम्य, समृद्ध जीवनाचा प्रारंभ, असें समीकरण जनतेनें पाठ केलें होतें. तथापि स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जें आल्हाददायक चित्र आपल्या दृष्टीला पडेल अशी सर्वांनीं आशा केली होती तें मृगजळाप्रमाणें दूर पळत चालल्याचें पाहून लोकांचा धीर सुटत चालला असला तर नवल नाहीं.

## स्वातंत्र्याच्या अक्रोडाचें रोप

वास्तविक स्वराज्याबद्दल अशी अतिरिक्त कल्पनाच उराशीं बाळगणें चूक होतें. कारण स्वराज्य म्हणजे कांहीं यक्षिणीची कांडी नव्हे किंवा कल्पवृक्ष नव्हे, कीं ज्याच्यामुळें मनांत आणूं ती वस्तु आपोआप आपल्या घरांत येऊन पडेल. स्वातंत्र्यामुळें आपल्या देशाचा कारभार चालविण्याचा अधिकार परत आपल्या हातीं आला आहे ही मोठीच गोष्ट झाली. तथापि या स्वातंत्र्याचा फायदा तेव्हांच आपल्या पदरांत पडूं लागेल, कीं जेव्हां अस्तन्या वर सारून सारा भरतखंड आपल्या उद्योगाची व कष्टाची शिकस्त करील व पायरीपायरीनें अभ्युदयाचें शिखर गांठील. स्वातंत्र्याच्या वृक्षाचें रोप हें अक्रोडाच्या रोपासारखें आहे. त्याचीं मधुर फळें चाखण्यास त्या झाडाची निगा तर घेतलीच पाहिजे, पण त्यासाठीं अवश्य धीरहि माणसाजवळ पाहिजे.

असा धीर आपल्याला नसल्यानें समाजवादी गोरे म्हणतात त्याप्रमाणें “ महाराष्ट्र विचारानें गोंधळलेला, निराशेनें हतबुद्ध झालेला, चुकीच्या दृष्टिकोनामुळें तर्कटी बनलेला, मनानें दरिद्री व कर्मानें बेफाम ” झाला आहे. परंतु यांत दोष समाजाचा आहे असें म्हणतां येईल काय ? स्वातंत्र्य मिळालें तरी त्याचा खरा अर्थ जनतेला समजावून देण्याचा कोणी कितीसा प्रयत्न केला ? स्वातंत्र्य मिळाल्यावर प्रत्येक व्यक्तीवर कोणती नवी जबाबदारी आहे याची जाणीव तिला कोणी करून दिली काय ? जनतेला विश्वासांत घेऊन तिला कार्यासक्त करण्याची योजना कोणी पुढें मांडली काय ? तसें कांहीं झालें नाहीं. त्यामुळें स्वातंत्र्यप्राप्तीच्या हर्षोन्मादांतून हळूहळू जागे झाल्यावर, जग आहे तसेंच आहे हें दिसून अपेक्षाभंगाचा तडाखा जनतेला बसावा हें सहाजिक होतें. आणि या अपेक्षाभंगांतूनच श्री. गोरे यांनीं वर्णन केलेल्या अनिष्ट प्रवृत्तींचा उगम होत आहे.

## अश्रु, रक्त आणि घाम...

हिंदुस्थानाला स्वातंत्र्यप्राप्ती झाली तो क्षण किती आणीबाणीचा होता हें कोणाच्या लक्षांत आलें नाहीं. तो क्षण कृतार्थतेचें लटकें समाधान

मानून आराम करण्याचा नव्हता, तर युद्धाला सज्ज झालेल्या सैन्यापुढें ज्या प्रकारचा क्षण उभा ठाकतो त्या प्रकारचा तो अत्यंत परीक्षेचा क्षण होता. खरें सांगायचें तर इंग्लंडवर जर्मनीची धाड आली तेव्हां जो प्रसंग ब्रिटिश जनतेवर ओढवला तसाच प्रसंग स्वातंत्र्यप्राप्तीबरोबर आपल्या देशावर ओढवला होता. अंतर इतकेंच कीं, हिंदुस्थानवर घाला घालणारे शत्रू डोळ्यांनीं दिसणारे नव्हते. पण त्यामुळें ते कमी भयंकर होते असें मुळींच नव्हे. प्रत्यक्ष युद्धामुळें युरोपांत जी प्राणहानी व वित्तहानी झाली आणि समाजाची वाताहात झाली तीच स्थिति आज हिंदुस्थानाची झालेली आपण पहात नाहीं काय ? ब्रिटनवर जेव्हां वरील संकट ओढवलें तेव्हां चर्चिलनें आपल्या देशबांधवांना आवाहन केलें व "तुम्ही मला तुमचे अश्रु, रक्त व घाम द्या, म्हणजे तुम्हाला मी विजय देतों" असें पुकारून जनतेची अभेद्य फळी उभी केली. सारें ब्रिटन शत्रूशीं सामना द्यायला उठलें. लहानापासून म्हाताऱ्यापर्यंत प्रत्यकानें नेत्याच्या हांकेप्रमाणें १०, १२ तासांप्रमाणें, महिन्याचे महिने, पडतील तीं कामें चुकारपणा न करतां, न कुरकुरतां पार पाडलीं, तेव्हांच शत्रूला परतवून ब्रिटनला विजय मिळवतां आला. आपल्या स्वातंत्र्योत्तर काळांत असा प्रचंड राष्ट्रोपयोगी खटाटोप करण्यास जनतेला उठवावयास हवें होतें, तें कोणी केलें नाहीं. आमच्या क्रिकेट मॅचीस, आमचे नाट्योत्सव, आमचे रंगढंग धूमधडाक्यानें पहिल्यासारखे चालू होते ! जणूं देशांत स्वातंत्र्य आलें म्हणजे विशेष कांहीं झालेंच नाहीं !

## विचारानें मार्ग सापडेल

श्री. गोरे यांनीं महाराष्ट्राच्या सद्यःस्थितीचें केलेलें वर्णन वावगें नसलें, तरी माझी या परिस्थितीची मीमांसा वरीलप्रमाणें आहे. तसेंच ही वस्तुस्थिति एकट्या महाराष्ट्राचीच असावी असें मानायला नको. कमी अधिक अंशानें हीच अवस्था इतर प्रांतांची देखील असणार. परंतु आपल्या कुरणाच्या आजूबाजूस पसरलेलीं कुरणें स्वतःला अधिक हिरवीगार दिसतात. तसाच आभास महाराष्ट्राची इतर प्रांताशीं तुलना करतांना होणें अगदीं नैसर्गिक आहे.

तथापि महाराष्ट्राला लागलेली सध्यांची घसरगुंडी थांबावी व भावी अनर्थापासून त्याचा बचाव करावा अशी आपली इच्छा असल्यास मागील चुकांबद्दल हळहळण्यांत अर्थ नाहीं. तसेंच महाराष्ट्राच्या भवितव्याबद्दल हताश होण्याचेंहि कोणास कारण नाहीं. आपल्यावर केवढेंहि मोठें गंडांतर ओढवलें असलें तरी शांत चित्तानें व कसून विचार केल्यास त्यावर तोडगा निघूं शकतो हा आपला अनुभव आहे व त्याप्रमाणें प्रयत्नाला सुरवात केली तर त्यांतून आपली मुक्ताहि होऊं शकते. एवढ्यासाठीं या वेळीं महाराष्ट्रांतील विचारवंतांनीं एकत्र जमून बिघडत चाललेल्या परिस्थितीचा विचार करावा, ही श्री. गोरे यांची सूचनाहि सर्वांना मान्य होण्यासारखी आहे.

## प्रत्यक्ष कार्यक्रमाची आवश्यकता

अशा विचारवंतांनीं कोणत्या प्रश्नांचें उत्तर निश्चित करावयाचें हेंहि निःसंदिग्धपणें ठरवावें लागेल. नाहींपेक्षां त्यांच्या चर्चेला योग्य दिशा लागण्याऐवजीं मुळांतच गोंधळ उडायचा. तसेंच चर्चेतून निष्पन्न होणारे निर्णय सामान्य स्त्रीपुरुषालाहि आकलन करतां येतील व मार्गदर्शक होतील अशा पद्धतीनें त्यांच्यापुढें ठेवले पाहिजेत. थोडक्यांत सांगायचें, तर या चर्चेतून प्रत्यक्ष एकादी योजना बाहेर पडून राष्ट्रीय नवरचनेच्या कार्याला सुरवात होऊं शकली तरच ही खटपट सफल झाली असें म्हणतां येईल. कारण नुसती वैचारिक खळबळ करण्यापेक्षां प्रत्यक्ष कार्यक्रमाची आतां देशाला खरी आवश्यकताआहे.

हिंदुस्थानांत अगोदर निर्भेळ व पूर्ण समाजवाद स्थापन झाल्याखेरीज इतर कामाला हात घालतां यावयाचा नाहीं, असें म्हणण्याचा श्री. गोरे यांचा रोख असेल, तर मात्र त्यांच्याशीं सहमत होणें जड होईल. मूळ उद्दिष्टच त्यामुळें बदलावें

लागेल. महाराष्ट्रीय जनतेच्या निर्वाहाची व सुखा-समाधानाची अधिक चांगली व्यवस्था लावून आपल्या प्रांताचा सर्व बाजूंनीं विकास करावयाचा हें आपलें उद्दिष्ट असेल, तर तें साधण्यासाठीं आपलें बुद्धिबळ, मनुष्यबळ व इतर साधनसामुग्री यांचा जमेल तसा उपयोग करून पायरीपायरीनें पुढें सरकावें लागेल. पण विशिष्ट राज्कीय पंथाची स्थापना केल्यावरच देशाच्या सुधारणेचा प्रश्न हातीं घ्यावयाचा असें म्हटलें, तर सध्यां अधिकारावर असलेल्या पक्षाशीं लढा देऊन त्याला पदच्युत करण्यासाठींच सर्व शक्ति वेचावी लागेल. मात्र असा अंतस्थ कलह सुरू केल्यास देशाची स्थिति बिघडून त्याची दशा अधिक विपरीत होईल, हेंहि अगोदर लक्षांत ठेवलें पाहिजे.

## जावें त्याच्या वंशा...

कारण असा लढा पुढें केवढें व्यापक स्वरूप धारण करील, त्याला केवढी उग्रता प्राप्त होईल, तो किती काळ चालेल व त्यांतून कोणतें अनिष्ट फळ बाहेर पडेल याचा कांहींच नेम सांगतां येत नसतो.

क्षणभर असेंसुद्धां धरून चालूं कीं, समाजवादी अथवा इतर एकाद्या पक्षानें असा निकराचा लढा दिला व राज्ययंत्र ताब्यांत घेतलें तरी केवळ या खांदेपालटानें देशाची स्थिति कितीशी बदलणार आहे ? जवाहरलालची जागा जयप्रकाश घेऊं देत, नाहीं तर जेधे अथवा जमनादास घेऊं देत, सद्यःस्थितींत हिंदुस्थानसारख्या अफाट पण कमकुवत, तसेंच अनेक भाषा, धर्म, पंथ व पेहराव यांचें कडबोळें बनलेल्या आणि अन्नान्न झालेल्या या देशाचा कारभार रेटून न्यायचा, तर जवाहरलालजींच्या पावलावर पाऊल टाकूनच त्यांना चालावें लागणार हें ठरलेलें आहे. कारण नुसतें म्यानिफेस्टो काढणें निराळें व राज्य चालविणें निराळें. प्रत्यक्ष अडचणींची कल्पना "जावें त्याच्या वंशा तेव्हांच कळे." तसेंच जनतेला ज्या प्रकारचें राज्य मिळतें त्याची तऱ्हा कोणा मूठभर लोकांच्या मर्जीपेक्षां त्या देशांतील जनतेच्या सर्वांगीण पात्रतेवरूनच ठरली जाते हा नियम आहे. त्यामुळें आपल्यास एका जुन्या राज्यपद्धतीचा निकाल लावून एक अभिनव पद्धत तिथें स्थापन करायची, तर त्याला कांहीं अवधि हवा. विशेषतः शेकडों वर्षें जनतेच्या अंगवळणीं पडलेल्या जुन्या राज्यपद्धतीला व समाजरचनेला झिडकारून हिंदुस्थानांत एक नवी प्रथा प्रस्थापित करण्याला दीर्घ प्रयत्न करावे लागतील. याचा अर्थ हें काम जरा सावकाशीचें आहे.

यावरून दिसून येईल कीं, आज घसरत चाललेलें महाराष्ट्राचें गाडें रुळावर आणण्यास एकाद्या "इझम"चा पाठपुरावा करण्यापेक्षां, युक्तायुक्त विचार करून आपल्यास स्वतःचे स्वतंत्र व्यावहारिक मार्ग चोखाळावे लागतील. आज पॅलेस्टाइन सारख्या देशांतील मूठभर एस्राएल त्या ओसाड प्रांताचें नंदनवन बनवीत आहेत व अशाच तऱ्हेचे राष्ट्रीय पुनरुत्थानाचे प्रयोग जगाच्या पाठीवर चालले आहेत. त्यांच्यापासूनहि जितकें शिकतां येईल तितकें शिकावें लागेल.

## आपल्याच पायावर घातलेली कुऱ्हाड

एवढेंच नव्हे, तर देशकालवर्तमान यांचा विचार न करतां आपण एकादी चळवळ सुरू केल्यास तिच्यापासून फायदा होण्याऐवजीं उलट पश्चात्ताप करण्याचीच पाळी येते हें आपण लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. आपल्या अनुभवांतील एक प्रत्यक्ष उदाहरणच येथें दिलेलें बरें.

महाराष्ट्रांत इतर खनिज साधनसंपत्ति विशेष नसली, तरी सह्याद्रीमुळें मुबलक वीज व शेतीला कालव्यांचें पाणी मिळण्याची उत्कृष्ट सोय आपल्या हाताशीं आहे. या सोयीचा लाभ करून घेण्यासाठीं टाटा कंपनीनें पूर्वीं तज्ज्ञांकडून सह्याद्रीची पहाणी केली व योग्य जागीं धरणें बांधण्याची योजना आंखली. तथापि दुर्दैव असें कीं, या धरणामुळें साऱ्या महाराष्ट्राचा औद्योगिक व शेतीचा विकास किती अमर्याद होईल इकडे न पाहतां, कांहीं शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार एवढ्यासाठींच टाटांची मुळशी येथील धरण-

योजना हाणून पाडण्यास महाराष्ट्रांत जोराची चळवळ सुरू झाली. तिचा परिणाम इतकाच झाला कीं, हातीं घेतलेलें मुळशीचें धरण मोठ्या मुष्किलीनें पुरें केल्यावर हेळवाकजवळ कोयना नदीला धरण बांधण्याची महाराष्ट्राला जीवनाधार ठरणारी योजना टाटांनीं रद्द केली.

महाराष्ट्राच्या खऱ्या प्रगतीला खो घालणाऱ्या गोष्टी आपणच केल्यावर महाराष्ट्राच्या पीछेहाटी-बद्दल तक्रार करायला आपणांला कुठें जागा रहाते ? याच्याच पुढची तऱ्हा म्हणजे परवां गांधीवधाचें निमित्त करून महाराष्ट्रांत समाजां-तील एका वर्गानें दुसऱ्या वर्गावर उगविलेला सूड ! या अत्याचारांत शेकडों घरें भस्मसात करण्यांत आलीं, इतकेंच नव्हे तर सुमारें चाळीस कार-खान्यांचाहि नाश करण्यांत आला. हे सर्व कारखाने महाराष्ट्रियांचे, व नाश करणारेहि त्यांचेच भाईबंद ! यापुढें कांहीं वर्षें दक्षिणेंतील कारखान्यांना डोकें वर काढणें किती जड जाणार आहे याची कुणास कल्पना आहे का ?

## करावें तसें भरावें...

महाराष्ट्रियांच्या भवितव्याबद्दल श्री. गोरे यांना काळजी वाटते. यापुढें त्यांना लवकर शहाणपणा सुचला नाहीं, तर त्यांच्या नशिबीं दुसऱ्याकडे मजूर, रामा गडी अथवा कचेरींत कारकून म्हणून राबण्याशिवाय दुसरा धंदा उरणार नाहीं, असें ते भाकित करतात. पण "करावें तसें भरावें" हा नियम अटळ आहे. त्याला महाराष्ट्र तरी कसा अपवाद ठरणार ? महाराष्ट्रांत बुद्धिमत्ता असेल, कर्तृत्व असेल, पण त्यांचा योग्य दिशेनें उपयोग न होतां त्याची भलतीकडे शक्ति खर्च होईल तर त्याला नरोटी धरण्याची पाळी येणार यांत काय नवल ? पण त्याला इतर कोण जबाबदार ?

टिळक–गोखल्यांनीं महाराष्ट्राला राजकारणांत अग्रेसर पद मिळवून दिलें, यांत शंका नाहीं. परंतु त्यांच्या राजकारणाला दोन आघाड्या असत. एकी-कडे सरकारशीं झगडत असतां दुसऱ्या बाजूनें देशाची ढांसळलेली आर्थिक भिंत पुनः उभी कर-ण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असे. स्वदेशीची मोहीम ही या दृष्टीनें त्यांची केवढी तरी महनीय कामगिरी होय. महाराष्ट्राला तिच्यामुळें एक नवजीवन प्राप्त झालें. मात्र त्यांच्या पश्चात् गेल्या ३० वर्षांत राज-कारण अत्यंत एकांगी बनून गेलें. त्यामुळें रचनात्मक कार्याचें खरें महत्त्व दृष्टिआड झालें. देश स्वयंपूर्ण व स्वावलंबी होण्यासाठीं देशांत अनेक प्रकारचे व्यवसाय व औद्योगिक प्रयत्न सुरू झाले पाहिजेत. पण असे उद्योग हातीं घेणारांना व चालवि-णाऱ्यांना उत्तेजन मिळण्याऐवजीं, पदोपदीं स्वकियांकडूनच निकराचा विरोध होत गेला, तर महाराष्ट्र पुढें येणार कसा ?

## विधायक कामाची जरूरी

महाराष्ट्र असो, किंवा देशांतील इतर कोणता प्रांत असो, साऱ्या जनतेपुढें आतां दोनच वाटा आहेत. प्रचलित सरकार कुचकामाचें आहे असें ठरवून त्याला उलटून टाकण्यासाठीं सगळीकडे झगडा सुरू करायचा ही एक वाट. हा मार्ग सध्यांच्या स्थितींत केवळ अव्यवहार्यच नव्हे तर अत्यंत आत्मघातकीपणाचा ठरेल. दुसरा मार्ग सध्यांच्या सरकारचेंच आसन स्थिर करून व त्याच्याशीं पूर्ण सहकार्य करून निरनिराळ्या विधायक योजना बेताबेतानें अंमलांत आणायच्या आणि जनतेची स्थिति सुधारायची, हा मार्गच महाराष्ट्राला श्रेयस्कर ठरेल.

मात्र हा मार्ग अनुसरण्यासाठीं साऱ्या देशांत अगोदर एक प्रचंड वैचारिक स्थित्यंतर घडवून आणावें लागेल. दीर्घकाल चालणारा व देशव्यापी कोणताहि उद्योग सुरळीतपणें चालविण्यांत देशां-तील आबालवृद्धांना त्याबद्दल अगत्य वाटलें पाहिजे, अशा कार्यक्रमाचें सर्वांना आकर्षण वाटून त्याला जरूर तें सहकार्य देण्यास त्याला अभिमान वाटला पाहिजे. अशा कामांत कसलाहि बिघाड होणार नाहीं याबद्दल प्रत्येकानें खबरदारी घेतली पाहिजे. पण वस्तुस्थिति कशी आहे ? सध्यां कोणत्याहि

विधायक कामाबद्दलची आस्था जनतेंत फार मंदावली आहे. उथळपणा व उच्छृंखल वृत्ति यांना मात्र सगळीकडे कसा ऊत आला आहे हें कुणाला दाखवायला नको. एवढें कुठें निमित्त झालें कीं, दंगल, हुल्लडबाजी व गुंडगिरी करायला जणू लोक टपलेले असतात. त्यामुळें कोणतेंहि कार्य सुरळीतपणें चालविणें मुष्किलीचें होत चाललें आहे. विद्यार्थ्यांची साधी परीक्षा असली, तरी तें काम कसें निभावून निघेल याबद्दल विद्याधिकाऱ्यांना प्रश्न पडतो. मग रेल्वे, पोष्ट, नगरपालिका, छापखाने, कारखाने व हॉस्पिटल्स अशा ठिकाणच्या कामाबद्दल तर बोलायलाच नको!

महाराष्ट्राच्या पुनर्रचनेच्या कार्याला हात घालायचा, तर समाजांत पसरलेल्या या वैचारिक अराजकाचा व बेवंदशाहीचा अगोदर बंदोबस्त झाला पाहिजे. जनतेला एवढ्यासाठीं योग्य मार्गदर्शन करून तिची सदसद्विवेक बुद्धि जागृत केली पाहिजे. व नव्या ध्येयाची तिच्यापुढें स्थापना केली पाहिजे. कारण जनतेचा पाठिंबा व तिचा उत्साह हेंच पुढील राष्ट्ररचनेच्या कार्यांतील मुख्य भांडवल आहे.

## समाजवादाला मान्यता

समाजवादच कां? —याबद्दल वाद घालण्याची जरूरी उरली नाहीं. उत्पादनांच्या साधनांच्या विकासाबरोबर समाजांत नवे वर्ग व हितसंबंध निर्माण होतात व जुन्या आर्थिक व्यवस्थेमध्यें बदल करावा लागतो. या सिद्धांताची माहिती आतां 'खेड्यांतील विद्यार्थ्यांनाही झाली आहे. अन्नधान्य व कारखान्यांतील मालाचें उत्पादन गरजेचा विचार करून नियंत्रित व्हावें व त्याची वाटणी पद्धतशीर व्हावी याहि कल्पनेचें महत्त्व सर्वांस कळून आलें आहे.

महाराष्ट्रांतील कारखानदार वर्ग सुबुद्ध व पुरोगामी विचारसरणीचा असल्यानें काळाबरोबर पावलें टाकण्यांत त्यांनाहि अवघड वाटणार नाहीं. मला तर असें वाटतें कीं, जग दिवसेंदिवस किती संकुचित होत चाललें आहे व त्यांत किती झपाट्यानें बदल पडत चालला आहे, याची आपल्या कारखानदारांइतकी इतर क्षेत्रांतल्या व्यक्तीस क्वचितच कल्पना असेल. त्यामुळें कोणत्याहि सुधारणेला हटवादीपणानें ते प्रतिकार करणार नाहींत. तथापि जी क्रांति व्हावीशी वाटते ती एकाच फटकाऱ्यांत होऊं शकेल काय, हा प्रश्न आहे. नसल्यास ती कोणत्या टप्प्यानें घडवून आणण्यासारखी आहे हें पाहिलें पाहिजे. आणि टप्प्याटप्प्यानें वर चढावयाचें तर सध्यांच्या सरकारशीं वितुष्ट करायला नको. कारण तेंच या सरकारचेंहि धोरण आहे व त्याला अनुसरून कायद्यांत इष्ट बदल होत आहेत हें आपण पहातोंच.

## समाजवादी कृति कुठें आहे ?

एवढ्याचसाठीं समाजवादाचा नुसता उदोउदो करून किंवा चालू गाड्याला खीळ घालून खरा समाजवाद प्रस्थापित होईल असें म्हणतां येणार नाहीं. समाजवाद हें एक तत्त्वज्ञान आहे, तो एक प्रकारचा धर्म आहे. आपल्या प्रत्येक व्यवहारांत व आचारांत समाजाच्या अंतिम हिताकडे लक्ष देऊनच माणसानें वागावें, ही विचारसरणी श्रेष्ठ प्रतीची आहे. माणसांनीं आपल्या स्वार्थाचें वर्तुळ व्यक्तीपुरतें आकुंचित न ठेवतां समाजाचाहि त्यांत अंतर्भाव होईल, एवढें तें विशाल करावें व तेवढ्यासाठीं त्याग करण्याची वेळ आली, तर त्याला आनंदानें तयार असावें, ही समाजवादाची शिकवणूक आहे. माणसाची वृत्ति या प्रकारची असेल तरच त्यानें समाजवादाचें खरें ग्रहण केलें असें मानतां येईल. पण सध्यां समाजवादी म्हणविणारे जें तंत्र वापरतात त्यांत ही दृष्टि आढळते काय? ऊठसूट कामगारांना संपाला प्रवृत्त करण्यांत परिणामीं समाजाच्या नरडीलाच नख लावल्यासारखें होत नाहीं का? परवां साऱ्या रेल्वेवर संप घडवून आणण्याचा घाट कामगारवर्गाच्या एका पक्षानें घातला होता. पण बहातुक

बंद पडल्यानें दुष्काळग्रस्त प्रांतांना वेळेवर धान्य न मिळून लाखों माणसांवर उपासमारीनें मृत्यू ओढवेल, एवढादेखील विचार या संपप्रवर्तकांना सुचूं नये ? बरें, तमाच कोठें मोठा अन्याय असेल तर संप करून मागण्या मिळवा, पण त्या प्राप्त झाल्यावर मग तरी काम चोख व मनापासून झालें पाहिजे ना ? रेल्वे–कामगारांना संपावर जाण्यास चिथावणी देणाऱ्यांनीं रेल्वेखात्यांत चाललेली लांचलुचपत, कामांतील दिरंगाई व निष्काळजीपणा यांना आळा बसण्यासाठीं कधीं ब्र काढला आहे काय ? हीच तऱ्हा साऱ्या औद्योगिक क्षेत्रांत आढळून येते. आपण करीत असलेलें काम स्वतःचें अथवा मालकाचें नसून तें समाजाचें असतें याची दखलगिरी कुणालाच नाहीं. उलट कामांत पहिल्यापेक्षांहि अधिक हेळसांड व बेपर्वाई वाढत चाललेली. अशा अनिष्ट व विकृत वृत्तीनें पछाडलेल्या व्यक्ति समाजवादी राष्ट्राचा पाया होऊं शकतील काय ?

श्री. गोरे यांना समाजांत पसरलेली विषमता पाहून हळहळ वाटते. ही विषमता दूर झाली पाहिजे याबद्दल दुमत नाहीं, परंतु त्या प्रयत्नांत व्यक्तिमात्रांतील कर्तव्यनिष्ठा, इमान, कळकळ, प्रामाणिकपणा, शिस्त इत्यादि गुणांना ओहोटी लागून सार्वजनिक नैतिक अधःपतन किती झपाट्यानें होत आहे इकडे दुर्लक्ष व्हावें हें मात्र योग्य नाहीं. कारण ठिसूळ विटांनीं बांधलेली भिंत फार उंच रचतां येत नाहीं, त्याचप्रमाणें मानसिक गुणांत हीन ठरणाऱ्या व्यक्तींनीं समाजाची उंची कशी वाढणार व त्यावर समाजवादाचा कळस तरी कसा चढणार ?

## केल्यानें होत आहे रे...

एवढ्याचसाठीं महाराष्ट्राला आतां विधायक कार्याची चटक लावली पाहिजे. सर्वांचे हात व डोकें यांना भरपूर अवसर मिळूं शकेल असा प्रत्येकाला व्यवसाय उपलब्ध करून दिला पाहिजे. आपण नव महाराष्ट्राचे रचनाकार आहों ही जाणीव प्रत्येकांत जागृत झाली पाहिजे. मी महाराष्ट्रीय कोणी क्षुद्र प्राणी नव्हे, माझ्याकडे एक थोर कामगिरी आली असून ती पार पाडण्याची मला अपूर्व संधी मिळत आहे, या चैतन्यपूर्ण विचारांनीं प्रत्येकाला स्फुरण चढलें पाहिजे. साऱ्या महाराष्ट्राच्या उत्साहाचा व कर्तृत्वशक्तीचा कोंडून राहिलेला झरा असा खळखळ करीत जेव्हां बाहेर पडेल व जिकडे तिकडे हजारों प्रकारचीं विधायक कामें करण्यांत जनता रंगून जाईल, तेव्हांच अनेक क्षुद्र बेबनाव व मतामतांतरांचा गलबला शांत होईल आणि सध्यां ज्या संशयाच्या व निराशेच्या मोक्यांतून महाराष्ट्र सांपडला आहे, त्यांतून तो बाहेर पडून उच्च जीवनाचा आस्वाद घेऊं लागेल.

मात्र सध्यांच्या गर्तेतून महाराष्ट्राला बाहेर काढण्याचें हें काम एकट्या दुकट्याचें नाहीं अथवा तें झटपट उरकतां येण्यासारखें नाहीं. तथापि प्रयत्नांची दिशा एकदां निश्चित झाली व महाराष्ट्रीय विचारवंत एकवटून खटपटीला लागतील तर महाराष्ट्राला " कृतिवंत " करण्यांत आपल्याला यश आल्यावांचून रहाणार नाहीं. कारण आपल्या पूर्वीं होऊन गेलेल्या एका थोर महाराष्ट्रीयानेंच एक महामंत्र आपल्यास ठेवला आहे, " केल्यानें होत आहे रे, आधीं केलेंच पाहिजे. "

: ८ :

# सांस्कृतिक प्रचाराची आघाडी उभारा !

लेखक : दिनकर साक्रीकर

नानासाहेबांचें (श्री. गोऱ्यांचें) पत्र विशेषत: दूरस्थ महाराष्ट्रीयांना आपलें मनोगत व्यक्त करणारें वाटेल. प्रत्यक्ष प्रांतांत राहाणांरापेक्षां प्रांतापासून दूर आल्यानंतरच ज्याप्रमाणें आपल्या 'स्वत्वा'ची जाणीव तीव्रतेनें होते त्याचप्रमाणें आमच्या 'पोरके' पणाचीहि होते, आज ही जाणीव विशेषत्वानें होण्याचें आणखी एक कारणहि आहे. महाराष्ट्रीय म्हणजे संघीय, जातीयवादी अशी सर्वत्र समजूत असते. एकवेळ आम्ही 'शिवाजी'चे वंशज म्हणून ओळखले जात होतों, नंतरच्या काळांत 'भगवान्' टिळकांच्या प्रांताचे म्हणून आमचा आदर. आज आम्ही फक्त गोडशाचे प्रांतबंधू आहोत. गोडशाविषयीं जितका आदर सामान्यत: असूं शकेल, तितकाच आदर सर्वसामान्य महाराष्ट्रीयाविषयीं आढळून येईल.

## मराठी भाषेची अवहेलना

आमच्या भाषेची काय कदर होते याचा प्रत्यक्ष अनुभव प्रथम ऑल इंडिया रेडिओच्या वृत्त–संस्थेंत काम करतांना आला. या संस्थेचें कार्य कसें चालतें याची बाहेर चांगलीशी स्पष्ट कल्पना नसते. बातम्यांचें संपादन करणारे एक, आणि अशा रीतीनें संपादित केलेल्या बातम्यांचें निरनिराळ्या भाषांतून भाषांतर करून तें वाचून दाखविणारे दुसरे, असे संपादक मंडळाचे दोन भाग असतात. पैकीं, खरे संपादक हे पहिलेच, म्हणजे मूळ इंग्रजींत बुलेटिन तयार करणारे असतात. त्यांचें बुलेटिन हें फक्त कोणताहि फेरफार न करतां भाषांतर करण्याचें काम दुसरे, ज्यांना आजकाल language editor म्हणण्यांत येतें ते, करतात. परंतु भाषांतरासाठीं key script तयार करणाऱ्या संपादकमंडळाच्या ज्ञानावर, किंवा अज्ञानावर, निरनिराळ्या प्रांतासाठीं जाणाऱ्या बातम्यांचें भवितव्य अवलंबून रहातें. या संपादकमंडळांत मराठी जाणणारा संपादक नाहीं. मराठी भाषा किंवा महाराष्ट्राविषयीं माहिती असलेला एकहि संपादक AIR मध्यें नाहीं. हें लक्षांत घेतल्यानंतर भारतीय महिला विद्यापीठाचे आद्य-संस्थापक होऊन सुद्धां, महर्षी कर्वे यांना AIR ओळखत कां नाहीं, भारतीय इतिहास परिषदेचे अध्यक्ष होऊनहि पोतदारांच्या नावांची गल्लत AIRचा वृत्त-निवेदक कां करतो, हैद्राबादसाठीं तेलगू आणि उर्दूतून AIR खास वेगळीं बुलेटिन्स करतो, पण मराठवाड्यासाठीं कां करीत नाहीं, वगैरे अनेक बारीक सारीक कमीअधिक महत्त्वाच्या कूटप्रश्नांचीं उत्तरें मिळतात. या गोष्टींचा उल्लेख इथें करण्याचा हेतु इतकाच कीं त्यावरून आमच्या भाषेबद्दल कशी अनास्था व अवहेलना केली जाते, याकडेहि या निमित्तानें लक्ष जावें.

## केवळ भाऊबंदकी ?

इतिहासाचें वाचन आणि अध्ययन विशिष्ट पद्धतीनें केल्यामुळें आमच्यापैकीं सर्वांच्या भूमिकेंत एक गृहितकृत्य असें असतें कीं, दोन महाराष्ट्री-

यांचें सहकार्य, विशेषत: ते बुद्धिवादी असले तर, अशक्य आहे. मराठेशाहींतील भाऊबंदकी, टिळक–गोखले, टिळक–आगरकर–वाद आणि आणखी अशी अनंत परंपरा आमच्या मनाच्या भूमींतच जणूं रुजलेली आहे. यांतहि अर्धसत्याला आम्ही संपूर्ण सत्य मानीत आहोंत. आमच्या इतिहासांत भाऊबंदकी आहे यांत शंका नाहीं. पण ती कोणाच्या इतिहासांत नाहीं ? भाऊबंदकी हें कांहीं खास महाराष्ट्राच्या अस्मितेचें वैशिष्ट्य नव्हे. आमच्या इतिहासांत नुसतीच भाऊबंदकी कधींहि नव्हती. भाऊबंदकी झाली तसेंच बारभाईचें कारस्थानहि झालें. आणि ज्या काळांत महाराष्ट्रांत एकहि कर्ता पुरुष उरला नव्हता, म्हणजे आजच्या पेक्षांही अधिक संपूर्णार्थानें महाराष्ट्र पोरका झाला होता, आणि बाहेरून परचक्र आलें होतें, अशा परिस्थितींत सर्वसामान्य महाराष्ट्रीयांनीं कांहीं व्यापक आणि विशाल ध्येयाची व हितसंबंधांची जाणीव ठेऊन एक सामुदायिक व्यक्तित्व निर्माण केलें, परचक्राचा यशस्वी प्रतिकार केला, राज्य राखलें व स्वत्वहि राखलें. राजारामाच्या कालांतील आमच्या पूर्वजांपेक्षा आणि बारभाईपेक्षां अधिक अनुभव, अधिक ज्ञान, संघटनेचें अधिक कौशल्य आजच्या महाराष्ट्रीयांजवळ आहे. इतिहासाची यांत्रिक पुनरावृत्ति होत नाहीं हें खरें आहे. दोन शतकांपूर्वी नसलेले राजकीय मतभेद व इतर कांहीं अगदीं नवीन शक्ति आमच्यांत वावरत आहे हेंहि खरें आहे. पण कोणत्याहि काळांत शंभर टक्के लोक एकत्र येऊन कार्य करीत नाहींत. कांहीं सुजाण लोकच दृढनिश्चयपूर्वक विशिष्ट हेतूपुरतेंच सहकार्य करून जनतेला बरोबर घेऊन जातात व या सहकार्यानें कांहीं विशिष्ट भवितव्य घडविलें जातें.

## संयुक्त राजकीय आघाडी

भवितव्य घडविणारी शक्ति, व्यक्ति कीं ऐतिहासिक शक्ति हा एक वाद आहे. पण ऐतिहासिक शक्तीच्या उपसकांनींहि असामान्य व्यक्तित्वाचें इतिहासाला कलाटणी देण्याचें सामर्थ्य मान्य केलें आहे. अशा व्यक्तिमत्वाचा पुढारी आमच्यांत टिळकानंतर निर्माण झाला नाहीं म्हणूनच आम्ही आज पोरके आहोंत. तशा व्यक्तिमत्वाचा पुढारी निर्माण होऊन सर्व प्रांताला आपल्या मागें फरफटत ओढून पुढें नेईपर्यंत आम्हीं वाट पहायची, कीं अनेक व्यक्तिमत्वाच्या संयुक्त प्रभावानें सामुदायिक व्यक्तिमत्व निर्माण करून एकाच महान व्यक्तिमत्वाची उणीव भरून काढायची, हा आमच्यापुढें प्रश्न आहे. या प्रश्नाचें नानासाहेबांनीं दिलेलें उत्तर हेंच खरोखर आमच्या ऐतिहासिक परंपरेला धरून आहे.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मिण्याच्या चळवळीचा त्यांनीं सुचविलेला लोकशाही समाजवादाची स्थापना हा अंतिम आदर्श जर सर्वमान्य झाला, तर त्यामुळेंच आमच्यावर प्रांतीयवादाचे–भाषिक साम्राज्यवादाचे-आरोप करणारांची असली नसलेली भूमिकाहि ढासळून पडेल व ही चळवळ केवळ मूठभर विशिष्ट हितसंबंधी लोकांची न रहातां तिला व्यापक जनता-आंदोलनाचें स्वरूप व सामर्थ्य प्राप्त होईल. श्री. गोरे यांनीं सुचविलेली सामुदायिक पुढारीपणाची कल्पना आचार्य जावडेकरांनीं व्यावहारिक स्वरूपांत मांडून दाखविली आहे. ती अत्यंत आकर्षक आणि मन मोहविणारी आहे. परंतु दुर्दैवानें अशाप्रकारची राजकीय स्वरूपाची संयुक्त आघाडीची कल्पना प्रथम ज्या पक्षानें उच्चारली आणि ज्या प्रकारें त्या पक्षानें तिची अंमलबजावणी केली त्यामुळें हे शब्दसमुच्चय राजकीय क्षेत्रांत घृणोत्पादक झाले आहेत. अर्थातच हीच कल्पना इतर व्यक्ति अथवा व्यक्तिसमूहाकडून चांगलें मूर्त स्वरूप धारण करणार नाहीं असें नाहीं. आचार्यांनीं सुचविलेली राजकीय संयुक्त आघाडी निर्माण झाली तर तें शुभमंगल होईल.

## महाराष्ट्राचा परिचय घडावा

परंतु मला असें नम्रपणें सुचवावेंसें वाटतें कीं, सांस्कृतिक स्वरूपाचें जें कार्य आहे तें विनासंकट व विनाविलंब ताबडतोब हातीं घेतां येईल,

व तसें करण्याची निकड व गरज आहे. महाराष्ट्राच्या केवळ राजकीय वृत्तीबद्दलचेच नव्हे तर ज्याबद्दल आम्हाला इतका अमर्याद अभिमान आहे त्या आमच्या साहित्य व संस्कृतीबद्दलसुद्धां गाढ अज्ञान परप्रांतात आहे. संयुक्त भारताची एक भारतीय अशी संस्कृती निर्माण होण्याच्या दृष्टीनेंसुद्धां हें परस्पर अज्ञान अत्यंत हानिकारक आहे. प्रांताच्या पुनर्रचनेच्या आमच्या चळवळीला भारतीय पुढाऱ्यांनीं भारतीय राजकारणांत विरोध केल्यामुळें या चळवळीशीं संबंध नसलेल्या, प्रांताच्या पुनर्रचनेचा प्रश्न ज्यांच्यापुढें अजीबात नाहीं अशा, विशाल लोकमतापुढें आमची भूमिका मांडणें अत्यंत आवश्यक आहे. भारतीय पुढाऱ्यांची भूमिका आपोआपच मांडली गेली, त्यांच्या भूमिकेचा प्रचार व प्रसार झाला. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याच्या मागणीला विरोध करणाऱ्या गुजराथ भाषिकांचे प्रवक्ते मुन्शी यांनींहि एक इंग्रजी ग्रंथ लिहून सर्व देशापुढें आपली भूमिका शास्त्रशुद्ध आहे असें दर्शविण्याचा व सर्व देशाचें मत आपल्याला अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न केला. असा प्रयत्न अद्याप आमच्यातर्फे व्यवस्थित व संघटित स्वरूपांत न झाल्यामुळें, मुंबई ही गुजराथ्यांची असतांना हे मराठे लोक ती कां मागत आहेत हें बिचाऱ्या परप्रांतियांना अद्यापही कळलेलें नाहीं. आजच्या लोकशाहीच्या काळांत, आम्हीहि लोकशाहीला प्रतिज्ञाबद्ध असल्यामुळें, आमची भूमिका आम्हाला सर्व देशाला पटवून देणें–बुद्धीनें वाद-विवाद करून, पिस्तुलानें नव्हे–एक आवश्यक कर्तव्य आहे. न्याय आणि सत्य दोन्ही स्वयंसिद्ध नाहींत. तीं त्यांच्या उपासकांना प्रस्थापित करावीं लागतात. महाराष्ट्राजवळ सर्व देशाला देण्यासारखें असें जें कांहीं भव्य दिव्य आमच्या संस्कृतींतल्या वाङ्मयांत आहे त्याची प्रतीती परभाषियांना वा प्रांतियांना आणून देण्याचें कार्य केलें पाहिजे.

## सांस्कृतिक प्रचाराची संयुक्त आघाडी

आचार्य जावडेकरांनीं सुचविलेली योजना फलद्रूप झाली, तर तो महाराष्ट्राच्या अपूर्व भाग्याचा क्षण समजला पाहिजे. पण तोंपर्यंत, तो भाग्योदय होईपर्यंत, महाराष्ट्रांतल्या सर्वश्रेष्ठ दर्जाच्या विद्वानांनीं सहकार्यानें, पाहिजे तर एकादा नॅशनल ट्रस्ट निर्माण करून—

(१) मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याच्या मागणीची आमची शास्त्रशुद्ध भूमिका समतोलपणानें सर्व देशापुढें मांडण्यासाठीं हिंदी व इंग्रजी माध्यमांतून याविषयावर ग्रंथ, पुस्तिका व वाङ्मय निर्माण करावें.

(२) मराठी वाङ्मयांतील सर्वश्रेष्ठ अशा कलाकृतींचे, काव्य धरून, हिंदी व इंग्रजी अनुवाद करण्याची एक व्यापक योजना आखावी.

टिळकांच्या मृत्यूनंतर आम्ही फक्त नाटकें कादंबऱ्या लिहीत बसलों असें एका लेखकानें कांहींसें तुच्छतेनें म्हटलें आहे. आम्ही निदान नाटकें कादंबऱ्या लिहिल्या, आणि चांगल्या लिहिल्या, हेंच नशीब समजलें पाहिजे ! कारण त्यांतहि आमचे कांहीं विशेष गुण प्रगट झाले आहेत. व या गुणांना मान्यता मिळवून देणें हेंहि आमचें एक निकडीचें कर्तव्य समजलें पाहिजे.

हें कार्य कांहीं व्यक्तींकडून किंवा एकदोन संस्थांकडून होणार नाहीं, त्याला लागणारें प्रचंड द्रव्यबळ व श्रेष्ठ प्रतीच्या विद्वानांचें सहकार्य (पुन्हा द्रव्याचाच प्रश्न) हेंहि एकाद्या–दुसऱ्या संस्थेला मिळवितां येणार नाहीं. म्हणून मला वाटतें कीं, संयुक्त राजकीय आघाडी उभारता येईल तेव्हां उभारावी पण मध्यंतरीं ज्याबाबतींत अंतःकलह नाहीं, मतभेद नाहीं, जें करावें असें अनेकांना वाटतें आहे, पण अद्याप होऊं शकलें नाहीं, तें सामुदायिक प्रयत्नानें झालें, तर त्या प्रयत्नामुळें निदान सर्व देशभर महाराष्ट्राविषयीं यथार्थ ज्ञान व सहानुभूति निर्माण होईल. आणि अशा परस्पर–ज्ञानावरच खऱ्या आंतरप्रांतीय सहकार्याची न एकजुटीचीहि उभारणी होईल.

: ९ :

# महाराष्ट्रीयांनीं व्यापाराचें क्षेत्र काबीज करावें

लेखक : वि. श्री. मराळकर

## अश्रद्ध व टवाळखोर बुद्धि

राजकारणांत महाराष्ट्र मागें पडला ह्याचें महत्वाचें कारण, म्हणजे आमच्यामध्यें श्रद्धेचा अभाव व बौद्धिक विषमता फार असा कित्येकांचा समज आहे. कोणत्याहि प्रश्नाकडे वा पक्षाकडे पहाण्याचा आमचा दृष्टिकोण चिकित्सक व टीकात्मक असतो. श्रद्धाळु मनानें दोषांकडे दुर्लक्ष करून, जास्तीतजास्त कार्यक्षम असणाऱ्या सद्गुणांकडे पाहण्याची आमची दृष्टि नसल्यामुळें कार्यावर विश्वास ठेवणें आम्हांस साहत नाहीं. स्वातंत्र्याचें पाणी नसानसांत खेळत असल्यामुळें त्याचा आविष्कार मात्र आतां वैचारिक मतभिन्नतेचं प्रदर्शन करण्याकडेच जास्त होतो व त्यामुळें महाराष्ट्रांत कोणत्याच संघटनेला, कार्याला वा पक्षाला सवंग लोकप्रियता मिळत नाहीं. किंबहुना त्यांत मतामतांच्या गलबल्यानें अनेक फाटे फुटून त्याचा बोजवारा उडतो. कोणाचीहि कशावरहि श्रद्धा नाहीं व दोष काढून टवाळी करण्यांत आमची बुद्धि जास्तीतजास्त खर्च होत आहे.

## जिवंतपणाचीं चिन्हें ?

राजकारणांत जसे अनेक पंथ आणि भेद, त्यापेक्षांहि इतर अनेक भांडणांनीं महाराष्ट्रीयांनीं आपली बुद्धि, उत्साह व वेळ विनाकारण फुकट दवडल्याचें दिसून येतें. कोकणस्थ विरुद्ध देशस्थ, ब्राह्मण विरुद्ध ब्राम्हणेतर, नागपूर विरुद्ध पुणें, पुणें विरुद्ध मुंबई असे अनेक तंटे निर्माण होऊन त्यांची ही लाथाळी कित्येक वर्षे चालू आहे व चालू रहाणार आहे असें वाटतें. इतर प्रांतांत अशा तऱ्हेचे वाद नाहींत असें मी निश्चयानें म्हणूं शकणार नाहीं, परंतु आमच्याइतकें त्याचें स्वरूप विशाल व भयानक मात्र सांपडणार नाहीं. पिढान्‌पिढ्या ह्या विषारी हेव्यादाव्यानें आमचीं अंतःकरणें आणि बुद्धि पार नासून टाकली आहे आणि त्यामुळें विधायक कार्याचा अभाव मात्र सर्वत्र निर्माण झाला आहे. वादविवाद, मतभेद, वैचारिक प्रगति हीं जिवंतपणाचीं व सुधारणेचीं चिन्हें होत असा ह्यावर कित्येकांचा आक्षेप येईल, परंतु ज्या वादांचा व भांडणांचा कधींच शेवट होत नाहीं, त्यामधून कोणतें कार्य बाहेर पडणार आहे, वा त्यांतून कोणती प्रगति निर्माण होणार आहे ? मतामतांच्या गलबल्यांतून व वादविवादांतून जेव्हां एखादा चांगला विचार तावूनसुलाखून निघतो व त्याप्रमाणें कार्य होऊन सामान्य जनतेला त्याचा योग्य तो फायदा मिळतो, तेव्हांच असे वाद उपयुक्त म्हणतां येतील.

## भौगोलिक व आर्थिक कारणें

जागतिक सुधारणा आणि सत्ता ह्यांच्याकडे दृष्टि फेकली, किंवा आपल्या देशांतील उत्कर्षाचें नीट निरीक्षण केलें तर आपणांस स्पष्टपणें दिसून येईल कीं ह्याच्या मुळाशीं संपत्तीचें भरपूर खत घातलेलें आहे. महाराष्ट्राची भूमि म्हणजे माळरान, जेमतेम एका वेळेस पोटास मिळेल एवढें उत्पन्न येणारा हा दुष्काळी भाग इतर प्रांताच्या मानानें

सांपत्तिक दृष्ट्या फार मागासलेला आहे हें उघड भौगोलिक सत्य आहे. संयुक्तप्रांत वा बंगालसारख्या प्रांतांतील शेतकरी वर्षाला तीन तीन पिकें विनासायास काढून भरपूर सुखस्वास्थ्य मिळवतो. त्यामुळेंच दक्षिण हिंदुस्थानपेक्षां सुबत्ता उत्तर हिन्दुस्थानांत भरपूर आढळते. दूधतुपाची इतकी रेलचेल असलेल्या त्या भागांतील लोकांचें शरीरहि तसेंच असावें ह्यांत नवल काय? त्या उलट आमचा मराठी माणूस. अंगानें काडीपहिलवान पण काटक, अर्धपोटी असला तरी अक्कल भरपूर, असा असूनहि तो मागें आहे. कष्टाची व तोट्याची शेती वा नोकरी ह्याशिवाय त्याला उदरनिर्वाहाचा दुसरा मार्ग नाहीं. आणि ह्या दोन्हीही धंद्यांत चुकून कधींही भरपूर सुख वा संपत्ति मिळणें शक्य नाहीं. त्यामुळेंच महाराष्ट्र जन्मानें नि कर्मानें दरिद्री राहिला.

## परप्रांतीयांनीं चालवलेली लूट

पण आजची सारी स्पर्धा अर्थजीवि असल्या-मुळेंच पोटाच्या विवंचनेनें ग्रासून गेलेला हा बुद्धि-मान प्रांत सर्वांच्या मागें पडला. अर्थ हीच आजच्या सर्व क्षेत्रांतल्या यशाची गुरुकिल्ली झाली आहे. सधन झाल्याशिवाय महाराष्ट्रीयांना इतर क्षेत्रांत वाव मिळण्याची आशा ह्यापुढें शक्य दिसत नाहीं. आपल्या खिशांतला पैसा व इतर सारी संपत्ति-जी मुळांतच थोडी होती-तिचें शोषण इतर प्रांतवासियांनीं केलें आहे. व्यापार व उद्योगधंदे हेच हमखास संपत्ति मिळविण्याचे मार्ग आहेत हें डोळ्यासमोर दिसत असूनहि आपण समाधानी वृत्तीनें आपल्याच शेतीभातीवर अवलंबून राहिलों आणि परप्रांतीय मारवाडी गुज-राथी लोकांना खुशाल आपलें अर्थशोषण करूं दिलें आणि आतां तर सिंधी व पंजाबी ह्यांनीं आपल्यावर हल्ला चढविला आहे. धनोत्पादक सर्व धंदे ह्या परप्रांतीय लोकांनीं संपूर्णतया ताब्यांत घेतल्यावर आपल्या हातीं नरोटी येणें हें स्वाभाविक आहे. ‘ सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते ’ ह्या न्यायानें सर्व क्षेत्रांत पैसेवाल्या लोकांचें स्तोम माजल्यास नवल तें काय ?

## प्रांतांतला पैसा प्रांतांतच राहिला पाहिजे

आतां ही आर्थीक पिळवणूक थांबवावयाची म्हणजे आपण सर्वांनीं उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत आघा-डीवर जावयाचें; उत्पादन, व्यापार व त्याचें गिऱ्हाईक आपणच व्हावयाचें आणि आपल्या प्रांतांतला पैसा आपल्याजवळ राखावयाचा.

तीच दृष्टि ठेवून महाराष्ट्राबाहेर नव्हे, तर निदान महाराष्ट्रांत तरी धनोत्पादक धंद्यांत पदार्पण करून आपण संपत्ति मिळविली पाहिजे. तिचा दुरुपयोग होऊन ती मूठभर भांडवल-वाल्यांच्या हातीं जाणार नाहीं, ह्याची आपण दक्षता घेऊं शकूं. पण तो काळ येईपर्यंत लहान लहान धंद्यांत तरी आपला शिरकाव आजच झाला पाहिजे. नोकरीच्या मागें लागणाऱ्या आमच्या थोड्याफार शिकलेल्या मंडळींनीं ह्यापुढें स्वतंत्र उद्योग निर्माण करण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. सहकारी पद्धतीवर जर लहान लहान कारखाने निर्माण केले; अल्पशा भांडवलावर अडत व्यापार काबीज केला व प्रत्येक ठिकाणी थोडीफार झीज सोसून धंदाच करण्याचें मनावर घेतलें तर पुढची पिढी निश्चितपणें अधिक संपन्न झालेली दिसून येईल व मग आपोआपच महाराष्ट्राच्या राजकार-णाला व मराठी भाषेला व प्रांताला सुरुंग लाव-णाऱ्या लोकांचें धाबें दणाणेल.

# : १० :

# " महाराष्ट्राची विकृति ? "

लेखक : गो. स. सरदेसाई. रियासतकार

" नाहीं हो नाना, मला नाहीं व्हायचें हें काम. "

" अहो हें सोपें आहे, कठिण नाहीं, करूं लागा, सुरुवात करा, म्हणजे सुचत जाईल. "

" छे, मी नाहीं करणार, मला नाहीं साधायचें तें. देवानें मला जन्मास तरी कशाला घातलें कोणास ठाऊक ! यांतून मरणाचाच कांहीं उपाय असेल तर सांगा, म्हणजे मी यातनांतून सुटेन तरी एकदांचा. "

असा माझा संवाद पूर्वी एकदां एका निकट परिचिताशीं झालेला मला आठवतो. ते पराकाष्ठेचे निराशावादी, दुःखी, सर्व जगास नांवें ठेवणारे, हातपाय गाळून बसणारे असे गृहस्थ बुद्धीनें होते. बिलकूल कमी नव्हते. त्यांची स्मरणशक्ति व निरीक्षणशक्ति एवढी जबरदस्त होती कीं, मला त्यांचा अत्यंत हेवा वाटे. स्टेशनांत गाडींत बसण्यासाठीं बरोबर ते व मी चाललों, कीं त्या गर्दींतील बऱ्यावाईट व्यक्तींची टेहेळणी त्यांच्या नजरेंत अशी बिनचूक भरे, कीं गाडींत बसल्यावर त्यांची ती चिकित्सा ऐकून मला त्यांचें केवढें तरी कौतुक वाटे. निरीक्षणशक्ती-बरोबरच छिद्रान्वेषण हें त्यांच्या स्वभावांतलें तीक्ष्ण वैशिष्ट्य होतें. प्रस्तुतच्या वातावरणांतल्या विद्यमान व्यक्ती असोत किंवा मागच्या इतिहासां-तील स्त्रीपुरुष असोत, प्रत्येकाचा दोष तेवढा नेमका ते बाहेर काढीत आणि त्यांच्या ठळक गुणांना ते हरताळ फांशीत. दोष कोणाच्या अंगीं नाहींत ? मनुष्यप्राणी म्हटला कीं तो स्खलनशील असणारच. शिवाजीचें मोठेंपण आपण कोणतें समजतों, तर अट्टल चोरदरवडेखोरांस हाताशीं घेऊन त्यानें राष्ट्रकार्यास जुंपलें. मराठ्यांची परं-परागत गळेकापू, अपहारशील वृत्ति शिवाजीनें नाहींशी करून त्यांजकडून राष्ट्रसेवा घेतली. दुष्प्रवृत्तीला आळा घालून राष्ट्राला सत्प्रवृत्त केलें.

वरील संवादांत शेवटच्या प्रश्नाला मी उत्तर दिलें, " अहो, तुम्हांला जन्म दिला, तो देवानें नाहीं दिला. तो जन्म कशाला दिला हें आपल्या आईबापांना विचारा. त्यांत देवाचा अपराध नाहीं कीं उपकार नाहीं. तुम्हाला जन्म मिळाला आहे खरा. त्याचा आतां बरावाईट उपयोग करणें एवढेंच तुमच्या हातीं आहे. मरणसुद्धां तुमच्या-माझ्या हातचें नाहीं. उद्योग करणें हा एकच उपाय तुम्हा-आम्हांस शक्य आहे. तुम्हीं मनुष्य आहां. मनुष्य म्हणजे मनानें विचार करणारा प्राणी. मरण हेंच तुमचें कर्तव्य असें तुम्हांस वाटत असेल, तर त्याचे मार्ग मला विचारूं नका."

## श्रीयुत गोऱ्यांचें म्हणणें

या संवादांत व्यक्त झालेली वृत्ति मला गोरे यांच्या मूळ लेखांत आढळली. त्यांनीं अनेक विधानें ठोकून दिलीं आहेत, पण एकाचाहि पुरावा त्यांनीं स्पष्ट मांडलेला मला आढळला नाहीं. ना. जयकरां-सारख्या एखाद्या थोरामोठ्यांचें मत सांगितलें म्हणजे तो कांहीं पुरावा नव्हे. या विषयांत जयकरांचे विचार काय आहेत ते मला ठाऊक नाहींत. आणि यदाकदाचित् ते गोऱ्यांच्यासारखे

सांपत्तिक दृष्ट्या फार मागासलेला आहे हें उघड भौगोलिक सत्य आहे. संयुक्तप्रांत वा बंगालसारख्या प्रांतांतील शेतकरी वर्षाला तीन तीन पिकें विनासायास काढून भरपूर सुखस्वास्थ्य मिळवतो. त्यामुळेंच दक्षिण हिंदुस्थानपेक्षां सुबत्ता उत्तर हिन्दुस्थानांत भरपूर आढळते. दूधतुपाची इतकी रेलचेल असलेल्या त्या भागांतील लोकांचें शरीरहि तसेंच असावें ह्यांत नवल काय? त्या उलट आमचा मराठी माणूस. अंगानें काडीपहिलवान पण काटक, अर्धपोटी असला तरी अक्कल भरपूर, असा असूनहि तो मागें आहे. कष्टाची व तोट्याची शेती वा नोकरी ह्याशिवाय त्याला उदरनिर्वाहाचा दुसरा मार्ग नाहीं. आणि ह्या दोन्हीही धंद्यांत चुकून कधींही भरपूर सुख वा संपत्ति मिळणें शक्य नाहीं. त्यामुळेंच महाराष्ट्र जन्मानें नि कर्मानें दरिद्री राहिला.

## परप्रांतीयांनीं चालवलेली लूट

पण आजची सारी स्पर्धा अर्थजीवि असल्यामुळेंच पोटाच्या विवंचनेनें ग्रासून गेलेला हा बुद्धिमान प्रांत सर्वांच्या मागें पडला. अर्थ हीच आजच्या सर्व क्षेत्रांतल्या यशाची गुरुकिल्ली झाली आहे. सधन झाल्याशिवाय महाराष्ट्रीयांना इतर क्षेत्रांत वाव मिळण्याची आशा ह्यापुढें शक्य दिसत नाहीं. आपल्या खिशांतला पैसा व इतर सारी संपत्ति–जी मुळांतच थोडी होती–तिचें शोषण इतर प्रांतवासियांनीं केलें आहे. व्यापार व उद्योगधंदे हेच हमखास संपत्ति मिळविण्याचे मार्ग आहेत हें डोळ्यासमोर दिसत असूनहि आपण समाधानी वृत्तीनें आपल्याच शेतीभातीवर अवलंबून राहिलों आणि परप्रांतीय मारवाडी गुजराथी लोकांना खुशाल आपलें अर्थशोषण करूं दिलें आणि आतां तर सिंधी व पंजाबी ह्यांनीं आपल्यावर हल्ला चढविला आहे. धनोत्पादक सर्व धंदे ह्या परप्रांतीय लोकांनीं संपूर्णतया ताब्यांत घेतल्यावर आपल्या हातीं नरोटी येणें हें स्वाभाविक आहे. 'सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते' ह्या न्यायानें सर्व क्षेत्रांत पैसेवाल्या लोकांचें स्तोम माजल्यास नवल तें काय?

## प्रांतांतला पैसा प्रांतांतच राहिला पाहिजे

आतां ही आर्थीक पिळवणूक थांबवावयाची म्हणजे आपण सर्वांनीं उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत आघाडीवर जावयाचें; उत्पादन, व्यापार व त्याचें गिऱ्हाईक आपणच व्हावयाचें आणि आपल्या प्रांतांतला पैसा आपल्याजवळ राखावयाचा.

तीच दृष्टि ठेवून महाराष्ट्राबाहेर नव्हे, तर निदान महाराष्ट्रांत तरी धनोत्पादक धंद्यांत पदार्पण करून आपण संपत्ति मिळविली पाहिजे. तिचा दुरुपयोग होऊन ती मूठभर भांडवलवाल्यांच्या हातीं जाणार नाहीं, ह्याची आपण दक्षता घेऊं शकूं. पण तो काळ येईपर्यंत लहान लहान धंद्यांत तरी आपला शिरकाव आजच झाला पाहिजे. नोकरीच्या मागें लागणाऱ्या आमच्या थोड्याफार शिकलेल्या मंडळींनीं ह्यापुढें स्वतंत्र उद्योग निर्माण करण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. सहकारी पद्धतीवर जर लहान लहान कारखाने निर्माण केले; अल्पशा भांडवलावर अडत व्यापार काबीज केला व प्रत्येक ठिकाणी थोडीफार झीज सोसून धंदाच करण्याचें मनावर घेतलें तर पुढची पिढी निश्चितपणें अधिक संपन्न झालेली दिसून येईल व मग आपोआपच महाराष्ट्राच्या राजकारणाला व मराठी भाषेला व प्रांताला सुरुंग लावणाऱ्या लोकांचें धाबें दणाणेल.

# : १० :

# " महाराष्ट्राची विकृति ? "

लेखक: **गो. स. सरदेसाई** रियासतकार

" **ना**हीं हो नाना, मला नाहीं व्हायचें हें काम. "

" अहो हें सोपें आहे, कठिण नाहीं, करूं लागा, सुरुवात करा, म्हणजे सुचत जाईल. "

" छे, मी नाहीं करणार, मला नाहीं साधायचें तें. देवानें मला जन्मास तरी कशाला घातलें कोणास ठाऊक ! यांतून मरणाचाच कांहीं उपाय असेल तर सांगा, म्हणजे मी यातनांतून सुटेन तरी एकदांचा. "

असा माझा संवाद पूर्वी एकदां एका निकट परिचिताशीं झालेला मला आठवतो. ते पराकाष्ठेचे निराशावादी, दुःखी, सर्व जगास नांवें ठेवणारे, हातपाय गाळून बसणारे असे गृहस्थ बुद्धीनें होते. बिलकूल कमी नव्हते. त्यांची स्मरणशक्ति व निरीक्षणशक्ति एवढी जबरदस्त होती कीं, मला त्यांचा अत्यंत हेवा वाटे. स्टेशनांत गाडींत बसण्यासाठीं बरोबर ते व मी चाललों, कीं त्या गर्दींतील बऱ्यावाईट व्यक्तींची टेहेळणी त्यांच्या नजरेंत अशी बिनचूक भरे, कीं गाडींत बसल्यावर त्यांची ती चिकित्सा ऐकून मला त्यांचें केवढें तरी कौतुक वाटे. निरीक्षणशक्तीबरोबरच छिद्रान्वेषण हें त्यांच्या स्वभावांतलें तीक्ष्ण वैशिष्ट्य होतें. प्रस्तुतच्या वातावरणांतल्या विद्यमान व्यक्ती असोत किंवा मागच्या इतिहासांतील स्त्रीपुरुष असोत, प्रत्येकाचा दोष तेवढा नेमका ते बाहेर काढीत आणि त्यांच्या ठळक गुणांना ते हरताळ फांशीत. दोष कोणाच्या अंगीं नाहींत ? मनुष्यप्राणी म्हटला कीं तो स्खलनशील असणारच. शिवाजीचें मोठेंपण आपण कोणतें समजतों, तर अट्टल चोरदरवडेखोरांस हाताशीं घेऊन त्यानें राष्ट्रकार्यास जुंपलें. मराठ्यांची परंपरागत गळेकापू, अपहारशील वृत्ति शिवाजीनें नाहींशी करून त्यांजकडून राष्ट्रसेवा घेतली. दुष्प्रवृत्तीला आळा घालून राष्ट्राला सत्प्रवृत्त केलें.

वरील संवादांत शेवटच्या प्रश्नाला मी उत्तर दिलें, " अहो, तुम्हांला जन्म दिला, तो देवानें नाहीं दिला. तो जन्म कशाला दिला हें आपल्या आईबापांना विचारा. त्यांत देवाचा अपराध नाहीं कीं उपकार नाहीं. तुम्हाला जन्म मिळाला आहे खरा. त्याचा आतां बरावाईट उपयोग करणें एवढेंच तुमच्या हातीं आहे. मरणसुद्धां तुमच्या-माझ्या हातचें नाहीं. उद्योग करणें हा एकच उपाय तुम्हा-आम्हांस शक्य आहे. तुम्हीं मनुष्य आहां. मनुष्य म्हणजे मनानें विचार करणारा प्राणी. मरण हेंच तुमचें कर्तव्य असें तुम्हांस वाटत असेल, तर त्याचे मार्ग मला विचारूं नका."

## श्रीयुत गोऱ्यांचें म्हणणें

या संवादांत व्यक्त झालेली वृत्ति मला गोरे यांच्या मूळ लेखांत आढळली. त्यांनीं अनेक विधानें ठोकून दिलीं आहेत, पण एकाचाहि पुरावा त्यांनीं स्पष्ट मांडलेला मला आढळला नाहीं. ना. जयकरांसारख्या एखाद्या थोरामोठ्यांचें मत सांगितलें म्हणजे तो कांहीं पुरावा नव्हे. या विषयांत जयकरांचे विचार काय आहेत ते मला ठाऊक नाहींत. आणि यदाकदाचित् ते गोऱ्यांच्यासारखे

असले तरी ते मला मान्य होतीलच असें नाहीं. गोऱ्यांच्या लेखांत कळकळ व भावना आहे, महाराष्ट्रानें बुद्धीनें, शक्तीनें, संपत्तीनें, व्यापारांत, राजकारणांत, उत्पादनांत बलवान व समृद्ध व्हावें ही गोऱ्यांची इच्छा तीव्र आहे, तशी ती माझी सुद्धां आहे. पण इच्छा धारण करतांना वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष होतां नये. गोरे यांचीं मुख्य विधानें मला आढळलीं तीं अशीं :

१ महाराष्ट्राचें नशीब उत्तरोत्तर खडतर होत आहे;

२ हल्लीं महाराष्ट्राची पूर्ण दुरवस्था होत आहे.

३ महाराष्ट्रांतलें राजकारण लोकमान्यांनंतर संपलें.

४ लोकमान्यांनंतर कॉंग्रेस, कम्युनिस्ट व प्रतिसहकार अशा तीन फळ्या महाराष्ट्रीय राजकारणाच्या झाल्या.

५ भांडवलशाहीचा काळ संपला असतांहि महाराष्ट्रांतील किरकोळ भांडवलदार जुनेच कित्ते गिरवितात.

६ प्रस्तुतचा महाराष्ट्र विचारानें गोंधळलेला, निराशेनें हतबुद्ध व तर्कटी बनलेला, मनानें दरिद्री व कर्मानें बेफाम दिसत आहे.

असें नानाविध स्वबलावमानी व वस्तुस्थितीचा विपर्यास करणारें शब्दावडंबर वाचकांपुढें मांडून, शेवटीं सर्वांनीं एकमतानें विचारविनिमय करावा आणि महाराष्ट्राला योग्य मार्गदर्शन करून त्याचा उत्कर्ष होईल अशी तरतूद आतांच करावी अशी रा. गोरे यांनीं जनतेला कळकळीची विनंती केली आहे. ही शेवटची विनंती सर्वथा स्तुत्य असून तिच्याशीं मी पूर्ण सहमत आहें. महाराष्ट्राचा भाग्योदय सदैव वृद्धिंगत होत रहावा अशी वर्तणूक प्रत्येकानें करणें आजचें निकडीचें कर्तव्य आहे. तें कर्तव्य नुसत्या भावनावश लेखानें पूर्ण होणार नाहीं असें मला प्रामाणिकपणें वाटतें. म्हणूनच मी माझे विचार निःसंकोचपणें लिहीत आहें. त्यांत गोऱ्यांचा किंवा दुसऱ्या कोणाचा दोष दाखवावा किंवा आत्मप्रौढी मिरवावी अशी माझी इच्छा नाहीं. मला माझ्या एकान्तांत जितक्या बाह्य हालचाली दिसतात व कळतात तेवढ्यांवरच मी आपलीं मतें बनविलीं आहेत.

## अलौकिक माणसांचा कारखाना नसतो

महाराष्ट्र मागें पडला आहे, महाराष्ट्राची अवनति होत आहे, ही आत्मघातकी भावना मला बिलकूल मान्य नाहीं. या भावनेंत लेखकाच्या दृष्टीपुढें पूर्वीचे शिवाजी, बाजीराव व हल्लींचे रानडे, लोकमान्य या व्यक्ती ठळकपणें वावरतांना दिसतात. शिवाजीसारखीं अलौकिक माणसें कधीं काळीं योगायोगानें निर्माण होतात. तशीं माणसें निर्माण करण्याचा कारखाना निघालेला नाहीं. म्हणून व्यवहारी माणसानें त्यांच्याशीं आपली तुलना कधीं करूं नये. रानडे, लोकमान्य या अलीकडील व्यक्ती आपल्या चांगल्या परिचयाच्या आहेत. माझ्या ऐशीं वर्षांच्या हयातींत त्या व्यक्तींचा काळ व आजचा काळ यांची तुलना माझ्या दृष्टीपुढें उत्कटत्वानें वावरते. मी शाळा-कॉलेजांत असतां त्यांच्या राष्ट्रीय बुद्धीचा प्रभाव मी अनुभविला आणि आजहि मी आपल्या मगदुराप्रमाणें बाह्य व्यक्तींचें निरीक्षण करीत आहे. त्यावरून मी समस्त वाचक बंधूंना खात्रीनें सांगतों कीं, महाराष्ट्राचें बुद्धिवैभव या पाऊणशें वर्षांत विद्येच्या प्रत्येक शाखेंत शेंकडों पट वाढलें आहे. मला ज्या गोष्टी कॉलेजांत असतांना कळत नव्हत्या, त्या आज माझ्या सभोंवारचीं आठ दहा वर्षांचीं मुलें मला शिकवूं शकतात. त्या वेळचीं शालोपयोगी पुस्तकें व आजचीं पाठ्य पुस्तकें नुसतीं मनांत आणा, म्हणजे माझ्या म्हणण्याची खात्री पटेल.

## लोकमान्य टिळक व गांधी

याचा पुरावाहि मी देऊं शकेन. पुराव्यानें बोला असें आव्हान मी गोरे यांना करतों, तेव्हां माझ्याहि प्रत्येक विधानास ते तसेंच आव्हान मलाहि करूं शकतील. लोकमान्यांची धडाडी व कळकळ अप्रतिम असली, तरी त्यांच्या एकंदर शिकवणीचा परिणाम जनतेच्या वरच्या अत्यंत

१८४०६ ९१
दि. ९.
६६७
२३।१।५४

अल्पांशाला मात्र पोंचला. सामाजिक, वैज्ञानिक वगैरे अनेक बाबतींत बहुसंख्य समाज सुस्तच होता. त्यास खडबडून जागें करण्याचें महात्माजींचें चातुर्य लोकमान्यांच्या उद्योगांत प्रकट झालें नाहीं. कोणत्याहि दोन व्यक्ति हुबेहूब सारख्या कधींच नसतात. यास्तव त्यांची तुलना करणें गैर होय, हें जरी मान्य केलें, तरी जी सर्वांगीण जागृति महात्माजींनीं कॉंग्रेसला हाताशीं घेऊन चरख्याचे प्रतीकद्वारा त्वरित घडवून आणिली, तिचा आविर्भाव लोकमान्यांचे उद्योगांत प्रत्ययास आला नाहीं. समस्त समाजाच्या ज्ञानाचा व कर्तव्याचा विस्तार महात्माजींनीं झपाट्यानें वाढविला. यांत मी लोकमान्यांचा अवमान करतों असें मला वाटत नाहीं. महात्माजींपेक्षां लोकमान्यांशींच माझा परिचय जास्त निकट होता.

## महाराष्ट्रीय कर्तबगारीची मोजदाद

राजवाड्यांनीं स. १८९९ त महाराष्ट्राच्या बुद्धिमत्तेची मोजदाद केली, तसाच अल्पसा प्रयत्न गेल्या दोनचार दिवसांत मी एक दोघां व्यवसायिकांच्या साह्यानें केला. आम्ही दीड-दोनशें महाराष्ट्रीय मंडळींची नांवनिशी सहज सुचली तशी बनविली. वकील, डॉक्टर्स, शास्त्रज्ञ, सैनिक, कारखानदार, एंजिनिअर्स, कलेक्टर्स, न्यायाधीश, प्रोफेसर्स, शिक्षक, नाटककार, प्रतिभाशाली लेखक, असेंब्लीचे सभासद, प्रधानमंडळांतील व सरकारी नोकरींतील व्यक्ति अशा नानाविध पेशांची धुंडाळणी केली. तेव्हां माझी खात्री झाली कीं, याबाबतींत महाराष्ट्राची बुद्धिमत्ता ओथंबून चालली आहे, महाराष्ट्राचें रक्त प्रगतीच्या मार्गांत सळसळत आहे, शेकडों असामी साहसांत उड्या घेत आहेत, कितीतरी व्यक्तींनीं भरीव यश कमावलें आहे आणि ही जगाच्या प्रगतीबरोबर धांवण्याची उत्कंठा प्रतिदिन वाढतच आहे. आगबोटी–विमानें इत्यादींत प्रवास करणाऱ्यांच्या नांवनिशा रोजरोज प्रसिद्ध होतात, त्यांतच या विषयाचा पुरावा भरपूर सांपडतो. दहा वर्षांपूर्वी अमेरिकेस हिंदी लोकांचें नांव माहीत नव्हतें, तर आजचा प्रकार किती वेगळा बनलेला दिसतो तें मनांत आणा. मी नुसत्या महाराष्ट्रापुरतें बोलत असलों, तरी महाराष्ट्राच्या बरोबरीनें इतर हिंदी राष्ट्रिकही आपल्या बुद्धितेजानें चमकत आहेत. नेहरू–पटेल या व्यक्ति आज आपणांस आपल्या आप्तच वाटतात; तथापि त्या सोडून दिल्या तरी आंबेडकर, मावळंकर, न. वि. गाडगीळ, हैद्राबादचे बखले व प्रधान, रिझर्व बँकेचे देशमुख, पुण्याचे कलेक्टर बर्वे, आर. डी. रानडे, प्रिन्सिपाल महाजनी, नुकतेच परलोकवासी झालेले का. ना. दीक्षित, जगन्नाथराव भोसले, वि. दा सावरकर, अणे, स्वामी कुवलयानंद, म. म. काणे, लक्ष्मणरावादि किर्लोस्कर बंधु व त्यांचा परिवार, नेत्रज्ञ डॉ. सरदेसाई, अर्थशास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळ, भाषाकोविद कर्वे, भास्करराव जाधव, केसकर, बाबासाहेब जयकर, वामनराव जोशी, डॉ. हेडगेवार व गोळवलकर, बडोद्याचे माणिकराव, स्वामी रामानंद तीर्थ, बालगंधर्व, मास्तर कृष्णा, चित्रकार धुरंधर, अशीं कितीतरी नांवें सहज सुचतात आणि जास्त तपासानें धुंडूं लागल्यास जगास अज्ञात अशीं आणखी शेकडों नांवें निघतील. ही सहज नजरेंत सुचलीं तीं येथें दाखविलीं, म्हणजे शोध केला तर तशाच योग्यतेचीं किंबहुना जास्तहि निघतील. मी तर अशी सूचना वृत्तपत्रकारांस करूं इच्छितों कीं, कसोशीनें तपास करून अशीं नानाविध व्यक्तींचीं नांवें व त्यांचें वैशिष्ट्य त्यांनीं मुद्दाम उजेडांत आणावें, म्हणजे न्यूनगंडाचा जो विकार कित्येक राष्ट्रबंधूंस जडला आहे त्याचा आपोआप निरास होईल.

## वृत्तपत्रकारांचा हेतु

पण मला तर संशय येतो कीं, वृत्तपत्रकार आपले अंक भरण्याकरितां मुद्दाम असले वाद उत्पन्न करून वाचकांस विषय पुरवीत राहतात. काय करतील बिचारे ! आजचा अंक निघाला कीं उद्यांची काळजी मनांत उद्भवली. तशांत वृत्तपत्रें दररोज नवीन निघतच आहेत. माझ्याकडेच कितीतरी नवीन नवीन अंक येतात. आश्चर्य वाटतें कीं, यांत पत्रकर्त्यांची जबाबदारी जाणणारे

व तशी योग्यता अंगीं असलेले कितीसे असतील ? हा आतां एक धंदाच बनलेला दिसतो. मराठी वर्तमानपत्रें वाचल्यावर त्यांत नवीन विचार, नवीन मुद्दे, सतत अभ्यास किंवा मनन फारच थोडें दृष्टोत्पत्तीस येतें. बरें, दर क्षणीं नवीन तरी काढायचें काय ! अशी या धंद्याची अनास्था झालेली माझ्या नजरेस येते. मनास पटलें तें मी बोललों. कोणाची मुद्दाम निंदा करावी असा माझा भाव नाहीं. म्हणून ' मौज 'कर्त्यांस माझी आतां विनंती आहे कीं, याच विषयाचा त्यांनीं आतां अखेरपर्यंत पिच्छा पुरवावा. प्रत्येक विषयांत महाराष्ट्राच्या बुद्धिमत्तेनें गेल्या पन्नास वर्षांत काय यश मिळविलें आहे त्याचा तपास करून, भरपूर पुरावा प्रसिद्ध करावा. म्हणजे पोकळ व सैल विधानें करण्याची प्रवृत्ति नष्ट होऊन विचारांस तीक्ष्णता व सार्थता उत्पन्न होईल; आणि त्याच कारणास्तव राष्ट्रास योग्य मार्गदर्शन केल्याचें पुण्य पत्रकारांच्या पदरीं पडेल. अद्यापि महाराष्ट्राच्या विषयांत पुष्कळ संशोधनास जागा आहे. मुख्यत: प्रस्तुत स्थिति किती सुधारायची याला तर मर्यादाच नाहीं. त्या सुधारणेचे जितके म्हणून उपाय व मार्ग असतील तितके विचारवंतांकडून जनतेपुढें व सरकारपुढें मांडले गेले पाहिजेत.

## इतर प्रांतांचीहि दुर्दशाच आहे !

पण या विषयाचा विचार शांत, निष्पक्षपाती व निर्विकार दृष्टीनें झाला पाहिजे. जेव्हां आपण महाराष्ट्र दु:स्थित आहे असें म्हणतों, तेव्हां त्याबरोबर इतर हिंदी प्रांतांची सापेक्ष स्थिति डोळ्यांपुढें ठेवणें जरूर आहे. मला वाटतें, गोरे यांनीं केलेलें महाराष्ट्राचें वर्णन आजहि बंगाल, पंजाब, कन्नड, बिहार इत्यादि प्रांतांसहि लागू पडेल. या व इतर प्रांतांची अशी कोणती सुधारणा किंवा भरभराट दृष्टींत भरण्याजोगी दाखवितां येईल कीं, जिच्याबद्दल आम्ही महाराष्ट्रियांनीं हळहळत बसावें ? गुदस्तां सर जदुनाथ सरकार दोन महिने मजकडे येथें राहत होते; त्या समागमांत त्यांचें-माझें पुष्कळ विवेचन होत असे. त्यांचें निदान असें दिसलें कीं, बंगाल प्रांताइतकी निकृष्ट स्थिति आज हिंदुस्थानांत कोणाचीहि नाहीं. पाकिस्तानच्या फाळणीनें त्याचा सर्वस्वीं प्राणघातच झाला आहे. खुद्द जदुनाथांची व त्यांच्या आप्तांचीं घरेंदारें, जमिनी, मालमत्ता सर्व कांहीं पाकिस्तानांत जाऊन मुस्लीम बळकावून बसले. आणि देशोधडीस लागलेल्या लोकांचा बोजा हिंदविभागावर पडला. यासंबंधानें जदुनाथांनींच ' मॉडर्न रिव्ह्यू 'त नुकतीच बंगालची करुण कहाणी प्रसिद्ध केलेली साक्ष पुरवील. पंजाबची तीच दशा आहे. काश्मीर-हैदराबाद प्रकरणें तर आज बनावाच्या स्थितींत आहेत. इतर प्रांतांची दुरवस्था असली म्हणून आपली सुव्यवस्था आहे असें म्हणतां येणार नाहीं, पण पाकिस्तानची खरी आंच महाराष्ट्राला लागली नाहीं ही गोष्ट उघड आहे. या संबंधांत जगाची परिस्थितीहि विचारी माणसानें लक्षांत आणावी. नुसत्या शिवाजीच्या किंवा लोकमान्यांचे पराक्रम आठवून आज आपण हळहळ करीत बसूं नये. आजच्या जगांतून अचूक उडी मारून आपणांस परत शिवाजीच्या महाराष्ट्रांत जातां येणार नाहीं. बाकी शिवाजीचा महाराष्ट्रहि केवळ सुवर्णयुग नव्हता हेंहि विसरून चालणार नाहीं. प्रत्यक्ष पुरंदर, सिंहगड, सातारा हे महाराष्ट्राचे संरक्षक टापू कैक वर्षें मुसलमानांचे ताब्यांत होते. शिवाजीची जन्मभूमि शिवनेर पाऊणशें वर्षें मुसलमानांचे कबजांत होती. त्र्यंबकेश्वरची मशीद बनली होती, तेवढी एकच पेशव्यांनीं मोडून पुन: मंदिर बांधलें तें विद्यमान आहे.

## ' मी हिंदी आहें ' ही भावना पहिली

मुख्य गोष्ट काळ सदासर्वकाळ सारखा नसतो. हल्लीं हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यापासून देशाच्या यातना किती व कशा वाढल्या आहेत हें आपण अनुभवीत आहों. मला तर वाटतें, परमेश्वराची कृपा या आर्यभूमीवर आहे, म्हणूनच नेहरू पटेलांसारखे दोन अद्वितीय कर्ते पुरुष या संकटकाळीं एकत्र येऊं शकले आणि तेहि अशाच अनेक कर्तब-

गार व्यक्तींस या कामीं आपल्या साह्यास आणूं शकले. भूतलावरील समर्थ राष्ट्रांत हिंदचे प्रतिनिधि आज या भूमीचें सामर्थ्य गाजवीत आहेत. हा एक अभूतपूर्व प्रयोग आहे. गेल्या दोनशें वर्षांत हिंदी संस्थानांचा इंग्रजांनीं मोठा बाऊ करून ठेवला होता, तो वर्ष सहा महिन्यांत मातीच्या ढेपळाप्रमाणें विरघळून गेला. हिंदचें एकीकरण त्वरेनें होत आहे. श्यामप्रसाद मुकर्जी, जॉन मथाई, भीमराव आंबेडकर असे भिन्नपंथी व भिन्नपेशी वीर सहकार्यानें उद्योगास लागलेले पाहून कोणाचें अंतःकरण भरून येणार नाहीं ? अशा सहकाराचीं चारदोन वर्षें या नेत्यांना राष्ट्रीकरणांत घालवितां येतील, तर हिंदभूमीला भूतलावर प्रतिष्ठेचें स्थान मिळाल्यावांचून राहणार नाहीं. इतकेंच काय, तर माझी मनोदेवता मला निश्चित सांगते कीं, पांच दहा वर्षांच्या अल्पावधींत आपले मुस्लीम बंधु आपण होऊन आम्हांस आपल्या हिंदसंघांत समवून घ्या, अशी विनंती करूं लागतील. आजच पाकिस्तानला स्वतंत्र नांदणें अशक्य होत चाललें आहे. धर्मरहित ( सेक्युलर ) राज्यकारभार कसा यशस्वी होऊं शकतो याचें प्रात्यक्षिक आज हिंदी संघ घडवीत आहे. या संघांत मुस्लीम, शीख, गुरखा, पारसी, खिस्ती अशा सर्व भिन्न जमातींस, आपलें जीवन व्यवस्थित चालू शकतें, आपले उद्योगधंदे निर्वेध उरकतात, एकाचा जुलूम दुसऱ्यावर चालत नाहीं, अशी खात्री पटवून देणें हेंच आपलें सर्वांचें मुख्य कर्तव्य आहे. अर्थात् मी हिंदी आहें ही भावना पहिली; महाराष्ट्रीय, बंगाली, पंजाबी ही भावना तदनंतरची, आपल्या घरीं पाळण्याची; अशी वृत्ति सर्व घटकांच्या ठिकाणीं बाणली जाणें हेंच भावी उत्कर्षाचें मुख्य निदान होय. यालाच महात्मा गांधी रामराज्य म्हणत. महात्माजींच्या एकंदर प्रयोगांत ज्या मुख्य तत्त्वांचा अंतर्भाव होता, ती समानता, ती निर्भयता, ती सर्वभूतहितेरति जितक्या लवकर उत्पन्न होईल, तितका आपला भाग्योदय जवळ येईल हें निश्चित होय.

## क्षुद्र हृदयदौर्बल्य टाकून कामासाठीं उठा !

याच मुख्य निकषावर आपण प्रत्येक प्रश्न तपासून पाहिला पाहिजे. महाराष्ट्रानें अवश्य आपला उद्धार करावा, आपल्या भाषेची महती वाढवावी, हरप्रकारची प्रतिष्ठा मिळवावी, पण आपल्याबरोबरच इतरांनाहि अशीच हाव आहे, तिलाहि आपण वाव दिला पाहिजे, ही भावना सदैव अंतःकरणांत वागविली पाहिजे. माझ्या मतें आत्मप्रौढी सांगत बसण्याची खोड महाराष्ट्रियांस आहे. स्वाभिमानास विनयाची जोड अवश्य असावी. तो विनय पुष्कळशा ख्यातनाम विद्वानांचे ठिकाणीं आढळत नाहीं. महाराष्ट्राबाहेरहि आपल्यासारखे थोर विद्वान आहेत ही भावना महाराष्ट्रानें प्रांजलपणानें व्यक्त करावी. यांतच राष्ट्रैक्याचें बीज आहे. मुख्य सरकारची संघशक्ति सामर्थ्यवान बनणें यांतच सर्वांचें कल्याण आहे. कांहीं बाबतींत थोडी माघार घेऊन सुद्धां आपण दुसऱ्यांचे हितास जपलें पाहिजे. गुजरात्यांनीं महाराष्ट्रियांस गिळलें ही कल्पनाच मुळीं अशक्य कोटींतली आहे. ती आपलेंच मनोदौर्बल्य दाखविते. कोण कोणाचें बरें, हि करूं शकत नाहीं, कीं वाईट करूं शकत नाहीं, ' आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ' हें भगवंतांचें वचन मला त्रिकालाबाधित वाटतें. आज महाराष्ट्रानें प्रत्यक्ष काय करावें असें जर कोणी मला विचारलें, तर मी एकच उत्तर देईन आळस टाका. निरर्थक काथ्याकूट, वादविवाद, भांडाभांडी, अहंमन्यता, साफ सोडून द्या. प्रत्येक क्षण उपयुक्त कामास लावा. बुद्धिसर्वस्व उद्योगांत वेंचा. मी माझ्या प्रामाणिक उद्योगानें आपला उत्कर्ष करून घेईन ही भावना उराशीं बाळगा. हीच राष्ट्रसेवा, आणि हीच परमेश्वरभक्ति. आज उद्योगक्षेत्राचीं शेकडों द्वारें भराभर उघडताहेत. उद्योगधंदे निघताहेत, प्रयोगशाळा निर्माण होताहेत. सृष्ट संपत्ति लुटण्याचे विविध उपाय शास्त्राभ्यासानें रोजरोज निघत आहेत. असा योग क्वचित्कालीं भाग्यानेंच येतो. " क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप. " संपलें माझें निवेदन,

# : ११ :

# महाराष्ट्र मागें पडला आहे का ?

लेखक : **एक महाराष्ट्रीय**

महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. बाबासाहेब जयकर यांनीं परवां असे उद्गार काढले कीं, 'गेल्या वीस पंचवीस वर्षांत महाराष्ट्राची पिछेहाट झाली आहे.' बाबासाहेबांच्या बोलण्याचा रोख असा होता कीं, महाराष्ट्रानें याची दखलगिरी घ्यावी आणि सर्व क्षेत्रांत पुढें घुसण्याचा प्रयत्न करावा.

वस्तुस्थिति काय आहे ?

महाराष्ट्रानें स्वस्थ बसूं नये, अल्प यशानें स्वतःस कृतार्थ मानूं नये, पराक्रमी पुरुष जर संतुष्ट राहूं लागला तर त्याची प्रगती पुढें होत नाहीं, असें जर डा. बाबासाहेबांना म्हणावयाचें असेल, तर त्या विरुद्ध आम्हाला कांहीं एक म्हणावयाचें नाहीं. परंतु डॉ. बाबासाहेबांना जर महाराष्ट्राची पिछेहाट खरोखरीच झाली आहे असें जर वाटत असेल, तर मग त्याला उत्तर द्यावें लागेल.

## व्यापार-उदीमांत प्रगति

एक वेळ असा होता कीं, ज्या वेळीं महाराष्ट्रांतील पांढरपेशा वर्ग केवळ सरकारी नोकरीच्या नादीं लागत असे. फार तर वकील किंवा डॉक्टर होण्यांत भूषण मानीत असे. पण आज ती स्थिति राहिलेली नाहीं. महाराष्ट्रीय लोक आतां विविध व्यापार करूं लागले आहेत. पुणें, नाशिक इत्यादि शहरांत किराणा मालाचीं दुकानें महाराष्ट्रीयच चालवीत आहेत. उंची दर्जाचा शिवणकामाचा मक्ता पोर्तुगीज किंवा अँग्लो इंडियन यांच्याकडे आतां राहिलेला नाहीं. ह्या धंद्यांत महाराष्ट्रीय लोक अधिक शिरत आहेत. लहान धंदे सोडले आणि साखरेच्या कारखान्यासारखा मोठ्या उद्योगांचा विचार केला, तरी त्यांत डहाणूकरांसारखी मंडळी बरीच पुढें सरकली आहेत. सासवडच्या माळी मंडळींनीं गोदावरीकांठचा साखरेचा धंदा बहुतेक काबीज केला आहे. लोखंडी मालाचे कारखानदार 'किर्लोस्कर' ह्यांनीं महाराष्ट्रांतच नव्हे तर सर्व हिंदुस्थानांत फार मोठें नांव कमावलें आहे. किर्लोस्करवाडीची रचना पहाण्यास दूरदूरचे लोक येत असतात. जी गोष्ट किर्लोस्करवाडीची, तीच ओगलेवाडीची म्हणतां येईल. टिकेकर, वेलणकर यांनीं लुगडीं तयार करण्याचे बाबतींत केवढी आघाडी मारली आहे हें सांगायला नकोच. मुंबईच्या शेअर बाजारांतहि महाराष्ट्रीय डोकीं चमकतांना दिसतात. एकूण काय, ज्या उदीमव्यापाराची आम्ही आतांपर्यंत उपेक्षा केली, त्या क्षेत्रांत आम्ही नेटानें आणि उत्साहानें शिरत आहोंत. नवीन क्षेत्र काबीज करणें ही गोष्ट सुलभ नव्हे. म्हणून त्या बाबतींत एकदम मोठा पल्ला गांठला नाहीं तर त्याबद्दल विषाद मानायला नको.

## —आणि शिक्षणक्षेत्रांतील कर्तबगारी

आर्थिक बाब सोडली आणि शिक्षणक्षेत्राचा विचार केला, तर मला वाटतें, याबाबतींत महाराष्ट्रीय माणसें कोठेंच मागें नाहींत. जे जे तरुण परदेशांत गेले, तेथें तेथें त्यांनीं चांगलेंच नांव कमावलें आहे. डॉ. करंदीकर या नांवाचे एक तरुण हिंदुस्थान सरकारची शिष्यवृत्ती घेऊन

अमेरिकेंत गेले आहेत. त्यांच्या संबंधानें तेथील विद्वान प्रोफेसर काय म्हणतात पहा :

Dr. Karandikar is among the most outstanding people I have ever had the pleasure to know ...He had been not only in my judgement, but in that of all who have met him, a person of outstanding intelligence, integrity and scientific understanding. Dr. Karandikar had no difficulty in holding his own, in being respected and having generally admired.

**B. A. Rubin**
Yale University, America

दुसरे एक मध्यम वयाचे गृहस्थ श्री. सुखात्मे हे अमेरिकेंत गेले होते. त्यांचा विषय आंकडेशास्त्र आहे. आंकडेशास्त्रज्ञांची परिषद तेथें होती. सुखात्मे ह्यांचें त्या शास्त्रांतील खोल ज्ञान पाहून तेथील सरकारनें हिंदुस्थान सरकारकडे त्यांची मागणी केली. तेव्हां हिंदुस्थान सरकारनें त्या सरकारला कळविलें कीं सुखात्मे ह्यांच्यासारख्या माणसांना आम्ही सोडूं शकत नाहीं.

कोणी म्हणेल कीं, महाराष्ट्रीयांना 'नोबेल प्राइज' कोठें मिळालें आहे. तें मद्रासच्याच वाट्याला गेलें. नोबेल प्राइजवरून एखाद्या प्रांताची प्रगती आजमवतां येणार नाहीं. नोबेल प्राइज हें नेहमींच उत्कृष्ट ग्रंथाला किंवा निबंधाला जातेंच असें नाहीं. इतर दृष्टीनें पाहिलें, तरी संशोधनशास्त्रांत आम्ही मागें पडलेले नाहीं. रानडे इन्स्टिटयूटचे श्री. लिमये यांचे शास्त्रीय शोध कांहीं कमी महत्त्वाचे ठरले नाहींत. प्राच्यविद्येंत भांडारकर संशोधन मंडळाची कामगिरी जगत्मान्य झाली आहे. खेळाच्या बाबतींत कितीतरी तरुणांनीं आज आपलें कौशल्य खेळाच्या मैदानावर प्रकट केलें आहे. प्रो. देवधर आज जरी क्रीडानिवृत्त झाले असले तरी त्यांची जागा सोहनी, फडकर वगैरे भरून काढीत आहेत असें दिसत नाहीं का ?

## स्वयमेव मृगेंद्रता

आतां प्रश्न असा येतो कीं, राजकीय बाबतींत आम्ही महाराष्ट्रीय अग्रभागीं आहोंत का ? एक काळ असा होता कीं, ज्या वेळेला रानडे, लो. टिळक, गोखले—ही मंडळी राजकारणांत विशेष चमकत होती. एका वेळीं फेरोझशहांकडे हिंदुस्थानचें पुढारीपण होतें, दुसऱ्या वेळेला तें लो. टिळकांकडे आलें. आज महाराष्ट्राला तसें महनीय स्थान राहिलेलें नाहीं, असे उद्गार बाबासाहेबांच्याच नव्हे तर अनेक महाराष्ट्रियांच्या तोंडांतून निघत असतात. असे उद्गार काढूनच ही मंडळी थांबत नाहींत, तर महाराष्ट्रांची पिछेहाट इतर प्रांतीयांनीं जाणून बुजून केली आहे, असें म्हणतात. ही विचारसरणी सदोष आहे. आज महाराष्ट्रीय पुढाऱ्यांकडे देशाचें नेतृत्व नाहीं, पं. नेहरू आणि वल्लभभाई पटेल ही जोडी 'कर्तुम्-कर्तुं' अशी ठरली आहे, आम्ही महाराष्ट्रीय बुद्धिमान्, राजकारणपटु, शूर, धाडसी, त्यागी, असे असून आम्हांला अग्रपूजेचा मान कां मिळत नाहीं ?—असें जे म्हणतात, त्यांना असें उत्तर आहे कीं, सिंहाला राज्याभिषेकाचा संस्कार करून त्याच्या पदीं पशु लीन होत नाहींत, त्याला राज्य हें त्याच्या पराक्रमावर मिळतें आणि तें तो पराक्रमानेंच टिकवतो. पं. नेहरूंना आजचें पद जें प्राप्त झालें आहे, तें मोतीलालजींचे जवाहरलाल चिरंजीव आहेत म्हणून मिळालेलें नाहीं. नाहींतर देशबंधू दासांचे चिरंजीवांना बंगालची पंतप्रधानकी मिळाली असती. जवाहरलालांचा व वल्लभभाईंचा पराक्रम, बुद्धिमत्ता, स्वार्थत्याग नजरेसमोर आणा, म्हणजे हें पद त्यांनीं कष्टानेंच कमावलें आहे हें समजेल आणि आज तेथें ते असावेत असेंच देशाला वाटत आहे. नेहरूंनीं आज जर आपल्या जागेचा राजीनामा दिला तर आंतरराष्ट्रीय राजकारणांत हिंदुस्थानला जें स्थान आहे तें टिकेल कीं नाहीं, ह्याबद्दल शंका वाटते.

वल्लभभाईंचें राजकारणपटुत्व पाहून प्रतिपक्षीयांनीं सुद्धां मान डोलावली नाहीं का? आम्ही मत्सरग्रस्त बुद्धीनें त्यांच्या पदाकडे पहातों, म्हणून आम्हाला असें वाटतें कीं, आमची पिछेहाट झाली. प्रांताचा विचार न करतां देशाचा विचार केला, तर महत्‌भाग्यानें नेहरू-पटेलांची ही जोडगोळी आपल्याला लाभली, असे म्हणावेसें वाटतें.

## मावळंकर-गाडगीळांचें काय ?

मध्यवर्ती विधिमंडळाचे अध्यक्ष नामदार मावळंकर हे महाराष्ट्रीय नाहींत का? मावळंकरांची जागा दुसरें कोणी भरून काढूं शकत नाहीं, असेंच हल्लींचे राष्ट्रसूत्रधार म्हणत आहेत ना? काकासाहेब गाडगीळांची तडफ आणि बुद्धिमत्ता पाहून त्यांना सरकारच्या 'वीज व पाणीपुरवठा' खात्याचे प्रधान नेमण्यांत आलें आहे. ही जबाबदारी काय लहान आहे? विजेच्या फैलावानें आमचे कारखाने वाढणार आहेत. आणि पाणी पुरवठ्यावर आमचें अन्नधान्य अवलंबून आहे. येवढी मोठी जबाबदारी महाराष्ट्रीयांवर टाकली असून, आम्हाला मागें टाकलें, आम्हाला मागें टाकलें, असें ओरडण्यांत अर्थ काय ?

## एकच मंत्र : 'पराक्रम करा'

हल्लींचें राजकारण हें पक्षाचें राजकारण असतें. कोणत्या तरी पक्षाला माणसानें धरून बसलें पाहिजे. त्याची शिस्त पाळली पाहिजे. त्याच्याबरोबर वनवास भोगण्याची तयारी ठेवली पाहिजे. तो पक्ष अधिकारारूढ झाला म्हणजे मग उच्च स्थानीं विराजमान होण्याचा मनुष्याला हक्क पोंचतो. इंग्रजींत एक अशी म्हण आहे कीं, 'मांजराला मासे खावयाला हवे असतात, पण पाण्यांत शिरण्याला तें केव्हांहि तयार नसतें.' तसें आमच्या कांहीं महाराष्ट्रियांचें झालें आहे. टिळकांची ध्येयनिष्ठा नाहीं, कार्यतत्परता नाहीं, विविध प्रकारच्या सेवेची तयारी नाहीं, राष्ट्रहिताचा अखंड ध्यास नाहीं, आणि तरीहि 'माझी अग्रपूजा करा, मला पंतप्रधान बनवा, असें जर कोणी म्हणेल तर कोण बरें ऐकेल? लो. टिळकांना प्रथम कोण विचारीत होतें? १९०५पर्यंत त्यांच्याकडे कॉंग्रेसचे नेते ढुंकून पहाण्यास तयार नव्हते. १९०७ सालीं बंगाली चळवळीला महाराष्ट्रियांनीं, म्हणजेच टिळकांनीं, जेव्हां उचलून धरलें, त्याच वेळेला फिरोजशहा वगैरे मंडळींनीं त्यांच्याकडे माना वर करून पाहिलें. १९१५ पर्यंत तरी टिळकांना कॉंग्रेसमध्यें महत्त्वाचें स्थान नव्हतें. १९१५ सालीं गोखले वारले. फिरोजशहा, वाच्छा, वगैरे मंडळी कॉंग्रेसमधून कार्यनिवृत्त झाली. त्यावेळीं टिळकांकडे अखिल हिंदुस्थानचें नेतृत्व आलें. आणि तें मात्र पुढील ४ वर्षें टिकून राहिलें. टिळकांचें शेवटचें वैभव आम्ही फक्त नजरेसमोर आणतों, त्यांचा अज्ञातवासाचा काळ ध्यानांत घेत नाहीं. गांधींना तरी १९१५ सालीं कोणतें स्थान होतें? गोखले-टिळक काय ते त्यांना आदरानें वागवीत; आणि इतर महाराष्ट्रीय नेते जे स्वतःला राजकारणपटु म्हणवत ते त्यावेळीं गांधींना तुच्छतेनें वागवीत होते. परंतु गांधींचा पराक्रमच दांडगा, झेंपच विलक्षण, लोकसंग्रह करण्याची शक्तीच असामान्य—त्यामुळें अखिल भारतीय राजकारणाचीं सूत्रें त्यांच्याकडे आलीं. जनता ही कर्तृत्वाच्या आणि धीरत्वाच्या पाठीमागें जाते. आज गांधीच्यानंतर राजकारणांत चमकायला पुष्कळ जागा आहे. ज्यांना पुढें यायचें असेल त्यांनीं राष्ट्रापुढें कार्यक्रम ठेवावा. आणि आपल्यामागें जनतेला खेचून घेऊन जावें. नाहीं कोणी म्हटलें आहे? परंतु मी घरांत बसेन, लेखणी चालवीन व सार्वजनिक सभेंत बोटें मोडत बसेन—यानें कार्यभाग होणार नाहीं. हिंदींत एक म्हण आहे, 'जलनेवालेको जलना देव.' ज्यांना बोटें मोडायचीं आहेत त्यांनीं बोटें मोडीत बसावें, परंतु पुढील पिढीचा बुद्धिभेद त्यांनीं करूं नये. पराक्रम करा, हा एकच मंत्र आपण तरुण पिढीला मागच्या पिढीनें दिला पाहिजे. ज्याच्या नेतृत्वाची गरज राष्ट्राला असेल, त्याच्या मागें राष्ट्र जाईल. मला पुढारी करा—'मिया मुझे मानो'—असें कोपऱ्यांत बसून ओरडून कांहींएक व्हावयाचें नाहीं

# : १२ :

# संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचें भवितव्य काय ?

लेखक : मा. ग. बुद्धिसागर

भारतीय लोककथांत विक्रमाच्या सिंहासनाची कथा प्रसिद्ध आहे. भगिनी निवेदिता यांनीं आपल्या मनोरम कथनशैलीनें इंग्लिश वाङ्मयांतहि तिला स्थान मिळवून दिलें आहे. त्या कथेंतील विक्रमाच्या सिंहासनावर बसलेल्या गवळ्याच्या मुलानें दिलेल्या निवाड्यावर लोकांची सहज श्रद्धा बसे. तो निवाडा न्याय्य असलाच पाहिजे आणि म्हणून बिनतक्रार विनासंशय मान्य केला पाहिजे अशी त्यांची भावना असे. हिंदी राजकारणांत एक काळ असा होता कीं, इतक्या आत्यंतिक श्रद्धेच्या आणि आत्मीयतेच्या भावनेनें काँग्रेसच्या कार्यकारी समितीचे निकाल जनता ऐकत असे आणि मान्य करीत असे. पण विक्रमाची काटेकोर न्यायबुद्धि आणि गवळ्याच्या मुलाची निरागस निःस्पृह वृत्ति या दोहोंची आज काँग्रेसच्या कार्यकारी समितीकडून अपेक्षा कुणी करीत नाहीं. जयपूर काँग्रेसच्या समितीनें नेमलेल्या समितीनें नुकत्याच दिलेल्या निवाड्यांत न्यायबुद्धीपेक्षां व्यवहारबुद्धीच अधिक दिसली; निःस्पृह नेतृत्वापेक्षां प्रस्थापित हितसंबंधांना चुचकारण्याची व मूळ प्रश्नाचें उत्तर लांबणीवर टाकण्याची वृत्ति आढळून आली, तर आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. दार समितीच्या अहवालापेक्षां काँग्रेसची कार्यकारी समिति वेगळें असें कांहीं सांगेल, अधिक रास्त निर्णय देईल अशी अपेक्षा काँग्रेसजनांशिवाय कुणीच व्यक्त केली नव्हती. त्यांनींहि ती अपेक्षा वास्तविक कितपत बाळगली, कुणास कळे. 'अशुभस्य कालहरणम्' या न्यायानें काँग्रेसश्रेष्ठींविरुद्ध ठाम भूमिका घेऊन उभें राहण्याचा अप्रिय प्रसंग लांबवेल तितका लांबवावा या बुद्धीनेंच त्यांनीं जयपूर समितीच्या निवाड्याचा हवाला दिला असावा.

## कार्यकारी समितीचा लोकसत्तावाद

हा निवाडा आतां प्रसिद्ध झाला आहे. त्याच्या तात्त्विक बाजूचा काथ्याकूट करून फारसें कांहीं निष्पन्न होणार नाहीं. दार कमिशनची भूमिका व त्यानें काढलेले निष्कर्ष समितीनें वस्तुतः मान्य केले आहेत. तसें केल्यानंतर भाषावार प्रांतरचनेविरुद्ध ठाम भूमिका घेऊन तिच्याविरुद्ध कौल देण्याचा--निदान साराच प्रश्न लांबणीवर टाकण्याचा–स्पष्ट अभिप्राय प्रगट करण्याचा मार्ग समितीला मोकळा होता. पण आपण लोकसत्तावादी असल्याची समितीला वेळींच आठवण झाली आणि–' लोकमतापुढें वांकून ' भाषावार प्रांतरचनेचा विचार करणें अपरिहार्य झाल्यास आंध्र प्रांताच्या प्रश्नाला अग्रस्थान द्यावें अशी शिफारसहि समितीनें करून टाकली ! आंध्राचा बहुतेक भाग हल्लींच्या मद्रास प्रांतांतच मोडत असल्यामुळें तो निर्माण होण्याच्या मार्गांत अडचणी कमी आहेत आणि त्याच्या निर्मितीबाबत जास्तींत जास्त मतैक्य आहे ही या शिफारशीचीं कारणें म्हणून समितीनें दिलेलीं आहेत.

महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळ यांचा विचार मागाहून सवडीनें करण्यास हरकत नाहीं असा निष्कर्ष यापासून सहजच निघतो. पण असें असूनहि

त्यांची हे प्रांत निर्माण करण्याची पद्धत कशी असावी, त्यांची निर्मिति परस्परावलंबी कशी आहे आणि त्यांच्या सीमा ठरविण्याच्या बाबतींत कोणत्या अडचणी आहेत याची चर्चा आतांच करणें समितीला आवश्यक वाटलें. इतकेंच नव्हे तर– कोणत्या ' लोकमता ' पुढें वांकून कुणास कळे !– मुंबई हा निराळाच प्रांत बनला पाहिजे आणि बृहन्मुंबईचा खटाटोप तावडतोब सुरू झाला पाहिजे, असेंहि याच वेळीं समितीनें जाहीर करून टाकलें.

## दुभाषी प्रदेशांचें बुजगावणें

आतां हा अहवाल म्हणे मध्यवर्ती सरकारकडे आणि घटना–समितीकडे पाठविण्यांत येणार आहे आणि त्यानंतर आवश्यक ती ' कारवाई ' लवकरच सुरू होईल. अशा वेळीं संयुक्त महाराष्ट्राच्या सच्च्या पुरस्कर्त्यांनीं प्रांतनिर्मितीबद्दल समितीनें सुचविलेल्या पद्धतीचा व मुंबईच्या प्रश्नाचा व्यवहाराच्या दृष्टीनें विचार करणें अवश्य आहे.

भाषावार प्रांतांच्या सीमा ठरविणें हें काम सोपें नाहीं. दोन भाषावार प्रदेशांच्या सीमा जेथें मिळतात तेथें संमिश्र दुभाषी प्रदेश तयार होतो. आणि असे प्रदेश ( Middle area ) कोणत्या प्रांतांत घालावयाचे, यासंबंधीं कलह माजतील अशी भीति समितीनें व्यक्त केली आहे. समितीनें लावलेला हा शोध कांहीं अपूर्व नाहीं. भाषावार प्रांतरचनेच्या पुरस्कर्त्यांनीं या प्रश्नाचा विचार आधींच करून ठेवला असून त्याच्या सोडवणुकीचा मार्गहि सुचविला आहे. अशा संमिश्र विभागांत गांव हा मतदानाचा एक घटक मानला जावा व मुख्य भाषावार प्रदेशाशीं तें भौगोलिक दृष्टीनें संलग्न असेल तर सार्वत्रिक मतदानाचा कौल अनुकूल पडल्यास त्या मुख्य भाषावार प्रांतास तें जोडण्यांत यावें. विवाद्य भाग निश्चित करण्यासाठीं आणि तेथील मतदान घेण्यासाठीं प्रांतरचनेच्या वेळींच सीमासमित्या नेमण्यांत याव्या, अशी त्यांची या प्रश्नावर उपाययोजना आहे. हिंदुस्तानची फाळणी करण्यांत आलेल्या अडचणींना व अनर्थांना पत्करणाऱ्या कांग्रेसच्या कार्यकारी समितीनें भाषावार प्रांतांच्या सीमा ठरविण्याच्या अडचणींचा बाऊ करावा आणि भाषावार प्रांतरचनेच्या पुरस्कर्त्यांनीं सुचविलेल्या वरील योजनेची दखलहि घेऊं नये हें आश्चर्य नव्हे काय ?

## रोगापेक्षां उपाय घातक !

पण यापेक्षांहि विस्मय वाटण्याजोगा भाग पुढेंच आहे. हिंदी संघराज्यांतील एकादी भाषा बोलणाऱ्या विभागांतील जनतेची आपला भाषावार प्रांत बनावा अशी इच्छा असली, तरी ती पुरी होणें इतर विभागावर अवलंबून राहील. उदाहरणार्थ, कर्नाटक व केरळ यांची निर्मिती, म्हैसूर, कोचीन व त्रावणकोर येथील जनतेच्या सहकार्यावर अवलंबून राहील.महाराष्ट्राला स्वतंत्र प्रांत म्हणून नांदावयाचें असलें तर त्याच्याशीं संलग्न असलेल्या कर्नाटकाच्या भागाची व्यवस्था करावी लागेल. वऱ्हाडनें महाराष्ट्रांत सामील व्हावयाचें ठरविलें तरी महाकोशलचा प्रश्न सुटल्याशिवाय त्याला तसें करतां येणार नाहीं वगैरे विवेचन करून समिति पुढें म्हणते कीं, या अडचणींचा निरास झाला असें मानलें, तरी **विवाद्य विभाग वगळून आणि सर्वसंमत विभागांचा समावेश करूनच नवे भाषावार प्रांत तयार करावे लागतील.** केवळ सर्वसंमत विभागांचा समावेश करून झालेली प्रांतरचना अखेरची आहे असें मानण्याचें कारण नाहीं, असाहि निर्वाळा समितीनें यावेळीं देऊन टाकला हें खरें आहे. पण मूळ रोगापेक्षांहि ही उपाययोजना घातक नव्हे काय ?

## निर्दय उपहास !

मुख्यत्वें महाराष्ट्रालाच ती लागू ठरणार असल्यानें महाराष्ट्राचाच प्रश्न घेऊं या. निजामशाहींतील मराठवाड्याचा किंवा विदर्भ व मराठी मध्यप्रांत यांचा प्रश्न बाजूलाच राहिला. खुद्द मुंबई प्रांतांत असलेल्या मराठी जिल्ह्यांचाच विचार केला, तरी खानदेशचे कांहीं तालुके व ठाणें जिल्हा यांवरहि गुजराती भाषीय आतां हक्क सांगू लागले आहेत. म्हणून काय हे ' विवाद्य ' विभाग अजिबात टाळून ' महाराष्ट्र ' प्रांत बनवायचा ? मुंबई

'Cosmopolitan' असल्यानें–( किंवा पट्टाभि म्हणतात त्याप्रमाणें ती एक बेट असल्यानें ! )– महाराष्ट्रांत तिचा समावेश होऊं नये असा फतवा समितीनें आधींच काढून ठेवला आहे. मराठवाडा हा संस्थानी मुलुख आहे, विदर्भाची दावण महा– कोशलशीं बांधलेली आहे. तेव्हां तुम्हांला संयुक्त महाराष्ट्र हवा असेल तर मुंबईरूपी शिर उडालेला, वऱ्हाड–मध्यप्रांतासारखे हातपाय तुटलेला आणि खानदेश-ठाण्याच्या भागांचे नाककान कापलेला असा विद्रूप आणि लुळापांगळा महाराष्ट्र घ्या, असें तर समितीला महाराष्ट्राला सांगायचें नाहीं ना ? 'Accepted areas' ( सर्वमान्य प्रदेश ) चा नवा दंडक घालून देण्याच्या मिषानें महाराष्ट्राच्या मागणीचा हा निर्दय उपहासच नव्हे का ?

## तर्काची आणि सत्याची ओढाताण

मुंबई महाराष्ट्राची नव्हे असें सांगण्यांत समि– तीनें केलेली तर्काची आणि वस्तुस्थितीची ओढाताण इतकीच किंबहुना यापेक्षाहि अजब आहे. मुंबईत महाराष्ट्रीय अल्पसंख्य आहेत हें समितीला कोणत्या खानेसुमारीच्या खास आंकड्यांवरून कळलें ? सार्वदेशीय संस्कृतीचा ( Cosmopolitan ) प्रदेश भाषावार प्रांताचा भाग झाल्यानें काय अनर्थ ओढवणार आहेत ? भाषावार प्रांतरचनेच्या वादामुळें मुंबईचा उद्योग- धंदा मंदावेल ( Business has sufferred ) असें एक विधान समितीनें केलेलें आहे. जणू काय शिवाजीच्या स्वाऱ्यांमुळें सुरतेच्या व्यापाऱ्यांनीं तेथून आपल्या पेढ्या हलविल्या त्याप्रमाणें संयुक्त महाराष्ट्रवाद्यांच्या आगामी हल्ल्यांच्या भीतीनें मुंबईचे धनवंत कारखाने आणि शेअरबाजार सोडून पळत सुटले आहेत. महाराष्ट्रीयांना तरी तसा अनुभव खास आलेला नाहीं. मुंबई सार्वदेशीय संस्कृ- तीची म्हणून भाषावार महाराष्ट्र प्रांतांत तिला घालणें अन्याय्य आणि त्याच मुंबईचा विस्तार कर- ण्यासाठीं 'ग्रेटर बॉंबे' च्या नांवाखालीं महाराष्ट्राचा प्रदेश हडप करणें मात्र न्याय्य ! महाराष्ट्र, कर्नाटक हे कॉंग्रेसचे प्रांत असले, तरी राज्यकारभारासाठीं ते स्वतंत्र प्रांत होऊं शकत नाहीं. पण मुंबई मात्र कॉंग्रेसचा स्वतंत्र प्रांत असल्यानें तिला राज्यकारभाराचा स्वतंत्र घटक बनविणें समर्थ- नीय ! ! आजूबाजूचे ग्रामीण प्रदेश गिळंकृत करून 'बृहन्मुंबई' उभारणें हें गांधीजींच्या अर्थशास्त्रां- तहि बसत असेलच. कारण मुंबई बेट असल्या- मुळें तो मुंबईचा भाग होऊं शकत नाहीं, असा नवीन भौगोलिक सिद्धांत पट्टाभि सीतारामय्यांनीं मांडलाच आहे, आणि हें सारें भाषावार प्रांतरच- नेच्या अभिमान्यांप्रमाणें विकारग्रस्त न होतां व्यापक आणि व्यावहारिक ( Broad and practical view ) दृष्टीनें करण्यांत आलें आहे ! ! !

भाषावार प्रांतरचनेच्या तत्वाची तात्विक चर्चा इतकी झाली आहे कीं कॉंग्रेसच्या कार्यकारी समितीच्या अहवालाची त्या दृष्टीनें छाननी करण्याची गरज उरलेली नाहीं. हा अहवाल तयार करतांना समितीनें भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाचें आगामी लोकशाहीच्या दृष्टीनें असलेलें महत्व ओळखलेलें नाहीं. महाराष्ट्रावर तर तिनें धडधडीत अन्याय केला आहे. या अन्यायाचा प्रतिकार कसा करा- वयाचा हा महाराष्ट्रीय समाजधुरीणांपुढें मोठाच प्रश्न आहे.

## सामान्य महाराष्ट्रीयांनीं जागरूक रहावें !

तो सोडवितांना संयम बाळगला पाहिजे याबद्दल वाद नाहीं. पण कांहीं झालें तरी accepted areas चें घातुक तत्व कॉंग्रेसच्या कार्यकारी समितीनें मांडलें आहे त्या स्वरूपांत स्वीकारलें जाऊं नये; मुंबईच्या बाबतींत तर तडजोडीला वावच नाहीं ही खूणगांठ प्रत्येकानें मनाशीं बांधून ठेवावी. मुंबईशिवाय बाकीचा महाराष्ट्र तर तावडतोब बनवूं या, असा सूर आतांपासून कुठें कुठें ऐकायला येत आहे. कॉंग्रेसची संघटनात्मक शिस्त मानण्यात बांधलेले गट त्याला साथ देणार नाहींत असें सांगणें कठीण.

म्हणून त्याविरुद्ध विशेष सावधगिरी बाळगणें अवश्य ठरतें. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला तरच त्याच्या निर्मितीचा हेतु साध्य होईल, नाहींतर दरिद्री कृषिप्रधान परकीय भांडवलानें चाललेल्या कारखान्यांत मजुरी किंवा कारकुनी करणारा निराळा महाराष्ट्र करायचा काय! त्यापेक्षां हल्लींची स्थिति काय वाईट? 'विवाद्य' म्हणून महाराष्ट्रापासून वेगळे झालेले भाग त्याला परत मिळतील अशी आशा कुणाच्या न्यायबुद्धीवर विसंबून बाळगावी महाराष्ट्राच्या अवनतीच्या कारणांची मीमांसा 'मौजे'च्या स्तंभांतून आलेली आहे. स्वतंत्र बाण्याचा अभिमान मिरवीत असतांना धनपतींच्या लगामीं महाराष्ट्र वऱ्हाडांतील मोठ्या गटाचें राजकारण असल्यामुळें आमचें सारें समाजजीवन विस्कळित झालें आहे. तोच प्रकार यापुढें चालू राहिला तर मुंबईच्या प्रश्नावर समजूतदारपणानें तडजोड करण्याची भाषा सुरू होईल आणि संयुक्त महाराष्ट्राचा गाभा नष्ट होऊन त्याचीं फोलपटें चघळीत आम्हांला बसावें लागेल. म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची यापुढील दिशा ठरविण्याच्या बाबतींत सामान्य महाराष्ट्रीयांनीं जागरूक राहणें अवश्य ठरतें.

मुंबईच्या फारकतीला त्यांनीं कधींहि संमति देऊं नये आणि महाराष्ट्राचा भाषावार प्रांत लवकर मिळविण्याच्या मोहानें काँग्रेस कार्यकारी समितीनें 'accepted areas' चें घातुक तत्वहि स्वीकारूं नये, हेंच दूरदर्शीपणाचें ठरेल.

---

# : १३ :

# महाराष्ट्रानें विधायक सेवेचें कार्य करावें

**लेखक : गणेश वासुदेव मावळंकर**

"आज महाराष्ट्र राजकारणांत व जीवनाच्या इतर क्षेत्रांत मागें पडला आहे, तेव्हां पूर्वीचें प्रमुखपद प्राप्त करून घेण्यासाठीं काय केलें पाहिजे?" या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी खरें राजकारण म्हणजे मी काय मानतों तें स्पष्ट करतों. राजकारण म्हणजे देशांतील राज्यसत्ता मिळविण्यासाठीं व राजदंडानें ती टिकविण्यासाठीं होत असलेला उद्योग एवढेंच आपण मानत आलों व आज मानतों. मी त्यास राजकारणाचा महत्त्वाचा भाग मानीत नाहीं. राष्ट्राची सर्वांगीण उभारणी हें मला खरें राजकारण वाटतें. त्यासाठीं आपण स्वराज्य मिळविलें. चारचौघांच्या हातांत सत्ता येऊन त्यांना मिरवतां यावें म्हणून कांहीं स्वराज्यासाठीं आपण झगडलों नाहीं. राज्यसत्तेतील केवळ अधिकाराच्या स्वरूपाचा स्वराज्याचा आशय गांधीयुगांत पालटला. अहिंसक समाजाची स्थापना हा नवा आशय स्वराज्याच्या कल्पनेंत आला. विषमतेवर आधारलेली समाजव्यवस्था नष्ट होऊन मानवी समानतेच्या आधारावर तिची प्रतिष्ठापना व्हावी, हें राजकारणाचें खरें उद्दिष्ट होय. तें रचनात्मक कार्यानें साधतें; सत्तास्पर्धेनें नव्हे. म्हणून शिक्षण बालसंगोपन, आरोग्य, ग्रामोद्योग, इत्यादि रचनात्मक विधायक कार्यक्रमांत गुंतलेलीं माणसें हीं मला यथार्थपणें राजकारणी वाटतात.

योग्य प्रकारचे शिक्षणानें चारित्र्यसंपादन होतें. भौगोलिक मर्यादा ओलांडून दृष्टि विशाल होते, मानवता अंगीं बाणते. समतेची वृत्ति येते. तीच गोष्ट इतर रचनात्मक कार्यांची. या सर्व कार्यांनींच राष्ट्राची सर्वांगीण उभारणी होऊं शकेल.

## राजकारण व स्वराज्य यांचे नवे आशय

अशा या खऱ्या राजकारणांत सबंध देशच मागें आहे, तेव्हां महाराष्ट्रहि आहेच. खरोखर महाराष्ट्राची कै. न्या. मू. रानड्यांचे वेळेपासूनची परंपरा विधायक आहे. टिळक, आगरकर, गोखले, अण्णासाहेब कर्वे वगैरे सर्वांनीं केवळ युक्तिवाद केले नाहींत. सेवेचें विधायक कार्य केलें. ही परंपरा गांधीयुगांत श्री. अप्पासाहेब पटवर्धन आदि मंडळींनीं राखली. तथापि राजकारणाच्या जुन्याच कल्पनेचा पगडा बौद्धिक महाराष्ट्राच्या मनावर अधिक राहिल्यानें हें कार्य जोरावलें नाहीं, संघटित झालें नाहीं, मागें पडलें. समाजसुधारणा आधीं कीं राजकीय स्वातंत्र्य आधीं, असा वाद टिळकांच्या वेळीं उद्भवला; लोकमान्यांनीं त्याचा निर्णय आपल्या कार्यानें राजकीय चळवळीच्या बाजूनें दिला. त्यामुळें राजकीय बनतां बनतां एक बुद्धिमंतांचा वर्ग समाजापासून वेगळा होत गेला. महात्मा गांधींनीं हा वाद मिटविला. सामाजिक क्रांतीशिवाय राजकीय क्रांति झाली तरी तिला अर्थ नाहीं असें म्हणून सामाजिक क्रान्तीचें विधायक कार्य हें सर्वश्रेष्ठ राजकारण मानलें. गांधीजींनीं स्वराज्य व राजकारण यांच्या आशयांतील ( Contents ) केलेली ही क्रांति महाराष्ट्रांतील ' राजकारण ' निष्ठ बुद्धिवंतांना नीटशी आकलन झाली नाहीं.

## महाराष्ट्रीयांचे प्रकृतिविशेष

बुद्धिमान् मानल्या गेलेल्या महाराष्ट्रीय पुढारी वर्गाला हें आकलन कां झालें नाहीं, हें कोडें आहे. राजकीय सत्तेतील वरिष्ठत्वाचा व स्वातंत्र्याचा महाराष्ट्राचा इतिहास ताजा होता. महाराष्ट्रांत त्या इतिहासाबद्दल अभिमान जागा होता. भौगोलिक परिस्थिति, समाजस्थिति, इतिहास यामुळें महाराष्ट्रीयांची प्रकृतीहि विशिष्ट प्रकारची बनली आहे. त्यांत स्वातंत्र्यवृत्ति आहे, जीवनसंग्राम तुलतेनें कठीण, त्यामुळें काटकपणा आहे. बुद्धि तीव्र आहे, वृत्ति लढाऊ आहे--एकप्रकारची टोळीबाज ( Clanish ) प्रवृत्ति आहे. व्यापक अशी सहकार्यभावना नाहीं; उलट सर्वांबद्दल एकप्रकारची संशयवृत्ति आहे. मन पेशवाईच्या आठवणींत रंगलेलें. त्यांत अव्वल इंग्रजींत शिक्षणामुळें सरकारदरबारीं मान मिळाला त्याचा अभिमान आला; तसें आर्थिक स्वास्थ्यहि लाभलें. त्याचा या वर्गावर परिणाम असा झाला कीं, त्यांची स्वतंत्र कर्तृत्वशक्ति नाहींशी झाली. राजद्रोहासाठीं फांसावर लटकण्याची तयारी ठेवणारा महाराष्ट्रीय प्रसंगीं जवळचे शंभर शिल्की रुपये पोस्टल बँकेंतच ठेवीत असे ! या उलट, शिक्षणानेंच जागृत झालेल्या पारतंत्र्यविरोधी भावनेचें टिळकादि नेत्यांनीं पुढारीपण केलें, त्याचा अहंकारहि रुजला. या सर्व गोष्टींमुळें गेल्या दीडशें वर्षांत बदलत गेलेल्या परिस्थितीशीं महाराष्ट्रीय नीटसे समरस झालेच नाहींत. समग्र जीवनाचा वेध घेऊन, सर्व देशाच्या भल्यासाठीं सहकार्यभावना वाढीस लावून, सर्वांचें हित साधावें, हें त्यांना जमलें नाहीं.

## गुजराती-मराठी वाद बहुजनांत नाहीं

पण बुद्धीच्या आंधळ्या अहंकारामुळें, आपण ज्या दोषांमुळें मागें पडत आहोंत ते पाहून नाहींसे करण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं इतर सत्ताधारी प्रांत आपली कुचंबणा करीत आहेत, असा आत्मवंचक त्रागा महाराष्ट्रांत कुठें कुठें दिसतो. गुजराती–महाराष्ट्रीय वाद अशाचपैकीं आहे. खरें पाहिलें, तर गुजराती–मराठी विरोधाची भावना दोन्ही प्रांतांतील बहुजनसमाजांत नाहीं. बुद्धिमंतांच्या मनांतील हें द्वैत आहे. आणि त्यांच्या प्रचारामुळें सामान्य जनांत तें पसरूं पहात आहे. उद्योगधंदे, व्यापार अशा अर्थविषयक क्षेत्रांत महाराष्ट्रीयांना गुजरात्यांशीं तोंड देतां येत नाहीं व

एक प्रकारची असूया वाटते. तीच गोष्ट शिक्षण संशोधनादि ज्ञानक्षेत्रांत कांहीं गुजरात्यांना महाराष्ट्रीयांविषयीं वाटत असतांना आढळते. तथापि मला वाटतें कीं, ही उभयपक्षीं भावना चुकीची आहे. गुजरात व महाराष्ट्र यांची प्रकृति भिन्न आहे. या प्रकृतिभेदाला त्यांची परिस्थिति कारण आहे. महाराष्ट्राची प्रकृति मागें सांगितलीच आहे. संपन्न प्रदेशांतील गुजराती हा व्यापारी पेशाचा व वृत्तीचा आहे. आपला व्यापार यशस्वी रीतीनें साधण्याकडे त्याचें सर्व लक्ष असतें; म्हणून बाकीच्या सर्व गोष्टींत तो उदार वृत्तीचा, तडजोडवादी, जमवून घेणारा, लाघवी व स्नेहशील असतो. सहकार्याची प्रवृत्ति त्याच्यांत अधिक. त्यामुळें बदलत्या परिस्थितीशीं जमवून घेणें त्याला सोपें व शक्य होतें. आपापला हा भिन्न प्रकृतिधर्म ओळखून, या दोन्ही प्रांतांनीं, व्यापक देशहित डोळ्यासमोर राखून, परस्परांना पूरक व्हावें, असें मला वाटतें.

महाराष्ट्रीयांनीं जरूर तर उद्योगधंद्यांत खूप प्रगति करावी. तथापि समानता म्हणजे एकच काम नव्हे, हें ओळखावें, आणि आपापल्या प्रकृतिधर्माप्रमाणें प्रगति करावी. प्रांत भिन्न असले व त्या त्या प्रांतांचीं वैशिष्ट्येंहि असलीं, तरी अखेर भारताची संस्कृति एक व एकता अखंड आहे ना ? मग हे गैरसमज, हा द्विधाभाव व ही स्पर्धा कशासाठीं ? गुजराती आपण मानतों तितका प्रांतीय नाहीं. अमदाबादेंत माझ्यासारख्या महाराष्ट्रीयाच्या प्रगतींत त्यानें अडथळे आणले नाहींत. एवढेंच नव्हे तर मला आपला समजून, प्रेमानें व आदरानें माझ्याशीं वागून, माझ्या शक्त्यनुसार सेवा घेत आहेत. प्रो. काथवटे, गोपाळराव देशमुख हीं जुनी मंडळी किंवा काकासाहेब कालेलकरांसारखे आजचे नेते तेथें मानले जातातच ना ? तेव्हां तेथें आपल्याविषयीं द्वेषभाव किंबहुना दुजाभाव भरलेला आहे, असें कसें मानतां येईल ?

## गुणांचा विधायक उपयोग करा

तेव्हा कोणी आपली मुद्दाम कुचंबणा करीत आहे असें मानण्याऐवजीं आत्मपरीक्षण करून आपण मागें कां पडलों तें आपण शोधावें. बदलत्या परिस्थितीशीं समरस होऊन, खरें राजकारण म्हणजे सत्तानिरपेक्ष रचनात्मक कार्य हें ओळखून महाराष्ट्रानें कामाला लागावें. हिंदुस्तानांत लोकशाही राज्ययंत्र यावयाचें आहे. येथील समाजरचना समाजवादी बनणें अपरिहार्य आहे. त्यासाठीं सत्तेचें व संपत्तीचें विकेंद्रीकरण होणें जरूर आहे. पण सहकार्यानें त्यासाठीं तयार झालें पाहिजे. आजवर अपरिचित असलेली सहकार्यभावना परिस्थितीच्या दडपणामुळें रुजूं लागेल असें मला वाटतें. महाराष्ट्रीयानीं तुटकपणास, सडेतोडपणास स्वातंत्र्य समजूं नये; मिळाऊपणास, सौजन्यास खुशामत समजूं नये; सहकारासाठीं देवाण–घेवाण करण्यास "होयबावृत्ति" किंवा "गुलामी–वृत्ति" समजूं नये; महाराष्ट्रीयांत असलेल्या गुणांबद्दल इतरप्रांतीयांस आदर आहे, प्रेम आहे हें मी स्वानुभवानें म्हणूं शकतों. त्याचा उपयोग भारतीय राष्ट्रकार्याकडे सेवाधर्मांचे निरंहकार वृत्तीनें, उच्च किंवा न्यूनगंडाचे भोंवऱ्यांत सांपडल्याशिवाय करतां आला तर काय बहार होईल ?

: १४ :

# सहकारी चळवळींतच महाराष्ट्राचें हित आहे

मुलाखत : ना. म. जोशी

## खरा महाराष्ट्र कोणता ?

श्री. ना. ग. गोरे यांनीं महाराष्ट्र मागासला आहे असें म्हणून या मागासलेपणाची मीमांसा आपल्या अनावृत पत्रांत केली आहे व आपल्या परीनें कांहीं मार्ग सुचविले आहेत. त्यांच्या पत्रांत त्यांनीं मांडलेल्या विचारांचा जेव्हां मी विचार करतों, तेव्हां महाराष्ट्राच्या मागासलेपणाविषयीं वस्तुस्थिति काय आहे, असा प्रश्न माझ्यापुढें उभा रहातो. श्री. गोऱ्यांसारखी मंडळी समजते, तसा महाराष्ट्र खरोखरच इतर प्रांतांहून मागासला आहे काय ? आणि खरोखर मागासला, मागासला म्हणून आपण ज्याच्याविषयीं बोलतों, तो महाराष्ट्र तरी कोणता आहे ? मला असें विचारांतीं प्रांजळपणें वाटतें कीं, हिंदुस्थानांतील इतर प्रांतांहून महाराष्ट्र मागें पडला आहे ही गोष्ट प्रथम वाटते तशी खरी नाहीं. आजच्या राजकारणाचीं सूत्रें महाराष्ट्रीय पुढाऱ्यांच्या हातीं नाहीत, ही गोष्ट खरी. रानडे, गोखले, टिळक यांच्या अमदानींत तीं महाराष्ट्रियांच्या हातीं प्रामुख्यानें होतीं, त्यामुळें आतां तशीं तीं नसावींत याची हळहळ आपल्याला वाटते. तथापि, रानडे, गोखले, अथवा टिळक यांपैकीं प्रत्येक जण महापुरुष होता. आणि महापुरुषांची परंपरा चालणें कठीण असतें. महापुरुष कांहीं वारंवार जन्माला येत नसतात. त्यामुळें देशाच्या राजकारणाचीं सूत्रें नेहमींच एका प्रांताच्या हातीं राहणें कठीण आहे. त्याचप्रमाणें ज्याला आपण मागासलेला 'महाराष्ट्र' म्हणत आहोंत, तो कोणता आहे ? अशा तऱ्हेची चर्चा करतांना साधारणत: आपल्या डोळ्यांसमोर आजवर जीवनाचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं ठेवणारा महाराष्ट्रांतील पुढारलेला सुशिक्षितांचा वर्ग उभा असतो. त्याच्या उन्नति–अवनतीवरून आपण सर्व महाराष्ट्राची उन्नति–अवनति मापतों. नव्हे, त्याची अवस्था तीच महाराष्ट्राची असें मानतों. महाराष्ट्राची ही व्याप्ति यथार्थ आहे काय ? मला ती यथार्थ वाटत नाहीं. महाराष्ट्र हा त्यांतील बहुजनसमाजावरून ओळखला जावा, असें मला वाटतें. आणि या खऱ्या महाराष्ट्राचा विचार केला, तर देशाच्या इतर प्रांतांहून तो मागासला आहे असें वाटणार नाहीं; उलट थोडासा पुढारलेला च अ.ढळेल. याचा अर्थ असा नव्हे कीं, महाराष्ट्रांतील बहुजन अशा कामगार व शेतकरी समाजाची पूर्ण सुधारणा झाली आहे. तसें नव्हे. तो अशिक्षित आहे, तथापि देशांतील साराच बहुजनसमाज तसा आहे. महाराष्ट्रांतील बहुजनसमाज इतर प्रांतांपेक्षां त्यातल्या त्यांत पुढें मानायचा इतकेंच.

## बुद्धिनिष्ठेंत मागासलेंपण नाहीं

तथापि बहुजनसमाजाची अवस्था तूर्त बाजूला ठेवू आणि पुढारलेल्या वर्गाचें राजकीय पुढारीपण का गमावलें तें पाहूं. हिंदुस्थानच्या राजकीय जीवनांत कॅांग्रेस संस्था नेहमीं प्रमुख राहिली. कॅांग्रेसचें पुढारीपण ज्याला लाभे, त्याच्या हातीं

खरोखरच देशाच्या राजकीय जीवनाचीं सूत्रें येत. गोखले किंवा टिळक यांच्या हातीं तीं कॉंग्रेसच्या नेतृत्वामार्फतच आलीं. गोखले-टिळकांनंतर गांधींचें युग सुरू झालें. म्हणजे कॉंग्रेसनें गांधींचें पुढारीपण पत्करलें. गांधींच्या प्रभावाखालीं कॉंग्रेस वाढली, बलशाली झाली; व स्वातंत्र्याच्या चळवळी तिनें त्यांच्याच नेतृत्वाखालीं केल्या. शेवटपर्यंत ती गांधींच्या छापेंतच राहिली. गोखले व टिळक यांचे परांजपे-केळकरांसारखे मुख्य महाराष्ट्रीय अनुयायी गांधींना मिळाले नाहींत. साहजिकच कॉंग्रेसमध्यें त्यांना प्रमुखपद मिळू शकलें नाहीं आणि कॉंग्रेसबाहेर त्याला अवसरच नव्हता. अशा रीतीनें महाराष्ट्रीय पुढारी हिंदी राजकारणाच्या क्षेत्रांत मागें पडलेले दिसतात.

आतां महाराष्ट्रीय पुढाऱ्यांना गांधींचें अनुयायित्व कां संपादन करतां आलें नाहीं, असा प्रश्न आहे. महाराष्ट्राची प्रकृति बुद्धिवादी आहे. विचारस्वातंत्र्याकडे त्याची प्रवृत्ति ओढ घेते. एखाद्या वस्तूवर चटकन् श्रद्धा ठेवून तिच्यामागें जाणें महाराष्ट्राला साधत नाहीं. कारण महाराष्ट्राच्या स्वभावाला अशी श्रद्धा मानवत नाहीं. इतर प्रांत महाराष्ट्राहून या बाबतींत भिन्न असावेत. ते श्रद्धावान् असतील. त्यांनीं गांधींचें अनुयायित्व श्रद्धेनें मान्य केलें. तथापि महाराष्ट्राच्या बुद्धीला गांधींचें तत्त्वज्ञान व राजकारण नीटसें पटलें नाहीं. त्यांचा अहिंसावाद व असहकारवाद महाराष्ट्राला पूर्णपणें पटले नाहींत. चरख्यावर आधारलेल्या आर्थिक कार्यक्रमाची देखील तीच गोष्ट आहे. बुद्धीला या गोष्टी पटल्या नाहींत, म्हणून महाराष्ट्रानें त्या श्रद्धेनें मान्य केल्या नाहींत. आणि या बुद्धिनिष्ठेमध्यें त्याचें मागासलेपण आहे असें मला वाटत नाहीं.

## पैशाला राजकीय आकांक्षा

राजकीय क्षेत्रांतील मागासलेपणाचा आणखी एक अर्थ लागतो. आपलें पहिलें राजकारण प्रगत होत असतां, हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांची वाढ झालेली होती. प्रथम हे हिंदी भांडवलदार राजकीय सभा-परिषदांना मदत करीत वा सहानुभूति दाखवीत; तथापि ते स्वतः राजकारणांत पडले नव्हते. राजकारणाचें धोरण ठरविण्यांत ते आपलें वजन पाडीत नसत. पुढें राजकारण वाढलें. त्याला पैशाची जरूर वाटूं लागली; त्याचप्रमाणें राजकारणाचीं सूत्रें आपल्या हातीं राहणें भांडवलदारांनाहि अगत्याचें वाटूं लागलें. अर्थातच राजकीय पुढारीपण पैसेवाल्या प्रान्तांकडे गेलें. पैशाला राजकीय आकांक्षा आली, अशा या काळांत दरिद्री महाराष्ट्र मागें पडला तर आश्चर्य वाटावयाला नको.

## भांडवलदार निर्मिणें हा उपाय नव्हे

दारिद्री लोकांचें पुढारीपण मात्र महाराष्ट्राच्या हातीं राहिलें. आणि महाराष्ट्रांतच नव्हे, तर देशांत अशा दारिद्री लोकांनाच बहुजनसमाज बनलेला आहे. देशाचें खरें स्वरूप तेंच होय; व या समाजाचें राजकारण तेंच देशाचें खरें राजकारण होय. तें चालविणाऱ्या चळवळींच्या अग्रभागीं महाराष्ट्रीय आहेत. आणि आज जरी ट्रेड युनियन चळवळीसारख्या चळवळींतील राजकीय रूपाची जाणीव पुरेशी होत नसली, व त्यांतील पुढारीपणाला पुरेशी मान्यता नसली, तरी उद्यांचें खरें राजकारण हेंच आहे आणि त्यांतील पुढारीपण हेंच उद्याचें खरें पुढारीपण आहे. म्हणूनच महाराष्ट्रांत भांडवलदार, कारखानदार निर्माण केले कीं, महाराष्ट्राचा प्रश्न सुटला असें मला वाटत नाहीं. भांडवलशाही ही नाहींशी होणारी गोष्ट आहे. इतर प्रांतांत मोठे भांडवलदार आहेत व महाराष्ट्रांत ते नाहींत यामुळें मला वाईट वाटत नाहीं. भांडवलशाहीबाबत महाराष्ट्रानें कोणत्याहि प्रांताशीं स्पर्धा करूं नये असें मला वाटतें; त्यात प्रगति नसून परागतीच होईल. त्याऐवजीं सहकारी चळवळ महाराष्ट्रांत जोरावली आणि त्या तत्त्वावर महाराष्ट्रांतील उद्योगधंदे व व्यापार यांची संघटना झाली, तर त्यांत उद्योगधंदे व व्यापार यांची प्रगति तर होईलच, परंतु महाराष्ट्राचें सर्व काळ हित होईल असें मला वाटतें.

तथापि तूर्त बहुजनसमाजाचा प्रश्न महाराष्ट्रासंबंधीं विचार करणाऱ्यांपुढें नाहीं. त्यांच्या पुढें सुशिक्षित, पुढारलेला वर्ग व त्याचे प्रश्न आहेत, या वर्गाचें काय व्हावयाचें व या वर्गानें काय केलें पाहिजे, असा विचार विचारवंत करीत आहेत. तेव्हां या महाराष्ट्रासंबंधींचें माझें म्हणणें सांगतों.

## लोकशिक्षणाचें कार्य सर्वांचें

मला असें वाटतें कीं, यापुढील समाजरचना समाजवादी होणें अपरिहार्य आहे, ही गोष्ट सर्वांनीं ओळखली पाहिजे. याबाबत श्री. गोरे सर्व विचारवंतांचें एकमत आहे असें जें म्हणतात तें मला मान्य आहे. समाजवादाच्या स्थापनेच्या कार्यांत महाराष्ट्रानें प्रमुखपणें भाग घ्यावा, हें त्यांचें मतहि बरोबर आहे. हें कार्य कसें करावयाचें? आणि महाराष्ट्रांतील आज मागें पडलेल्या शिक्षित बुद्धिमान वर्गानें त्यांत कोणता भाग घ्यावयाचा? मला असें वाटतें कीं, पक्षनिष्ठांना जसें यांत स्थान आहे, तसें पक्षातीत कार्यकर्त्यांनाहि आहे. समाजवादी समाजरचनेच्या स्थापनेचें ध्येय ज्यांना मान्य आहे, अशा सर्वांना पक्षभेदरहित समाजवादाला अनुकूल असें लोकजागृतीचें व लोकशिक्षणाचें कार्य करतां येईल. त्यासाठीं उदार वृत्ति बाणवली पाहिजे. मूलभूत तत्त्वाला मान्यता असल्यावर, परस्परांतील साधनाबाबतचे भेद विसरून सहकार्य करण्याची संवय लावून घेतली पाहिजे. दृष्टि व्यापक केली पाहिजे. उदाहरणार्थ, शेतकरी–कामगार चळवळ प्राधान्यानें अब्राह्मणांचीच असली तरी म्हणून तिच्यांत जातीयता आहे असें मानतां कामा नये. मी स्वत: तशी ती केव्हां मानली नाहीं. त्याचप्रमाणें शेतकरी कामगार पक्ष किंवा शेडयूल्ड कास्ट फेडरेशन यांच्या चळवळीलाहि नेहमीं 'जातीय' 'जातीय' म्हणून धिक्कारून चालणार नाहीं; त्या त्या वर्गांतील जागृतीकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे, असें मला वाटतें. प्रागतिक हे नेहमींच उदार वृत्तीचे राहिले. ते समाजवादी लोकशाहीला मान्यता देणारेहि राहिले. ना. गोखल्यांनीं माझ्या कामगार सेवेच्या कार्याविषयीं नेहमीं सहानुभूति बाळगली. तेव्हां समाजवादी, बहुजनसमाजवादी, शेडयूल्ड कास्ट फेडरेशन, इत्यादि, अंतिम समाजव्यवस्थेचें एकच स्वरूप मानणाऱ्या, पक्षांतील लोकांनीं एकत्र यावें आणि लोकशिक्षणाचें कार्य करावें, असें माझें मत आहे. रूढ समाजस्थितीचें स्वरूप लोकांना सांगावें, त्यांतील दोष उघड करावे, त्याचीं कारणें समजावून द्यावींत व आदर्श समाजरचनेचें चित्र त्यांना दाखवावें, आणि अशा रीतीनें त्या आदर्श समाजवादी समाजाच्या स्थापनेस त्यांची मनोभूमिका तयार करावी.

## सहकारी चळवळ पुन्हां करावी

या लोकजागृतीच्या कार्याबरोबरच, विधायक समाजकार्यहि व्हावयाला हवें. गेल्या कांहीं वर्षांत देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीचें राजकारण प्रमुखपद पावलें; आणि हीं सामाजिक कार्यें मागें पडलीं. वस्तुत: महाराष्ट्रामध्यें या कामाची परंपरा जुनी आहे. अण्णासाहेब कर्वे यांचें स्त्रीशिक्षणाचें कार्य, कै. देवधरांचें सेवासदनाचें व सहकारी चळवळीचें कार्य अशा कार्यांचें महत्त्व मोठें आहे. तें मध्यंतरीं मागें पडलें खरें, तथापि स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर त्याची आवश्यकता वाढली आहे व त्याची वेळहि फिरून आली आहे. समाजसेवेच्या या कार्याचें क्षेत्र व्यापक असावें. त्यांत पक्षभेद नसावे. साक्षरताप्रसार, शारीरिक शिक्षण, दारिद्र्यनिवारण, जातिभेदनिर्मूलन, अस्पृश्यतानिवारण अशीं कितीतरी कामें करावयाचीं आहेत. सर्वांनींच तीं जोरानें करावयास लागलें पाहिजे. मला सहकारी चळवळ अतिशय मोलाची वाटते. या क्षेत्रांत महाराष्ट्रांत कै. गोपाळराव देवधरांनीं मोठें कार्य केलें. ती फिरून सुरू व्हावी, तिला जोर चढावा, संपूर्ण महाराष्ट्र तर तिनें व्यापावाच, पण अवघ्या देशांतच ती वाढावी असें मला वाटतें. माझा सहकारी चळवळीवर मोठा विश्वास आहे. समाजवाद व सहकारी चळवळ हीं एकदम जन्माला आलीं व एकदमच वाढलीं. त्यांच्यामागें एकच तत्त्व असून, त्यांत साम्यही फार आहे.

तेव्हां समाजवादाच्या प्रस्थापनेच्या दृष्टीनें ही चळवळ जोरावणें इष्ट आहे. ती चळवळ म्हणजे समाजवादाचें शिक्षण व समाजवादाचा आचारच होय. तेव्हां महाराष्ट्रांत सहकारी चळवळ फोफावली पाहिजे असें मला वाटतें.

हीं सर्व विधायक कार्यें करणें जसें सरकारचें कर्तव्य आहे, तसेंच तीं लोकांनींहि केलीं पाहिजेत. लोकांनीं तीं केलीं, तर त्याचा परिणाम सरकारवर मोठा होईल. लोकजागृति व विधायक कार्यें याचा सरकारवर अंकुशासारखा परिणाम होतो. मात्र या सर्व कार्यांमध्यें निश्चित योजना हवी; पेशवाई भोंगळपणा असू नये. असें परिणामकारक कार्य जर उभें राहिलें, तर महाराष्ट्रांतील आज पुढारलेल्या व मागासलेल्या अशा सर्वच वर्गांचे प्रश्न सुटतील. इतकेंच नव्हे, तर देशाचेंहि त्यांत हितच होणार आहे.

## निकरानें कार्याला लागा

महाराष्ट्रांतील सर्व विचारी माणसांनीं याच कार्याला जोरानें, श्रद्धेनें व निकरानें लागावें असें मला वाटतें. दारिद्र्य नाहींसें व्हावें, विषमता संपावी, जातीयतेचा निरास व्हावा, अशा तळमळींतून निर्माण झालेल्या चळवळीला माणसें जरूर मिळतात. माझा अनुभव तसा आहे. कार्य चांगलें असलें कीं, कार्यकर्ते लाभतात आणि यशही येतें. सत्तारूढ कॉंग्रेसचे लोक या कामांमध्यें सहाजिकच लक्ष कमी घालतील, पण बाकीच्यांना तर हें क्षेत्र मोकळेंच आहे.त्यांनीं या कार्याला सर्व भेद विसरून सर्वस्वीं जुंपून घेतलें पाहिजे. दुसऱ्यानें आपली कुचंबणा केली, ही समजूत भ्रमक आहे. सरकारला आपलें कर्तव्य करण्यास प्रवृत्त करण्याचा जोराचा प्रयत्न करावा. परंतु सरकार करीत नाहीं म्हणून स्वस्थ बसणें ही नाकर्तेपणाची वृत्तीही चुकीची आहे. संयुक्त महाराष्ट्रासारख्या साधनरूप प्रश्नांकडेहि सर्वस्व गुंतवून टाकणें इष्ट नाहीं. मला ती मागणी मान्य आहे; तथापि ती चळवळ फार मोठी केली तर त्यांत घोटाळे माजतील. लोकशाहीचें भाषावार प्रांतरचना हें एक साधन आहे; तें कांहीं साध्य नव्हे. त्यांतून लोकशाही मिळेल, तिचें पोषण होईल हें खरें; पण त्या प्रश्नाला वाजवीपेक्षां जास्त महत्त्व देऊन आपलें साध्य व ध्येय यांच्याकडे दुर्लक्ष होतां कामा नये. त्यापेक्षां समाजवादासाठीं सर्व समाजाची चळवळ उभारणें अधिक मूलगामी व इष्ट आहे. त्यानें हे सर्वच प्रश्न सुटणार आहेत.

मला स्वतःला महाराष्ट्राच्या भवितव्याबद्दल निराशा वाटत नाहीं. रानडे, टिळक, गोखले यांच्यासारखे महापुरुष (giants) आज महाराष्ट्रांत नसतील, परंतु एकंदर समाजाची पातळी प्रगति पावलेली आहे असें मला निश्चयानें वाटतें. अधिकाधिक चांगलीं माणसें तयार होतांना मला दिसत आहेत. प्रस्तुत काळ संक्रमणाचा आहे. भावी समाज व्यवस्थेच्या आदर्शावर निष्ठा ठेवून, या काळांतच त्या आदर्शासाठीं कार्याची पराकाष्ठा केली, तर सर्व अडचणींचा निरास होईल व महाराष्ट्राचे व देशाचे प्रश्न सुटतील, असा मला विश्वास वाटतो.

# : १५ :

# लोकशाही समाजवादाची स्थापना, हाच उपाय

लेखक : विद्वद्रत्न डॉ. के. ल. दप्तरी

संपादक "मौज" यांस,

सा. न वि. वि. तारीख ९-२-४९ च्या मौजेंतील श्रीयुत गोरे ह्यांचें पत्र आणि ता. ९-२-४९ च्या मौजेंतील श्रीयुत जावडेकर ह्यांचें पत्र वाचून त्यांतील विषयावर माझे विचार लिहून पाठविण्याविषयीं मला आपण लिहिलें. त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. श्रीयुत गोरे व श्रीयुत जावडेकर हे चालू राजकारणाचा जितका सखोल अभ्यास करतात, तितका माझ्याकडून होत नाहीं, ह्याची जाणीव मला आहे. म्हणून मी आपली सूचना मान्य करावी किंवा नाहीं ह्याविषयीं शंकितच होतों. तथापि माझ्या विचारांचा जो कांहीं उपयोग राष्ट्रास व्हावयाचा असेल तो होवो, ह्या बुद्धीनें मी आपले विचार पुढें मांडीत आहें.

## लोकशाही समाजवाद कशाला ?

"महाराष्ट्र मागें पडला, म्हणून पुढें येण्याकरितां महाराष्ट्रानें लोकशाही समाजवादी भारत निर्माण करण्याचें कार्य हातीं घ्यावें" असा दोघांच्याहि लिहिण्याचा सारांश आहे. ह्यापैकीं महाराष्ट्रानें लोकशाही समाजवादी भारत निर्माण करण्याचें कार्य हातीं घ्यावें हें मला सर्वांशीं मान्य आहे. आतां भारतांतील सर्व राष्ट्रहितैषी माणसांचें हेंच कर्तव्य आहे. पण महाराष्ट्र मागें पडला. म्हणून हें कार्य हातीं घेतों हें मात्र म्हणू नये. असा संशय देखील महाराष्ट्रीयेतरांस येऊं देऊं नये. त्यानें विनाकारणच महाराष्ट्रीयांविषयीं द्वेष निर्माण होऊन अखिल भारतांत लोकशाही समाजसत्तेच्या प्रस्थापनेच्या कार्यांत विघ्न उत्पन्न होईल. शिवाय तें कार्य करतांना महाराष्ट्र मागें पडला असें म्हणण्याची गरजहि नाहीं. लोकशाही समाजवादाच्या प्रस्थापनेस पुरेशीं दुसरीं जबरदस्त कारणें आहेतच. तीं अशीं :

आज भारत जरी स्वतंत्र झालें असलें तरी त्यांतील सर्व व्यक्ति सुखी नाहींत. दारिद्र्यानें पीडिले गेल्यामुळें बहुतेक लोक दुःखीच आहेत. दारिद्र्यामुळेंच पुष्कळ बुद्धिमान् व कर्तबगार व्यक्तींस आपला पराक्रम करून दाखविण्यास अवसर मिळत नाहीं. हें दारिद्र्य सांप्रतची अर्थव्यवस्था असेपर्यंत कायम टिकणार हें उघड आहे.

धनिकांनीं स्वखुषीनेंच आपल्या धनाचा उपयोग दरिद्र्यांच्या हिताकरितां करावा हा महात्मा गांधींचा उपदेश कोणी धनिक पूर्णपणें पाळतील असेंहि दिसत नाहीं. कारण तें सामान्य मनुष्याच्या स्वभावाविरुद्धच आहे. अशा स्थितींत लोकशाही समाजसत्तावाद शांततेच्या मार्गानें प्रस्थापित करणें हाच मार्ग दिसतो.

## बेकी निर्मूल करा !

बेकीनेंच भारताचें आजपर्यंत फार नुकसान झालें आहे. बेकीमुळेंच भारत परतंत्र झाला. आज भारत स्वतंत्र झाला असला, तरी त्यांतील बेकी नाहींशी झालेली नाहीं व तीमुळें तो पुनः परतंत्र होईल हें निश्चित आहे. हिंदु-मुसलमान वाद आज जरी उघडपणें दिसत नाहीं तरी तो हिंदुस्थान व

पाकिस्तान ह्यांमधील लढाईचे वेळीं तरी तो आविष्कृत होण्याचा संभव आहेच. प्रांताप्रांतांमधील वाद तर आतां उतास येऊं लागले आहेत. जातिजातीमधील वाद मिटले नाहींतच आणि व्यक्तिव्यक्तीमधील वाद तर प्रत्येकास धनाची हांव आहे तोंपर्यंत मिटणार नाहींतच; काळाबाजार, लांचलुचपत, कोर्टांतील भांडणें, दरोडे हे सर्व प्रकार चालू आहेतच. ह्या सर्वांच्या बुडाशीं धनाची हांव हीच गोष्ट आहे हें उघड आहे. तें सर्व धनच राष्ट्राच्या मालकीचें करावें, म्हणजेच सर्व धनच नाहींसें करावें म्हणजे हे तंटे मिटतील आणि बेकी निर्मूल होऊन भारतांत पूर्ण ऐक्य स्थापन होईल. व त्यानें भारत अत्यंत बलवान् आणि आनंदाचा अनुभव घेणारें होईल. हें घडवून आणण्याकरितां भारतांतील सर्वच शहाण्यांनीं कंबर कसावी आणि उद्योगास लागावें.

## भाषावार प्रांताची चळवळ स्थगित करावी

हें कार्य कॉंग्रेसकडूनच होईल अशी आशा कांहीं दिवसांपूर्वीं वाटत होती. पण आतां जयपूर कॉंग्रेसमध्यें Classless Democracy हें प्राप्तव्य ठरलें असलें तरी त्याविषयीं निराशा वाटते. कॉंग्रेसमधील पुष्कळसे लोक धनिकांच्या साहाय्यानेंच निवडणुकींत विजयी झालेले असल्यामुळें ते धनिकांचे मिंधे आहेत. त्यांच्याकडून हें कार्य व्हावयाचें नाहीं. पुढील निवडणुकींतही धनिक लोक कॉंग्रेसच्या लोकांनाच निवडणुकींत साहाय्य करून त्यांनाच निवडून आणतील आणि समाजसत्तावादाच्या स्थापनेस विरोध करतील हें ग्रहण करूनच आपण वागलें पाहिजे. अर्थात स्वतंत्रपणें गरीबांच्या साहाय्यानेंच पुढील निवडणुकी लढवून समाजसत्तावादाच्या स्थापनेचें कार्य घडवून आणलें पाहिजे. आणि हेंच कार्य मुख्य असल्यामुळें त्यावरच बळ एकत्रित करण्याकरितां "संयुक्त महाराष्ट्राची चळवळ" सध्यां स्थगितच केली पाहिजे, किंबहुना भाषावार प्रांतरचनेचीच चळवळ स्थगित केली पाहिजे. लोकशाही समाजसत्तावाद संपूर्ण भारतांत स्थापन झाल्यानंतर भाषावार प्रांतरचनेस कांहीं किंमतच राहाणार नाहीं. ती शासनव्यवस्थेकरितां आपोआपच येईल आणि न आली तरी त्या स्थितींत कांहींच बिघाड असणार नाहीं.

"संयुक्त महाराष्ट्राच्या" चळवळीच्याहि बुडाशीं महाराष्ट्र मागें पडला व तो पुढें नेला पाहिजे हीच कल्पना आहे. म्हणूनच त्या चळवळीस महाराष्ट्रीयतेरांचा विरोध आहे. अशा चळवळीस महाराष्ट्रियेतरांकडून मदत मिळणें असंभवनीय आहे. उलट समाजसत्तावादाच्या चळवळीस सर्व प्रांतांतून मदत मिळेल. म्हणूनच ती प्रथमतः हातीं घेतली पाहिजे.

## न्यूनगंड टाकून द्या !

महाराष्ट्र मागें पडला असें मानणें हा एक न्यूनगंडच आहे. तो प्रथमतः म. गांधींनीं चालविलेल्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत जे बुद्धिपुरस्परच मागें राहिले त्यांचेमध्येंच उत्पन्न झाला. व तो इतरांसहि अलीकडे बाधला आहे असें दिसतें. तो न्यूनगंड टाकून देऊन धडाडीनें आजचें कर्तव्य म्हणजे अखिल भारतांत समाजसत्तावादाच्या स्थापनेचें कार्य करण्यास सुरवात करावी. म्हणजे कोठेंच अटकाव होणार नाहीं. आणि अखिल भारतांत लोकशाही समाजसत्तावाद स्थापन झाल्यास पुढें नवीन असें कार्य साधावयाचें राहाणार नाहीं व पूर्ण सिद्धि प्राप्त होईल. त्या स्थितींत प्रत्येकाचें कर्तव्य राष्ट्राच्या संपत्तींत, ज्ञानांत, व बलांत भर टाकत जाणें एवढेंच कार्य शिल्लक राहील व तें हमेशाकरितांच राहील.

ह्या प्रमाणें आपल्या प्रश्नाचें यथामति उत्तर दिलें आहे. क. लो. ही. वि.

श्री. ग्रंथ संग्रहालय ... ८६३८ ...

: १६ :

# महाराष्ट्राची विकृत मनोवृत्ति

लेखक : डॉ. वा. दा. गाडगीळ

आपल्या लोकप्रिय पत्रांत 'या महाराष्ट्राचें काय होणार ?' ही जी लेखमाला आपण चालविलेली आहे, ती अत्यंत उपयुक्त आहे व आत्मपरीक्षण करणारी आहे. हें आत्मपरीक्षण फार पूर्वीच व्हावयास पाहिजे होतें. मी एक मोंगलाईत रहाणारा महाराष्ट्रीय आहें. महाराष्ट्राबद्दल व महाराष्ट्रियांबद्दल मला अतिशय अभिमान आहे, व म्हणूनच मला महाराष्ट्रियांची जी विकृत मनोवृत्ति होत आहे त्याबद्दल वाईट वाटतें. "आजचा महाराष्ट्र विचारानें गोंधळलेला, निराशेनें हतबुद्ध झालेला" इत्यादि जें श्री.गोऱ्यांनीं लिहिलें आहे, तें केवळ त्याच्या राजकीय पिच्छेहाटीसंबंधींच लिहिलेलें आहे, असें मला वाटतें. व्यापार–उदीम, शिक्षण इत्यादि संबंधांत पिच्छेहाट होत आहे असें त्यांना म्हणावयाचें नाहीं व मलाहि तसेंच वाटतें. राजकारणांत मात्र आपची खात्रीनें पिच्छेहाट झालेली झालेली आहे. व चुकीच्या दृष्टिकोनामुळें महाराष्ट्र तर्कटी बनलेला आहे, व खरोखरच मनानें दरिद्री झाला आहे! "ज्ञानाची' घमेंड, सहकारी प्रयत्नाचा अभाव, वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांच्याकडे पहाण्याची चुकीची दृष्टि" इत्यादि वर्णन महाराष्ट्राच्या सध्यांच्या राजकीय वृत्तीलाच अनुलक्षून श्री. गोऱ्यांनीं केलेलें आहे.

## दोषदर्शनाचें एकच एक कार्य

हे दोष महाराष्ट्रांत कित्येक वर्षांपासून शिरलेले आहेत. लोकमान्यांच्या मृत्यूनंतर कांहीं वर्षांनीं बुद्धिमान समजणाऱ्या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनीं 'कॉंग्रेस' सोडली. आणि पुढें कॉंग्रेसमधील दोष दाखविण्याचें एकच एक काम त्यांनीं पत्करलें ! "कॉंग्रेस महात्माजींची बटीक झालेली आहे !" हा दोषारोप करून महात्माजींच्या कांहीं मतांवरहि त्यांनीं टीकेची झोड उठवली. वस्तुत: महात्माजींचीं कांहीं मतें सामान्य बुद्धीच्या आवाक्यांत येण्यासारखीं नसल्यामुळें, कॉंग्रेस-मधील बरीच मंडळी त्यांच्याशीं सहमत नसत. प्रत्यक्ष पंडित जवाहरलाल, व सरदार पटेलहि कांहीं बाबतींत त्यांच्या मताशीं विरोधी होते. परंतु असें असूनहि ही मंडळी कॉंग्रेसला चिकटून राहिली ! महात्माजी आपलीं मतें दुसऱ्यावर लादण्याचा बळजबरी प्रयत्न करीत नसत. ह्यासंबंधीं मि. एच. एन्. ब्रेल्सफोर्ड ह्यांनीं गांधी–चरित्रांत "He never bullied, never asserted himself, never raised his voice" असे उद्गार काढलेले आहेत. असें असतां महाराष्ट्रीय बुद्धिवानांनीं कॉंग्रेस चळवळींतून आपलें अंग काढून घेण्याचें कारण नव्हतें. लोकमान्य टिळकांनीं कॉंग्रेस कधींच सोडली नसती. 'सुरते'च्या प्रसंगानंतर कॉंग्रेस-त्यागाबद्दल त्यांना पुष्कळांनीं उपदेश केला. परंतु लाजिरवाणें नेमस्तांचें 'क्रीड' अंगिकारूनहि ते कॉंग्रेसमध्यें गेले ! आणि पुढें कॉंग्रेस काबीज केली ! केळकरांनीं नेमका उलटा प्रकार केला ! 'कॉंग्रेस'

तर सोडलीच, पण तिला ते शत्रूसमान लेखूं लागले! ‘ हिंदु महासभा ’ काँग्रेसची विरोधी संस्था कधींच नव्हती, पण केळकरांनीं तींत शिरून तिला विरोधी बनविलें! महाराष्ट्राला हाच चुकीचा दृष्टिकोन लागला ! पुढें सावरकरांनींहि हीच चूक वाढवून त्याचा खिळा केला ! वस्तुतः ह्या दोन्ही व्यक्ति राष्ट्रीय वृत्तीच्या, परंतु राष्ट्राच्या मोठ्या संस्थेस विरोध करण्यासाठीं जातीय संस्थेंत शिरल्या ! आणि महाराष्ट्रीय बहुजनसमाजाला भलतेंच संकुचित वळण दिलें!

## वड्याचें तेल वांग्यावर

ब्रिटिश मुत्सद्यांना हिंदु-मुसलमानांची एकी होऊं द्यावयाची नव्हती. खिलाफत चळवळीनंतर तसे त्यांचे अटोकाट प्रयत्न चालू झाले. ह्याविरुद्ध डाव म्हणून हिंदु मुसलमानांच्या एकीला गांधींनीं अग्रस्थान दिलें. इ. स १९२२ नंतरचें हिंदुस्थानचें सर्व राजकारण ह्या दोघांच्या झटापटीचें आहे. ब्रिटिश मुत्सद्दी सत्ताधीश; मुसलमान हिंदुस्थानास स्वदेश न समजणारे धर्मवेडे! म्हणून मुस्लिम लीग बळावली व ब्रिटिशांना convenient cloak म्हणजे योग्य मुखवटा असे बॅ. जीना मिळाले ! त्यामुळें हिंदुमहासभेची कांहीं दिवस चढती दिसूं लागली. हिंदु-मुसलमानांच्या एकीशिवाय ब्रिटिशांशीं सामना देतां येणार नाहीं, व दिला तरी चिरस्थायी यश मिळणार नाहीं, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट होती. परंतु महाराष्ट्रीय बुद्धिवानांना ही महत्त्वाची बाब मोठ्या नामुष्कीची वाटूं लागली ! कारण हे बुद्धिवादी अद्यापहि आपण शिवाजी व पेशवे यांच्याच काळांत आहोंत असेंच समजत आहेत ! काँग्रेसवर व गांधींवर अगोदरच सडकून टीका होत होत्या !आतां तर काय, “मुसलमानधार्जिणे”पणाची काठी काँग्रेसला झोडपण्यास चांगलीच उपयोगांत येऊं लागली ! ह्यासंबधीं गांधींवर टीकाच काय, प्रत्यक्ष ह्यासाठींच त्यांचा खूनहि करण्यांत आला ! महाराष्ट्रीय बुद्धीचें हें चुकून भडकलेलें जहाज शेवटीं ह्या खडकावर आपटलें ! “ देशाची फाळणी काँग्रेसनें केली ! गांधींनीं केली ! ” अशा डरकाळ्या फोडून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हा द्वेष पराकाष्ठेचा माजविण्यांत आला ! ह्या बुद्धिवादी म्हणविणाऱ्यांनीं शांत डोक्यानें एवढासुद्धां विचार केला नाहीं कीं, जर ब्रिटिश मुत्सद्यांच्या मनांत फाळणी करण्याचें नसतें तर आणखी पन्नास वर्षें तरी फाळणी होऊं शकली असती काय ? फाळणी ब्रिटिशांनाच करावयाची होती ! बॅ. जीना फक्त त्यांचे हस्तक होते. ही उघड असलेली गोष्ट, जी महात्माजींना स्पष्ट दिसत होती, ती बुद्धिवादी महाराष्ट्रीयांच्या लक्ष्यांत न येण्याचीं कारणें “ चुकीचा दृष्टिकोन, तर्कटीपणा, मनानें दरिद्री, व कर्मानें बेफाम, ज्ञानाची घमेंड,वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांच्या--कडे पहाण्याची चुकीची दृष्टि ” इत्यादि जे दोष गोऱ्यांनीं दाखविले आहेत तेच त्याचीं कारणें ! काँग्रेसनें सिव्हिल वॉर थांबावी ( जी ब्रिटिशांच्या उत्तेजनानें आरंभित झाली होती ) म्हणून फाळणी कबूल केली. अनन्यगतिक होऊन कबूल केली ! ही चूक झाली असेंहि वाटलें ! परंतु जें होतें तें बऱ्याकरतांच होतें असेंच पुढें आढळून आलें ! कारण नऊ कोटींचें लोढणें गळ्यांत बांधून घेऊन देशाची प्रगति सध्यांच्या गतीनें कधींच झाली नसती. पदोपदीं मुसलमानश्रेष्ठींनीं अडविलें असतें ! आतां नऊ कोटींतून चार कोटी अंकित झाले ! व पांच कोटी वेगळे पडले, ! पाकिस्तानहि विभागलें गेलें ! अर्थात ह्यांत मुसलमानांचाच नाश झाला ! व ह्यापुढें जास्त होणार हें भविष्य आमच्या हैद्राबादच्या मुसलमानांना आतां चांगलें प्रत्ययास आलें ! हिंदुस्थानांतील मुसलमानांचीहि खात्री झाली ! “ जीना मुसलमानांचें अत्यंत नुकसान करीत आहेत ! ” असा मौ. अबुलकलाम आजाद यांनीं आरंभींच दिलेला इषारा प्रत्ययास आला ! फाळणीनंतर विश्वासघातानें अथवा पंजाबमधील धर्मवेड्या मुसलमानांना आवरणारा जबाबदार अधिकारी तेथें कोणी नसल्यामुळें हिंदूंची व शीखांची तेथें कत्तल झाली. रक्तहीन क्रांती

ईश्वरास मान्य नव्हती एवढेंच फार तर म्हणतां येईल. कॉंग्रेस नेत्यांना त्याबद्दल जबाबदार धरणें म्हणजे वड्याचें तेल वांग्यावर कढण्यासारखें असंबद्ध व खुनशी वृत्तीचें आहे. कॉंग्रेसच्या ह्या यशाबद्दल टिळक जिवंत असते तर तिला डोक्यावर घेऊन नाचले असते. त्याच यशाकडे महाराष्ट्रीय बुद्धिवादी मत्सराच्या दृष्टीनें कां पहातो? हें विष कां व कसें फैलावलें? ह्याचाहि विचार केला पाहिजे!

## महाराष्ट्राची विघडलेली अभिरुचि

महाराष्ट्रीय वाचकांची अभिरुची एका दृष्टीनें चिपळूणकरांपासूनच विघडत चालली होती. म्हणजे मराठी वाचक 'टीका' व 'टिंगल' जितक्या आवडीनें वाचतो तितकें तो दुसऱ्या प्रकारचें लिखाण वाचीत नाहीं. ह्या विकृत अभिरुचीमुळें 'टीका' अथवा 'टिंगल' असल्याशिवाय वर्तमानपत्रांचे अंक खपेनासे झाले! दोषास्पद म्हणून टीकेस पात्र हाहि धरबंध आतां राहिलेला नाहीं! सद्गुणांचीसुद्धां थट्टाच! व्यक्तिविषयक कुचाळी करण्यासुद्धां कांहीं मर्यादा पाहिजे! परंतु तीहि राहिलेली नाहीं! वर्तमानपत्री लिखाणांत शिरल्यापासून श्री. माट्यांसारखीं प्रौढ, विद्वान् माणसेंहि खुशाल पंडित जवाहरलालसारख्या वंद्य व्यक्तीचीहि हवी तशी ग्राम्य टिंगल करण्यास धजतात! महाराष्ट्राचा हा लाजिरवाणा अधःपात नव्हे काय? परंतु हेंच बुद्धिस्वातंत्र्य म्हणून उलट ह्यांत त्यांना घमेंड वाटते! असतु. हा प्रकार नाहींसा होऊन महाराष्ट्र–राजकारण शुद्ध स्वरूपांत आलें पाहिजे. शिक्षणांत महाराष्ट्र पुढें आहे व पुढें राहील. बुद्धीनें तो श्रेष्ठ आहे. ह्याबद्दलहि वाद नाहीं. परंतु पालटलेली स्थिती तो अद्याप लक्षांत घेत नाहीं! हिंदुस्थान हें एक, एकसंधी राष्ट्र झालें पाहिजे! तरच तरणोपाय आहे! हें ध्येय डोळ्यांपुढून हलतां कामा नये. हिंदुस्थान बलवान राष्ट्र व्हावयाचें म्हणजे प्रांताभिमानाला मुरड घातली पाहिजे. प्रांतद्वेष येऊं देतां कामा नये. प्रांताप्रांतातल्या मत्सराला उत्तेजन देतां कामा नये. राष्ट्रभाषेला उचलून धरलें पाहिजे! भाषावार प्रांतरचना संस्कृतिवर्धनास उपयुक्त होईल, असें प्रथमतः वाटलें होतें. परंतु ह्या पेटाऱ्याखालीं झाकलेले प्रांतद्वेषाचे व जातिद्वेषाचे नाग फुस्कारित आहेत, असें आतां दिसून आलें! 'आर. एस. एस.' च्या योगानें ब्राह्मणांनीं व, गांधीवधानंतर ब्राह्मणेतरांनीं आपली नालायकी सिद्ध केल्यानंतर "संयुक्त महाराष्ट्र" होण्यास थोडी दिरंगाई झाल्यास अथवा मुंबई महाराष्ट्रापासून कांहीं काळ वेगळी राहिल्यास असें काय ब्रह्मघातक होणार आहे कीं ज्यासाठीं "महाराष्ट्र लढेल पण मरणार नाहीं!' असें निर्वाणीचे उद्गार 'केसरी'-कारांनीं काढावेत? लढावयाचेंच असेल तर तो प्रसंग संयुक्त महाराष्ट्र होतांच ब्राह्मण-ब्राह्मणेतरांत मन्मुराद घडून येईल! महाराष्ट्रांत शिक्षणाचा प्रसार जोपर्यंत खालच्या थरापर्यंत होणार नाहीं, जोंपर्यंत विशाल एक राष्ट्रीयत्वाची दृष्टि येणार नाहीं, जोंपर्यंत सर्व हिन्दुस्थान देशाबद्दल जाज्वल्य देशाभिमान उत्पन्न होणार नाहीं, जोंपर्यंत सद्गुणावरील श्रद्धा व ध्येयाबद्दल पवित्रपणा वाटणार नाहीं, तोंपर्यंत 'संयुक्त महाराष्ट्रा'ची इच्छा करणें घातक ठरेल! व ह्या निमित्तानें रण माजविणें महामूर्खपणाचें ठरेल! कर्नाटक, केरळ, आंध्र, बंगाल, गुजराथ ह्याप्रमाणें भाषावार राक्षस उठून हिंदुस्थानचें वाल्कन झालें तर रशिया म्हणा, अथवा 'अमेरिका' म्हणा, हिंदुस्थानचा ताबा घेण्यास धांवून आलेंच समजा! म्हणून थोडा वेळ सबूर! महाराष्ट्रानें तावडतोब सोशियालिष्ट व्हावें अशी श्री. गोऱ्यांची खात्रीनें इच्छा नसावी. त्या इच्छेनें जर त्यांनीं हा लेख लिहिला असेल, तर त्यास मात्र माझा विरोध आहे. महाराष्ट्रानें पूर्ण कॉंग्रेसी व्हावें व कॉंग्रेसमधील दोष काढण्याचा प्रयत्न करावा.

: १७ :

# वेगळेपणा नको !

◆ लेखक : काका कालेलकर ◆

महाराष्ट्र मागें कां पडला ? महाराष्ट्राचें कोठें चुकतें ? महाराष्ट्रानें यापुढें काय केलें पाहिजे ? याची चर्चा सध्यां चालू आहे. ही चर्चा कांहीं नवीन नाहीं. कांहीं वर्षांपूर्वीं बनारस हिंदु युनिव्हर्सिटीच्या महाराष्ट्र मंडळानें इतर महाराष्ट्रीयांबरोबर मलाही या विषयावर व्याख्यान देण्यास बोलाविलें होतें. कर्तव्य म्हणून मी तेथें जाऊन आलों. महाराष्ट्राबाहेर दूर राहाणाऱ्या महाराष्ट्रीयांना आपलें म्हणणें पटेल, निदान त्यांचे अनुभव आपल्यास ऐकावयास मिळतील म्हणून मी तेथें गेलों होतों.

स्वराज्य मिळाल्यामुळें आणि स्वतःचा कारभार स्वतःच्या इच्छेप्रमाणें चालविण्याचा अधिकार जनतेला मिळाल्यानंतर या प्रश्नाला बरेंच व्यावहारिक महत्त्व आलें आहे.

## भाषावार प्रांतरचना : निर्दोष व निरोगी सिद्धांत

त्यांतच नागपूरच्या माडखोलकरांनीं संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू करून ती श्री. शंकरराव देवांच्या हातीं सोंपवून दिली, तेव्हांपासून महाराष्ट्राची अस्मिता बरीच जागृत झाली आहे आणि आतां विद्वान पुढाऱ्यांबरोबर जनतापक्षांच्या नेत्यांनींहि हा प्रश्न धसाला लावण्याचा निश्चय केला आहे. आणि तेव्हांपासून पुष्कळांना वाटूं लागलें आहे कीं, महाराष्ट्राला अन्याय होत आहे. महाराष्ट्रानें कडवेपणानें भांडल्याखेरीज महाराष्ट्राचें रक्षण होणार नाहीं. सर्वच शेजारी आपल्या जिवावर उठल्यासारखे दिसतात. तेव्हां वेळींच धांवाधांव केली पाहिजे.

भाषावार प्रांतरचना झाली पाहिजे, हा सिद्धांत अतिशय निर्दोष आणि निरोगी आहे. महात्मा गांधींनीं स्वतःच बत्तीस वर्षांपूर्वीं तो हिंदुस्तानापुढें मांडला होता. काँग्रेसनें तो स्वीकारलाहि; आणि तिनें स्वतःपुरती हिंदुस्तानची भाषावार प्रांतरचना होऊं दिली.

पण प्रांतरचना करण्यांत हिंदुस्तानाचे तुकडे होतां कामा नयेत. सबंध हिंदुस्तानाची राजकीय एकता इंग्रजांनीं दृढ केली होती. ती प्रजाकीय एकताहि आहे, सांस्कृतिक एकताहि आहे, अशा भ्रमांत राहून आपण भाषावार प्रांत रचण्याचा पुरस्कार करीत राहिलों. याचें पहिलें फळ म्हणजे सिंध प्रांत मुंबई इलाख्यांतून वेगळा पडला. इंग्रजांना तें इष्ट होतें. त्यामुळें मुस्लिम लीगचें तत्त्व बळावलें आणि पंजाब प्रांतांतील पश्चिमेकडील लोकांना विशेष आनंद झाला.

## तुमचाच सोटा आणि तुमचेंच कंबरडें

स्वतःच्याच तत्त्वाप्रमाणें हें सर्व झालें असल्यामुळें काँग्रेसला कांहीं बोलतां येईना. पण झालें तें चांगलेंच झालें असेंही म्हणतां येईना. तुमचाच सोटा आणि तुमचेंच कंबरडें असें म्हणून नोकरशाहीनें सिंध प्रांत वेगळा केला.

यानंतर भाषेच्या तत्त्वावर दुसरा प्रांत वेगळा पडला तो ओरिसा. आसामचेंहि कांहीं अंशीं असेंच आहे. पण त्या इतिहासांत जाण्याचें आपल्याला कारण नाहीं. याच वेळीं आंध्र प्रांत भाषेच्या दृष्टीनें वेगळा व्हावा अशी चळवळ सुरू झाली आणि त्यावर साहित्यहि लिहिलें गेलें.

'भाषा हा जनतेचा प्राण आहे. एक भाषा बोलणारे लोक एकजीव असतात. भाषानिहाय संस्कृति वेगळी पडते...' वगैरे सिद्धांत पुढें करून बंगालनें बंगभंगाची नीति हाणून पाडली. पण तेवढें केल्यानंतर लवकरच तो बंगाल झोंपीं गेला.

स्वत: उत्पन्न केलेली एकता लोकांत कितपत मुरली आहे, याची इंग्रजांना यथार्थ कल्पना असल्यामुळें त्यांनीं बंगालमध्यें हिंदु बंगाल आणि मुसलमान बंगाल अशा भेदाला प्रोत्साहन दिलें. आणि शेवटीं सिद्ध करून दिलें कीं, धर्मानें जे लोक भिन्न आहेत ते लोक भाषेनें एक असले तरी वेगळे पडूं शकतात.

पंजाबचे जे दोन भाग पडले ते तेथें पंजाबी भाषेची एकता असूनहि पडले आणि आज पूर्व पंजाबचे जे दोन भाग होऊं पहात आहेत, तेहि भाषा एक असूनहि, हें आपण विसरतां कामा नये.

## संस्कृति व भाषावार प्रांतरचना

खरें पाहतां भाषावार संस्कृतिभेद कोठेंच दिसून येत नाहीं. खरें म्हणजे, व्यापक दृष्टीनें पाहिलें तर धर्मभेद, वंशभेद, भाषाभेद आणि प्रगतिभेद असूनहि सबंध हिंदुस्थानची संस्कृति एक आहे! पण जर आत्मघातकीपणानें संस्कृतीचा अत्यंत संकुचित अर्थ करावयाचा असेल तर हिंदुस्थानांत धर्माप्रमाणें,जातीप्रमाणें आणि पेशाप्रमाणें संस्कृतिभेद दिसून येतो. तसें नसतें तर महाराष्ट्रांत मराठी बोलणारे तेवढे सगळे महाराष्ट्रीय आणि म्हणून ते सगळे एकजीव असें निरपवादपणें मनापासून आणि हृदयापासून महाराष्ट्रीयांनीं स्वीकारलें असतें आणि त्याप्रमाणें त्यांचें आचरण दिसून आलें असतें. आंध्रमधून आलेले बापूजी अणे जितके महाराष्ट्रीय, तितकेच राजस्थानमधून आलेले जाजूजी, जमनालालजी आणि बियाणीजी हेहि महाराष्ट्रीय आहेत असें सर्वांना वाटावयास पाहिजे होतें. आज हळूहळू तसें वाटावयास लागलें आहे. निदान बोलतांना आणि व्होट देतांना महाराष्ट्रीय ही गोष्ट स्वीकारूं लागले आहेत; एवढें संतोषपूर्वक कबूल केलें पाहिजे. पण राजकीय प्रगति किंवा एकता जर सामाजिक बाबतींत उतरली नाहीं, तर ती वरवरची आणि तकलादी ठरते. ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद हेंच सिद्ध करतो. खरें पाहतां भाषावार प्रान्त पाडण्याच्या मुळाशीं संस्कृतीचा आणि भाषामूलक संघटनेचा कांहींच संबंध नाहीं. देशाचे जसे सोइस्कर जिल्हे पाडतात आणि जिल्ह्याचे तालुके पाडतात, त्याचप्रमाणें लोकांच्या सोईप्रमाणें प्रान्त पाडावयाचे असतात. सबंध देशांत इंग्रजी भाषेंतून राज्य चालविण्याचें ठरविल्यानंतर इंग्रजांना या देशाचे कसेहि प्रान्त पाडतां आले. त्याचप्रमाणें आज जर हिंदुस्तानी भाषेंतूनच हिंदुस्तानचें सगळें राज्य चालवावयाचें असें ठरविण्यांत आलें, तर भाषावार प्रान्तरचना करण्याचें कांहींच कारण उरणार नाहीं. सबंध हिंदुस्तानांत उच्च शिक्षण, व्यापार, न्यायदान, वृत्तविवेचन आणि राज्यकारभार एकाच भाषेंत चालवावयाचा असें जर ठरविलें, तर एका रीतीनें स्वराज्य चालविणें वरेंच सोपें जाईल. पण त्यामुळें जनतेला डोकें वर काढणें कठीण जाईल. आणि राज्यकर्ता म्हणून विशिष्ट लोकांचीच,एक निराळी जात तयार होईल.

स्वराज्य म्हणजे सर्वराज्य—हा आदर्श आपण स्वीकारलेला आहे. आणि जनतेचा जन्मसिद्ध हकहि आपण मान्य केला आहे कीं, आपलें राज्य कसें चाललें आहे हें सामान्य मनुष्याला त्याच्या भाषाद्वारेंच कळलें पाहिजे. राज्याचा संबंध जेथें जेथें प्रजेशीं येतो, तेथें तेथें प्रजेची भाषाच वापरली जावी हें स्वराज्याचें एक आवश्यक लक्षण आहे.

पण याचा अर्थ असा होत नाहीं कीं भिन्न भाषी लोक एकत्र नांदूंच शकत नाहींत. ज्या

लोकांचे धर्म भिन्न आहेत, ज्यांचे कायदेहि भिन्न आहेत, असे लोक आपल्या देशांत आजवर गुण्या-गोविंदानें नांदले आहेत. गुलामीच्या दिवसांत जे सद्‌गुण आपण दाखवूं शकलों ते स्वराज्य-प्राप्तीच्या शुभ मुहूर्तीं मावळून जावे, हें दुःखकारक व आश्चर्यकारक नव्हे काय ?

## महाराष्ट्रीयांचा न्यूनगंड

महाराष्ट्र जर मागें पडला असेल, तर त्याचें कारण महाराष्ट्रानें इतर लोकांशीं मिळून मिसळून वागण्याची आपली शक्ति बरीचशी घालवली आहे, हें होय. महाराष्ट्री लोक परप्रांतांत गेले तर इतरांशीं न मिसळूं शकल्यानें स्वतःचीच टोळी करून राहतात ! एक प्रकारची स्वाभिमानी वृत्ति असल्यामुळें आणि मिसळण्याची कला पुरेशी अवगत नसल्यामुळें जेथें तेथें त्यांना शंका येते कीं 'आपला अपमान होतो, आपली हेळसांड होते ! आपल्याला डावललें जातें !' अशा प्रकारचा न्यूनगंड एकदां उत्पन्न झाला म्हणजे स्वाभिमानाचा पारा बेसुमार वाढू लागतो व त्यामुळें मनुष्य स्वतःची योग्यता वाढविण्याच्या संधी देखील घालवून बसतो ! आणि मग खरोखरच लोक अशा मनुष्याला टाळूं पाहतात !

कोणच्याहि समाजांत कित्येक लोक असे असावयाचेच कीं ज्यांना सर्वत्र मिसळतां येतें ! अशांची मनोवृत्ति निराळी असते ! त्यांची जीवनदृष्टि स्वाभाविकपणें व्यापक असते ! घरकोंबड्या लोकांना त्यांची व्यापक दृष्टी पटत नाहीं ! आणि मग त्यांची प्रतिष्ठा कमी करण्यासाठीं ते त्यांना परधार्जिणे म्हणतात !

व्यापक दृष्टीच्या सेवकांना परधार्जिणे म्हणून त्यांचा पाणउतारा करणें आणि त्यांचें पुढारीपण हाणून पाडणें हें अधिकारलालसेच्या दिवसांत फारच सोपें जातें. व्यापारामुळें ज्यांना अनेक प्रान्तांत जाऊन रहावें लागतें आणि दळणवळण वाढविण्याची ज्यांना संवय असते, अशा सर्व-समाजी लोकांना व्यापक दृष्टीच्या स्वकीयांची सल्ला लवकर पटते. ज्यांना बाहेर जाऊन राहण्याची संवय नाहीं अशा लोकांचें पुढारीपण करूं पाहणारे लोक केव्हां केव्हां त्यांच्या संकुचित दृष्टीला पटेल असेंच धोरण त्यांच्यापुढें मांडतात; एवढ्यानें भागलें नाहीं, तर लहान लहान गट उत्पन्न करून त्यांचे पुढारी बनण्यासाठीं त्यांना सांगितलें जातें कीं 'तुम्हीं आहांत भोळे, उदारतेच्या नादीं लागून सर्वस्व घालवून बसतां. जगांत सर्वत्र धूर्त लोक पसरलेले आहेत. जो तो आपल्याच पोळीवर तूप ओढीत असतो.' आनंदीबाईनें राघोबाला हीच सल्ला दिली होती. व्यापक दृष्टीच्या पुढाऱ्याचा पाणउतारा करावा, तेवढ्यानें न भागलें तर त्याचा खून करावा. हें संकुचित दृष्टीच्या राजकारणाचें सनातन व्याकरण आहे.

## अदूरदृष्टि, अल्पनिष्ठा आणि रागद्वेष

महाराष्ट्रानें जेव्हां जेव्हां युगधर्म ओळखून व्यापक विचार केला आहे, तेव्हा तेव्हां महाराष्ट्र पुढें आला आहे. जेव्हां जेव्हां महाराष्ट्रानें स्वतः-पुरता, एखाद्या जातीपुरता, वर्गापुरता, कुटुंबा-पुरता किंवा कुटुंबद्रोह करून स्वतःपुरता विचार केला आहे, तेव्हां तेव्हां महाराष्ट्र मागें पडला आहे आणि त्याची अवनति झाली आहे. महाराष्ट्रांतील संतांनीं महाराष्ट्रापुढें संकुचित दृष्टि कधींच ठेवली नाहीं. शिवाजी महाराजांनीं त्यांच्या काळाला योग्य अशी व्यापक दृष्टि ठेवली होती. रानडे, टिळक वगैरे महाराष्ट्रीयांमध्यें ज्या मानानें व्यापक दृष्टि होती त्या मानानें त्यांनीं महाराष्ट्राला पुढें आणलें. आज महाराष्ट्रांत जे लोक व्यापक दृष्टीनें विचार करतात, त्यांना हिंदुस्थानांत मान आहे आणि महाराष्ट्रातील संकुचित वृत्तीचे लोक त्यांचें पुढारीपण ढिलें करण्यासाठीं, त्यांना परधार्जिणे म्हणून, ते दुसऱ्यांच्या आहारीं गेले आहेत, असें सिद्ध करूं पाहतात. अदूरदृष्टि, अल्पनिष्ठ आणि रागद्वेषानें प्रेरित अशा सल्ल्याची महाराष्ट्र कदर करूं शकतो, येथेंच महाराष्ट्राचें चुकलेलें आहे. व्यापक दृष्टीनें ज्यांना विचार करतां येतो, अशा महाराष्ट्रीयांनीं एकत्र येऊन महाराष्ट्राला समजावून सांगितलें पाहिजे कीं, सर्व

देशाच्या हितांतच महाराष्ट्राचें हित समावलेलें आहे.

## स्वकीयांच्या स्वाभाविक आकांक्षा

एकाकाळीं महाराष्ट्रीयांना तंजावर, बडोदा, इंदोर, ग्वाल्हेर, धार, बनारस, नेपाळ वगैरे ठिकाणीं जाऊन स्वतःच्या कर्तबगारीनें व्यापक दृष्टि कमावता येत होती. पण राज्यकर्त्यांची जात म्हणून मिरविल्यामुळें कित्येक ठिकाणचें त्यांचें स्थान डळमळीत झालें. विद्वत्तेच्या अभिमानानें देखील कित्येक ठिकाणीं महाराष्ट्रीयांनीं स्वतःचें स्थान घालविलें. इंग्रजी राज्य सुरू झालें तेव्हां कित्येक महाराष्ट्रीयांनीं सिंध, गुजरात, कर्नाटक वगैरे प्रान्तांत चांगलें नांव मिळविलें. पण त्यांना तेथें स्वतःचें स्थान टिकवतां आलें नाहीं. आतां जर आपण चिडून जाऊन म्हणूं, कीं 'आमच्या महाराष्ट्रांत आम्हींच राहूं, इतरांना नांदूं देणार नाहीं–'तर तें कितपत योग्य होईल आणि कितपत साधेल, याविषयीं मला शंका आहे. महाराष्ट्रीयांनीं महाराष्ट्रांतच राहावें अशी स्थिति उत्पन्न करणें फारसें कठीण नाहीं. पण त्यामुळें महाराष्ट्राची शक्ति वाढेल असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. हिंदुस्तान हा हिन्दुस्तानांतील सगळ्या लोकांचा आहे, सर्व लोकांना सर्व प्रांतांत जाण्यायेण्याची, राहण्यानांदण्याची मुभा असली पाहिजे. हा कल्याणकारी सिद्धांत सर्वांनीं स्वीकारला पाहिजे. अन्य प्रांतांतील अन्यभाषी लोक महाराष्ट्रांत येऊन राहिले तर ते स्वाभाविकपणें मराठी शिकून महाराष्ट्रीय होतील. आपण दुसऱ्या प्रांतांत जाऊन राहिलों तर आपणहि तिकडचे होऊन राहिलेले चांगले; पण प्रांतांत गेलें तरी आपली मराठी भाषा टिकावी, आपल्या मुलांना, शक्य झाल्यास, प्राथमिक शिक्षण मराठींतून मिळावें असें जसें आपणाला वाटतें, तसेंच इतरांना देखील महाराष्ट्रांत येऊन राहिल्यानंतर, स्वतःची भाषा टिकावी, स्वतःच्या मुलांची विशिष्ट प्रकारची सोय व्हावी असें स्वाभाविकपणें वाटतें. मुसलमानांच्या फुटीर वृत्तीमुळें लोक इतके घाबरून गेले आहेत कीं त्यांना स्वकीयांच्या स्वाभाविक आकांक्षा देखील फुटीरवृत्तीच्या द्योतक वाटूं लागलेल्या आहेत. आणि त्यामुळें इतरांच्या फुटीर वृत्तीचा बंदोबस्त करण्यासाठीं स्वतः देखील फुटीर वृत्ति कमाविली पाहिजे असें वाटण्यापर्यंत मजल गेली आहे.

## भलत्याच वेळीं भलताच प्रश्न

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा मुख्य भाग म्हणजे विदर्भाला बाकीच्या महाराष्ट्राशीं एकजीव करणें हा होय. दक्षिण हैद्राबादेंतील मराठवाडा महाराष्ट्रांत आणणें हें देखील इतकेंच महत्त्वाचें काम आहे. त्यासाठीं लोकमत तयार करण्याची जरूर नाहीं. त्यासाठीं फक्त राजकीय पंचांगांतून अमृतसिद्धी योगाचा मुहूर्तच शोधून काढला पाहिजे. या सर्व गोष्टी बाजूला ठेऊन महाराष्ट्रानें मुंबईचा आणि गोव्याचा प्रश्न मोठ्या हिरीरीनें हातीं घेतला आहे. भलत्याच वेळीं भलताच प्रश्न हातीं घेतल्यानें कार्यभागाचा विचका होतो, हें आपण ध्यानीं घ्यावयास पाहिजे होतें. मुंबईचाच प्रश्न घ्या.

सध्यां मुंबई महाराष्ट्रांतच आहे. मुंबईंत महाराष्ट्राची कोठेंच गळचेपी झालेली नाहीं. पंतप्रधानाच्या जागीं महाराष्ट्रीय येऊं शकतो. युनिव्हर्सिटीचा व्हाईस चॅन्सलर महाराष्ट्रीय नेमला जातो. कॉर्पोरेशनमध्यें मेयरचें स्थान महाराष्ट्रीयाला मिळूं शकतें. अशा प्रकारची संतोषकारक स्थिति असतांना मुंबईचा प्रश्नच कां उठविला जातो हें समजत नाहीं.

विभक्त महाराष्ट्राचे सर्व तुकडे एकत्र व्हावे अशी इच्छा महाराष्ट्राला असणें स्वाभाविक आहे. तें आवश्यकच आहे असें जरी सिद्ध झालें नाहीं, तरी त्यांत अनुचित असें कांहींच नाहीं. गुजराती बोलणारे लोक एकत्र यावेत अशी गुजरात्यांनीं इच्छा केली तर तीहि चुकीची नाहीं. पण महाराष्ट्र आणि गुजरात हे विभक्त झालेच पाहिजेत अशी चळवळ आपण कां म्हणून करावी? संयुक्त महाराष्ट्राची चळवळ गुजराथ–महाराष्ट्राच्या एकीकर-

णाच्या विरुद्ध कां जावी हें समजत नाहीं. गुजरातनें प्राचीन काळीं महाराष्ट्रावर राज्य केलें आहे. महाराष्ट्रानें गुजरातवर राज्य केलें आहे. दोघांना एकमेकांचा परिचय आहे. कर्तबगारीच्या बाबतींत महाराष्ट्र आणि गुजरात तुल्यबळ आहेत एवढेंच नव्हे तर परस्परपोषकहि आहेत. आपण एकत्र राहिलों तर गुजरात आपल्याला खाऊन जाईल, आपण गुजरातच्या आहारीं जाऊं, असें महाराष्ट्राला कां वाटावें? तो न्यूनगंड आहे. न्यूनगंडानें घेतलेल्या लोकांकडे जो प्रांत स्वतःचें पुढारीपण सोंपवितो, तो प्रांत स्वतःची कर्तबगारी खच्ची करतो. खरें पाहिलें तर महाराष्ट्रीय आणि गुजराती हे दोन्ही समाज एकजीव होण्यासारखे आहेत. राहणी, करणी, विचारसरणी इत्यादि बाबतींत दोन्ही समाज इतके कांहीं परस्परानुकूल आहेत कीं, त्यांना एकजीव होऊं न देणें हा आत्माघातीपणाचाच एक प्रकार आहे.

## गुजरात–महाराष्ट्र एकीकरण

महाराष्ट्रांतून जातीभेद आणि उच्चनीच भाव यांचें विष अजून गेलेलें नाहीं. म्हणूनच गुजरात-महाराष्ट्राच्या एकीकरणाची कल्पना महाराष्ट्राच्या डोक्यांत अजून शिरत नाहीं, हृदयाला मानवत नाहीं. रूढी आणि आत्मप्रौढी यांचे दास बनलेल्या ब्राह्मणांना व्यापक एकीकरणाची कल्पना जर पटणार नाहीं तर त्याचें आश्चर्य वाटावयास नको. पण ब्राह्मणेतरानीं संकुचित दृष्टि कां धारण करावी हें समजत नाहीं. राजकारण, धर्मकारण आणि समाजकारण यांचा सराव नसलेल्या लोकांनीं बुजून जावें यांत आश्चर्य नाहीं. पण ज्यांना भविष्यकाळचा प्रवाह स्पष्ट दिसतो, जे रूढीचे दास नाहींत आणि जे भविष्यकाळांत नवीन नवीन प्रयोग करण्याइतके हृदयसमर्थ आहेत त्यांनीं महाराष्ट्राला योग्य दिशा दाखविली पाहिजे.

समस्त महाराष्ट्राचें एकीकरण करावयाचें असेल तर अवश्य करा. तो आंतरिक प्रश्न आहे. बाहेरचे लोक त्याचा विरोध करणार नाहींत, करूं शकणार नाहींत. पण इंग्लंड आणि स्कॉटलंडचें एकीकरण जसें त्या लोकांनीं प्रयत्नपूर्वक घडवून आणलें, त्याचप्रमाणें महाराष्ट्र–गुजरातचें एकीकरण आपोआप घडून येत असतांना आत्मघातीपणानें आपण त्याला विरोध कां म्हणून करावा ? मराठी आणि गुजराती या दोन्ही भाषा एकमेकींना इतक्या जवळ आहेत कीं मुंबईंत प्रत्येकाला या दोन्ही भाषा कमी अधिक समजतातच. इंग्रजीचें विघ्न मध्यें नसतें तर या दोन्हीं भाषा एव्हांना कितीतरी जवळ आल्या असत्या. आतां इंग्रज गेले! इंग्रजीचें महत्त्व घटलें. यापुढें आपला राज्यकारभार फार दिवस इंग्रजींतून चालणार नाहीं ! अशा वेळीं जर महाराष्ट्र आणि गुजरात हे दोन्ही समाज गुण्यागोविंदानें एकजीव झाले तर त्यांत महाराष्ट्राचा सर्व बाजूंनीं फायदाच आहे. कर्तबगारीच्या बाबतींत ज्यांना आत्मविश्वास नसेल त्यांनीं महाराष्ट्राचा बुद्धिभेद करण्याच्या ऐवजीं स्वतःची कर्तबगारी वाढवावी. आणि ज्यांना महाराष्ट्र–गुजरातचें एकीकरण पटत आहे त्यानीं पुढें येऊन, महाराष्ट्र-गुजरातच्या एकीकरणाच्या द्वारा समस्त महाराष्ट्राचें एकीकरण सलोख्यानें आणि सामर्थ्यानें करून दाखवावें. सबंध गुजराथ आणि सबंध महाराष्ट्र एकत्र होऊन देखील तो प्रान्त युक्त प्रांताहून मोठा होईल असें नाहीं. राज्यकारभार उत्तरेकडे गुजरातींत, दक्षिणेकडे मराठींत आणि मुंबईमध्यें दोन्हीं भाषांच्या मदतीला राष्ट्रभाषा घेऊन, उत्तम रीतीनें चालू शकेल. स्वराज्यामध्यें स्थानिक स्वराज्याला अधिकाधिक वाव असणारच. अशा स्थितींत सौराष्ट्रापासून विदर्भापर्यंत पसरलेला पश्चिम प्रान्त कारभार चालविण्यास अवजड होईल असें मानण्याचें कांहींच कारण नाहीं. अशा प्रकारचा प्रयोग करण्यांत महाराष्ट्राचें कांहींच नुकसान नाहीं.

तेव्हां आपण गुजरातला विभक्त न करतां विदर्भाला जोडून घेण्याचा प्रयत्न कां करूं नये ?

: १८ :

# सत्तेचें राजकारण सोडलें तरच तरणोपाय !

लेखक : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

श्री. ना. ग. गोरे यांनीं 'महाराष्ट्राच्या भवितव्याबद्दल प्रश्न उपस्थित करून महाराष्ट्राच्या अनेक विचारकांना आत्मपरीक्षणास प्रवृत्त केलें आहे. या चर्चेतून दोन गोष्टी बाहेर येतील. एक, महाराष्ट्राच्या सद्यःस्थितीचा आढावा आणि दुसरी, महाराष्ट्रांतील कांहीं प्रमुख व्यक्तींच्या मानसिक घटनेचें प्रत्यंतर. ना. म. जोशी, दादासाहेब मावळंकर, अण्णासाहेब कर्वे, काकासाहेब कालेलकर इत्यादिकांच्या चिकित्सेंत त्यांच्या व्यक्तित्वाचे नमुने मिळतात. या व्यक्तींचा आयुष्यक्रम ज्यांच्या परिचयाचा आहे, त्यांना प्रस्तुत विषयावर ते काय लिहितील याचा साधारण अंदाज अगोदरच करतां येईल. त्यांचें व्यक्तित्व अगदीं ठसठशीतपणें त्यांच्या लेखनांत प्रतीत होतें.

ज्यांचें व्यक्तित्व अजून निश्चित आकाराला आलें नाहीं किंवा ज्यांचें व्यक्तित्व विविध आभास निर्माण करतें अशा व्यक्ति महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनांत क्वचितच आढळतात.

## प्रगति-परागतीच्या तीन कसोट्या

'महाराष्ट्राची पिछेहाट होत आहे' या विधानांतील 'पिछेहाट' ही कल्पना सापेक्ष आहे. कोणाच्या किंवा कशाच्या अपेक्षेनें महाराष्ट्र मागें पडत आहे, याचें उत्तर काढलें पाहिजे. प्रगति वा परागति हें ठरविण्यास प्राधान्य ध्येय गृहीत धरावें लागतें. कोणतें ध्येय ध्यानांत धरून महाराष्ट्राची प्रगति अथवा परागति ठरवावयाची ? इतिहासांत प्रगति व परागति ठरविण्याच्या तीन कसोट्या इतिहासकारांनीं दाखविलेल्या आढळतात; त्या म्हणजे राज्यसत्ता, भौतिक सुधारणा आणि मानसिक संस्कृति या होत. ( मानसिक संस्कृति म्हणजे धर्म, नीति, कायदा, वाङ्मय ललितकला, विज्ञान, तत्त्वज्ञान इत्यादि होय. ) त्यापैकीं सत्तेच्या राजकारणांत म्हणजे राज्यसंस्थेवर कबजा ठेवण्याच्या किंवा वाढविण्याच्या राजकारणांत महाराष्ट्राला दुय्यम स्थान प्राप्त झालें आहे; ही गोष्ट अगदीं उघड आहे. परंतु या बाबतींत इतर कोणताहि प्रांत 'प्रांत' या नात्यानें महाराष्ट्राच्या पुढें नाहीं. पंडित नेहरू संयुक्त प्रांताचे नेते म्हणून हिंदुस्थानचें सत्तेचें राजकारण चालवीत नाहींत; किंवा पंडित नेहरू यांचें व्यक्ति-श्रेष्ठत्व अथवा राज्य-धुरंधुरत्व संयुक्त प्रांताच्या राजकीय सामर्थ्यांत भर घालीत नाहीं. जी गोष्ट पंडित नेहरूंची तीच वल्लभभाईंची. सरदार वल्लभभाईंचा राजकीय दरारा गुजराथच्या राजकीय दर्जाला फारसें वर आणीत नाहीं. सरदार वल्लभभाईंचा पुढारीपणा म्हणजे गुजराथचा पुढारीपणा नव्हे. परंतु एवढें मात्र खरें कीं गुजराथला राजकीय दृष्टीनें वल्लभभाईंचा फायदा होत आहे. संयुक्त गुजराथची म्हणजे महागुजराथची स्थापना वल्लभभाईंच्यामुळें होणार आहे; दुसरें असें कीं मुंबई संयुक्त महाराष्ट्रांत सामील होण्याची भीति वल्लभभाईमुळेंच टळली आहे. गुजराथी व्यापाऱ्यांना मुंबई महाराष्ट्रांत जाऊं नये, असें खरोखरच वाटतें.

संयुक्त महाराष्ट्रांत मुंबई गेल्यानंतर गुजराथी व मारवाडी व्यापाऱ्यांची महाराष्ट्रीय जबरदस्तीनें हकालपट्टी करतील अशी मारवाडी व गुजराथी लोकांना भीति खरोखरच वाटत आहे. अशा प्रकारचा थोडा थोडा अनुभव मद्रास प्रांतांतील गुजराथी व्यापाऱ्यांनाहि येऊं लागला आहे. संकुचित प्रांतीय अहंता हा कांहीं महाराष्ट्रीयांचाच विशेष नाहीं, हिंदुस्थानांतले सगळेच प्रांत थोडे-बहुत असे आहेत. बंगाली लोक या बाबतींत तर कुप्रसिद्ध आहेत. प्रत्येक प्रांताचे या संकुचित-पणाचे काटे इतर प्रांतीयांना बोचल्याशिवाय राहत नाहींत. महाराष्ट्रीय मनुष्याचा ताठा आणि तुसडेपणा तो इतर प्रांतांत गेल्यावर अधिकच खुलून दिसतो. सहकार्य, भ्रातृभाव आणि समता या वृत्ती महाराष्ट्रियांच्या ठिकाणीं दुर्लभ आहेत. मत्सर, परदोषाविष्करणाची आवड आणि तुटकपणा यांचा महाराष्ट्रियांना आपसांतहि नेहमीं अनुभव येतो. या दोषांचा उपसर्ग इतरांनाहि पोचल्याशिवाय राहत नाहीं. म्हणून गुजराथ्यांना मुंबई महाराष्ट्रांत सामिल होऊं नये, असें वाटतें. सरदार वल्लभभाईनीं या बाबतींत गुजराथ्यांना अभय वर दिला आहे. एवढाच वल्लभभाईंचा गुज-राथ प्रांताला फायदा आहे. परंतु त्यामुळें गुजरा-थला राजकीय नेतृत्व प्राप्त होत नाहीं. वल्लभभाई व पंडित नेहरू यांचें नेतृत्व अखिल हिंदुस्थाननें निर्माण केलें आहे. तें कोणत्याहि एका प्रांतानें निर्माण केलेलें नाहीं. त्या तोडीचें नेतृत्व कोणत्याहि महाराष्ट्रियाला लाभलें नाहीं; म्हणून महाराष्ट्र मागें आहे, असें म्हणतां येत नाहीं.

## शिवाजी-बाजींची छाप !

सत्तेच्या राजकारणांत महाराष्ट्र अथवा महा-राष्ट्रीय व्यक्ति नजिकच्या काळांत अग्रेसर होईल अशी आशा बाळगण्याला कसलेंहि गमक सांपडत नाहीं; आणि तशी आशाहि बाळगणें वेडेपणाचें आहे. महाराष्ट्रांतील पांढरपेशाच्या मनांत मराठे-शाहीच्या ताज्या स्मृतीमुळें सत्तेच्या राजकार-णाचीं मुळें खोल रुजलीं आहेत. श्री. गोरे यांची क्षमा मागून मी असें म्हणतों कीं श्री. गोरे यांच्या प्रश्नाच्या मुळाशींसुद्धां जी विवंचना वा काळजी दडली आहे त्यांस त्यांची महाराष्ट्रिय परंपराच न कळत कारण आहे. ‘ हिंदुस्थानचा अग्रेसर महा-राष्ट्र व्हावा ’ ही वासना तेथें धगधगत आहे. शिवाजी, बाजीराव, नाना फडणीस, भाऊसाहेब, संभाजी, रामशास्त्री, रामदास, इत्यादि महा-राष्ट्राच्या तलवारीशी सलग्न असलेल्या व्यक्तींची छाप महाराष्ट्रीयांच्या अहंकारावर पडली आहे, डांगे, पटवर्धन, शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ, शंकरराव मोरे, नाना पाटील, जेधे इत्यादि कोणीहि त्याला अपवाद नाहींत. कोणाचा शिवाजी कम्युनिस्ट झाला आहे, कोणाचा बाजी-राव समाजवादी झाला आहे, कोणाचा भाऊसाहेब संघवाला झाला आहे, कोणाचा रामदास गांधींची लुंगी नेसून दिल्लीच्या तख्ताजवळ बसला आहे. इतर कोणत्याहि प्रांतापेक्षां या प्रांतांत राजकीय वैचारिक असंतोष फार धगधगत आहे. कारण दिल्लीचें तख्त पाहिजे.

## सत्तेच्या राजकारणाचा खोल संस्कार

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदुसभा, कॉंग्रेस, समाजवादी पक्ष, कम्युनिस्टपार्टी इत्यादि राजकीय पक्षोपपक्षांत महाराष्ट्रियाचीच छाप अधिक पडलेली आढळते. राजकीय ध्येयवाद आणि राज-कीय ध्येयाकरितां लागणारी कडक तपस्या या बाबतींत महाराष्ट्रीय हिंदुस्थानांत अग्रेसर आहे. निदान कोणाच्याहि मागें तरी खास नाहीं. परंतु या राजकीय उद्यमाच्या पाठीमागें सत्तेच्या राज-कारणाचा खोल संस्कार आहे. या राजकीय उद्यमाच्या मुळाशीं सात्विक श्रद्धा क्वचितच आढळते. आढळली तरी ती खोल व अढळ नसते. सर्वस्व समर्पित करून राजकारणांत पडण्याची महाराष्ट्रीय परंपरा फार उज्ज्वल आहे. परंतु हें समर्पण सत्ताभिनिविष्ट शूरांचें आहे, त्यांत चोखट संतपणा नाहीं, परमार्थ वृत्ति नाहीं. संतपण वा परमार्थ दृष्टि दिसली तरी ती शबल असते, शुद्ध नसते. याचें प्रत्यंतर प्रतिपक्षाच्या बाबतींत

प्रकट होणाऱ्या अनुदार वृत्तींत मिळतें. राजकीय तपश्चर्या कितीहि प्रखर असली तरी, राजकीय महत्त्वाकांक्षा त्या तपश्चर्येच्या पोटांत दडून बसलेली असल्यामुळें ती तपश्चर्या सहकार्याला प्रवृत्त करूं शकत नाहीं. एक कम्युनिस्ट दुसऱ्या कम्युनिस्टाला मदत करतो एक राष्ट्रीय स्वयंसेवक दुसऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवकास मदत करतो. परंतु त्यांच्यांतील दानतेची कल्पना सांप्रदायिक असते. शेजारधर्म आणि मनाचा स्वाभाविक उदारपणा याचें निरपेक्ष मूल्य समजून महाराष्ट्रीय राजकारणी वागत नाहीं. विशिष्ट राजकीय ध्येयवाद हें त्याचें सर्वस्व बनलेलें असतें. महाराष्ट्रीयत्व ही भावना हीन अर्थानें मूर्तिपूजक (Idolatrous) आहे. त्यामुळें महाराष्ट्रीय सात्विक प्रभाव हिंदुस्थानच्या राजकारणावर आणि सामान्य हिंदी संस्कृतीवर पडेनासा झाला आहे. संकुचित राजकीय ध्येयवादी निष्ठा महाराष्ट्रांत फार पिकते. याचें कारण महाराष्ट्राला सत्तेच्या राजकारणाची महत्वाकांक्षा कळत वा नकळत पिशाच्चाप्रमाणें छळीत आहे. परंतु ध्यानांत धरा, कितीही धडपड नजिकच्या काळांत महाराष्ट्राला मध्यवर्ती सत्तेची केली तरी सूत्रें खेळण्याची ताकत लाभणें शक्य नाहीं.

## गिरगावांत समाजवाद आणि काळबादेवीला भांडवलशाही !

समाजवादी राजकारण महाराष्ट्रांत स्थापन करून हिंदुस्थानला मार्गदर्शन करण्याची आकांक्षा बाळगणें सुद्धां अशास्त्रीय आहे. समाजवादाची स्थापना क्रांतिकारकपक्षाच्या हातीं सांपडलेली मध्यवर्ती सत्ताच करूं शकते. समाजवादी राजकारण म्हणजे प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणें आत्मोन्नती करण्याचा मार्ग नाहीं, हें जसें खरें आहे, त्याचप्रमाणें मध्यवर्ती सत्तेच्या कक्षेंत असलेल्या कोणत्याहि एकाच प्रांताला अविरोधपणें अंमलांत आणण्याचाहि तो कार्यक्रम नव्हे. गिरगावांत समाजवादाची स्थापना आणि काळबादेवीला भांडवलशाही असें म्हणण्यासारखें तें आहे. ती महाराष्ट्राला बंड करूनच पार पाडावयाची असेल तर मात्र गोष्ट वेगळी. संयुक्त महाराष्ट्र अगोदर बनवावयाचा आणि नंतर समाजवादी बंड करावयाचें असा भावार्थ काढावयाचा काय ?

## परंपरेचा अभिमान हा आमचा परमेश्वर

दुसरें असें कीं समाजवादी दृष्टीनें महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, इत्यादि प्रकारची प्रांतिक भेददृष्टि समाजवादी विचारसरणीशीं सुसंगत नाहीं. समाजवादाला वर्गभेद दिसतात, प्रांतभेद दिसत नाहींत. महाराष्ट्रांत वरिष्ठ वर्ग आहे आणि मध्ययुगीन सरंजामशाही संस्कृतीचा मध्यम वर्ग आहे. त्यांना समाजवाद मान्य होणें शक्य नाहीं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारखी जबरदस्त संघटना अल्पकाळांत हिन्दुस्थानभर पसरविणारे तरुण येथीलच आहेत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारसरणी महाराष्ट्रांत प्रथम उगम पावली, याचें कारण गेल्या दोनशें वर्षांतील येथील राजकीय इतिहास होय. परंपरेच्या अभिमानाला सर्वोच्च परमेश्वर मानून हिन्दुत्वाची साम्राज्य–पदावर स्थापना करूं पहाणारी दुर्दम्य महत्वाकांक्षा म्हणजेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ होय. महाराष्ट्राला सत्तेच्या राजकारणांतील स्पर्धेत आघाडीवर नेण्यास राष्ट्रीय स्वयंसेवक संघच समर्थ झाला असता. अपघाती आकस्मिक कारणानें तो संघ आज दडपला गेला आहे एवढेंच. परंतु महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अभिमानगंडाचा संघ हा मानदंड आहे. मराठे, माळी इत्यादि बहुजनसमाज संघाच्या पाठीमागें आज नाहीं, हें खरें आहे. परंतु हिंदुस्थानांतील हिन्दु पांढरपेशा बीजरूपानें संघवालाच आहे. कारण त्यांची परंपरागत मानसिक घडण तशी आहे. सामान्य हिन्दी जनता ही अज्ञान व भोळाभाव यांनीं ग्रस्त असल्यामुळें संघाच्या धार्मिक प्रचाराला बळी पडणार नाहीं असेंहि नाहीं. तिला कम्युनिस्ट व समाजवादी, भुकेच्या प्रश्नांवर पेटवूं शकतील; परंतु माणूस देवापेक्षांहि अधिक भावनेचा भुकेला आहे. उपासमार ही राष्ट्रसेवेची

तपश्चर्याच समजून राष्ट्र व धर्म यांच्याकरितांहि हिन्दी जनता संघटित होऊं शकते व समाजवादी क्रांतिस थोपवूं शकते.

महाराष्ट्रीय शेतकरी मध्यमवर्गांत शिक्षणाचें प्रमाण अल्प आहे. शैक्षणिक दृष्टया तो वर येण्यास अनेक मोठ्या अडचणी आहेत. तो अशिक्षित असल्यामुळें कोणत्या विधायकहि सांस्कृतिक सुधारणेच्या चळवळींत जोरांत भाग घेण्यास तो असमर्थ आहे. समाजवादी विध्वंसक चळवळींत तो भाग घेऊं शकेल. परंतु हिंदुस्थानांतील सर्वच प्रांत त्या चळवळींत सामील झाले नाहींत तर तो वर्ग मध्यवर्ती सत्तेचा तडाखा बसल्याबरोबर निर्बल व हतबुद्ध होऊन नामोहरम होईल.

## शैक्षणिक चळवळ पसरली पाहिजे

भौतिक सुधारणेच्या बाबतींत हिंदुस्थानचें आणि महाराष्ट्राचें भवितव्य सारखेंच आहे. सद्यःस्थितींत बंगाल आणि महाराष्ट्र मानसिक संस्कृतीच्या क्षेत्रांत पुढें आहेत. यांची कविता, नाटक, कादंबरी इत्यादि कलात्मक अंगें पाश्चात्य वळणाचीं झालीं आहेत. व्यक्तिस्वातंत्र्य, समान हक्क आणि रूढीविरुद्ध बंडखोरी या तीन पाश्चात्य मूल्यांचा वाङ्मयावर व कलेवर सुंदर संस्कार झाला आहे, परंपरागत पारलौकिक अंधश्रद्धेची पकड शिथिल झाल्याचा प्रत्यय यांच्या आधुनिक वाङ्मयांत व कलेंत येतो. मानसिक संस्कृति वाढण्याकरितां महाराष्ट्राच्या मनावरील सत्तेच्या राजकारणाची मगरमिठी ढिली झाली पाहिजे ती ढिली करण्यास एकच एक साधन शिक्षण आहे. तें म्हणजे विधायक दृष्टि. त्याशिवाय बाकीच्या सर्व धडपडी फुकट जातील. महाराष्ट्रांत शैक्षणिक चळवळ पसरली पाहिजे. विद्याव्यासंगी, अध्यापनाची आवड असणारा व कर्तव्यनिष्ठ शिक्षकच महाराष्ट्राला वर आणूं शकेल. महाराष्ट्राची भूमि आर्थिकदृष्टया कमजोर आहे. परंतु मनोभूमी कसदार आहे. बहुजन समाजाची शैक्षणिक पातळी वर आल्याशिवाय या प्रांतांतील समाजाला थोर भवितव्याचे वारसदार बनतां येणार नाहीं. विद्या, कला आणि शिक्षण या तीन क्षेत्रांत निष्काम बुद्धीनें सरकारी मदतीचीहि पर्वा न करतां विधायक पराक्रम करणाऱ्या अनेक पिढ्या जेव्हां खर्ची पडतील, तेव्हांच महाराष्ट्राचें अभ्युत्थान होईल. विधायक दृष्टीशिवाय सहकार्य उत्पन्न होणार नाहीं. राजकीय आणि धार्मिक पंथभेदांना वाव नसणारा आर्थिक शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम क्रांतिकारकाच्या उत्साहानें पार पाडण्यास यावज्जीव वाहून घेतलेले नागरिक महाराष्ट्राच्या थोर भवितव्याचे कारागीर बनतील. महाराष्ट्राचा प्रश्न केवळ संयुक्त महाराष्ट्र निर्माण केल्यानें सुटणार नाहीं. त्याकरितां नवी सांकृतिक चळवळ निर्माण केली पाहिजे. महाराष्ट्राचा प्रश्न व हिंदुस्थानचा प्रश्न एकच आहे. राजकीय व धार्मिक पंथभेदांना छेदून जाणारी व सर्वव्यापी सहकार्य उत्पन्न करणारी विधायक कार्यक्रमाची दीक्षा हा प्रश्न सोडवील.

## नाहींतर उपाय नाहीं !

'राज्यसत्ताच सर्व प्रश्न सोडवूं शकते, हल्लींची हिंदी राज्यसत्ता प्रतिगामी असल्यामुळें जनतेच्या सांस्कृतिक व भौतिक गरजा भागविण्यास असमर्थ आहे म्हणून राज्यसत्ताच अगोदर काबीज केली पाहिजे' ही दृष्टि जोंपर्यंत महाराष्ट्रीय बाळगतील तोंपर्यंत त्यांना महाराष्ट्राच्या मागासलेपणावर उपाययोजना सांपडणार नाहीं. मूठभर पांढरपेशा चळवळ्यांनीं महाराष्ट्रीय मागासलेल्या बहुसंख्यांची ससेहोलपट करून महाराष्ट्रीय जनता वर येणार नाहीं. प्रत्येक खेडें आणि प्रत्येक शहरांतील बहुजनवस्ती आळस, अमंगळपणा, करंटेपणा, घाण व अडाणीपणा यांचें माहेरघर बनली आहे. महाराष्ट्रसमाज तीन प्रकारांनीं भंगलेला आहे. ब्राह्मणादि पांढरपेशा हा निराळा महाराष्ट्र आहे; मराठी, माळी, कुणबी, सुतार, तांबट, लोहार इत्यादि स्पृश्य पण मागासलेला महाराष्ट्र निराळा आहे, आणि महार, मांग चांभार इत्यादि

बहिष्कृत जाति हा निराळा महाराष्ट्र आहे. या महाराष्ट्रांची गृह्य संस्कृति एक नाहीं; यांच्यांत आपसांत घरोबा नाहीं; सांप्रदायिक राजकीय दृष्टीनें त्यांच्यांत पांढरपेशा किंवा ब्राह्मण मिस‍ळतो, परंतु सांस्कृतिक समरसता त्यांच्यांत नसते. या तीन महाराष्ट्रांना एकत्र आणून संयुक्त महाराष्ट्र कसा बनेल हाच मूलगामी प्रश्न आहे. तो प्रश्न विधायक सर्वव्यापी तत्त्वज्ञान, बुद्धिवाद आणि व्यापक नव संस्कृतीचें स्फुरण सोडवील. हा तिभंगलेला महाराष्ट्र एकरूप करण्यास शैक्षणिक चळवळीची दीक्षा घेतली पाहिजे. या शैक्षणिक चळवळीचें स्वरूप म्हणजे साक्षरतेचा व पुस्तकी विद्येचा प्रसार एवढेंच असून उपयोगी नाहीं. स्वच्छता, आरोग्य, व्यायाम, गांवसफाई, घरदुरुस्ती, गांवदुरुस्ती, काटकसर, शेती, आर्थिक सहकारितेची चळवळ, इत्यादि बहुविध अंगें त्यांत आलीं पाहिजेत. या चळवळींतूनच जोमदार मूलगामी लोकसत्तात्मक क्रांति निर्माण होईल. समंजस व सुसंस्कृत नागरिकच लोकसत्तात्मक व साम्यवादी संस्कृति जन्माला घालतील. ते नागरिक बनविणें हें या शैक्षणिक चळवळीचें ध्येय असलें पाहिजे.

~~~~~~~~~~~

# : १९ :

# राष्ट्रीयता प्रथम, प्रांतीयता दुय्यम, विधायक कार्य हवें, सत्तालोलुप पक्षाभिमान नको !

★ लेखक : भवानी शंकर नियोगी ★

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, तें मी घेणारच' हे उद्गार लोकमान्यांच्या तोंडून एका ऐतिहासिक प्रसंगीं बाहेर पडले. ते शब्द भारतीयाचे होते कीं महाराष्ट्रीयाचे ? त्यांच्या स्फूर्तीचें मूळ हिंदमाता कीं महाराष्ट्र ? या प्रश्नाला एकच उत्तर असूं शकतें. त्या शब्दानें हिंदमातेनें आपल्या महाराष्ट्रीय पुत्राकडून पुढें येणाऱ्या स्वातंत्र्य–संग्रामाचें रणशिंग फुंकलें.

## गाडी चुकलेली नाहीं !

संग्राम आटोपला; भारतमाता स्वतंत्र झाली. पण स्वराज्य कुठें आहे ? १९२० सालीं महाराष्ट्राची हिंदी राजकारणाची गाडी चुकली, तशी आतां तरी पुढें निघणारी राजकीय गाडी चुकूं नये या उद्देशानें श्री. गोरे यांनीं समाजवादाचा पुरस्कार केला आहे. १९२० सालीं गाडी चुकली हें विधान यथार्थ दिसत नाहीं. लोकमान्यांच्या निधनानंतर त्यांच्या खास शिष्यवृंदांपैकीं कोणीहि हिंदी–राजकारणांतील अग्रेसरत्वाचा मान मिळविण्यास समर्थ झाला नाहीं ही गोष्ट खरी; परंतु याचा अर्थ महाराष्ट्र भारतीय राजकारणापासून परावृत्त झाला असा होत नाहीं. लोकमान्यानंतर त्यांचें अंगीकृत व घोषिलेलें कार्य त्यांच्या कांहीं विशिष्ट अनुयायांशिवाय इतरांनीं आपल्या शिरावर घेतलें ही गोष्ट महाराष्ट्राला लांछनास्पद कां वाटावी ? असें
~~~~~~~~~~~

वाटल्यास ती वृत्ती ' महाराष्ट्रशाहीची ' निदर्शक असेल, परंतु लोकशाहीची खास नाहीं. यांत प्रतिबिंबित होणारी विचारसरणी अनुदार व हिणकस अशी भासते. हाच तर महाराष्ट्रांतील तथाकथित ' मध्यमवर्गीयाचा ' दोष नाहीं ना ?

## अवनत आणि हतबुद्ध महाराष्ट्र कोणता ?

बंगाल–फाळणीच्या आंदोलनांतून स्वराज्याच्या कल्पनेचा अवतार झाला. तिचें दिग्दर्शन ना. गोखले यांनीं १९०५ सालच्या बनारसच्या बैठकींत आपल्या अध्यक्षीय भाषणांत केलें. १९०६ सालीं तें ध्येय दादाभाई नौरोजी यांच्या मार्फत जाहीर झाल्यावर तें गांठण्याचा मार्ग कोणता हा प्रश्न दत्त म्हणून पुढें आला. त्यावेळीं लोकमान्यांनीं पुढाकार घेऊन स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतुरंग कार्यक्रमाच्या भूमिकेवर राष्ट्रीय पक्ष तयार करून स्वातंत्र्याच्या लढ्याची तयारी केली; तोंच नोकरशाहीची त्यांच्यावर झडप पडली व त्यानंतर मंडालेहून परत आल्यावर लौकरच काळानें त्यांना ओढून नेलें. अशा पेचप्रसंगीं १९२० सालीं महात्मा गांधी पुढें सरसावले व त्यांनीं लोकमान्यांची जागा भरून काढली. गांधीजी हे गोखल्यांचे शिष्य; व गोखले हे रानड्यांचे शिष्य. रानड्यांचा कटाक्ष सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रांत विधायक कार्यावर होता. हें कार्य सुसंघटित व्हावें म्हणून ' भारत–सेवक समाज ' गोखल्यांनीं स्थापन केला, व त्याला धनिक लोकांचा आश्रय मिळाला. लोकमान्यांचें कार्य गोखल्यांच्या शिष्यानें हातीं घेतल्यामुळें महाराष्ट्रांतील " आधीं राजकीय स्वातंत्र्य कीं सामाजिक प्रगति ? " हा वाद आपोआपच मागें पडला. गांधीजींनीं, टिळकांनीं आंखलेल्या मार्गानेंच—आपल्या व्यक्तिमत्वाची भर घालून—देशाला स्वातंत्र्याप्रत आणून सोडलें. त्यांनीं चरख्याच्या सांकेतिक झेंड्याखालीं स्वदेशीची विधायक चळवळ करून बहिष्कार इतका यशस्वी केला कीं, ज्यांना तिची आंच लागली अशा लँकेशायरच्या लोकांनींसुद्धां त्यांची प्रशंसा केली. त्याचप्रमाणें त्यांनीं असहकारिता व सविनय कायदेभंगाद्वारें राष्ट्रीय शिक्षण देऊन जनतेला स्वातंत्र्यसंग्रामांत ओढलें व अखेरीस ब्रिटिश जनतेलाच भारताला स्वातंत्र्य देण्यास भाग पाडलें. गोखल्यांचा शिष्य राष्ट्रपिता झाला यांत महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला बाधक असें काय आहे ? महाराष्ट्रांतील बहुसंख्य जनतेनें स्वातंत्र्यसंग्रामांत अतिशय उत्साहानें भाग घेतला ही गोष्ट जगजाहीर आहे. त्याचप्रमाणें मध्यमवर्गानें जी कामगिरी केली तिची साक्ष देव, मावळणकर, अणे, आंबेडकर, गाडगीळ, खेर, विनोबा भावे यांना जें स्थान आज प्राप्त झालें आहे तेंच देतें. असें असतां " अवनत, निराश, हतबुद्ध " झालेला महाराष्ट्र कोणता ? हा महाराष्ट्र म्हणजे स्वतःला बुद्धिवादी असें म्हणून केवळ छिद्रान्वेषण करणारे, महाराष्ट्राच्या गतवैभवाच्या स्मृतिरूप भांडवलावर व्यापार करणारे, क्षोभकारक भाषणें व मर्मभेदक लेख यांच्या जोरावरच नेतृत्वाकरतां धडपडणारे, राजकारण म्हणजे सत्ता जिंकण्याचा, छक्के–पंज्याचा लपंडाव असें मानणारे, शठं प्रति शाठ्यम्, शापादपि शरादपि, मनगटांत शक्ति व मेंदूंत युक्ति, लढाऊ, आक्रमक अशा शब्दांचा भडिमार करून जनतेची दिशाभूल करणारे, अशांचाच वर्ग ना ? या वर्गानें एकाकाळीं परकीय सत्तेविरुद्ध असंतोष उत्पन्न करण्याचें कार्य केलें. परन्तु तें इंग्रजी शिक्षणामुळें ज्या वर्गाला नवीन दृष्टि प्राप्त झाली त्या वर्गापुरतेंच होतें. गांधीजींनीं तें असंतोषाचें लोण व्यापारी, उद्योगपती, धनिक, श्रमिक, व शेतकरी म्हणजे अर्थोत्पादन करणाऱ्या वर्गापर्यन्त नेऊन ब्रिटिश राज्यसत्तेविरुद्ध अखिल राष्ट्राचें नैतिक बंड उभारलें. त्यांतून स्वतंत्र भारत निर्माण झाला.

## स्वातंत्र्याचें सत्त्व

स्वतंत्रता ही दुरंगी आहे. एक अंग म्हणजे बंधमुक्तता, व दुसरें स्वराज्य ( Self–Government). माणसाच्या बेड्या तुटल्या म्हणजेच तो

योग्य वाटेनें जाऊं शकतो असें नाहीं; किंवा शेतावर आगळिक करणाऱ्याला पिटाळल्यानेंच शेतांत भरपूर पीक येतें असें नाहीं. गांधीजींचें सत्तावीस वर्षांचें कार्य मुख्यत: भारताला बंधमुक्त करण्याचें होतें, ते स्वत: "मला कागदी घटनेचें महत्त्व वाटत नाहीं, मला स्वातंत्र्याचें सत्त्व ( Substance of Independence) पाहिजे" असें वारंवार म्हणत. त्यांनीं स्वराज्याचा विधायक मार्गहि आंखून दिला. एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे कीं, त्यांनीं आपल्या युद्धाचा प्रारंभ टिळक-स्वराज्य फंडानें केला. स्वराज्य शब्दांतील 'स्व' हा पाया व 'राज्य' ही इमारत आहे. 'स्व' म्हणजे अखिल भारत; प्रांत, जात किंवा पंथ नाहीं. याच व्यापक भावनेनें प्रेरित होऊन या दोघां थोर पुरुषांनीं आपले देह झिजविले. ही व्यापक भावना देशांतील प्रत्येक भागांत व प्रत्येक व्यक्तीच्या हृदयांत जागृत करणें हें आद्य कर्तव्य नव्हे काय? एकराष्ट्रीयतेकडे कानाडोळा करून प्रांतीयतेचा उदो-उदो करणें हें समंजस आहे काय? सध्यां प्रांतीयता थैमान घालीत आहे त्यांत किती अर्थ आहे, याचा महाराष्ट्रापुरताच विचार करणें अवश्य आहे.

## वऱ्हाड जसा वामनराव जोशांचा, तसा बियाणींचाहि

महाराष्ट्र हा हिंदचा एक विशिष्ट भूभाग आहे. तो वंश-जाती-धर्म-निरपेक्ष असा आहे. 'हिंदुस्थान हिंदुओंका, नहीं किसीके बापका' अशी घोषणा एका पक्षाकडून होत असे. त्याप्रमाणें 'महाराष्ट्र मराठोंका, नही किसी औरोंका' असें आज म्हणतां येणें शक्य नाहीं. नागपूरचें उदाहरण घ्यावयाचें तर रघोजी भोसल्याचें राज्य सुरू होण्या-पूर्वी हा प्रान्त गोंडाचा होता. तो गोंडांना कां परत करूं नये? जर हा प्रान्त भोसल्यांनीं जिंकल्यामुळें मराठी भाषिकांचा झाला, तर ब्रिटिशांनीं तो प्रान्त जिंकल्यावर तेथें वसति केलेल्या पर-प्रांतस्थ व्यापारी व उद्योगपती यांचाहि कां होऊ नये? या महाराष्ट्रनामक भूभागाचे रहिवासी महारट्ठांचे वंशज असोत, किंवा मराठी-साम्राज्य स्थापन करणारे मावळे-मराठे असोत, किंवा त्या साम्राज्याचा भगवा झेंडा अटकेपार नेणारे ब्राह्मण असोत—हे सर्व भारतीय नागरिक याच हक्कानें या प्रदेशांत वास्तव्य करीत आहेत व पुढेंहि करतील. मध्य-प्रान्त व वऱ्हाडामध्यें परप्रांतीयांची संख्या बरीच आहे. व ते आर्थिक दृष्ट्या सुद्धां कांहीं कमी बलवान् नाहींत. आज असेंच म्हणणें प्राप्त आहे कीं, वऱ्हाड जसा वामनराव जोश्यांचा तसाच बियाणींचाहि आहे. इतकेंच नव्हे तर पुढें वऱ्हाडांत वसति करण्यास येणाऱ्या परप्रांतस्थांनासुद्धां असाच हक्क राहील. असाच हक्क परप्रांतांत वसति केलेल्या महाराष्ट्रीयांचाहि राहील. अर्वाचीन युगांत व्यक्तीव्यक्तींना जोडणारा दुवा हा गणगोत ( kinship ) किंवा धर्म ( riligion ) नसून प्रादेशिक ( teritorial) आहे. याच कारणानें राज्यसंस्थेचेंहि स्वरूप बदलतें. या विचारसरणीच्या चौकटींत महाराष्ट्र, आन्ध्र, कन्नड इ. भूभागाच्या विभक्तीकरणाचें तत्त्व कशा-प्रकारें बसतें? अखिल भारताची राज्यघटना स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व सामाजिक न्याय या तत्त्वांवर अधिष्ठित झाल्यानंतर प्रांतांतील सर्व भेद नाहींसे होतात. अपरिहार्य असा एकच भेद उरतो, तो भाषेचा. याला राजकारणाच्या क्षेत्रांत कांहींच महत्व असूं शकत नाहीं. भाषा ही शिक्षणाचें माध्यम म्हणून महत्त्वाची आहे म्हणून हा प्रश्न शिक्षणाच्याच क्षेत्रांत हाताळण्यास योग्य आहे. प्रादेशिक भाषेचा मेळ राष्ट्रभाषेशीं कसा बसवावा ह्याच बाबतींत भाषेचा राजकारणाशीं संबंध येतो. भारतीय नागरिकत्वाचें अखंडत्व कबूल केल्यावर राज्यकारभाराच्या सोईकरतां भाषावार प्रान्तरचनेच्या यथार्थतेविषयीं मतभेद होणें शक्य नाहीं. परंतु या प्रश्नावर बृहन्महाराष्ट्र, विशाल आन्ध्र, या शब्दामध्यें गर्भित असलेल्या गतकाळच्या साम्राज्याची छाया पडते. या भाव-नेचा जोर विशेषत: महाराष्ट्रांत असणें सहाजिक आहे. कारण जेव्हां ब्रिटिशांनीं महाराष्ट्र पादा-

क्रान्त केला, तेव्हां तो स्वतंत्र होता. तरी पण महाराष्ट्र हा परतंत्र झाल्यावर ब्रिटिशांच्या एकछत्री राज्यांत इतर प्रांतांच्या ओळींत जाऊन बसला. ब्रिटिशांनीं पाकिस्तानचा लचका तोडून उरलेल्या हिंदुस्थानच्या अखिल जनतेला अनुलक्षून सत्तात्याग केला. स्वातंत्र्य व तदंतर्गत सत्ता हिंदुस्थानच्या जनतेला मिळाली. त्या सत्तेची वांटणी होणार ती केवळ राज्यकारभाराच्या सोईकरतां, सोंपीव (delegated) अशीच राहील. देशांत अनेक स्वतंत्र संस्थानें निर्माण करून देशाचीं शकलें पाडण्याकरितां नाहीं. प्रांत हे केवळ एका घरांतील निरनिराळ्या खोल्यांप्रमाणें आहेत. त्यांचें अस्तित्व कबूल केल्यानें अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांप्रमाणें हिंदी नागरिकत्व द्विधा होत नाहीं. भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार काँग्रेसनेंच केला होता ही गोष्ट खरी. परंतु ब्रिटिश कुटिल नीतीनें त्याचा पूर्ण फायदा घेऊन सिंध प्रांत अलग करून मुसलमानांच्या हातीं कोलीत दिलें व अखेरीस आपल्या आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या बुद्धिबळाचा डाव साधण्याकरितां पाकिस्तानची उभारणी केली. यावरून ती काँग्रेसची मागणी निर्दोष नव्हती, हें स्पष्ट दिसतें.

## गांधीजींची दुरंगी कलाटणी

भारताच्या एकराष्ट्रीयत्वाला जसें इस्लाम व देशी संस्थानें बाधक होतीं तशीच पण प्रच्छन्नपणें प्रांतीयताहि बाधक होती, हें आतां संस्थानांचा प्रश्न सुटायला आला तोंच प्रांतीयतेनें आपलें डोकें वर काढलें यानें सिद्ध होतें. तिला वेळींच आळा घालून ती विकोपास जाणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे.

भारतीय राज्यघटना एकदां कागदावर उमटल्यावर खरा स्वराज्याचा प्रश्न उद्भवतो. गांधीजी वारंवार रामराज्याचा उल्लेख करीत असत. त्यावरून राज्यकर्ता हा राजर्षि (Plato चा philosopher-king) असावा असें त्यांनीं सुचविलेलें भासतें. असा पुरुष सत्तालोलुप नसतो; प्रजानुरंजन करणारा प्रजा-सेवक असतो. त्याला benevolent despot असेंहि म्हणतां येईल. गांधीजींचा आशय भारतांत एकतंत्री राज्य असावें असा तर नव्हता ना? ते लोकशाहीच्या अंतरंगांत धनिकशाही वावरत असते हें जाणून होते. धनिकांनीं आपल्या सत्तेचा उपयोग श्रमिकांची पिळवणूक न करतां आपण त्यांचे विश्वस्त आहोंत असें वागावें असें ते म्हणत असत. हीच विचारसरणी सध्यां भारतीय सत्ताधाऱ्यांची असावी असें दिसतें. परंतु ती फलद्रूप होण्यास रामाप्रमाणें धनिकांच्या अंगीं मानवता व तदंगभूत सौहार्द व न्यायशीलता हे गुण असावे लागतात. तसे कांहीं अंशीं इंग्लंडच्या सत्ताधाऱ्यांमध्यें होते म्हणून इंग्लंडची आर्थिक प्रगति विकासाच्या मार्गानें बिनबोभाट समाजवादाकडे झुकली. हें कार्य लिबरल पक्षानें केलें. सध्यां सर्व सुधारलेल्या देशांत शासनसंस्था ही केवळ कायदा व सुव्यवस्था राखणारी हुकुमशाही राहिली नाहीं. तिचें रूपान्तर Social–Service–State (समाजसेवानिष्ठ) मध्यें झालें आहे. भारताच्या स्वराज्याची उभारणी ह्याच तत्त्वावर होणार हें उघड आहे. तदनुषंगानेंच राजकीय व सामाजिक पुनर्घटनेचें स्वरूप होईल. यास्तव राजकारणाच्या आखाड्यांत पाय टाकणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला विधायक कार्य करणें अपरिहार्य आहे. इंग्लंडमधील श्रमिकांनीं दोन आघाड्यांवर धनिकांशीं लढा सुरू केला. एक ट्रेड युनियनची, तर दुसरी को–ऑपरेटिव्ह सोसायटींची, एक राजकीय युद्धाकरितां, तर दुसरी श्रमिकांची अंतर्गत संघटना करण्याकरितां. गांधीजींनीं हिंदुस्थानच्या राजकारणाला अशीच दुरंगी कलाटणी दिली, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

## समाजवाद कीं साम्यवाद ?

सध्यां हिंदुस्थानांतील सत्ताकेंद्र धनिक व श्रमिक वर्गाकडे संक्रमण करीत आहे अशी प्रस्तावना करून श्री. गोरे असें म्हणतात कीं, मध्यम वर्गानें आपलें बल वेळींच एकवटून समाजावादाच्या ध्येयाकडे वळलें पाहिजे. ह्या समाजवादाचें विशिष्ट

स्वरूप त्यांनीं विशद करून सांगितलें नाहीं. समाजवाद हा लोकशाहीच्या "समतेच्या" तत्त्वामध्येंच गर्भित आहे. लॉर्ड ॲम्बेलसारख्या कट्टर व्यक्तिवाद्यालासुद्धां 'I am something of a socialist' असें कबूल करावें लागलें. श्री. गोरे यांच्या मतें पांढरपेशा मध्यमवर्ग व शेतकरी हे समाजवादाला अनुकूल होतील;परंतु मला वाटतें, कीं शेतकरीवर्गावर खाजगी मालकीच्या कल्पनेचा इतका पगडा बसलेला असतो कीं, ते समाजवादाला सहज अनुकूल होणार नाहींत. झाले तरी बुद्धिजीवि अशा पांढरपेशा वर्गाचें महत्त्व ते कबूल करतील किंवा नाहीं ही शंका आहेच. हिंदुस्थान आतां उद्योगप्रधान देश होणार आहे, हें जाणून लहान शेतकरी व मजूर खेड्यांतून निघून शहरांत वसती करूं लागले आहेत. ते श्री. गोरे यांनीं कल्पिलेल्या समाजवादाकडे झुकतील कीं साम्यवादाकडे ? समाजवादाचा रोख श्रमिकांची आर्थिक स्थिती सुधारण्याकडे, तर साम्यवादाची ओढ क्रान्तीकडे ! इंग्लंडमध्यें स्वतंत्र मजूरपक्ष स्थापन झाला तेव्हां त्याचा हेतू केर-हार्डी व रॅम्से मॅक्डोनल्ड यांनीं जाहीर केला तो असा : The watch-word of socialism is not class-consciousness, but community-consiousness. नवीन प्राप्त झालेल्या स्वातंत्र्यानें हुरळून जाणारा श्रमिक वर्ग हा विलंबित विकासमार्गापेक्षां वर्गकलह तीव्र करून द्रुतगतीच्या क्रान्तिमार्गाकडे वळण्याचा जास्त संभव नाहीं काय ?

इंग्लंडमध्ये भांडवलशाहीनें धनोत्पादनाचें परमोच्च स्थान गांठलें तेव्हां धनाच्या वांटणीचा प्रश्न निघाला. धनिक व श्रमिक या उभयतांना साम्राज्यशाहीचा आश्रय असल्यामुळें त्यांचे हितसंबंध एकवटले होते. तशी स्थिती हिंदुस्थानांत नाहीं. येथें अजून देशांत इष्ट व आवश्यक प्रमाणावर उद्योगधंदे उभारलेच नाहींत. श्रमिक वर्गाचा कल धनिक वर्गाशीं सहकार्य करण्याकडे फार कमी दिसतो; जाति–वैमनस्यामुळेंहि त्यांचीं मनें कलुषित झालीं आहेत. याचा परिणाम असा दिसूं लागला कीं, धनोत्पादनाचे आधींच अडवणुकीच्या मार्गानें श्रमिकवर्ग आपलें स्वतःचें हित साधण्याचा प्रयत्न करीत आहे. पुढें त्याची प्रवृत्ति अत्याचाराकडे वळणार अशींहि चिन्हें स्पष्ट दिसत आहेत.तेव्हां याला तोड काय?

## लोकशाहीला कायद्याच्या करड्या अंमलाची जरूरी

कांहीं विवक्षित पुढाऱ्यांनीं सत्ता काबीज करण्याकरितां आपसांत गट्टी करून पक्ष निर्माण केले तर समाजवादाचें कार्य दिलजमाईच्या व सलोख्याच्या अशा लोकशाहीच्या मार्गानें चालू लागेल अशी आशा दिसत नाहीं. असे पुष्कळ पक्ष निर्माण झाले तर गटबाजीचें राजकारण वाढेल. लोकशाही यशस्वी होण्यास लोकांमध्यें कायद्याबद्दल आत्मसंयमन पाहिजे. लोकशाहीला कायद्याची करडी अंमलबजावणी लागते. सध्यां हिंदुस्थानाचें राज्ययंत्र बरेंच ढिलें झालें आहे, सरकारी नोकरवर्गांत लांचलुचपत, चालढकल, जबाबदारीचा अभाव इत्यादि दोष फार शिरले आहेत, हें सर्वश्रुत आहेच. त्यामुळें कायदा व सुव्यवस्था यांना बराच धक्का बसला आहे. अशा वेळीं जर खाजगी उद्योगधंदे राष्ट्रीकृत केले तर त्यापासून देशाला लाभ होईल असा विश्वास बाळगणें धाडसाचें आहे. वास्तव धनोत्पादनाचें कार्य त्यांत रुळलेल्या धनिकांवरच सोपविणें इष्ट आहे. तूर्त पक्षोपपक्ष काढून लोकांचा बुद्धिभेद करणें योग्य नाहीं.

## भारताच्या जीवनसमृद्धींतच खरें स्वराज्य

महाराष्ट्राला जर खरोखरी लोकमान्यांचा अभिमान वाटत असेल तर त्यांनीं जाहीर केलेल्या अर्थानें म्हणजे 'हिंद स्वराज्य' स्थापण्याचा कळकळीनें व निग्रहानें प्रयत्न केला पाहिजे. इंग्रजांनीं अखिल हिंदुस्थानांत एकसूत्री राज्ययंत्र तयार करून भारताच्या एकतेचें बहिरंग ( macrocosm ) सजविलें. परंतु स्वराज्याचें अंतरंग ( microcosm ) कसें परक्यांकडून मिळणार ? स्वराज्य हें सामुदायिक

जीवनाच्या विकासाचें स्वरूप आहे; तें एकानें दुसऱ्याला देण्यासारख्या भौतिक वस्तूसारखें नाहीं. खरें स्वराज्य भारताच्या जीवन-समद्धींतूनच निर्माण झालें पाहिजे. भारताच्या जीवनसमृद्धीला महाराष्ट्रांतील "मध्यम वर्ग" कसा पोषक होणार ? या वर्गांत बुद्धिमत्ता, धडाडी, चिकाटी, करारीपणा, कर्तृत्वशक्ति इत्यादि सद्गुण विपुल आहेत. परंतु त्याची विचारसरणी असावी तितकी वस्तुनिष्ठ नाहीं. शिवाजी, बाजीराव, रानडे, गोखले, टिळक या थोर पुरुषांचीं नांवें पुढें करून, त्यांच्या विभूतिपूजेचे पुजारी बनून, केवळ लोकप्रियतेच्या दक्षिणेची लालसा बाळगण्यापेक्षां, वर्तमानकाळची परिस्थिती पूर्ण लक्षांत घेऊन, अंतःकलह मिटवून, विधायक मार्गानें आपली कर्तबगारी प्रगट करून, त्या थोर पुरुषांचें नांव चालविणें हें अधिक श्रेयस्कर आहे. हिंदी नागरिकत्व अखंड असल्यामुळें महाराष्ट्र हा भारतापासून निराळा राहूं शकत नाहीं. महाराष्ट्रानें देशाच्या जनतेशीं समरस होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्रांतील बुद्धिजीवि पांढरपेशा वर्गानें सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त राहून लोकांमध्यें स्वावलंबन व एकजुटीनें कार्य करण्याची संवय वाढेल असें, कीं ज्या योगानें त्यांची सामाजिक बुद्धि जागृत होऊन गांवपंचायत, सहकारी पतपेढ्या, जनपद व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्यें काम करण्यास ते जास्त लायक होतील, शिक्षण द्यावें. याच मार्गानें लोकशाहीच्या अभिवृद्धीला अनुकूल अशी मनोभूमिका तयार होईल. केवळ सत्तालोलुप पक्षनिर्मितीनें लोकांची अंतःप्रवृत्ति बदलणें शक्य नाहीं.

"Ah! you fouriers failed,
Because not poets euough to understand.
That life develops from within."

~~~~~~~~~~~~

# : १९ :

# ज्ञानेश्वर-तुकारामाचा महाराष्ट्र मागें कसा पडेल ?

★ ★ लेखक : डॉ. सुमंत खंडेराव मुरंजन ★ ★

आतांपर्यंत अनेक विद्वानांनीं या विषयावरील आपले विचार जनतेसमोर मांडले आहेत. तेव्हां पुनरुक्तीचें भय आहे. म्हणून माझें म्हणणें सारांशरूपानें, पण सूत्रांत खंड पडूं न देतां, मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

## राजकीय पुढारीपणाला प्रांतिक महत्त्व कां ?

कांहीं वर्षांपूर्वीचें महाराष्ट्राचें राजकारणक्षेत्रांतील अग्रेसरत्व म्हणजे रानडे, गोखले व टिळक ह्या तीन महापुरुषांचें व्यक्तिगत कर्तृत्व होतें. त्यांच्या देशभक्तीला प्रांतिक मर्यादा नव्हत्या. त्यांच्या कर्तृत्वाला मराठीपण चिकटविणें हा मराठी लोकांचा दोष आहे. आमच्या गुजराती बांधवांनीं तोच आंधळेपणा जास्त प्रमाणांत आचरणांत आणून गांधींसारख्या जगद्बंधूला गुजरातीपण चिकटविलें आहेच कीं नाहीं ! रानडे, गोखले, टिळक यांच्यानंतर त्यांच्याइतकीच आणखी एखादी महान् व्यक्ति महाराष्ट्रांत
~~~~~~~~~~~~

जन्मली नाहीं, हें कांहीं निसर्गाविरुद्ध नाहीं; व तो महाराष्ट्राचा दोषहि होऊं शकत नाहीं. राष्ट्राच्या एका विभागानेंच पुढारी निर्माण करावे ही मक्तेदारीची कल्पना भ्रामक आहेच; पण ती राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीनें हानिकारकहि आहे. टिळकांपुढें इतर प्रांत आदरानें लवले, तेव्हां परप्रांतीय श्रेष्ठांपुढें महाराष्ट्र लवला यांचा विषाद वाटूं नये. वाटला तर तें अहंकाराचें लक्षण आहे. पण राजकीय पुढारीपणाला असें प्रांतिक महत्त्व कां आलें आहे ? त्याला दोन कारणें आहेत. एक तर खरीखुरी लोकशाही अमलांत यावयास या देशांत अद्याप अवकाश आहे. हल्लीं आपला सार्वजनिक कारभार अवास्तव व्यक्तिपूजेवर चालला आहे. असल्या तऱ्हेचें बुवाबाज पुढारीपण हें देशाच्या सामर्थ्याचें चिन्ह नसून परिणामीं तें देशाचें दुर्दैव ठरण्याचा संभव आहे. ह्या सत्याचा कटु अनुभव महाराष्ट्रास येतच आहे. तो अनुभव इतर प्रतांसहि येईलच. विशिष्ट प्रांताचा तराजू खालींवर होईल तो होवो. पण संबंध देशाला असलें पुढारीपण न बाधतां हा देश निभावला म्हणजे झालें. पुढारीपण व्यक्तींच्या कर्तृत्वावर उभारलें असलें तरी त्यास इतकें प्रांतिक महत्त्व कां यावें ? देशाचे पुढारी ह्या प्रांतांत जन्मले किंवा इतरत्र जन्मले याचा महाराष्ट्रास, बंगाल्यास वा आसामास विषाद कां वाटावा ? ह्याचा सडेतोड विचार केला, तर देशाचें दुसरें दुर्दैव डोळ्यासमोर उभें राहतें. जाहीर भाषणांत आणि लेखनांत जातिनिरपेक्ष व प्रांतनिरपेक्ष राजकारणाची उदात्त भाषा ऐकू येते. प्रत्यक्ष व्यवहारांत काय अनुभवास येतें ? आमच्या देशभक्तांनीं दिल्लीस जाऊन निर्माण केलेलें वातावरण कितीसें प्रांतनिरपेक्ष व जातिनिरपेक्ष आहे ? भाषावार प्रांतरचना व मुंबई शहराचें देशव्यवस्थेंतील स्थान ह्याबाबत आमच्या सार्वजनिक प्रामाणिकपणाचें बेंड फुटलें आहे तें काय दर्शवितें ? रानडे, गोखले, टिळक ह्यांच्या काळांत अधिकाराच्या उपभोगाचा प्रश्नच नव्हता—वांट्यास काहीं आलें असेल तर श्रम, फाशी किंवा तुरुंग. परंतु आतां प्राप्तीच्या वाट्याचा हावरा काळ आला आहे ! नोकरपेशा, मध्यमवर्गप्रधान मराठी लोकांच्या उपजीविकेचा आणि सरकारी कारभाराचा किती निकट संबंध होता व आहे, हें ध्यानांत घेतल्यावर या कोत्या प्रांतीय हेव्यादाव्यामागील रहस्य कांहींसें सुटेल.

## महाराष्ट्रांतील ‘ कुऱ्हाडीचे दांडे ...’

रानडे, गोखले, टिळक याच्या पुढारीपणामुळें मराठी कर्तृत्वाला उजाळा आला. परंतु मोठी झालीं तरी तीं माणसेंच होतीं. आपल्या कार्याच्या पूर्तीकरतां त्यांना शेंकडों स्थानिक कार्यकर्त्यांवर विसंबणें भागच होतें. रानडे, गोखले, टिळक गेले, पण हे असंख्य लोकसेवक त्यांच्याबरोबर गेले नाहींत व मराठी लोकांची सार्वजनिक कार्याची परंपराहि खंड पावली नाहीं. उलट महाराष्ट्रांत लोककार्याला वाहून घेतलेली जितकी मंडळी दिसतात, तितकी इतरत्र दिसत नाहींत असाच समज आहे. मग इतक्या लोकांचा सामुदायिक प्रभाव कां पडत नाहीं ?

महाराष्ट्राची कल्पिलेली पिछेहाट फक्त राजकीय पुढारीपणावरच थांबली असती तर त्यांत इतका विषाद वाटण्याचें कारण नव्हतें. परंतु पुढारीपण गेलें तर गेलें, खुद्द महाराष्ट्रांतील तरी आपली मालकी आपलीच राहिली आहे किंवा नाहीं ह्या विषयीं अंतर्भेदी मराठी दृष्टीला अलीकडे बळकट संशय येऊं लागला आहे. मराठी राजकारण मराठी राहिलें आहे, कीं त्याचा बोलविता धनी निराळाच आहे ? १५० वर्षांच्या परकीय अंमलाखालीं बाळाजीपंत नातूची अवलाद संपुष्टांत तर आली नाहींच—उलट ती जास्तच फोफावली आहे. असले कुऱ्हाडीचे दांडे उभे करून मराठी कर्तृत्वाचा आणि बुद्धीचा तेजोभंग करूं इच्छिणारा परप्रांतीय चाणक्य अथवा ठगांचा शंकराचार्य अगदींच आढळणार नाहीं असें नाहीं. परंतु कर्मधर्मसंयोगानें असली नामुष्कीची परिस्थिती कांहीं काळ अस्तित्वांत आली तरी जोंपर्यंत लोकशाहीचें

तंत्रच ह्या देशांत जारी आहे तोपर्यंत उपाययोजना मराठी लोकांच्याच हातांत राहणार आहे. जागरूक राहून आपली बहुजनसमाजाची अभेद्य फळी निर्माण केली म्हणजे झालें.

## एलदिल विचार व एकमुखी उच्चार

आज मराठी कर्तृत्व अनेक व परस्परविरोधी क्षेत्रांत पांगलेलें आहे. हिंदुधर्माचें रक्षण करावयास जाऊन श्री. सावरकरांनीं न कळतच एक निराळेंच, जवळ जवळ पेशवाई, राजकारण व धर्मकारण उभें केलें. बहुजनसमाजवादी मंडळींनी अरेला कारे म्हणण्यांतच आपली पुण्याई खर्च करण्याचें ठरविलेलें दिसतें. बिचाऱ्या अस्पृश्यांना गतकाळच्या अनुभवामुळें खरे मित्र कोण व शत्रु कोण हेंच उलगडणें अशक्य झालें आहे. रानडे, गोखले व टिळक यांच्या काळीं मराठी समाजाला एक प्रकारचा एकजिनसीपणा होता. परंतु त्या एकजिनसीपणाला बहुजनसमाजाची निरक्षरता व परंपरागत समाजरचनेचा स्वीकार हा आधार होता. महाराष्ट्राचें सार्वजनिक मत म्हणून आज ५–५० वर्षें जें समजलें गेलें व जात आहे तें मत खरोखरी कोणाचें व किती लोकांचें होतें वा आहे ह्याची छाननी केली, तर मराठी समाजाचे कित्येक दोष तेव्हांच लक्षांत येतील. तेव्हां आतां शतशः भंग पावलेल्या या समाजास एकदिल विचार व एकमुखी उच्चार कसा साधतां येईल? खराखुरा ‘ एकदिल विचार व एकमुखी उच्चार ’ शक्य होण्यास समाज एकजिनसी हवा; म्हणजे सर्वांचें हित एकत्र पाहणारा हवा. आजवर मूठभर वरिष्ठांनीं मिरासदारी गाजवून आपलें हित तेंच सर्वांचें असा कांगावा केला; पण आतां कनिष्ठांतहि जाग येत आहे. या शतकानुशतकें चिरडलेल्या कनिष्ठांचा ज्यांत समावेश नाहीं अशी योजना आतां व्यर्थ ठरेल. ‘ एकदिल ’ विचारास दिल साफ पाहिजे, उच्चनीचत्वाचा विषार नष्ट झाला पाहिजे; ‘ एकमुखी ’ उच्चार म्हणजे पोपटपंची नव्हे; प्रत्येक मुखाला ‘ यांत आपलें हित आहे ’ ही आपुलकी वाटली पाहिजे.

## ताडवृक्ष नव्हे, अश्वत्थ वृक्ष !

समाजाचें नेतृत्व, लोकमताची प्रामाणिक मांडणी, सामाजिक कार्याचें परहिततत्पर संचालन ह्यांची नैतिक जबाबदारी फार मोठी आहे. प्रसंगपरत्वें नेतृत्व, लोकमत, कार्यसंचालकत्व एकमुखी होऊं शकतात. परंतु असला अनुभव तात्पुरता व त्या त्या प्रसंगापुरताच असूं शकतो. सर्वसाधारणतः समाजाचें दैनंदिन जीवन ताडवृक्षाप्रमाणें एकसोट नसून अश्वत्थ वृक्षाप्रमाणें अपरंपार पसरलेलें असतें. म्हणून समाजाच्या सार्वजनिक कारभारांत आतताईपणा, जाहिरातबाजी, दडपेगिरी, गटबाजी असल्या दोषांना स्थान नसावें. परंतु ह्याविषयीं आम्ही कितपत काळजी घेतली आहे? ज्यांना पुढारीपण लाभलें अथवा ज्यांनीं पुढारीपणाचा कबजा घेतला ते, पुढारीपण खरें पण तें कोणाचें, हा विचार मनांत येऊं देतात काय? लोकमत म्हणून जाहीर करणारा अथवा सार्वजनिक प्रश्नावर प्रचार करणारा आमचा संपादकवर्ग तें मत अथवा तो प्रचार वस्तुतः बहुजनसमाजास कितपत लागू पडतो व किती मान्य असतो त्याची क्षिति बाळगतो काय? समाजकार्यप्रवृत्त मंडळी आपपरभावाच्या पलीकडे गेलेली आढळून येते काय? असल्या गंभीर दोषांकडे जाणूनबुजून डोळेझांक केली, एवढेच नव्हे तर त्या दोषांना गुणच समजून आम्ही उत्तेजन देत गेलों असतां हा सर्व प्रकार चिडीस जाऊन अनपेक्षित तऱ्हेचे स्फोट अनुभवास येऊं लागले आहेत, ह्यांत आश्चर्य तें काय?

असला प्रयत्न यशस्वी होण्यास नैतिक भांडवल लागतें. ह्या नैतिक भांडवलाच्या दृष्टीनें पाहिलें तर दोनचार मोठ्याच उणीवा नजरेंत भरतात. रानड्यांनीं सहिष्णुतेचें व सर्वसंग्राहक कार्यकौशल्याचें उदाहरण घालून दिलें. परंतु टिळक–आगरकर–गोखले यांच्या पक्षभेदमंथनांत जें असहिष्णुता हें विष निर्माण झालें त्याची बाधा अद्याप उतरलेली दिसत नाहीं. ह्या असहिष्णुतेचेंच एक अपत्य म्हणजे इतर जगाच्या मानानें, कोणत्याहि

क्षेत्रांत आपण नव्या ज्ञानाची किती भर घातली याचा विचारहि न करतां, इतरांपेक्षां आपण अधिक बुद्धिमान आहोंत या विलक्षण आत्मवंचनेची लागलेली संवय हें होय. असहिष्णुता व व्यक्तिगत अथवा प्रांतीय बुद्धिश्रेष्ठतेचा समज ह्यांचा एक परिणाम असा दिसतो कीं, स्वतःचें वैशिष्ट्य प्रस्थापित करतां करतां सामुदायिक हिताच्या मर्यादा बहुशः सुटतात हें आम्हांस उमजत नाहीं. महाराष्ट्रांत कुऱ्हाडीचे दांडे इतके कां निर्माण होतात, हा विचारणीय विषय आहे. ह्या मानीव बुद्धिमत्तेचें दुसरें एक अंग म्हणजे सांप्रतच्या पिढीस गंभीर, सायास-साध्य, प्रसिद्धि-विन्मुख असे विषय मानवत नाहींत. कोणतेंहि कार्य, कोणतीहि व्यक्ति यांची निरर्गल टवाळी करणें हा एक बुद्धीचा प्रशंसनीय विलासच समजला जातो. आमच्या बुद्धीची पातळी आमच्या वर्तमानपत्रांत, मासिकांत अचूक प्रतिबिंबित झालेली आढळून येईल. अप्रामाणिक भाडोत्री स्तुतिनिंदा, हुल्लडबाजी, हलकी रुचि, जाहिरातबाजी, आत्मसंतुष्ट वृत्ति यांचें रान माजलें आहे. गाळ वर येत आहे आणि बाष्कळ लटपट्यांचें फावलें आहे. पण टिळक-आगरकरांचा दांभिक घोषहि ऐकूं येतो. विचार साफ ठेवण्याऐवजीं भाषेची भूल घालण्याचा हलका उद्योग चालू आहे. असल्या वातावरणामुळें समाज महान् प्रयत्नाला दिवसेंदिवस नालायक होतो, हें आमच्या स्वयंनिर्मित म्होरक्यांना व विशेषतः लेखक-संपादकवर्गाला जेव्हां पटेल तो सुदिन.

## सर्वमान्य आर्थिक योजना अवश्य

एकजूट म्हणजेच सर्वमान्य एकमेव कार्यक्रम असें वाटणें साहजिक आहे. पुष्कळांना लोकशाही व समाजवाद हा आपला नवा जरीपटका होऊं शकेल असें वाटतें. त्याच्या मुळाशीं मराठी समाजांत भांडवलशाहीवर्ग विशेष नाहीं हा विचार दिसतो. परंतु लहान कारखानदार व लहान शेतकरी हे आपल्या वित्ताला बिलगून बसणार नाहींत ही समजूत अथवा आशा चुकीची दिसते. इतरांना सहकारी चळवळ त्याच कारणाकरितां मराठी समाजाचा उद्धार करील असें वाटतें. परंतु सहकारी चळवळीचा उत्पादनाच्या क्षेत्रांत अद्याप प्रभाव दिसून यायचा आहे, हें विसरून चालावयाचें नाहीं. मराठी लोकांनींहि भांडवलशाही वर्गाच्या मार्गानें जाऊन आपलें आर्थिक सामर्थ्य वाढवावें, अशी सूचना करणारे फारसे लेखक अवलोकनांत येत नाहींत. याला इतर कारणें असलीं, तरी आपणास भांडवली उलाढाली साधणार नाहींत असा एक निष्कारण हीनगंड हेंहि एक कारण असावें, असें वाटतें. वास्तविक पाहतां समाईक भांडवली कंपन्या काढून आपल्या इतर देशबांधवास प्रामाणिकपणा, व्यवहारकौशल्य, माणुसकी यांचे चांगले धडे घालून देणें मराठी लोकांस अशक्य नाहीं; फक्त ध्येयनिष्ठा हवी. असो. या सर्व कार्यक्रमांच्या मुळाशीं महाराष्ट्रास एक सर्वमान्य आर्थिक योजना हवी अशी जी सूचना आहे ती अगत्याची आहे. मराठी लोकांच्या उद्धारासाठीं प्रेरित झालेली सुबुद्ध मंडळी एकत्र आली, तर अंतिम मानवी ध्येयांचा उच्चार क्षणभर बाजूस ठेवून, सर्वसंमत अशी व्यवहारी योजना तयार करणें अशक्य नाहीं. परंतु मराठी आर्थिक नियोजन म्हटलें कीं, संयुक्त महाराष्ट्राची सिद्धि दत्त म्हणून पुढें उभी ठाकते. आणि संयुक्त महाराष्ट्र उद्यां निर्माण झाला तरी तो संघराज्याचा एक भाग म्हणूनच अस्तित्वांत येणार. संघराज्याच्या एका भागाला आर्थिक नियोजनाचे अधिकार केव्हांहि अत्यंत परिमित असेच मिळणार. तेव्हां आपलें आर्थिक नियोजन प्रांतिक मर्यादा ओलांडून सर्व देशास लागू पडेल असेंच असावें लागेल.

## बिळे आणि भोपळे

राजकीय पिछेहाटीची मीमांसा करतांना आर्थिक कार्यक्रमावर एकजूट होईल असें अनुमान करणें शक्य आहे ? कदाचित् ज्याच्या हातीं पैसा त्याची सत्ता, अथवा भविष्यकाळचें राजकारण म्हणजे वर्गविग्रह अथवा आर्थिक झटापट असा भरंवसा वाटत असेल. कदाचित् राजकीय पिछे-

हाटीला कारणीभूत असलेले सामाजिक व मानसिक दोष दिसत नसतील, अथवा दिसत असले तरी त्यांचा ऐतिहासिक किंवा परंपरागत जोर आकळतां येत नसेल. कदाचित् तो आमचा किंवा आमच्यांतील कांहीं विवक्षित जमातींचा पलायनगंडहि असूं शकेल.

आर्थिक समता अस्तित्वांत आणली तर सामाजिक तेढी देखील कालप्रवाहाबरोबर अंतर्धान पावतील असें कांहीं लोकांस प्रामाणिकपणें वाटत असावें. परंतु थोडा विचार केला तर हा समज अथवा ही आशा फोल आहे हें तेव्हांच कळून येईल. एकतर निरपवाद आर्थिक समता हें कल्पनासृष्टींतील ध्येयच राहणार आहे. प्रत्यक्ष सत्यसृष्टींत आर्थिक विषमता हल्लींच्या मानानें कितीतरी कमी करतां येईल, परंतु अजिबात नष्ट होईल हें शक्य नाहीं. एकवेळ आर्थिक समता अस्तित्वांत आली असें क्षणभर मानलें, तरी मानाची, अधिकाराची वगैरे विषमता राहणारच. तेव्हां मानाकरितां, अधिकारांकरितां, प्रसंगविशेषीं संपत्तीच्या अधिकाधिक वाट्याकरतां देखील, हल्लींची जातीय तेढ तेवढीच उग्र स्वरूपांत अनुभवास येणार नाहीं, असें मानावयास काय जाग आहे ? एवढेंच नव्हे, या जातीयतेमुळें हल्लींची भांडवलशाही आर्थिक विषमता पुरवली, परंतु समाजसत्तेच्या पांघरुणाखालीं कांहीं जमातींनीं इतर जमातींवर चालविलेली हुकमत नको अशीहि स्थिती येणें अगदींच असंभवनीय नाहीं. एका वाक्यांत सांगावयाचें म्हणजे आमची समाजरचना आणि समाजवाद ह्यांचें विळ्याभोपळ्याएवढेंच सख्य शक्य आहे.

प्रगतीच्या कल्पना पक्षापक्षाप्रमाणें बदलतात. एकाला जी प्रगति वाटते ती दुसऱ्याला पिछेहाट वाटेल. आज दोन तीन राजकीय तत्त्वज्ञानांचा झगडा पूर्वी कधीं नव्हे असा पेटला आहे. हा झगडा केवळ तात्त्विक नाहीं; राष्ट्रसंसाराच्या कोनाकोपऱ्याशीं तो बांधलेला आहे. अधिकाधिक लोक त्यांत उतरत आहेत; तटस्थपणाला अथवा तडजोडीला त्यांत वाव फार कमी. मग त्याबद्दलचें धोरण महाराष्ट्रानें, आणि पर्यायानें हिंदुस्थान देशानें, निश्चित करण्याची वेळ आली नाहीं का ? तें न करतां, केवळ 'सहकार्या' च्या सदिच्छेनें फार कार्य होणार नाहीं. कदाचित् तात्पुरती जूट झाली तरी आवळे-भोपळे फार काळ एकत्र सुखानें बसणार नाहींत. जोंपर्यंत आपला राष्ट्रवाद इंग्रजांना घालवून देणें एवढेंच उद्दिष्ट घेऊन बसला होता—म्हणजे बहुतांशीं negative होता—तोंवर त्या भावनेच्या जोरावर बळकट एकी होऊं शकली. आतां, स्वातंत्र्य मिळाल्यावर, ती एकी कोसळून नव्या रचनेचे positive प्रश्न सोडविण्याबाबत तीव्र मतभेद होणें साहजिक आहे. स्वच्छ नजरेनें या प्रश्नांचा विचार करून या झगडणाऱ्या प्रणालींपैकीं एकीचा अंगीकार करावा लागेल, त्या बैठकीवरील जूट स्थिर होईल. एकजूट म्हणजे, एक नेता, एक कार्यक्रम व एक भाषा मात्र नव्हे. तर आगरकर–रानड्यांची विशाल दृष्टि आठवून सर्वांनीं सर्वतोपरी प्रगतीवर नजर ठेवून शक्य तितकें विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांस सहकार्य द्यावें हा वरील विवेचनाचा निष्कर्ष आहे.

## महाराष्ट्र सर्वोदय परिषद भरावी

राजकीय क्षेत्रांत पिछेहाट, आर्थिक क्षेत्रांत परंपरागत इटुकलें मिटुकलें कर्तृत्व, हें पटलें, तरी त्याबाहेरील इतर क्षेत्रांतीलहि वस्तुस्थितीचा आढावा घेणें प्राप्त नाहीं काय ? मराठी वाङ्मय, मराठी वर्तमानपत्रें वगैरे प्रचार-संस्था, मराठी नाट्य–चित्रपट–गायन इत्यादि कला, मराठी संशोधन संस्था, मराठी समाजसेवक व समाजसेवा–संस्था, मराठी शिक्षण-संस्था, मराठी धर्मकार्य मंडळें इत्यादिकांची जुनी, अखंड व तेजस्वी परंपरा आहे. परंतु त्यांत देखील मूलभूत अथवा अलीकडे शिरलेल्या कित्येक प्रवृत्तींची स्पष्ट व जाहीर छाननी होणें अत्यंत अगत्याचें झालें आहे. ही छाननी विभागशः झाली, तरी महाराष्ट्राची सद्यःपरिस्थिति ही त्या छाननीची अपरिहार्यतः पार्श्वभूमि आहे, हें दृष्टिआड करतां कामा नये. वाङ्मय, प्रचार, कला, शिक्षण, समाजसेवा,

धर्म इत्यादींचा विभागशः विचारविनिमय करणारी परंतु एकाच स्थळीं जमणारी व सूत्ररूपानें फलश्रुति जाहीर करणारी महाराष्ट्र सर्वोदय परिषद पांच दहा वर्षांत एकदां तरी भरविण्याची जरूरी आतां उत्पन्न झाली आहे. परिषद कार्यकर्त्यांचीच असावी;—बाजारबुणग्यांचें येथें काम नाहीं.

## अवगुणांनीं मागें पडला, गुणांनीं पुढें येईल !

आपल्या कांहीं चुकांनीं अथवा अवगुणांनीं महाराष्ट्र मागें पडला, पडला असेल, तरी आपल्या गुणांनीं आघाडीवर येऊं शकेल, असे गुणहि मराठी लोकांत खास आहेत. इतर प्रांतांत क्वचितच आढळून येणारी ऐतिहासिक कर्तृत्वाची व एकजुटीची स्मृति आजहि तेवढीच तेवत आहे. किंबहुना, इतर प्रांतांत प्रसंगतः उफाळून येणारा हीनगंड आपली असली स्मृति नाहीं अशा सुप्त विचारांनींच प्रसृत झालेला आढळतो. महाराष्ट्राच्या शिपाईगिरीचा निराळा निर्वाळा देण्याचें कारण नाहीं. आज नांगर आणि उद्यां तरवार असला पेशापालट आजहि अगदींच अपरिचित नाहीं. ह्यापेक्षांहि अत्यंत मौल्यवान परंपरा म्हणजे इतरांच्या मानानें स्वतंत्र वातावरणांत वाढणारा, पुरुषांच्या बरोबरीनें खासगी व सार्वजनिक कार्यांत भाग घेणारा, परंतु कुटुंबव्यवस्थेस श्रद्धेनें, व टापटिपीनें चिकटून रहाणारा असा इतर प्रांतांत क्वचित आढळून येणारा आपला स्त्रीवर्ग आहे. ह्या सर्वांना आधारभूत म्हणून खालपासून वरच्या थरापर्यंत पोहोचलेलें व दैनंदिन आयुष्यक्रमाबरोबर एकजीव झालेलें तुकाराम–ज्ञानेश्वराचें तत्त्वज्ञान व नैतिक स्फूर्ति आहेत. असले गुण सळसळत असणारा समाज सांप्रतच्या, पैशाच्या व्यवहारांनीं बुजबुजलेल्या परंतु क्रांतिसन्मुख, काळांत मागें पडून राहील हें शक्य नाहीं.

---

# : २० :

# मिशनरी वृत्ती व विधायक कार्य हाच उपाय!

★ लेखक : एस. एम्. जोशी ★

माझे मित्र साथी नारायणराव गोरे यांनीं " महाराष्ट्र मागें कां पडला ?" या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर सुरू केलेली चर्चा चांगलीच रंगली. अनेक विद्वानांनीं आणि पक्षोपपक्षांच्या प्रवक्त्यांनीं या प्रश्नाचा गंभीरपणें विचार करून आपलीं मतें वाचकांच्यापुढें मांडलीं आहेत. महाराष्ट्रांतील सार्वजनिक जीवनाची आजची परिस्थिति लक्षांत घेतां ही चर्चा उद्बोधक आणि विचारप्रवर्तक झाली असें मला वाटतें. या नाजूक प्रश्नाबद्दल माझे विचार वाचकांना सादर करण्यास प्रथम मला जरा संकोच वाटत होता. परंतु मोकळ्या मनानें आपल्या कल्पना आणि अभिप्राय वाचकांपुढें मांडल्यास फायदा झाला नाहीं, तरी विशेष नुकसानहि होण्याची शक्यता नाहीं, असें वाटल्यावरून मी तें धाडस करीत आहें.

## महाराष्ट्र खरेंच मागें पडला आहे ?

या चर्चेमध्यें ज्यांनीं भाग घेतला त्यांपैकीं कांहींनीं ‘ महाराष्ट्र खरोखरच मागें पडला आहे काय ? ’ असा मूलभूत प्रश्नच उपस्थित करून

त्याचें नकारात्मक उत्तर दिलें आहे. अखिल भारतीय राजकारणांत जे लोक महाराष्ट्राचें नेतृत्व करीत आहेत, त्यांना या उत्तरानें समाधान वाटावें हें अगदीं स्वाभाविक आहे. महाराष्ट्र मागें पडला आहे, ही गोष्ट मान्य करणें म्हणजे आपली अपात्रताच कबूल करणें होय. विद्यमान महाराष्ट्रीय नेत्यांवर तो एक निंदाव्यंजक ठरावच होईल. सर्वसामान्य मनुष्याला देखील आपण इतर प्रांतांच्यापेक्षां मागें नाहीं हा विचार आश्वासनपर वाटतो. परंतु त्याबद्दल त्याची खात्री पटलेली नाहीं हें उघड आहे. आपण मागें आहोंत, या भावनेनें त्यांचीं मनें ग्रासलेलीं आहेत, याबद्दल मला तरी शंका वाटत नाहीं. कारण तसें नसतें तर सर्वसाधारण सुशिक्षित समाजामध्यें आज जो एकप्रकारचा कुढेपणा दिसून येतो तो दिसला नसता.

अखिल भारताच्या राजकीय वर्तुळांत महाराष्ट्राला आज मान नाहीं, ही गोष्ट नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. त्या ठिकाणीं आमचें वजन असतें तर आमच्यामध्यें ज्या प्रश्नावर वाद नाहीं, पूर्णतया एकमत आहे, असा संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न असा लोंबकळत पडलाच नसता. आपलें भवितव्य घडविण्याचें सामर्थ्य आमच्यापाशीं नाहीं म्हणूनच ही रास्त मागणी देखील आज टोलवली जाते आहे. इतर सर्व प्रांत आमच्यापेक्षां पुढें आहेत, असा मात्र याचा अर्थ नव्हे. बंगाल, पंजाब, मध्यभारत, मद्रास, कर्नाटक वगैरे प्रांतांची परिस्थिति पाहिली म्हणजे आपणच सर्वांत मागें आहोंत असें वाटत नाहीं.

संयुक्तप्रांत, गुजरात, बिहार वगैरे कांहीं प्रांत या दृष्टीनें आमच्या पुढें आहेत. भारताच्या राजकीय क्षेत्रांत त्यांचें प्रभुत्व आहे हें उघड आहे. परंतु तसें असण्याचें कारण काय? त्या इलाख्यांतील जनतेमध्यें असे कोणते गुण आहेत, कीं ज्यामुळें ते आमचें भवितव्य ठरविण्यांत प्रभुत्व गाजवूं शकतात? त्यांच्यांत राजकीय जागृति अधिक आहे, कीं त्याची बुद्धिमत्ता महाराष्ट्राहून वरच्या दर्जाची आहे? मला यापैकीं कोणतीच गोष्ट दिसत नाहीं. त्यांना महत्त्व प्राप्त करून देणाऱ्या निराळ्याच गोष्टी आहेत.

समाजाच्या निरनिराळ्या थरांतील लोकांवर त्या प्रांतांत काँग्रेसचा आणि काँग्रेस पुढाऱ्यांचा प्रभाव आहे. जमीनदार, भांडवलदार, व्यापारी, मध्यमवर्गीय, किसान कामगार वगैरे सर्व थरांतील लोकांवर त्यांची पकड आहे. या पुढाऱ्यांचें व्यक्तिमत्व श्रेष्ठ दर्जाचें आहे, एवढें एकच कारण त्याला पुरेसें नाहीं. तें कारण तर आहेच, परंतु त्या व्यतिरिक्त सामाजिक आणि आर्थिक कारणें देखील महत्त्वाचीं आहेत. ज्या प्रांतांत जमीनदारी पद्धति अस्तित्वांत आहे, तेथील किसानांमध्यें अद्याप पुरेशी जागृति झालेली नाहीं. आणि नांव घेण्यासारखा जागृत मध्यमवर्गहि अस्तित्वांत नाहीं. गुजरातमध्यें गांधीजींच्या सारखा महान् नेता निर्माण झाला. आणि त्यांचा वारसा तेथील काँग्रेसला आणि काँग्रेसच्या पुढाऱ्यांना मिळाला आहे. त्यामुळें त्या प्रांतांतल्या सर्व थरांतल्या लोकांच्या मनावर काँग्रेसच्या या पुढाऱ्यांची छाप आहे. या खेरीज औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रांत गुजराती समाजांतल्या लोकांनीं आघाडी मारलेली असून व्यापारी आणि मालकवर्ग चांगला संघटित आहे. त्या वर्गांचा पाठिंबा त्या प्रांतांतील काँग्रेसच्या विद्यमान पुढाऱ्यांना असल्यानें, त्यांचें वजन अखिल भारतीय राजकारणांत चांगलेंच वाढलें आहे. अर्थात या पुढाऱ्यांच्याकडून आपल्या वर्गांचे हितसंबंध संरक्षिले जातील, असें आश्वासन वाटत असल्याशिवाय त्यांनीं हा पाठिंबा दिलेला नसणार, हें उघड आहे. परिणामतः भारतांतील सर्वच भांडवलदार वर्गांचा पाठिंबा या पुढाऱ्यांना प्राप्त झाला असून, महाराष्ट्रांतील उद्योगपति देखील त्यांचें नेतृत्व मान्य करूं लागले आहेत. जनतेची संघटित शक्ति ज्याच्या मागें असेल त्याचा प्रभाव राजकारणामध्यें पडत असतो. मग ती शक्ति कोणत्या पद्धतीनें संघटित केली आहे, अगर कशामुळें गोळा झाली आहे, हा प्रश्न कोणी उपस्थित करीत नाहीं.

## जागृति हाच दोष !

या दृष्टीनें पहातां महाराष्ट्र भारतीय राजकारणांत मागें कां पडत आहे, त्याचा खुलासा होऊं शकतो. समाजांतील सर्व थरांतल्या लोकांना ज्याचें नेतृत्व मान्य आहे असा पुढारी आम्ही निर्माण करूं शकलों नाहीं. महाराष्ट्रांतील समाजांत आज जी जागृति आहे त्यापेक्षां कमी जागृति असती तर कदाचित् हें शक्य झालें असतें. आणि मग महाराष्ट्राचें वजन आजच्यापेक्षां अधिक पडलें असतें. आमच्या येथें इतरांच्यापेक्षां जागृति अधिक, हाच आमचा जणुं दोष होऊं पहात आहे. येथील राजकीय चळवळीची परंपरा फार मोठी आहे. न्या. रानडे, लो. टिळक, आगरकर या त्याचप्रमाणें पुढाऱ्यांची वासुदेव बळवंत फडके, सावरकर, चाफेकर, सेनापति बापट वगैरे सशस्त्र क्रांतिकारकांची ही भूमि असल्यामुळें, येथें मध्यमवर्गीयांमध्यें इतर प्रांतांपेक्षां अधिक जागृति असावी, हें स्वाभाविक आहे. शिवाय आमच्या येथें जमीनदारी फारशी नाहीं. रयतवारीचें प्रमाणच मोठें आहे. शिक्षणाबद्दल आस्था बाळगणारा पांढरपेशा वर्ग देखील भला मोठा आहे; त्यामुळें या प्रांतांत मध्यमवर्गाचें अस्तित्व जाणवण्यासारखें आहे. जमिनदारी नसली तरी सामाजिक विषमता फार मोठी आहे. कारण येथें हिंदु समाजांतील चार वर्णांचें समतुलन नाहीं. वैश्य आणि क्षत्रिय वर्ग फारच थोडा. ब्राह्मण आणि श्रमजीवि वर्गच प्रामुख्यानें दिसून येतात. त्यांत श्रमजीवी वर्गाचाच भरणा विशेष. ब्राम्हण आणि ब्राम्हणेतर त्यांच्यामध्यें आचार, रूढी, शिक्षणादि दृष्टीनें फारच मोठें अंतर पडलेलें आहे. सामाजिक विषमता असह्य होऊन महात्मा फुले, आगरकर यांच्यासारख्यांनीं सामाजिक क्रान्तीची आवश्यकता प्रतिपादन केली. सत्यसमाजी चळवळीसारखी सामाजिक चळवळ या प्रांतांत उदयास येऊन प्रभावी ठरली. राष्ट्रीय चळवळींत जागृत झालेल्या कांहीं तरुणांनीं मुंबईसारख्या औद्योगिक केंद्रांत जाऊन कामगारांच्या वर्गीय चळवळीस देखील सुरवात केली. या राजकीय, सामाजिक आणि वर्गीय चळवळींमुळें महाराष्ट्रीय समाजांत इतरांच्यापेक्षां अधिक जागृति झाली आणि याच चळवळींतून हुशार, कार्यक्षम, आणि कळकळीचे किती तरी कार्यकर्ते निर्माण झाले. अन्य प्रांतांच्यापेक्षां महाराष्ट्रांत बुद्धिमान, स्वार्थत्यागी आणि तळमळीचे कार्यकर्ते अधिक आहेत हें साथी गोरे यांचें म्हणणें बरोबर आहे. परंतु त्याची कारणपरंपरा माझ्या दृष्टीनें वर दाखविल्याप्रमाणें आहे. म्हणून केवळ जागृति आणि कार्यकर्त्यांच्या संख्येचा निकष लावावयाचा असेल, तर आम्ही मागासलेले नसून पुढेंच आहों. किंबहुना, आज आम्ही प्रगतीचा पुढचा टप्पा गाठूं शकत नाहीं, याचें कारण हेंच आहे.

## ‘ हवे ’ म्हणून नेते मिळत नाहींत !

विविध क्षेत्रांत निर्माण झालेल्या या कार्यकर्त्यांना एकत्र आणून त्यांचा विश्वास संपादन करणें, आणि समाजांतील सर्व थरावर ज्याचा प्रभाव पडेल, असें पुढारीपण निर्माण करणें, अशी दुहेरी कामगिरी आम्हांस करावयाची आहे. जेथें अशी परिस्थिति नाहीं, केवळ सर्वसामान्य जनतेवर छाप बसविण्याचाच प्रश्न आहे,, तेथें पुढारीपण करणें तितकेंसें अवघड जात नाहीं. जागृत कार्यकर्ते आणि त्यांचा जिच्याशीं जिव्हाळ्याचा संबंध आहे अशी सर्वसामान्य जनता, या दोघांनींहि आपला ध्येयवाद आणि धोरण पटवून देऊन त्यांना पुढें नेणें हें कार्य फार कठीण आहे. शिवाजी महाराज अगर लोकमान्य टिळक यांच्या सारखा असामान्य नेता मिळाला, तर हें कार्य तो सहज करूं शकतो. परंतु असे नेते, हवे म्हणून मिळत नाहींत. त्याचप्रमाणें असा नेता नाहीं म्हणून आम्हीं मागें पडलों, हा दावा करणें देखील नामुष्कीचें आहे. प्रगति करूं पाहणाऱ्या सर्व समाजांना हा प्रश्न आज ना उद्यां सोडवावा लागतोच. इतर प्रांतांत जरी हा प्रश्न आजच्या घटकेला उपस्थित झाला नसला तरी कालांतरानें त्यांना सुद्धां तो प्रश्न सोडवावा लागणारच आहे. सामाजिक आणि

आर्थिक विषमतेविरुद्ध चळवळी हळु हळू निर्माण होत आहेत. त्यांतून नवी जागृति येत आहे. सर्वांनाच कांहीं असामान्य पुढारी लाभणार नाहींत. आमच्यांत असामान्य पुढारी नसतांना देखील आम्ही आपला प्रश्न सोडवून दाखविला, तरच आपण विशेष कांहीं केलें असें होणार आहे. तसें होईल तरच सर्वसाधारण लोकांमध्यें एक प्रकारचा आत्मविश्वास येईल. ध्येयाबद्दल आत्यंतिक निष्ठा असेल तर, अलौकिक मोठेंपण नसतांहि परस्पर सहकार्यानें आपण समाजाची उन्नति साधूं शकतों, असा आशावाद त्यांच्यांत निर्माण होईल. नाहीं-पेक्षां नेत्याची वाट पहात बसणारे दैववादी बनण्याची त्यांच्यावर पाळी येईल.

## सामाजिक सुधारणेंत ब्रिटिशांनीं निर्मिलेली विकृति

महाराष्ट्रांतील प्रश्न आणखीहि एका कारणानें गुंतागुतीचा आणि बिकट होऊन बसला आहे. या प्रांतातील सामाजिक चळवळी ब्रिटिशांच्या आमदानींत झाल्याकारणानें त्यांतून निर्माण झालेल्या जागृतीला एकप्रकारचें वैगुण्य प्राप्त झालें आहे. हिंदी राष्ट्रीय चळवळींत फूट पाडून आपली सत्ता स्थिर करणें, ही ब्रिटिशांची नीति होती. त्यामुळें सामाजिक विषमतेविरुद्ध उभ्या राहिलेल्या सामाजिक चळवळींचा फायदा त्यांनीं आपल्या स्वार्थासाठीं करून घेण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. त्यांना ती एक सुवर्णसंधिच मिळाल्यासारखी झाली. या चळवळींना प्रोत्साहन देऊन त्यांच्यामध्यें एक प्रकारची विषारी धार त्यांनीं निर्माण केली. त्यांना ऐक्यप्रवर्तक विधायक वळण लागूं दिलें नाहीं अगर समन्वयवादी सहकारीवृत्ति रुजूं दिली नाहीं. उलट परस्परांविरुद्ध द्वेष निर्माण करून फुटीरपणाची तुटक वृत्तीच जोपासली. हिंदु-मुसलमानांच्या भांडणांत द्विराष्ट्रवादाच्या कल्पनेस चिथावणी देऊन या दोन्ही जमाती एकत्र नांदूंच शकत नाहींत, अशी भावना दृढमूल केली. अखेरीस त्याचें पर्यवसान पाकिस्तानी राष्ट्र स्थापन करण्यांत झालें. सामाजिक विषमतेच्या जाणीवेंतून निर्माण झालेल्या ब्राह्मणेतर चळवळीचा प्रवाह राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीशीं एकजीव होऊं नये, म्हणून बुद्धिपुरःसर प्रयत्न झाले. फुटीर आणि उच्छेदक वृत्ति वाढूं नयेत आणि अन्यायाविरुद्ध उभ्या राहिलेल्या सर्व सामाजिक चळवळी, स्वातंत्र्याच्या व्यापक चळवळीला येऊन मिळाव्या, असा महात्माजींचा अव्याहत प्रयत्न होता. म्हणूनच स्वतंत्र मतदार संघांना त्यांचा विरोध असे. याच्या उलट त्या वेळच्या राज्यकर्त्यांचा प्रयत्न असे. जातीजमातींत जेणें करून द्वेषभावना वाढेल, अशा कार्यक्रमांना आळा घालण्याऐवजीं प्रोत्साहन देण्यांत येई. द्वेषभावना इतकी वाढवावी कीं, शेवटीं दोघांना एकत्र येतांच येऊं नये, हा त्यांतला मुख्य हेतु होता. त्यामुळें चळवळींतील विधायक प्रवृत्ति निष्प्रभ होऊन फुटीर आणि उच्छेदक वृत्तीच वाढीस लागणें अपरिहार्य होतें. सारांश, सामाजिक अन्यायाविरुद्ध उभारलेल्या चळवळींत एक प्रकारची विकृति निर्माण झाली. परिणामतः महाराष्ट्रांत अखिल भारतीय राजकारणांत प्रभावी होतील, अशीं चांगलीं माणसें उदयास आलीं, तरी त्यांना सर्व समाजाचा पाठिंबा मिळूं शकला नाहीं. ब्राह्मणेतर असेल तर ब्राह्मण समाजानें त्याचें नेतृत्व मान्य करण्यास खळखळ करावी; ब्राह्मण असेल तर ब्राह्मणेतरांना त्याच्याबद्दल आपुलकी वाटूं नये; आणि अस्पृश्य असेल तर प्रश्नच विचारायला नको. महारडा म्हणूनच त्याची संभावना व्हायची.

## संयुक्त पुढारीपणानें वाढलेलें वजन

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनांतील हे धागेदोरे एकत्र गुंफून एक संयुक्त नेतृत्व निर्माण केलें, तर महाराष्ट्राला प्रगतीचा पुढचा टप्पा गांठतां येईल. समाजाच्या निरनिराळ्या थरांतील जागृत कार्यकर्त्यांना एकाच ध्येयवादानें प्रेरित करून त्यांची शिस्तबद्ध संघटना उभारतां येईल आणि महाराष्ट्राचा प्रभाव अखिल भारतीय राजकारणांत पडूं शकेल.

१९३० च्या सत्याग्रह चळवळींनंतर महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटींतील हिंदुमहासभावृत्तीच्या लोकांनीं आपला सवतासुभा निर्माण करण्यास सुरवात

अनुक्रम
विभाग
क्रमांक

केली आणि शेवटीं ते काँग्रेसमधून बाहेर पडले. त्यांच्याबरोबर शहरी, पांढरपेशा, तथाकथित सुशिक्षित समाजापैकीं बहुसंख्य लोक गेले. परंतु त्याच सुमारास ब्राम्हणेतर चळवळींतील तरुण आणि त्यागी पुढारी श्री. केशवराव जेधे आपल्या तरुण सहकाऱ्यांबरोबर काँग्रेसला येऊन मिळाले. प्रत्यक्ष प्रतिकाराच्या चळवळींत श्री. केशवराव काँग्रेसमध्यें आल्यामुळें ब्राम्हणेतर चळवळीपैकीं लढाऊ वृत्तीचे लोकच त्यांच्या समवेत आले. एकांतिक, फुटीर वृत्तीच्या आणि संधिसाधू लोकांनीं त्यांना विरोधच केला. तथापि त्यांच्या विरोधाची परवा न करतां श्री. जेधे यांनीं सत्यसमाजी चळवळींतील खऱ्या अर्थानें सत्याग्रही प्रवाह राष्ट्रीय चळवळीच्या गंगेंत आणून सोडला. श्री. शंकरराव देव आणि काकासाहेब गाडगीळ आदि काँग्रेस पुढाऱ्यांनीं श्री. जेधे यांचें स्वागत करून एक संयुक्त नेतृत्व निर्माण केलें. लढाऊ वृत्तीची सर्व स्वातंत्र्यवादी जनता काँग्रेसच्या मागें उभी राहिली. १९३४ सालीं मध्यवर्ति असेंब्लीच्या निवडणुकींत श्री. केशवराव जेधे आणि काकासाहेब गाडगीळ यांनीं लोकशाही स्वराज्य पक्षाच्या उमेदवारांचा पराभव केला. या पक्षाचे उमेदवार हलके सलके नव्हते. शेठ वालचंद हिराचंद आणि कै. नारायणराव गुंजाळ यांना या पक्षानें उभें केलें होतें. हिंदु महासभावादी, वरिष्ठ मध्यमवर्ग आणि महाराष्ट्रांतील श्रीमंत लोकांचा त्यांना पाठिंबा होता. परंतु त्यांचा पराजय होऊन महाराष्ट्रांतील बहुसंख्य जनता काँग्रेसच्या पाठीशीं असल्याचें सिद्ध झालें. अखिल भारतीय राजकारणांतील महाराष्ट्राचें वजन वाढलें.

## पुढारीपण संयुक्त झालें, एकजीव नाहीं

परंतु या निवडणुकीपासून काँग्रेसच्या राजकारणाला निराळें वळण लागलें. प्रत्यक्ष प्रतिकाराची भाषा मागें पडली. निवडणुकींचा जमाना सुरू झाला. काँग्रेसच्या वाऱ्याला देखील उभे न रहाणारे लोक, आतां काँग्रेसच्या तिकिटाची याचना करूं लागले. श्री. शंकरराव देव, काकासाहेब वगैरे काँग्रेस पुढारी, आतां निवडणुकी यशस्वी करून असेंब्लींत बहुमत मिळविण्याच्या दृष्टीनें सहकाऱ्यांचें व सर्वसामान्य काँग्रेस कार्यकर्त्यांचें मूल्य मापूं लागले. १९२८ पासून सुरू झालेल्या युवक चळवळींतून पुढें आलेल्या कार्यकर्त्यांचें त्यांना महत्त्व वाटेनासें झालें. पूर्वीच्या कट्टर काँग्रेसविरोधकांना देखील आतां अधिकाराच्या जागावर आणून बसविलें. हे लोक लढ्याच्या जमान्यांत काँग्रेसमध्यें आलेले नव्हते, त्यांनीं आपल्या आत्यंतिक जात्याग्रहाला मुरड घातलेली नव्हती, अगर पूर्वींच्या चळवळींत निर्माण झालेली जातिद्वेषाची भावना देखील ते पूर्णपणें विसरले नव्हते. त्यामुळें राष्ट्रीय चळवळींतील आणि सत्यसमाजी चळवळींतील लढाऊ कार्यकर्त्यांचा जसा एकजीव व्हावयास पाहिजे होता, तसा होऊं शकला नाहीं.

## विळे, आवळे व भोपळे यांची मोट !

असामान्य कर्तृत्वाचा पुढारी आपणांस लाभला नाहीं तर एक संयुक्त नेतृत्व निर्माण करून महाराष्ट्रानें प्रगतीचा पुढचा टप्पा गांठला पाहिजे असें वर म्हटलें आहे. परंतु विळे, आवळे, आणि भोपळे यांची मोट बांधून संयुक्त नेतृत्व निर्माण करतां येत नाहीं. एका ध्येयानें प्रेरित झालेली आणि ज्यांच्या धोरणांत मूलभूत फरक नाहीं, अशी मंडळीच एकत्र येऊ शकतात. ब्राम्हणेतर चळवळींतील संकुचितपणाचा त्याग करून व्यापक राष्ट्रीय भूमिकेचा आश्रय केल्याविना बहुजनसमाजाचा अभ्युदय होऊ शकणार नाहीं, ही गोष्ट श्री. जेधे यांना पटली, म्हणूनच सहकाऱ्यांचा विरोध पतकरूनहि ते काँग्रेसमध्यें आले, आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ प्रामुख्यानें बहुजनसमाजाचे प्रश्न सोडविण्यासाठींच आहे, ही भूमिका श्री. देव–गाडगीळांनीं आत्मसात केलेली असल्यामुळें, ते श्री. जेधे यांचें आनंदानें स्वागत करून त्यांच्याशीं समरस होऊं शकले. परंतु देव–गाडगीळांना महाराष्ट्रा-

पुरतीच ही ध्येय-धोरणाची एकी घडवून आणतां आली. सर्व काँग्रेसला तसें वळण देणें शक्य झालें नाहीं. राष्ट्रीय आन्दोलनाची भट्टी कच्ची राहिली. समाजक्रान्तीचा रंग तिला चढूं शकला नाहीं. त्यामुळें काँग्रेसचा कायापालट होण्याची ही प्रक्रिया होऊं शकली नाहीं. जोंपर्यंत अधिकारपदांचा प्रश्न नव्हता तोंपर्यंत हें संयुक्त नेतृत्व उत्तरोत्तर अधिकाधिक प्रभावी होत जाईल, अशी आशा वाटत होती. परंतु मंत्रिमंडळें बनविण्याच्या दृष्टीनें पाऊलें पडूं लागल्यामुळें ती आशा फोल ठरली. श्री. देव-गाडगीळांनीं अधिक मतें आणणाऱ्या लोकांना जवळ करण्याचें जें धोरण स्वीकारलें, तें जरी त्यांनीं धडाक्यानें पुढें नेलें असतें, तरी आजच्यापेक्षां निराळें दृश्य आपणास पहावयास मिळालें असतें. १९३०-३२ च्या चळवळीनंतर त्यांनीं जशी युवक चळवळींत निर्माण झालेल्या कार्यकर्त्यांची कदर केली नाहीं, त्याचप्रमाणें १९४२ च्या प्रचंड आन्दोलनांतून पुढें आलेल्या तरुण कार्यकर्त्यांना देखील त्यांनीं जवळ केलें नाहीं. तसें करण्याची ती एक उत्तम संधि होती. समाजवादी, बहुजन-समाजी आणि गांधीवादी यांचें एक संयुक्त नेतृत्व त्यांना निर्माण करतां आलें नाहीं. धड बहुजन-समाजवाद्यांनाहि त्यांनीं खूष केलें नाहीं. मुंबई प्रांताचें मंत्रिमंडळ बनविण्याचें सामर्थ्य ज्यांच्या ठिकाणीं होतें, त्या काँग्रेस श्रेष्ठींनीं वर्गस्वार्थाच्या आणि प्रांताभिमानाच्या आहारीं जाऊन पुरेसें औदार्य दाखविलें नाहीं आणि त्यामुळें बहुजन-समाजवादी विचारांच्या लोकांना असें दिसून आलें कीं, केवळ महाराष्ट्र काँ. कमिटींत बहुमत मिळून आपला कार्यभाग होऊं शकत नाहीं. संपूर्ण काँग्रेसचा कायापालट होईल तरच शेतकरी-कामगार वर्गांचे प्रश्न तांतडीनें सुटून जनताराज्य अस्तित्वांत येऊं शकेल. या निर्णयाप्रत आल्याकारणानें श्री. जेधे-मोरे यांच्या गटाला समाजवादी-पक्षाप्रमाणेंच काँग्रेस मधून बाहेर पडावें लागलें. परंतु या सर्व घडामोडींचा परिणाम असा झाला कीं, प्रत्येक गट आआपल्या परीनें स्वतंत्र झाला असला, तरी महाराष्ट्रीय जनतेची संघटित शक्ति विभागली गेली. आमच्या समाजकारणांत एक प्रकारचा विस्कळितपणा निर्माण होऊन अखिल भारतीय राजकारणांत आमचा सामुदायिक प्रभाव पडेनासा झाला.

## मतभेद कुठें होतात ?

तसें पाहिल्यास महाराष्ट्रांतील सर्व गटांमध्यें कांहीं मुद्यांबाबत मतैक्यच आहे. उदाहरणार्थ, संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला सर्वांचा पाठिंबा आहे. तरीहि त्यांना एकत्र घेऊन एक संयुक्त आघाडी उभारतां येत नाहीं. कारण मागणी एक असली, तरी ती कशी आणि कोणत्या मार्गांनीं मिळवतां येईल याबाबत त्यांच्यामध्यें मूलगामी भेद आहेत.

श्री. शंकरराव देव समाजवादाचें समर्थन करतात. परंतु काँग्रेसमार्फतच समाजवाद प्रस्थापित केला पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे. लोकशाही समाजवादानेंच महाराष्ट्राचे प्रश्न सुटूं शकतील, याबद्दलहि यांची खात्री आहे. संयुक्त महाराष्ट्र हें देखील त्या व्यापक ध्येयाचें एक अंग आहे. हें ते ओळखतात. परंतु असें असूनहि काँग्रेसश्रेष्ठी या मागणीला विरोध कां करतात, हें त्यांना सांगतां येत नाहीं. काँग्रेस-मधील एका प्रभावी गटाचा समाजवादाला विरोध आहे ही वस्तुस्थिति मान्य करण्यास ते तयार नाहींत. त्यामुळें आपली मागणी मान्य होत नसली तरी काँग्रेसश्रेष्ठींना विरोध करण्यास ते तयार नाहींत.

## बहुजनसमाजवादी व लोकशाही साधनें

बहुजनसमाजवादी पक्षाचें ध्येय समाजवादच आहे. जनतेचें दारिद्र्य नष्ट केल्यावाचून तिच्या आकांक्षा पुऱ्या होऊं शकत नाहींत. आणि संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावाचून खरें खुरें जनताराज्य अस्तित्वांत येणार नाहीं याबद्दल त्यांना मुळींच शंका नाहीं. परंतु संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न हा देशांत समाजक्रांति घडवून आणून

समाजवाद प्रस्थापित करण्याच्या मुख्य प्रश्नाचें एक अंग आहे या गोष्टीकडे पुरेसें लक्ष पुरविलें जात नाहीं. महाराष्ट्रांतील जनता म्हणजे इतरांच्यापेक्षां फारच निराळी आहे आणि एकटा महाराष्ट्र जणुं हा प्रश्न सोडवूं शकेल, अशा वृथा आविर्भावानें किती तरी लोक बोलत सुटतात. इतर प्रांतांतल्या जनतेचे प्रश्न काय आहेत ते समजून घेऊन त्यांचा पाठिंबा आपल्या मागणीला मिळविला पाहिजे. सर्वांची एक आघाडी उघडली, तरच हा प्रश्न हवा तसा सोडवितां येईल, ही गोष्ट समजावून दिली जात नाहीं. संयुक्त महाराष्ट्राला पुढें मागें इच्छा झाल्यास संघराज्यापासून वेगळे होण्याचा अधिकार घटनेमध्यें दिला पाहिजे, असें प्रतिपादण्यापर्यंतहि कित्येक वेळां मजल पोंचते. सो. रशियाच्या घटनेंत प्रांतांना तशा प्रकारचा अधिकार असल्याचा दाखला पुढें करण्यांत येतो. परंतु या उथळपणामुळें संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला निष्कारण प्रांतीयतेचा रंग चढतो; इतर प्रांतीयांबद्दल तुसडेपणाची वृत्ती बळावते; आणि परप्रांतांतल्या लोकांचा विरोध निर्माण होऊन धनिकशाहीचे हात बळकट करण्यासच अप्रत्यक्षपणें सहाय्य पोंचतें. या खेरीज हें ध्येय साध्य करण्यासाठीं प्राप्त परिस्थितींत कोणत्या साधनांचा अवलंब केला पाहिजे याबद्दलहि बहुजनसमाजवादी मंडळींनीं खोलवर विचार करून निर्णय घेतलेला दिसत नाहीं. लोकशाही साधनांची टिंगल करून सह्याद्रींतील दऱ्याखोऱ्यांच्या आश्रयानें चीनसारखी गनीमी लढाई चालविण्याची वढाई देखील ऐकू येते. साधनांबद्दलचा हा महत्त्वाचा निर्णय घेतलेला नसल्यामुळें कम्यूनिस्टांसह सर्व लोकांचा एक संयुक्त मोर्चा उभारण्याचा आग्रह ते धरीत आहेत.

## समाजवाद्यांची भूमिका

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळींत प्रामुख्यानें भाग घेतलेल्या बहुतेक तरुणांनीं लोकशाही समाजवादाचा अंगिकार केला असून त्यांनींच हिंदी समाजवादी पक्षाची स्थापना केली आहे. इतर प्रांतांप्रमाणें महाराष्ट्रांतहि या पक्षाची एक सुसंघटित शाखा असून स्वातंत्र्यलढ्यांत भाग घेतलेल्या तरुणांचाच त्यामध्यें अधिक भरणा आहे. या पक्षाला देखील लोकशाही समाजवादाचें एक अंग म्हणून संयुक्त महाराष्ट्र हवा आहे. परंतु काँग्रेसच्या हातून समाजवाद प्रस्थापित होईल असें त्यास वाटत नाहीं. सबब काँग्रेसच्या अधिकारारूढ पक्षाला लोकशाही समाजवादाच्या कार्यक्रमावर विरोध करणारा एक प्रभावी विरोधी पक्ष निर्माण करूनच महाराष्ट्राचा हा प्रश्न सोडवितां येईल, अशी त्यांची कल्पना आहे. असा विरोधी पक्ष संघटित करणें हेंच आपलें ऐतिहासिक कार्य आहे, असें समाजवादी मानतात. त्यामुळें श्री. शंकरराव देव वगैरे काँग्रेस नेत्यांबरोबर त्यांचें एकमत होऊं शकत नाहीं. या प्रश्नावर काँग्रेसश्रेष्ठींना विरोध करण्याचें महाराष्ट्रांतील काँग्रेसजनांनीं ठरविल्यास ही एकजूट होणें सहज शक्य आहे. लोकशाही पद्धतीनें आणि साधनांची शुद्धता राखून आपलें उद्दिष्ट गांठण्याचा त्यांचा आग्रह असल्यामुळें बहुजनसमाजवाद्यांचा कम्यूनिस्ट विचाराच्या लोकांबरोबर एकजूट करण्याचा आग्रह त्यांना मंजूर करतां येत नाहीं. नवजात स्वतंत्र हिंदी राज्याबद्दल आणि आतांपर्यंतच्या चळवळींतील लोकशाही परंपरेबद्दल निष्ठा न बाळगतां परकीय सत्तेच्या मदतीवर भिस्त ठेवून आणि तिच्या धोरणानुसार चालून आजच्या बिकट परिस्थितींत आततायी मार्गांचा अवलंब करणाऱ्या कम्यूनिस्टांबरोबर एकजूट करण्यास समाजवादी तयार नाहींत. तसें करणें म्हणजे आजपर्यंत ज्यासाठीं आपण झगडलों त्या ध्येयाचाच त्याग करण्यासारखें आहे. या आततायी मार्गांनीं समाजवाद येण्याऐवजीं फॅसिझम येण्याचीच अधिक शक्यता आहे.

## महासभा व रा. स्व. संघ

हिंदु महासभावादी, रा. स्वयंसेवक संघ आणि तत्सम विचारांचे लोकहि महाराष्ट्रांत पुष्कळ आहेत. त्यांत मध्यमवर्गीयांचा भरणा अधिक

आहे. गांधीजींच्या खुनानंतर ते बहुसंख्य जनतेपासून अलग पडले आहेत. तथापि त्यांची संघटना निश्चितच उपेक्षणीय नाहीं. हे लोक अद्याप हिंदु सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या कल्पनेंतच दंग आहेत. हिंदुस्थानांत अलीकडे जी राष्ट्रीयत्वाची लाट उठली आणि जिच्यांतून आपलें राजकीय स्वातंत्र्य मिळालें त्या राष्ट्रीयत्वाचे धागेदोरे हिंदु संस्कृतिक राष्ट्रीयत्वाच्या भावनेपासून पूर्णतया अलिप्त नसले, तरी त्यांतील खरी प्रेरकशक्ति आधुनिक लोकशाहीराज्यपद्धतींतून आणि आर्थिक स्थित्यंतरांतून प्राप्त झाली आहे, या गोष्टीची दखल घेण्यास या लोकांची अद्याप तयारी झालेली दिसत नाहीं. त्यामुळें आर्थिक आणि राजकीय परिवर्तनावर जोर देऊन लोकशाही समाजवादाचा पुरस्कार करणाऱ्या समाजवाद्यांना ते फार जोराचा विरोध करतात. अर्थातच समाजवाद्यांना विरोध करणारे आपले मित्र समजण्याकडे स्वाभाविकच कल निर्माण होतो. परंतु त्यामुळें भांडवलशाहीचें आसन स्थिर करण्यास अप्रत्यक्ष सहाय्य होत आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नसावीसें दिसतें.

## वर्गातीत कार्यकर्त्यांची एकजूट

महाराष्ट्राच्या समाजकारणाचा विचार करतेवेळीं ब्राह्मण–ब्राह्मणेतर प्रश्नाला डावलून भागणार नाहीं. तो प्रश्न महत्त्वाचा नाहीं असें समजणें म्हणजे वस्तुस्थितीकडे डोळेझाक करणेंच होय. ब्राह्मणेतर समाजांत कमालीचें दारिद्र्य आहे. ब्राह्मणसमाज विशेष संपन्न आहे असें नव्हे, परंतु शिक्षणाच्या दृष्टीनें तो समाज अद्याप पुष्कळच पुढें आहे. पांढरपेशा वर्गाबद्दल वैषम्य वाटावें इतकी विषमता आपल्या समाजांत आहे हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. या परिस्थितीला कोण जबाबदार आहे, हा प्रश्न बाजूला ठेवला, तरी दोन्ही समाजांमध्यें भली मोठी खाई निर्माण झालेली आहे हें उघड दिसतें. परिणामतः आमच्या प्रांतांत सामाजिक विषमतेविरुद्ध चळवळी होऊन, जागृति झाली. परंतु परकीयांच्या अमलामुळें त्या जागृतीला एक विशिष्ट प्रकारची विषारी धारहि आली. त्यामुळें एकाच ध्येयानें प्रेरित झालेल्या कार्यकर्त्यांमध्यें नाहक अंतर पडत आहे. समाजक्रांति घडवून आणावयाची असेल तर मध्यमवर्गांतून श्रमजीवी लोकांच्या लढ्यांत आलेल्या कार्यकर्त्यांची आवश्यकता असतेच. आयोजनपूर्वक समाजवादी व्यवस्था निर्माण करावयाची म्हटलें, तरी तें कार्य अशा कार्यकर्त्यांच्या अभावीं यशस्वी होऊ शकत नाहीं. आतांपर्यंत ज्या क्रान्त्या झाल्या त्यामध्यें आपणांस हेंच पहावयास मिळेल. संघटित दलित जनतेच्या सामर्थ्यावर त्या यशस्वी झाल्या असल्या तरी त्यांचें नेतृत्व करण्याचे कामीं वर्गातीत मनोवृत्तीच्या (declassed) मध्यमवर्गीय कार्यकर्त्यांनीं बहुमोल सहाय्य केलें आहे. आपल्या दुर्दैवानें महाराष्ट्रांतील मध्यमवर्ग आणि ब्राह्मण पांढरपेशा वर्ग यांची आतांपर्यंत तरी जवळ जवळ समव्याप्तीच होती असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यामुळें पांढरपेशा वर्गांतून आलेल्या कार्यकर्त्याबद्दल ब्राह्मणेतर श्रमजीवी जनतेला वाटावा तसा आपलेपणा वाटत नाहीं आणि त्यांच्या कर्तृत्वाला आपोआपच एक मर्यादा पडते. समाजाच्या निरनिराळ्या थरांतील अनेक बुद्धिमान आणि कर्तृत्वान तरुणांची एकजूट साधणें अवघड जातें आणि परिश्रम करूनहि व्हावी तशी प्रगति होत नाहीं.

## गाळ खालीं बसून जीवनगंगा निर्मळ होईल

आजच्या महाराष्ट्राला प्रगतीचा पुढचा टप्पा गाठतां येत नाहीं आणि त्याची पिछेहाट झाल्यासारखी वाटते त्याची कारणपरंपरा ही अशी आहे. पूर्वीच्या काळीं पुढाऱ्यांच्यामध्यें तात्त्विक भांडणें नव्हतीं असें नाहीं. परंतु राजकीय जागृतीचें लोण खालपर्यंत गेलेलें नसल्यामुळें एकंदर समाजाला त्या मतभेदांची झळ लागत नसे. आतां जागृति अधिक झालेली असल्यानें या तात्त्विक झगड्याचा परिणाम आपल्या शक्ति विस्कळित होण्याकडे झाला आहे. त्यांतहि वर उल्लेखलेल्या पूर्व-

ग्रहांची भर पडली आहे. सर्व थर ढवळले जाऊन समाजकारणाचा प्रवाह गढूळ झाला आहे. त्यांतील गाळ खालीं बसून स्वच्छ निर्मळ पाण्याची गंगा वाहूं लागली, म्हणजे पुन्हां एक वेळ महाराष्ट्राला मानाचें स्थान प्राप्त होईल. हें महान कार्य चटकन घडवून आणील असा अलौकिक पुढारी आज आपल्यामध्यें नाहीं. परंतु त्यासाठीं खेद करीत बसून चालणार नाहीं. असा पुढारी निर्माण होण्यासाठीं लागणारी भूमिकाच आपण निर्माण केलेली नाहीं असें कां म्हणू नये ? खरें लोकशाही पुढारीपण निर्माण होण्यासाठीं लागणारें वातावरण आज दिसत नाहीं. आपणांपैकीं सर्वांमध्यें एक गंड निर्माण झाला आहे. मी आणि माझा पक्ष हेच काय ते शहाणे आणि गुणवान, बाकीचे सारे मूर्ख, असा वृथाभिमान जोपासला जात आहे. प्रत्येक, बाबतींत माझें म्हणणें शंभर टक्के खरें, ही वृत्ति बळावत आहे. ज्यांच्याशीं ध्येय-धोरणाबाबत मतभेद असतील, त्यांना सारखें पाण्यांत पाहून त्यांचा उच्छेदच केला पाहिजे, असें आहे काय ? विरोधी पक्षाला खऱ्याखोट्या, सूक्तासूक्त मार्गांनीं दडपून टाकण्याचें अधिकारारूढ पक्षाचें धोरण ही वृत्ति वाढविण्यास अधिकच कारणीभूत होत आहे. निरनिराळ्या पक्षांतील पांच पंचवीस प्रमुखांना भेटून एकदम विचारलें कीं, तुमच्या विरोधी गटांतील लोकांनीं केलेल्या कांहीं चांगल्या गोष्टी सांगा, तर त्यांना चटकन त्या सांगतां येतील, असें वाटत नाहीं. कारण दुसऱ्याच्या ठिकाणीं कांहीं गुण आहेत याची कबुली आम्ही मनापासून कधींच देत नाहीं. त्यामुळें त्यांच्याशीं सहकार्य करण्याची आवश्यकता देखील आम्हास फारशी भासत नाहीं. आणि एखाद्या चांगल्या कार्यांत सहकार्य करण्यास कोणी धजावलाच, तर तेथें देखील आपल्याच शहाणपणाचें घोडें दामटून आपण त्याला नाउमेद करण्यास आणि त्या कार्यांत बिब्बा घालण्यास कमी करीत नाहीं. आपली असहिष्णुता ही अशा थराला गेलेली आहे. म्हणून पहिली गोष्ट कोणती करावयाची असेल, तर परमतसहिष्णुता व गुणग्राहकता या गुणांची जोपासना करणें. कारण तोच लोकशाहीचा पाया आहे. एकवेळ असहिष्णु वृत्ति दृढमूल झाली, म्हणजे तात्त्विक मतभेद मिटण्यासारखे असले, अगर मिटले असले, तरी सहकार्य करण्यास मन धजत नाहीं. आपले तात्त्विक मतभेद विसरून जावे, असें कोणीच म्हणणार नाहीं. परंतु बदलती परिस्थिति लक्षांत घेऊन आपल्या ध्येयधोरणाबद्दल विचार करणें आवश्यक नाहीं काय ? असा विचार करून जे एक विचाराचे असतील त्यांनी एकत्र यावयास हवें. ज्यांना लोकशाही समाजवादाशिवाय तरणोपाय नाहीं असें प्रामाणिकपणें वाटत असेल, त्यांनीं एक दिलानें कामास लागलें पाहिजे. आपल्यावरील जबाबदारी ओळखून त्यांनीं तरी आपले पूर्वग्रह विसरले पाहिजेत. परपक्षीयांबद्दल असहिष्णुता नसावी, परंतु धोरण आणि कार्यपद्धति यामध्यें मूलभूत फरक असलेल्यांची देखील एकजूट झाली पाहिजे, असा अनिष्ट हव्यास धरूं नये. अखेरीस महाराष्ट्राचें भवितव्य एकट्या महाराष्ट्रांतील तुमच्याच शक्तीवर अवलंबून आहे, असें समजूं नये. भारतीय, किंबहुना जागतिक, भवितव्याशीं तें निगडित आहे, हें लक्षांत ठेवावें. सर्व शेत बेणून स्वच्छ करण्याची शक्ति नसली, तरी प्रत्येकानें मिशनरी वृत्तीनें कार्य करीत राहिलें पाहिजे. प्रथमतः आपल्या मनापासूनच सुरवात करावी. त्यांत वाढलेलें पूर्वग्रहाचें, आणि सामाजिक उच्चनीचतेच्या भावनांचें तण काढून टाकलें पाहिजे. प्रत्येकानें आपल्या मर्यादित क्षेत्रांत विधायक आणि लढाऊ कार्यक्रमाच्या द्वारा जनमनाची मशागत करून त्यांतील तण काढून टाकणें आवश्यक आहे. जाति-जमातींचीं डबकीं फोडून एकजिनसी समाज आपणास निर्माण करावयाचा आहे. कार्य डोंगराएवढें आहे. परंतु त्याच्या विशालतेनें घाबरून जातां उपयोगी नाहीं. निष्ठेनें आणि चिकाटीनें प्रयत्न करीत राहिल्यास हळुहळू जीवनप्रवाह निर्मळ होत जाऊन महाराष्ट्राचें भवितव्य उज्ज्वल होईल.

: २१ :

# लोकशिक्षणानेंच महाराष्ट्राची प्रगति होईल!

◆ लेखक : **गोवर्धन पारीख** ◆

१. श्री. गोरे यांच्या अनावृत पत्राचा रोख महाराष्ट्राच्या आजच्या राजकीय मागासलेपणाकडेच आहे. राजकीय दृष्ट्या महाराष्ट्राची दिवसेंदिवस पिछेहाट होत आहे याबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं, असा त्यांच्या म्हणण्याचा आशय आहे. तथापि ही गोष्ट केवळ गृहीत न धरतां पत्राच्या पूर्वार्धात त्यांनीं ती सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. मागासलेपणाची कारणमीमांसा करून त्यावर समाजवाद हा उपायहि त्यांनीं सुचविला आहे. तथापि प्रस्तुत प्रश्नाची विस्तारश: चर्चा व्हावी; त्यांतून महाराष्ट्राचें खडतर भवितव्य टाळतां येण्याजोगा उपाय सांपडावा व तो प्रत्यक्ष आचरणांत आणला जावा यासाठीं त्यांनीं इतरांस चर्चेस पाचारण केलें आहे. पत्राच्या मुळाशीं अशा प्रकारें अत्यंत चांगला हेतू आहे यांत संशय नाहीं. परंतु तो मान्य करून देखील पत्रांतील विचार पद्धति, विवेचन व अनुमानें याबाबतींत मतभेद होणें शक्य आहे.

## चर्चेला पडलेल्या अनिश्चित मर्यादा

२. श्री. गोरे यांच्या पत्रांतील मांडणीमुळें कांहीं अंशीं चर्चेला मर्यादा घातल्यासारखी अवस्था निर्माण झाली आहे. आतांपर्यंत झालेल्या चर्चेवरून हीच गोष्ट, कांहीं थोडेसे अपवाद वगळल्यास, स्पष्ट होते. बहुतेकांचें लक्ष महाराष्ट्र खरोखरच मागें पडला आहे किंवा नाहीं, महाराष्ट्राबद्दल अशा प्रकारें स्वतंत्रपणें विचार करणें युक्त कीं अयुक्त, आणि समाजवाद हा योग्य उपाय म्हणतां येईल काय इत्यादि दोनतीन प्रश्नांवरच केंद्रित झालें आहे. हे प्रश्न महत्त्वाचे आहेत यांत शंका नाहीं. तथापि मागासलेपणा म्हणजे राजकीय मागासलेपणा असें समीकरण गृहीत धरल्यामुळें महाराष्ट्रतील जीवनाची सर्वांगीण चिकित्सा प्रस्तुत चर्चेत फारशी प्रकट झालेली नाहीं, असें म्हणावें लागतें. किंबहुना यापुढें जाऊन असेंहि म्हणतां येईल कीं, राजकीय मागासलेपणाचा देखील एक विशिष्ट अर्थ चर्चेत अभिप्रेत आहे. हिंदुस्थानच्या आजच्या राजकीय जीवनांत कांहीं अन्यप्रांतीयांना असलेलें मानाचें व पहिल्या प्रतीचें स्थान कोणाहि महाराष्ट्रीयाच्या वांट्यास आलेलें नाहीं, हा तो अर्थ होय. निरनिराळ्या कारणमीमांसेंत फरक आढळतील परंतु अनेकांच्या लेखनांत हीच कल्पना मध्यवर्ति आहे. मात्र त्यामुळें चर्चेच्या मर्यादा निश्चित झाल्या आहेत, असें म्हणतां येत नाहीं.

## चुकीचें गृहीतकृत्य

३ राजकीय मागासलेपणावरच सारें लक्ष केंद्रित करावयाचें असल्यास त्यासाठीं एक गृहीत कृत्य मान्य करणें आवश्यक आहे. एकाद्या समाजाचा आर्थिक, सामाजिक, कलात्मक, सांस्कृतिक इत्यादि विविध जीवनक्षेत्रांतील विकास हा राजकीय विकासावरच अवलंबून असतो; राजकीय विकासावांचून तो संभवतच नाहीं, हें मान्य

केल्यावांचून राजकीय जीवनावरच सारें लक्ष केंद्रित केलें पाहिजे, असा आग्रह धरणें इष्ट होणार नाहीं. हें गृहीतकृत्य गेल्या शंभर वर्षांत पुढें आलेल्या विचारसरणी व विशेषत: मार्क्सवाद, यांचा परिणाम आहे. तथापि त्याला गृहीतकृत्य म्हणण्याचें कारण असें कीं इतिहासांत त्याला फारसा आधार नाहीं. उलट तें चुकीचें आहे असें दर्शविणारीं अनेक उदाहरणें आढळतात. आजच्या पाश्चात्य संस्कृतीचा जेथून प्रारंभ झाला असें मानलें जातें त्या युरोपीय पुनरुज्जीवनाच्या चळवळीच्या काळांतील इटलीचा राजकीय इतिहास पाहिल्यास हें सहज ध्यानांत येईल. अधिक विस्तारानें त्यासंबंधीं चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. अगदीं जवळचें व ताजें उदाहरण ध्यावयाचें झाल्यास, देशाला मिळालेलें स्वातंत्र्य हा राजकीय विकासांतील अत्यंत महत्वाचा टप्पा होय, ही गोष्ट सर्वमान्य होईल. परंतु त्यायोगें नवा समाज, नवें जीवन निर्माण करण्याची शक्यता व आशा बळावण्याऐवजीं चोहोंकडे ऐकूं येणारें व प्रत्यहि वाढत जाणारें गोंधळाचें वातावरण व निराशेचे उद्‌गार काय सुचवतात? तात्पर्य वरील गृहीतकृत्य तपासून पहाण्याची गरज चोहोंकडे आज निर्माण झाली आहे.—आणि तिचे पडसाद अनेक विचारवंतांच्या लेखनांत उमटत आहेत. म्हणून हें गृहीतकृत्य मला मान्य नाहीं. त्याऐवजीं समाजजीवनाच्या निरनिराळ्या बाजूंचा विकास हा परस्परपूरक व परस्परावलंबी आहे; त्यांतील कोणत्याहि विशिष्ट बाजूला अवास्तव महत्व देणें अयोग्य आहे, ही कल्पनाच अधिक शुद्ध व सत्य आहे असें म्हणतां येईल. महत्व द्यायचेंच म्हटलें तर तें सांस्कृतिक विकासाला देणें अधिक उचित होय असें वाटतें. प्रस्तुत मुद्याची यापेक्षां अधिक चर्चा येथें करतां येणार नाहीं.

## चर्चा सांस्कृतिक दृष्टिकोनांतून झाली पाहिजे

४. राजकारणाचा संबंध जीवनाच्या इतर सर्व निरनिराळ्या बाजूंशीं येतो. त्यामुळें राजकीय प्रश्न त्यांपासून अलग करून त्याचा विचार केल्यास त्यांत दोष निर्माण होण्याचा संभव अधिक व अधिक निश्चित आहे. केवळ आर्थिक घटनांच्या आधारें राजकारणाचा उलगडा करूं पहाणें, हेंहि बऱ्याच अंशीं उपयुक्त असलें तरी, पूर्णपणें समाधानकारक नाहीं. उदाहरणार्थ देशाच्या राजकारणांत गेल्या तीस वर्षांत अत्यंत प्रभावी ठरलेली व्यक्ती—महात्मा गांधी—हे या अर्थमूलक चिकित्सेच्या चौकटींत बसूं शकत नाहींत. कोणी दुराग्रहानें प्रेरित होऊन त्यांना भांडवलदारांचे प्रतिनिधी म्हणून म्हणतील; परंतु ही गोष्ट सिद्ध करणें अत्यंत कठिण, किंबहुना अशक्य, आहे. म्हणून समाजाच्या सर्वांगीण जीवनाचा विचार केल्यावांचून त्याच्या राजकीय अवस्थेबद्दल अनुमान काढणें आणि तेंहि भविष्याविषयीं, ही गोष्ट धोक्याची म्हटली पाहिजे. तात्पर्य, राजकीय प्रगति अथवा मागासलेपणा यांबद्दलची चर्चा व्यापक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोणांतूनच व्हावयास पाहिजे. त्यावांचून जीवनाचा अर्थ योग्य रीतीनें समजणें कठीण आहे.

## सामाजिक विघटनाचीं चिन्हें

५ वरील दृष्टिकोणांतून विचार केल्यास पत्रांतील प्रश्न मर्यादित स्वरूपाचा व सदोष वाटतो. महाराष्ट्राचें भवितव्य खडतर आहे व त्यांतून मार्ग काढणें अत्यावश्यक आहे यांत शंका नाहीं. तथापि याचा अर्थ परप्रांतीयांचें वर्चस्व महाराष्ट्रावर वा देशाच्या राजकारणांत होण्याचा संभव आहे, म्हणून हें भवितव्य खडतर आहे असा मात्र नव्हे. देशांतील निरनिराळ्या प्रांतांच्या ठिकाणीं परस्परांविषयीं दिसून येणारा अविश्वास व त्याचा अनेकवार द्वेष, कलह इत्यादि स्वरूपांत होणारा आविष्कार हें सामाजिक विघटनाचेंच एक चिन्ह आहे. वास्तविकपणें हे सारे प्रांत एकाच राज्याचे घटक आहेत. एकाच मूलभूत कायद्यानें रहाणार आहेत. असें असतां परस्पराविषयींच्या शंका, संदेह, अथवा बेपर्वाईचें वर्तन काय दर्शवितात ? या

सर्वांच्या मुळाशीं मध्यवर्ति राज्य हें फारसें स्थिर स्वरूपाचें असणार नाहीं, हीच कल्पना नाहीं काय ? त्यांवांचून तांत्रिक प्रांतिक प्रश्नांना आज दिलें जाणारें महत्त्व व त्यांतून निर्माण होत असलेले कलह यांचा योग्य अर्थ लागणें कठीण आहे. नव्या राज्यघटनेंत दिसून येणारी सत्तेच्या केंद्रीकरणाची प्रवृत्ती हा यावर अगदीं मामुली, तांत्रिक व परिणामीं अत्यंत धोक्याचा असाच उपाय म्हटला पाहिजे. त्यांतून सामाजिक विघटनाच्या ( Social dissolution ) काळांत सामान्यत: उद्भवणारी हुकूमशाहीच वाढीस लागण्याचा संभव आहे. जुन्या नैतिक बंधनांत निर्माण झालेला विस्कळितपणा, त्यांचें नाहींसें झालेलें परंपरागत वैचारिक अधिष्ठान, देशांतील जनतेंत असलेला राज्यव्यवस्थेच्या दृष्टीनें आवश्यक प्राथमिक एकजिनसीपणाचा ( basic homogeneity ) अभाव, नव्या विचारांनीं मूळ न धरणें इत्यादि अनेक कारणें या विघटनाच्या मुळाशीं आहेत.

## देशाचा आणि महाराष्ट्राचा प्रश्न एकच

६ वर उल्लेख केलेल्या परिस्थितींत सर्व देशाचेंच भवितव्य खडतर आहे. आजच्या अवस्थेंत आशेचीं किरणेंच मुळीं थोडीं व फार क्वचितच आढळतात. महाराष्ट्र हा देशाचाच एक घटक असल्यामुळें त्याच्याहि भवितव्याबद्दल फारशी आशादायक परिस्थिति आढळूं नये हें या दृष्टीनें स्वाभाविकच आहे. देशाचा सर्वसामान्य प्रश्नच महाराष्ट्राच्या विशिष्ट परिस्थितींत प्रतिबिंबित झालेला आहे. ‘ महाराष्ट्राचीं तीन शकलें ’ या शब्दप्रयोगानें अनेकवार सूचित केला जाणारा ब्राह्मण–ब्राम्हणेतर–अस्पृश्य वाद हें तें प्रतिबिंब होय. येथेंहि समानता, सामान्य मूल्यें, सामान्यत: एकत्र परस्पर सहकार्यानें रहावयास आवश्यक असलेला दृष्टिकोण, समान गृहसंस्कृती इत्यादींचा अभावच आहे. त्यामुळें ‘ महाराष्ट्र ’ या शब्दप्रयोगानें जर महाराष्ट्रांतील सारीं माणसें असा अर्थ अभिप्रेत असेल तर वरील विचार मान्य करणें आवश्यक आहे. तात्पर्य मूलभूत राजकीय प्रश्न हा देशाचा आणि महाराष्ट्राचा एकच आहे. त्यांत फरक करण्यास फारशी जागा आहे असें वाटत नाहीं. प्रस्तुत चर्चेच्या बाबतींत उत्पन्न होणारी ही अडचण महत्त्वाची आहे. ती ध्यानांत न घेतल्यास चर्चेत फारसें स्वारस्य उरणार नाहीं. महाराष्ट्रांत फारशी आर्थिक वा सामाजिक विषमता नाहीं हें म्हणणें थोडेसें धाडसाचेंच आहे. सांस्कृतिक, सामाजिक दृष्ट्या महाराष्ट्रीयांतील समानता अजून निर्माण व्हावयाची आहे. श्रीमंत वर्गांत जरी बरेच परप्रांतीय मोडत असले तरी त्यांना वगळून देखील उरणाऱ्या समाजांत आर्थिक विषमता नाहीं असें म्हणतां यावयाचें नाहीं.

## हा महाराष्ट्र कोणता ?

७. ‘महाराष्ट्र राजकारणांत मागें पडला आहे’ या विधानांत दोन तीन प्रश्नांचा समावेश होतो, एक म्हणजे महाराष्ट्र कोणास म्हणावयाचें हा प्रश्न होय. उदाहरणार्थ, “ आतां आमची भवितव्याची गाडीच कायमची चुकून इतरांच्याकडे खटपटे, आचारी, पहारेकरी म्हणून रहाण्याची पाळी आमच्यावर येईल असें मला वाटतें ” हें श्री. गोरे यांचें विधान कळकळीचें असलें तरी, मनांत संशय उत्पन्न केल्यावांचून रहात नाहीं. अत्यंत मोठ्या बहुसंख्येनें महाराष्ट्रीय आज या किंवा यासारख्याच अवस्थेंत आहेत. नव्यानें प्रसंग आलाच तर तो मूठभर लोकांवरच येणार आहे. त्यालाच भवितव्याची गाडी चुकली असें म्हणावयाचें कीं काय ? इतिहास अशा प्रकारें एकाद्या गाडीप्रमाणें जातो, ज्यांना जागा मिळाली ते पुढें जातात, व ज्यांची गाडी चुकेल ते मागेंच रहातात ही कल्पना अपुरी व अयोग्य आहे. गाडी चुकलेले किंचित काळ मागें पडल्यासारखे जरी दिसले तरी त्यांची पुढें जाण्याची शक्यता कोणीहि नाहींशी करूं शकत

नाहीं. माणूस हा ऐतिहासिक शक्तींच्या हातांतील बाहुलें नसून तो त्यांचा निर्माता आहे. महाराष्ट्रीय हा कांहीं याला अपवाद नव्हे.

## ' मागें पडणें ' व ' पुढें जाणें '

८. वर विवेचन केलेल्या विधानासंबंधींचा दुसरा प्रश्न 'मागें पडणें' किंवा 'पुढें जाणें' यासंबंधींचें गमक कोणतें हा होय. राजकीय दृष्ट्या जरी विचार करावयाचा म्हटलें तरी देखील हें गमक सत्तासंपादनाचें नसून संवादी जीवन (harmonious Existence) निर्माण करणें हेंच म्हणतां येईल. हें संवादित्व प्रत्येक व्यक्तीच्या आंतरजीवनांत त्याचप्रमाणें बाह्य परिस्थिति व समाज यांच्याशीं असलेल्या संबंधांत निर्माण होणें आवश्यक आहे. आजवरच्या अनेक पुढें आलेल्या विचारसरणींत केवळ दुसऱ्याच बाजूवर भर दिला गेला आहे. त्यामुळें राजकीय जीवनांत एकांगीपणा निर्माण झाला आहे. तें बदसूर झालें आहे. व त्याचे दुष्परिणाम आजच्या जगाला भोगावे लागत आहेत. प्रस्तुत प्रश्नाचें विस्तारानें विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. चर्चेंत गमक निश्चित झालेलें नाहीं एवढाच मुद्दा विचारांत घेतला म्हणजे पुरे ! गमक निश्चित झाल्यावरहि आणखी एक प्रश्न शिल्लक रहातोच. तो म्हणजे 'मागें पडणें' या कल्पनेच्या अर्थाबद्दलचा होय. याचा अर्थ पंचवीस वा पन्नास वर्षांपूर्वींच्या महाराष्ट्राच्या मानानें आजचा महाराष्ट्र मागें पडला असा समजावयाचा कीं आजच्याच परिस्थितींत तो मागें पडला आहे असें मानावयाचें ? विवेचनांत दोन्ही दृष्टी अभिप्रेत आहेत. तथापि त्यांतील गमक हें सत्तेच्या राजकारणांतील गमक आहे. राजकारण म्हणजे सत्तेचें राजकारण हें समीकरण गेल्या तीनचारशें वर्षांत विशेष प्रामुख्यानें पुढें आलें आहे. मॅकेव्हलीनंतरचा काळ हा या समीकरणाचा खरा काळ होय. त्यायोगें राजकीय जीवनांत तत्व व व्यवहार यांची पूर्णपणें 'फारकत' झाल्याचें आढळतें. हें समीकरण त्याज्य म्हणून टाकून देण्याची, चुकीचें म्हणून वर्ज्य करण्याची वेळ आतां आली आहे. याठिकाणीं "प्रत्येक राजसत्ता ही प्रस्थापित होतांच आपल्या विनाशाचीं कारणें निर्माण करूं लागते" हें स्वतः मॅकेव्हलीचें म्हणणें ध्यानांत ठेवणें जरूर आहे.

## समाजवादानें प्रश्न सुटेल ?

९. महाराष्ट्राची आजची परिस्थिति सुधारण्याच्या दृष्टीनें समाजवाद हा उपाय सुचविण्यांत आला आहे. याबाबतींत पहिली महत्त्वाची अडचण म्हणजे एकाद्या प्रांतापुरता हा उपाय अंमलांत आणतां येईल ही कल्पना सदोष व चुकीची आहे. यावर रशियानें एका राष्ट्रापुरता प्रयोग केला कीं नाहीं अशी शंका घेण्यांत येईल. परंतु हें म्हणणें समाधानकारक नाहीं. एक तर राष्ट्र व प्रांत यांत या दृष्टीनें महत्वाचा फरक आहे. व दुसरें म्हणजे रशियन प्रयोगाच्या परिणामाबद्दल आजचें विचारी जग बरेंच साशंक आहे. साम्यवाद (Communism) हा अतिरेकी मार्ग म्हणून स्वतः गोऱ्यांनीं वर्ज्य ठरविला आहे. तो वर्ज्य ठरविण्यांस बरींच वैचारिक, तार्किक व अनुभवात्मक कारणेंहि आहेत. तथापि दुसऱ्या महायुद्धांत होरपळून निघालेलें जग हें समाजवादाबद्दलहि साशंक झालें आहे. वर्गयुद्धापेक्षां वेगळें समाजरचना बदलण्याचें तंत्र, सर्वंकष मध्यवर्ति आर्थिक नियोजनापेक्षां निराळी अर्थव्यवस्था, दलितवर्गाच्या नांवानें सत्ता हस्तगत करण्यापेक्षां निराळा राजकीय मार्ग हीं समाजवादाला अजून दाखवावयाचीं आहे. याहीपुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं प्राथमिक वा मूलभूत मूल्यांच्या दृष्टीनें विचार केल्यास समाजवाद व लोकशाही हे विचारच मुळीं परस्परांहून भिन्न व विरोधी स्वरूपाचे आहेत. एकांत 'समाज' हें तें मूल्य आहे तर दुसऱ्याचा भर हा व्यक्तीवर आहे. मूल्यांच्या दृष्टीनें दुसरी विचारसणी हीच अधिक सत्य, शुद्ध व योग्य आहे. सुविख्यात मानसशास्त्रज्ञ युंग यांनीं म्हटल्याप्रमाणें व्यक्ति हीच जीवनसरित् पात्र आहे. तिचेंच मूल्य प्राथमिक आहे. समाज ही

एक अव्यक्त कल्पना आहे. व्यक्तीच्या जीवनाला म्हणजेच विकासाला त्याची गरज आहे यांत शंका नाहीं. अगदीं प्राणवायु–ऑक्सिजन–इतकी महत्त्वाची ती गरज आहे हें जरी मान्य केलें तरी देखील जसें प्राणवायूला प्राथमिक मूल्याचें स्थान देतां येत नाहीं तसें तें समाजालाहि देतां येणार नाहीं. तात्पर्य समाजवाद व लोकशाही हा पवित्र विवाह नसून तें एक सोयीचें ( Companianate ) लग्न आहे. व्यक्ति व समाज यांचा मानवी विकासाच्या दृष्टीनें योग्य संबंध दर्शविण्याचें कार्य समाजवाद करूं शकत नाहीं असें अनुमान आज अनेक विचारवंत काढूं लागले आहेत. साधनांच्या मर्यादांसंबंधीं लिहितांना " यानंतर **यावच्छक्य** लोकशाहीच्या मार्गानींच आपणाला जावयाचें आहे" असें श्री. गोरे म्हणतात याचा अर्थ तरी कसा लावावयाचा ? तात्पर्य, वरील संबंध योग्यरीतीनें सांधण्याचें कार्य विकसित लोकशाहीचा विचारच करूं शकेल. कारण त्याचा पाया तर्कशुद्ध व नैतिक आहे.

## सर्व मूल्यें तपासण्याची वेळ

**१०.** " विचारवंतांनीं एकत्र येऊन अंतःकरणाच्या तळमळीनें विचार करावा " हें अत्यंत आवश्यक आहे यांत शंका नाहीं. तथापि "पुढच्या पांचपंचवीस वर्षांत देशाची प्रगति कोणीकडे होईल त्याची स्थूल आंखणी नजरेसमोर आणून" महाराष्ट्राचें स्थान निश्चित करण्याची कल्पना मात्र बरीच धाडसाची आहे असें म्हणावें लागतें. वास्तविक प्रश्न सर्व देशाचा व त्याबरोबरच महाराष्ट्राचा आहे. त्याचें सामान्य स्वरूप एकच आहे. त्यासंबंधीं सामान्य दिग्दर्शन वर आलेंच आहे. 'कांहीं किमान बाबतींत एकमत' शोधण्याची ही वेळ नसून सारीं मूल्यें वा आदर्श चिकित्सक दृष्टीनें तपासून पहाण्याचा हा काळ आहे. गेल्या दहावीस वर्षांतील इतिहासानें आमची कितीतरी वेळां फसवणूक केली आहे. त्यापासून उचित तो बोध घेण्याची जरूरी आहे. एकादी अर्थव्यवस्था नष्ट करून तिच्याऐवजीं दुसरी निर्माण करणें, राज्यकर्ते बदलून नवे राज्यकर्ते त्यांच्या ठिकाणीं आणणें अशा प्रकारें केवळ आर्थिक वा राजकीय पातळीवर सोडवण्यासारखा आमचा आजचा प्रश्न नाहीं. समाजरचनेचा नैतिक पायाच आज हळुहळू ढासळूं लागल्यासारखा दिसत आहे. गोंधळ, अराजक हीं चोहोंकडे प्रत्यहीं वाढत आहेत. त्याचाच परिणाम म्हणून हुकूमशाहीहि वाढीस लागल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. ही परिस्थिति टाळावयाची असल्यास मिळालेल्या स्वातंत्र्याचा पाया घालण्याचें कार्यच आज केलें पाहिजे. या दृष्टीनें रचनात्मक कार्य करावें, सत्तेच्या राजकारणांत वाहून जातां कामा नये, हा अनेकांनीं सुचविलेला उपाय योग्य वाटतो. तथापि रचनात्मक कार्याचा आरंभ देखील मनोरचनेपासूनच होतो. बाह्य गोंधळ हा बऱ्याच अंशीं तरी आंतल्या गोंधळाचाच आविष्कार आहे. तो नष्ट व्हावा अशी इच्छा असल्यास परंपरागत व नवनिर्मित अभिमान व त्यापासून निर्माण होणारे विकार यांच्या पकडींतून आमची प्रथम मुक्तता होणें आवश्यक आहे. निरनिराळे भेदाभेद व त्यांतून निर्माण होणाऱ्या अहंकाराच्या धुक्याचा भेद करून सर्वांना हितावह जीवनानुकूल असा टिकाऊ स्वरूपाचा आधार वा अधिष्ठान शोधणाऱ्या व त्यावर नवरचना करण्याचा मार्ग दर्शविणाऱ्या वैचारिक व सामाजिक आंदोलनांची आज खरी गरज आहे. महाराष्ट्र इतरांप्रमाणेंच ही गरज पुरी करण्यास समर्थ आहे. ती पुरी करण्यास उद्युक्त झालेले विवेकशाली, विचारी, निष्ठावान महाराष्ट्रीय अधिकाधिक संख्येनें निर्माण होण्यावरच महाराष्ट्राच्या भवितव्याबद्दलची शाश्वती अवलंबून आहे असें वाटतें. या बाबतींत स्पष्ट सूचनाहि करणें शक्य आहे. तथापि त्यांचा विस्तारानें ऊहापोह येथें करतां यावयाचा नाहीं.

## 'चांगलीं माणसें' हवीं

**११.** पक्ष व सत्ता हें केवळ प्रांतिक वा राष्ट्रीय पातळीवर आढळणारे दोष आहेत असें समजण्याचें कारण नाहीं. ह्या दोन शक्ति समाज-

जीवनाच्या खालपासून वरपर्यंत सर्व पातळीवर आढळून येतात. एखाद्या लहानशा खेड्याचा वा शहराचा विचार करावयाचा म्हटलें तरी देखील तेथें दिसणारे गट, व ग्रामसंस्था काबीज करण्याची वृत्ती या स्वरूपांत त्यांचा आविष्कार होत असलेला आढळतोच. गटबाजी आणि सत्ताभिलाष हीं नवसंस्कृतीचीं शापग्रस्त तत्त्वें आहेत. माणसाचा बुद्धिप्रकाश, गुणांची आवड, गुणोत्कर्षाची महनीयता यांना सामाजिक जीवनांत मुख्य व अद्वितीय स्थान आहे; याचा वरील तत्वांमुळें विसर पडला आहे. चांगला शिक्षक, चांगला डॉक्टर, चांगला शेतकरी, चांगला दुकानदार, चांगला कारागीर, वा चांगली नर्स यांना 'चांगलीं माणसें' होण्याचें वा असण्याचें महत्व वाटेनासें होऊं लागलें आहे. गट आणि सत्ता यांच्या निरपेक्ष एकमेकांना सहाय्य करण्याची सहानुभूति व्यक्त करण्याची कल्पनाच यामुळें सामाजिक जीवनांतून नष्ट झाली आहे. कारण गट आणि सत्ता यांच्या योगानें वास्तविक गुण आणि वास्तविक उंची वाढविण्याची गरज नाहींशी होते. व्यक्तित्वाच्या अस्सल विकासाची आवश्यकता वाटत नाहीं. आणि मोठेपणाचे आभास निर्माण करून खोटे देव बनवितां आणि मिरवितां येतात. कलैव्याचें आच्छादन करतां येतें. सृजनशीलतेचा आनंद स्वयंपूर्ण असतो. देखावा आणि प्रदर्शन याची त्याला गरज नसते. यांच्यापासून पराङ्मुख होण्यांतहि तो धन्यता मानतो. कीर्ति आणि स्तुति हा त्याचा अलंकार आहे, प्राण नव्हे. गट आणि सत्ता यांच्याकडे ओढा निर्माण करणाऱ्या सर्व चळवळी माणसाला मायिक थोतांडाकडे, मृगजलाकडे नेत आहेत. अस्सल मानवी गुणांची उपासना हेंच साधन आणि साध्य आहे. लोकशिक्षणाचा हाच आधारस्तंभ झाला पाहिजे. कारण लोकशिक्षण हेंच महाराष्ट्राला पुढें नेईल. महाराष्ट्राला जें पुढें नेईल तेंच सर्वांना पुढें नेईल. सर्वांचा जो प्रश्न तोच महाराष्ट्राचाहि खरा प्रश्न आहे.

# : २२ :

# महाराष्ट्र मागें कां पडला व त्याचे पुढें काय?

★ लेखक : **प्रा. श्रीकृष्ण व्यंकटेश पुणतांबेकर** ★

## अनेक विचार व अनेक सूचना

कोणी म्हणतात, महाराष्ट्र मागें पडला तो त्याच्या राजकारणामुळें, व गांधीविरोधामुळें; तेव्हां सर्वच राजकारण आतां पुरे, व यापुढें सामाजिक सहकारी चळवळ हातीं घ्यावी. कोणी म्हणतात, महाराष्ट्रीयांचा विशिष्ट स्वभाव, अहंमन्यता व तुटकपणा, यांच्यामुळें तसें झालें. तेव्हां ती वृत्ति सोडून सर्वांनीं एकत्र यावें. कोणी सांगतात, त्याच्या जातीयतेमुळें असें घडलें! तेव्हां सर्व जाती नष्ट कराव्या व सर्रास विवाह करावे. कोणी सांगतात, त्याची भूमिका केवळ विध्वंसक टीकेची आहे. तेव्हां त्यानें विधायक कार्यक्रम हातीं घ्यावा. कोणी म्हणतात, त्याच्या सनातन वृत्तीमुळें असें झालें. तेव्हां समाजवादाची कास धरावी व स्थापना करावी. कोणी म्हणतात परकीय व्यापारी व भांडवलवाले यांच्या द्रव्यशोषणानें हें घडलें.

तेव्हां व्यापार व उद्योगधंदे हातीं घ्यावे. को मागतात, महाराष्ट्रीय विकृत मनोवृत्ति सोडून हिंदी मनोवृत्ती पत्करण्यानेंच पुढें जाईल. तसें कोणी म्हणतात, प्रथम निराशावाद सोडला पाहि कोणी सांगतात, अखंड महाराष्ट्राची माग सोडून गुजराथ–महाराष्ट्राचें एकीकरण केल्या तो पुढें जाईल. कोणाला सत्तेचें राजकार नको, केवळ संस्कृत विचाराचें शिक्षण पाहि कोणाला राष्ट्रीयता पाहिजे, प्रांतीयता नक विधायक कार्य हवें, सत्तालोलुप पक्षाभिमा नको. असे अनेक विचार व सूचना आपल्यामध प्रसृत आहेत.

## भोवतालचें जग व आम्हीं

माझ्या मतें या प्रत्येक विचारसरणीं एकांगीपणा व अपुरेपणा आहे. इत प्रांतांच्या तुलनेनें महाराष्ट्र मागें पडलेला नाह इतरांबरोबर त्यालाहि तसेंच भवितव्य आहे. स देशच विद्येच्या, शास्त्रांच्या, यांत्रिकतेच्य संपत्तीच्या उत्पादनाच्या, शिक्षणाच्या, का क्षमतेच्या व स्वतंत्र विचाराच्या दृष्टीनें मा आहे, ही जाणीव प्रथम झाली पाहिजे. आपल भोवतालच्या जगांत नव्या सुधारणा व न सुधारक, नव्या कल्पना व नवे नेते यांचें प्राब झालें आहे. त्यांतील लोक स्वार्थत्यागी, साहस व महत्त्वाकांक्षी आहेत. ते अनेक शास्त्रीय यांत्रिक, बौद्धिक व नैतिक, सामाजिक, शासनि व आर्थिक प्रयोग करीत आहेत व तदनुसा योजना आंखीत आहेत. त्यांचें मानसिक सामथ व कर्तबगारी फार मोठी आहे. त्यांचें ज्ञान विद्वत्ता, त्यांचे शोध, शौर्य व धैर्य, त्यांचें ध्ये व धोरण, हीं व्यापक आहेत. या दृष्टीनें विचा केला असतां केवळ गत वैभवाच्या व परंपरेच्य भांडवलावर वर्तमान संकटाचें निराकरण, किंव भावी ध्येयाचें संपादन होणार नाहीं. तद्व केवळ परकीयांच्या संस्था व वाद यांचें अनुकरण करूनहि होणार नाहीं. स्वतंत्र विचार, अनुभ व योजना यांच्या योगानें प्रत्येक पिढीला आपलें खरें वैभव राखून त्याला नव्यानें उजळा दिला पाहिजे. केवळ अनुकरणशील व तर्कमूलक, विरोधात्मक व विध्वसंक अशा वृत्तीनें कांहीं होणार नाहीं. समाजाच्या धारणेला विधायक वृत्ति व व्यक्तीच्या सुधारणेला शीलवान नेते मिळाले पाहिजेत. केवळ अनुकरणवाद, इतिहासवाद, समाजवाद, दैववाद हे घातक आहेत.

## वणिग्वृत्तीची आवश्यकता

आज आपण महाराष्ट्राचा विचार त्याच्या खंडित भूगोलाच्या दृष्टीनें करीत नाहीं. त्याचा साकल्यानें व त्यांतील जनतेच्या दृष्टीनें करीत आहोंत. तरी पण महाराष्ट्र अखंड राहणें हें त्याच्या भवितव्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे. त्याच्या जीवनाचा आर्थिक पाया मजबूत पाहिजे. व त्याचें आर्थिक क्षेत्र विस्तृत पाहिजे. त्यांच्या सहाय्यानेंच त्याच्या वैयक्तिक गुणांचा व सामुदायिक जीवनाचा परिपोष होणार आहे. महाराष्ट्राला जर आज एका अधिक गुणाची आवश्यकता असेल, तर ती वणिक्वृत्तीची. तिच्या अभावामुळें, परप्रांतीयांचें राजकारणांत व अर्थकारणांत प्राबल्य वाढलें आहे. केवळ ज्ञाननिष्ठा, क्षात्रवृत्ती व श्रमक्षमता असून भागणार नाहीं. उद्योग व व्यापार यामध्यें आपली भगीदारी व स्वामित्व पाहिजे. महाराष्ट्राच्या प्रकृतीचें स्वरूप ठरवून आपल्याला त्याच्या प्रगतीचीं मूल्यें व मोल ठरविलीं पाहिजेत. मात्र व्यक्तिजीवनाच्या वृद्धिक्षयाच्या कल्पना व उपमा समाजाच्या उत्कर्षापकर्षांना सांगोपांग लावणें चुकीचें आहे. व इतिहासाच्या दृष्टीनें तें फारसें उपयोगीहि पडत नाहीं. कोणताहि समाज निस्तब्ध व गोठलेला आहे, कीं पुढें जात आहे, हे ठरविणें शास्त्रज्ञाच्या व तत्त्वज्ञाच्या दृष्टीवर व तारतम्यावर अवलंबून असतें. त्याला एक कीं अनेक कारणें आहेत व तीं भौगोलिक, वांशिक, आर्थिक, बौद्धिक, नैतिक अथवा राजनैतिक आहेत, हें सांगणें कठीण आहे.

## महाराष्ट्र आहे तरी कसा ?

आजचा महारराष्ट्र जगांतील प्रौढ व प्रबल

राष्ट्रांच्या दृष्टीनें मागें पडलेला आहे. याकरतां त्याची आर्थिक स्थिति, त्याचें राजकारणांतील स्थान व नेतृत्व, त्याच्या बौद्धिक हालचाली व त्याचे शास्त्रीय शोध, त्याच्या नैतिक चळवळी व सामाजिक संघटन आणि त्याची एकंदर सांस्कृतिक स्थिति व ऐहिक प्रगति या सर्वांगाचा आपणांस विचार केला पाहिजे.

ज्या गोष्टींमुळें मुख्यतः कोणत्याहि प्रादेशिक लोकसमूहाला विशिष्ट वळण लागतें त्या म्हणजे त्याची प्रादेशिक रचना, आर्थिक घटना, ऐतिहासिक परंपरा, राजकीय परिस्थिति, सांस्कृतिक संपर्क व संघर्ष आणि ह्या सर्वांच्या योगानें उत्पन्न झालेला स्वभावविशेष व दृष्टिकोण, आणि बनलेली समाजव्यवस्था ह्या होत. पण त्याचा उदय व उत्कर्ष, पतन व प्रगति कोणत्या कारणानें होतात, याचें रहस्य उलगडणें कठीण आहे. जे एकच कारण व एकच मार्ग घेऊन बसतात ते एकांगी व अवास्तव असतात. त्याचा बोध होण्यास अनेक बाबींचा, प्रसंगांचा व कारणांचा विचार करावा लागतो. वांशिक, धार्मिक, आर्थिक अथवा राजकीय अशा एकांगी व एकांतिक स्वरूपाच्या तत्त्वसूत्रावर व विचारसरणीवर माझा विश्वास नाहीं. महाराष्ट्रभूमि विपुल साधनांनीं युक्त, उत्पादनक्षम, शक्ति व उत्साह देणारी आहे. ती आळस, दीनता व दारिद्र्य वाढविणारी नाहीं. महाराष्ट्रीय लोक उद्योगी, साहसी, कल्पक, कलावान्, बुद्धिमान व अयोग्य बंधनें तोडणारे आहेत. ते आळशी, घरबसे, फाजिल संतुष्ट वृत्तीचे व नुसतें अनुकरण करणारे नाहींत. तसेंच, असेल तेंच रक्षण करीत बसणारे नाहींत. ते ध्येयनिष्ठ, बुद्धिनिष्ठ व कार्यनिष्ठ आहेत. त्यांची दृष्टि भावी जगाकडे लागली आहे. असें असून सुद्धां त्यांची वाढ व विकास सर्व अंगांनीं झालेला नाहीं. त्यांच्यामध्यें शौर्य, विद्वत्ता, साहस, कल्पकता, उद्योग इत्यादि गुण जरी असले तरी ते समाजाच्या सर्व भागांमध्यें, वर्गांमध्यें व व्यक्तींमध्यें समप्रमाणानें वाटले गेले नाहींत. विशेषतः ते आर्थिक व्यवसायांत व व्यापारी वृत्तीच्या बाबतींत तर मुळींच दिसत नाहींत.

## वेगळेपणा व तुटकवृत्ति

सर्व महाराष्ट्रीयांचा स्वभाव कांहीं एकाच साच्याचा व वळणाचा नाहीं. त्यांतील अनेक जातींचा, वर्गांचा व व्यक्तींचा स्वभाव व कार्यक्षमता सारखी नसून त्यामध्यें पुष्कळ भिन्नता व विरोध सुद्धां आहे. आपापल्या व्यवसायानुसार व प्रकृति व परिस्थिति यांच्या अनुकूल–प्रतिकूलतेप्रमाणें मनुष्य स्वभावाची घडण होत जाते, व त्याच्या संवयी व दृष्टी बनतात.

सामान्यतः मात्र महाराष्ट्र जनतेंत प्रत्येकाचा आपापला कांहीं तरी वेगळेपणा व तुटक वृत्ति ह्या सांपडतात. त्यांच्यामध्यें स्वमताभिमान व एकांगी दृष्टी असल्याचें दिसतें. त्यामुळें महाराष्ट्रांत सामुहिक बळ व प्रेरक शक्ति लवकर तयार होत नाहीं. तद्वत् संस्थांचें सामर्थ्य व संघटनेचें बळ वाढत नाहीं. तसेंच, त्यांतील प्रज्ञावान् व क्रियावान् लोकहि आर्थिक पुरुषार्थ नसल्यामुळें आपापल्या तुटक कार्यांत यशस्वी होत नाहींत. विधायक व संघटनात्मक अशा कार्याला लागणारी सामुहिक एकत्त्वबुद्धि व सहकार्यवृत्ति व सामुहिक दूरदृष्टि आपल्यांत कमी आहे.

महाराष्ट्रांत श्रीमंत असा वर्ग नाहीं. जो आहे तो परप्रान्तीय व उदासीन आहे. मध्यम वर्ग आर्थिक दृष्टीनें मागासलेला व स्वभावानें तुटक व स्थितिप्रिय आहे. सामान्य जनता तर अजून खऱ्या बौद्धिक, सामाजिक व आर्थिक चळवळीमध्यें पडलेली नाहीं.

## महाराष्ट्रांत एकत्व हवें व राज्यत्व हवें

महाराष्ट्र मागें पडण्याचें मुख्य कारण त्याची विभागणी होणें व स्वतंत्र शासनसत्ता जाणें. कोणत्याच विभागांत त्याचें प्रधान स्थान नाहीं. आजच्या जगांत स्वतःच्या शासनावाचून कोणत्याहि दृष्टीनें प्रगति होणें अशक्य आहे. मुंबईप्रान्त, मध्यप्रान्त व हैदराबाद संस्थान यांच्यामध्यें महाराष्ट्राची शक्ति कोठें आहे? आजच्या प्रगतिप्रवाहाला राजसत्तेचा अबाधित पाठिंबा पाहिजे. राज्यसत्तेनेंच पुष्कळ सुधारणेचीं कार्यें

केलीं पाहिजेत. तिनेंच आपले सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व शासनिक प्रश्न सोडविले पाहिजेत. महाराष्ट्राची विभागणी व स्वशासनाचा अभाव हें कारण मात्र अंगभूत नाहीं, आगंतुक आहे. महाराष्ट्राच्या कर्तृत्वाला नांदावयास त्याला एकत्व पाहिजे व राज्यत्व पाहिजे. तें नसल्यास स्वगुणाचा परिपोष करण्यास व स्वपराक्रम दाखविण्यास अवसर मिळणार नाहीं. सध्यां राजाश्रय व लोकाश्रय हे दोन्ही नाहींत. राजकारणांत व अर्थकारणांत परकीयांचें प्राबल्य झाल्यामुळें आजची राजकीय व आर्थिक अवनती दिसून येत आहे. जे गुण पूर्वीं स्वराज्याच्या प्राप्तीला व पोषणाला अनुकूल होते ते आजच्या लोकशाही व वणिक् राजकारणांत उपयोगी होत नाहींत. आजचें राजकारण आर्थिक आहे. पूर्वींचें धार्मिक होतें. बहुजन समाजाला पुढें यावयास मुळींच वाव मिळत नाहीं. मध्यम वर्गाला कारकुनी व मास्तरी पेशा मिळाला आहे. बहुजनसमाजाला शेतकी व मजूरी मध्येंच गुंतून पडावें लागलें आहे. व्यापार व उद्योग इतरांच्या हातांत गेले आहेत.

## शासनसत्तेबरोबर अर्थसामर्थ्यहि

लोकशाही समाजांत व राज्यांत लोकांमध्यें नुसती नीतिमत्ता, बुद्धिमत्ता व विद्वत्ता, अथवा शौर्य व क्षात्रवृत्ति असून चालत नाहीं. समाजाच्या उन्नतीच्या दृष्टीनेंहि त्यांचा उत्तम उपयोग होण्यास त्यांना व्यापारी नीति व युक्ति, व्यवसाय वृत्ति व शक्ति यांची जोड मिळाली पाहिजे. महाराष्ट्राचा आर्थिक पाया व आर्थिक जीवन कच्चें आहे. त्याला स्वशासन नसल्यामुळें स्वतःचें आर्थिक धोरण व नियोजन बांधतां येत नाहीं. त्यामुळें त्याचा क्षत्रिय बाणा व त्याच्या विद्वत्तेचें तेज लोकशाहीच्या काळांत सफल होत नाहींत. वरिष्ठ दर्जाचा राज्यकारभार व शासनाधिकार आणि मोठे व्यापार व औद्योगिक व्यवसाय हे स्वतंत्रपणें चालविणें, हा प्रत्येक प्रदेशाच्या प्रगतीचा मूळ आधार किंवा पाया आहे. व तो महाराष्ट्रानें आज गमावलेला आहे. महाराष्ट्राच्या विभंगण्यानें व इतर प्रांतीयांशीं कृत्रिम रीतीनें संलग्न झाल्यानें त्याचें अस्तित्व व कर्तृत्व नष्ट झालें आहे. अविश्वास, द्वेष व दुष्टावा वाढला आहे, महाराष्ट्राच्या एकीकरणाला व प्रगतीला केवळ चालू कृत्रिम प्रांतरचनेमुळें व शासनव्यवस्थेमुळें मोठा व्यत्यय उत्पन्न झाला आहे. म्हणून महाराष्ट्राच्या सर्व भागांना अनुकूल व पोषक असें एक धोरण एक योजना व एक कार्यक्रम आंखतां येत नाहीं. महाराष्ट्राच्या हातांत कोणतीच शासनसत्ता नाहीं व अर्थसामर्थ्य नाहीं. त्याचप्रमाणें पाश्चात्य देशांतून आलेले वाद–व्यक्तिवाद, राष्ट्रवाद, लोकसत्तावाद, समाजवाद, साम्यवाद, इ. यांच्या जाळ्यातून व घोटाळ्यातून सुटणें व राष्ट्राच्या उन्नतीचा एक कार्यक्रम व योजना तयार करणें अशक्य झालें आहे.

## परकीयांचें संपत्तिशोषण

तसेंच आधुनिक शास्त्रांच्या व विद्यांच्या दृष्टीनें महाराष्ट्राची उंची व पातळी कमी आहे. त्याच्यामध्यें स्वतंत्र गति, प्रज्ञा, व प्रतिभा अजून फारशी दिसत नाहीं. त्याबरोबर त्याला राजकीय व आर्थिक परिस्थिति अनुकूल नाहीं. बहुजनसमाज उदासीन आहे. राजसत्ता प्रतिकूल आहे. नव्या विचारांना व प्रयोगांना लागणारी प्रखर बुद्धिमत्ता व तीव्र नीतिनिष्ठा असून त्यांचा उपयोग होत नाहीं. धडाडीचे विधायक विचार व कर्तृत्व आहे, पण त्याला उचलून धरणारी समाजशक्ति व प्रोत्साहक राजसत्ता महाराष्ट्राच्या हातांत नाहीं. आमच्या आर्थिक जीवनाचे मार्ग निकृष्ट व मोजकेच असल्यामुळें त्याच्या स्वतंत्र उद्योगाला व प्रज्ञेला व्यापक वाव नाहीं. जगाच्या शास्त्रीय, औद्योगिक व साहित्यिक प्रपंचांत महाराष्ट्राचें नांव अजून प्रामुख्यानें झळकलें नाहीं. महाराष्ट्राची संपत्तीचीं साधनें परकीयांच्या हातांत आहेत. महाराष्ट्र हा केवळ शेतकऱ्यांचा असला तरी त्या शेतीची मालकी परकीयांच्या हातांत बरीच गेलेली आहे. शेतकरी हा निरक्षर, अडाणी

व दरिद्री राहिल्यानें त्याला समाजाच्या बौद्धिक व राजकीय जीवनांत समतेचा व पुढारीपणाचा वांटा मिळालेला नाहीं. त्यामुळें तो आपल्याच समाजांतील शिक्षितवर्गाचा कट्टर शत्रू होऊन बसला आहे. त्यामुळें समाजाची गतीच या अंतःकलहानें खुंटली आहे. त्याचें परावलंबित्व मात्र कायम आहे. महाराष्ट्रांतील परकीय व परप्रान्तीय व्यापारीवर्गाच्या व कारखानदार-वर्गाच्या संपत्तिशोषणामुळें व वर्चस्वामुळें त्याच्या सर्व जीवनांगाचें व कर्तृत्वाचें मातेरें झालें आहे. त्याला आजच्या धनदोहन व धनोत्पादन विद्येचें ज्ञान व अनुभव नाहीं. त्यामुळें त्याचें आर्थिक जीवन व सांस्कृतिक व बौद्धिक सामर्थ्य आज प्रभावी होत नाहीं.

## महाराष्ट्राच्या अवनतीचीं कारणें आणि उपाययोजना

हल्लीं महाराष्ट्र समाज हा जातिव्यवस्थेच्या दृष्टीनें व वर्गरूपानें अंतर्विरोधी व विस्कळित झालेला आहे. पूर्वीची समाजरचना व समाजवृत्ति आणि आर्थिक व्यवस्था, एकंदर समाजांतील सर्व जातींना व वर्गांना वरपासून खालपर्यंत एका संकलित व परस्परपोषक सूत्रांत बांधणारी होती. एका जातीचा किंवा वर्गाचा धंदा व चरितार्थ त्याच समाजांतील जातींच्या किंवा वर्गाच्या गरजांवर अवलंबून होता. ते एकमेकांना पोषक व सहाय्यक होते. समाजाची कल्पना सामुहिक व सामुदायिक स्वरूपाची होती. त्याची रचना गुणकर्मविभागशः होती. त्यामुळें समाज एकत्रित व संकलित होता. पण आतां आमच्या समाजांतील जाती व वर्ग एकमेकांवर अवलंबून नाहींत. त्यांना सगळें जग मोकळें झाल्यामुळें त्यांच्यामध्यें फुटीरपणाच्या व एकांडेपणाच्या कल्पना घुसल्या आहेत. प्रत्येक जात व वर्ग आपणाला स्वतंत्र, समान व निराळा असा समजत आहे, आणि परस्परांच्या द्वेषांत व कलहांत मग्न झाला आहे. समतेचें व स्वतंत्रतेचें वारें भरल्यामुळें आणि संकलित बंधुभावाची कल्पना व बंधन क्षीण झाल्यामुळें आजच्या महाराष्ट्र समाजाचें जीवन असूयेनें, इर्ष्येनें व द्वेषानें फारच दूषित असें झालें आहे. त्यामुळें सुधारणेच्या नव्या कल्पना व शिक्षणाच्या नव्या योजना व्यवहारांत आणतां येत नाहींत. तेव्हां महाराष्ट्र मागें पडण्याचीं व पुढें न जाण्याचीं मुख्य कारणें (१) महाराष्ट्राचे तीन खंड, (२) स्व-शासनाचा अभाव, (३) परकीयांचें आर्थिक नियंत्रण आणि (४) अंतर्गत सामाजिक यादवी, दुही व फूट अशीं आहेत. हीं कारणें महाराष्ट्राच्या सर्वांगीण कर्तृत्वाला व उन्नतीला फारच बाधक झालीं आहेत. त्यामुळें प्रगतीला आवश्यक असणारी एक-कार्यसूत्रता, एक-विचारधारा व ध्येयाची एकवाक्यता महाराष्ट्रांत आज राहिली नाहीं. स्वार्थी समूहांचे व जातींचे कलह व व्यक्तींचा तुटकपणा ह्यांनीं सामाजिक वातावरण व्यापलेलें व नासलेलें आहे. विद्येची निंदा व विद्वानांची पिछेहाट चालू आहे. सर्वच गट, जाती, वर्ग व पक्ष आपापल्यालाच सर्वांत अधिक लाभ व राजकीय अधिकार मिळविण्याच्या खटपटींत आहे. मग त्यांच्या दिखाऊ घोषणा व अघळपघळ भाषणें कांहींहि सांगोत. हें तुटकपणाचें वारें, संशयाचें व समत्वाचें पिशाच्च, व स्वातंत्र्याचें वेड सर्व गटा-मध्यें संचारलेलें असून त्याचा परिणाम म्हणजे आज महाराष्ट्र समाज असा कांहीं राहिला नाहीं.

तेव्हां माझ्या मतें आज महाराष्ट्र मागें पड-ण्याचीं व पुढें न जाण्याचीं कारणें.

(१) स्वशासनसत्तेचा अभाव.

(२) महाराष्ट्राची विभागणी.

(३) परकीयांचे उद्योग व व्यापार, यांवर स्वामित्व व नियंत्रण.

(४) महाराष्ट्र समाजांतील फुटीरपणा व अंतस्थ यादवी व कलह.

(५) विद्येचा व विद्वानांचा द्वेष.

तेव्हां महाराष्ट्र अखंड झाला पाहिजे, त्याला प्रांतीय स्वराज्य मिळालें पाहिजे, त्याच्या स्वभाषेला प्रांतीय शिक्षणांत, कारभारांत, न्यायालयांत व लोकसभेंत प्राधान्य स्थान मिळालें पाहिजे.

त्याचा व्यापार, उद्योग व शेतकी त्याच्या मालकीची झाली पाहिजे आणि त्याच्या समाजाला एकवटून लोकशाही, शिक्षण, व विद्या यांची स्थापना व वाढ त्याला केली पाहिजे. म्हणजे त्याचें कर्तृत्व वा कर्यक्षमता, बुद्धिमत्ता, नीतिमत्ता व विद्याप्रेम यांना वाव मिळेल व तो इतर प्रान्तांबरोबर नवें हिंदी राष्ट्र निर्माण करण्यांत व त्यामध्यें चैतन्य व नेतृत्व उत्पन्न करण्यांत भाग घेईल. ह्या सर्व गोष्टी घडवून आणणारे नेते महाराष्ट्रास पाहिजेत, व त्यांच्या नेतृत्वाखालीं सर्व आघाडीवर त्यांनीं झुळून काम केलें पाहिजे.

~~~~~~~~~~~~

# : २३ :

# महाराष्ट्राच्या प्रकृतींतिल दोष : अतिव्यवहारवाद

श्री संपादक 'मौज' यांचे सेवेशीं

कृ. सा. न. वि. वि.

महाराष्ट्राच्या उत्कर्षाच्या प्रश्नाविषयीं लेख लिहिण्याबद्दल आपलीं कितीतरी पत्रें आलीं आणि मनांत नसतांहि मी कोडगेपणानें दिरंगाई केली. लेख लिहावा असें कितीदांतरी मनांत आलें पण लिहिण्याचें धैर्य होईना. त्याचीं कारणें आहेत.

माणसाच्या आयुष्यांतला जो काळ अत्यंत संस्कारसुलभ असतो आणि ज्या काळांत माणसाच्या मनाला वळण लागतें, माझ्या आयुष्यांतील तो काळ अशा प्रांतांत व अशा परिस्थितींत गेला कीं, माझ्या मनांत कुठल्याहि विशिष्ट प्रांताबद्दल किंवा भाषेबद्दल अभिमान उत्पन्न होऊं शकला नाहीं. माझें सारें शिक्षण हिंदींतून झालें आणि आजहि मी हिंदी बोलूं लागलों, म्हणजे ती माझी मातृभाषा नव्हे, असें उत्तर भारतीयांना देखील वाटत नाहीं. कुठल्याहि विशिष्ट प्रांताचे संस्कार मनावर न होणें हा जसा माझ्या दृष्टीनें गुण आहे, तसाच तो प्रांतप्रेमी लोकांच्या दृष्टीनें दोष ठरूं शकतो. नीतीचे, धर्माचे आणि सभ्यतेचे सारे संस्कार मी हिंदींतून व इंग्रजींतून घेतलेले असल्यामुळें, हिंदी भाषा आणि हिंदी भाषा बोलणारे यांच्याविषयीं परकेपणाची भावना माझ्या मनांत कधींच उत्पन्न झाली नाहीं. हिंदीभाषी मुलें मुली आणि मी लहानपणीं एकत्र खेळलों–बागडलों, एकत्र जेवलों आणि एकत्र राहिलों. त्यांनीं स्वतःच्या गरजांकडे दुर्लक्ष करून माझ्या गरजा भागवल्या आणि मी स्वतःपेक्षां त्यांच्या आवश्यकतांना अधिक महत्त्व दिलें. या कारणांमुळें कुठल्याहि प्रांतापुरता विचार करण्याची संवय माझ्या मनाला नाहीं आणि म्हणून आपण इतका तगादा लावला तरी मी लेख लिहिण्याचें टाळत आलों.

स्वतःविषयीं इतकें लिहावें लागलें, याला माझा नाइलाज होता. यांत आपण माझा अविनय मानणार नाहीं अशी आशा आहे. मी ज्या परिस्थितींत वाढलों आणि माझ्या मनाला जें वळण लागलें, त्याला अनुरूप अशींच माझीं मतें असणें स्वाभा-
~~~~~~~~~~~~

विक आहे. तीं मी थोडक्यांत व्यक्त करीत आहें. आपणांस त्यांची कांहीं उपयुक्तता वाटल्यास आपण हें पत्र प्रसिद्ध करावें, एरवीं करूं नये.

## आदर, वचक–आणि विश्वासहि

मध्यप्रांताच्या ज्या भागाला हल्लीं महाकोशल म्हणतात त्या भागांत माझें पुष्कळसें संस्कार-सुलभ वय गेलेलें आहे. त्या भागांतील महाराष्ट्रीयांच्याविषयीं तेथील लोकांच्या मनांत विलक्षण आदराची व गौरवाची भावना माझ्या लहानपणीं असे. मी जेव्हां आठ वर्षांचा असतांना शाळेंत जायला सुरवात केली, त्यावेळीं शाळेच्या पटावर माझें नांव पंडित शंकरराव असें लिहिण्यांत आलें आणि माझी जातहि पंडित अशीच लिहिण्यांत आली. महाराष्ट्रीयांच्या बुद्धिमत्तेबद्दल, बाणेदारपणाबद्दल आणि देशभक्तीबद्दल तेथील लोकांच्या मनांत अतिशय आदरभाव होता. आजहि मी जवळजवळ सर्वच प्रांतांत जातों तेथील सुबुद्ध लोकांच्या मनांत महाराष्ट्राच्या माणसाबद्दल आदर आहे, वचक आहे आणि थोडासा विश्वासहि आहे. अलीकडे किंचित् संशय व अविश्वास उत्पन्न होऊं लागलेला आहे त्याची कारणमीमांसा अर्थातच महाराष्ट्रीयांनीं अंतर्मुख होऊन केली पाहिजे.

काशी हें अखिलभारताचें पुरातन विद्यापीठ. तेथील विद्वानांच्या उच्चारावर आणि निरूपण पद्धतीवर महाराष्ट्रीय पंडितांची स्पष्ट छाप दिसते. याची अचूक खूण म्हणजे 'ज्ञ' चा उच्चार करण्याची पद्धत. आजदेखील काशींतील प्राचीन विद्याभिमान्यांच्या मनांत महाराष्ट्रीय विद्वानांच्या विषयीं आदरभावच नव्हे तर पूज्यबुद्धि आहे. १९३८ च्या हिंदी साहित्य सम्मेलनाच्या वेळीं जेव्हां कांहीं अंतर्वेदी पंडितांनीं काकासाहेब कालेलकरांवर असा आरोप केला कीं, काकासाहेब स्वधर्म, स्वभाषा व स्वसंस्कृति यांच्याविषयीं उदासीन आहेत, ते राजकीय फायद्याकरितां या सर्वांचा बळी द्यायला तयार आहेत, तेव्हां खुद्द टंडनजी, गोविंद मालवीय व इतर विद्वान मोठ्या अभिनिवेशानें म्हणाले, 'कोणावर आरोप करतां, याची शुद्ध आहे कां तुम्हाला? काका महाराष्ट्रीय आहेत. भाषेचा व संस्कृतीचा अभिमान महाराष्ट्रीयांना शिकविण्याचा आव कोणीहि आणूं नये. तो त्यांच्याजवळच आम्हाला शिकावा लागेल.' इतर प्रांतांतील समंजस लोकांना महाराष्ट्रीयांबद्दल काय वाटतें याची यावरून कल्पना येईल.

## स्त्रीवर्गाविषयींचें कौतुक

आणखीं एका बाबतींत महाराष्ट्रीयांचें कौतुक इतर प्रांतीयांना वाटतें. ती म्हणजे आमचें स्त्री-पुरुषसंबंधांतील तारतम्ययुक्त व विवेकपूर्ण स्वातंत्र्य. आमच्या लहानपणीं माझी मित्रमंडळी जेव्हां आमच्या आईला, आजीला, आत्याला मोकळेपणानें घरांत वावरतांना बघत व तोंडावर बुरखा न घेतां विनययुक्त स्वातंत्र्यानें रस्त्यावरून फिरतांना बघत, तेव्हां त्यांना मोठें चमत्कारिक वाटे. ते मला म्हणत, "तुम्हांला कुलीनता—विलीनता कांहीं नाहीं का रे? आमच्या इकडे 'भले घर की औरतें' अशा कधींच नाहीं वागायच्या."

ही भावना आतां पार बदलून गेलेली आहे. महाराष्ट्रीय स्त्रियांच्या स्वातंत्र्यप्रियतेची, चरित्रसंपन्नतेची आणि सुशीलतेची आज सर्वत्र वाखाणणी होते. उच्च कुलांतील महाराष्ट्रीय स्त्रियांत देखील जी श्रमनिष्ठा, कामाचा उरक, कगरीपणा व तरतरी दिसून येते ती पाहून इतर प्रांतीयांना हेवा वाटतो.

सांगण्याचा आशय असा कीं, महाराष्ट्रीयांची सार्वत्रिक पीछेहाट व उपमर्द होत आहे, असा जो भ्रम कित्येक महाराष्ट्रीयांना होऊं लागलेला आहे, तो पूर्णपणें वास्तविक नाहीं. राष्ट्रांना व मानवसमुदायांना ज्याप्रमाणें उत्कर्षाची भावना होते त्याप्रमाणें क्षयाचीहि भावना होत असते. क्षयाची भावना झाली म्हणजे तदनुरूप लक्षणें मानसिक व शारीरिक प्रकृतींत उद्भवूं लागतात.

## रोगाच्या लक्षणांची चिकित्सा

महाराष्ट्राला अलीकडे क्षयाची भावना होऊं लागलेली आहे. आणि म्हणून तदनुरूप लक्षणें त्याच्या प्रकृतींत आढळूं लागलीं आहेत. या लक्षणांची थोडीशी मीमांसा करण्याचें योजिलें आहे.

आधुनिक भारताच्या निर्मितींत बंगाल व महाराष्ट्र या दोन प्रांतांचें स्थान अनन्य आहे. राजकीय चळवळीच्या इतिहासांत जनतास्पर्शाचा पहिला प्रयत्न बंगालांत बाबू अश्विनीकुमार दत्त यांनीं केला. आणि सबंध भारताला पहिला जनतेचा पुढारी महाराष्ट्रानें दिला. लोकमान्य टिळकांच्या व्यक्तित्वाची छाप, त्यावेळच्या राजकीय चळवळीवर अगदीं स्पष्ट उमटलेली दिसते. केसरीची हिंदी आवृत्ति प्रयाग, कानपूर आणि काशी येथें गंगेच्या घाटावर व वाळवंटावर मोठ्या उत्कंठेनें वाचण्यांत येत असे. महाराष्ट्राचा लौकिक व प्रतिष्ठा लोकमान्यांनीं कितीतरी पटींनीं वाढविली. महाराष्ट्राची आंतरप्रान्तीय प्रतिष्ठा वाढविण्यास रानडे, गोखले, भांडारकर यांची व्यापक बुद्धिमत्ता व विदग्धता कांहीं कमी कारणीभूत झाली नाहीं. बंगालमध्यें मोठे दिग्गज पुढारी झाले. बौद्धिक व सांस्कृतिक क्षेत्रांत त्यांनीं अचाट कर्तबगारी केली. आणि राजकीय क्षेत्रांत त्यांनीं गाजविलेलें शौर्य अखिल भारताला ललामभूत होईल असें आहे. पण एकंदरींत बंगाली लोकांची प्रकृति भावनानिष्ठ व ध्येयवादी. चैतन्याचा भक्तियोग, रामकृष्ण परमहंसांची दुर्गोपासना आणि राममोहन राय, विवेकानंद यांचा वेदान्तवाद अशा अनेकविध प्रवृत्तींचा ठसा बंगालच्या चळवळीवर उठला. त्या मानानें महाराष्ट्राची प्रकृति अधिक व्यवहारनिष्ठ असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं कार्यकुशलता व समयज्ञता जास्त प्रमाणांत असल्याचें आढळून आलें. म्हणून महाराष्ट्रीय पुढाऱ्यांच्या वृत्तीचा पगडा साऱ्या चळवळीवर बसला. आजहि साम्यवादी, समाजवादी आणि सर्वोदयनिष्ठ चळवळींवर महाराष्ट्रीयांची कमी पकड आहे असें नाहीं.

## कमी झालेलें महत्त्व व त्याची प्रतिक्रिया

अखिल भारतीय प्रतिष्ठेची थोडी किंमतहि द्यावी लागते, हें उघडच आहे. ज्याच्याजवळ व्यापक दृष्टि नसेल, उदार हृदय नसेल आणि रुंद भावना नसेल त्याला सगळा भारतवर्ष आपला वाटणार नाहीं आणि समग्र भारताला तो आपलासा वाटणार नाहीं. जोंपर्यंत महाराष्ट्रांत व बंगालांत अखिल भारताच्या मापाचे पुढारी जन्माला आले, तोंपर्यंत ते दोन प्रांत सगळ्या भारताच्या आदराला पात्र झाले. पुढें योगायोगानें अखिल भारतीय नेता अन्यत्र जन्माला आला आणि या दोन प्रांतांचें महत्त्व त्या मानानें कमी झालें. याच वस्तुस्थितीची प्रतिक्रिया आज आपल्या मनावर झालेली आहे.

अखिल भारतीय नेतृत्वाचें अधिष्ठान गेल्याबरोबर महाराष्ट्राच्या व्यवहारनिष्ठेचें पर्यवसान व्यवहारवादांत झालें. व्यवहारवाद बुद्धीला संकुचितपणा आणतो आणि वृत्तीला क्षुद्रपणा आणतो हें वस्तुगत सत्य आहे. वस्तुनिष्ठा निराळी आणि व्यवहारवाद निराळा. वस्तुनिष्ठेचें तत्त्वज्ञान ही एक वैज्ञानिक विचारसरणी आहे. तिची एक समग्र अशी तत्त्वप्रणाली आहे, साधनांचा निश्चित क्रम आहे. आणि सामाजिक स्थित्यंतराची सुनिश्चित प्रक्रिया आहे. वस्तुनिष्ठेच्या तत्त्वज्ञानाला आज मार्क्सवाद म्हणतात. तत्त्व व व्यवहार यांच्यांत तफावत असतांच कामा नये असा त्या तत्त्वज्ञानाचा कटाक्ष आहे. वस्तुनिष्ठेचें तत्त्वज्ञान निराळें आणि व्यवहारज्ञानाचें तत्त्वज्ञान निराळें याची अधिक मीमांसा करण्याचें हें स्थळ नव्हे.

## समन्वयाच्या नांवाखालीं समेट

धर्म व व्यवहार, तत्त्व व आचार, सिद्धांत आणि वर्तन यांची सांगड घालण्याचा जो प्रयत्न महाराष्ट्रांत झाला त्यांत तत्त्व प्रबल कीं व्यवहार प्रबल. या मुद्याचा नीटसा विचार झालेला नाहीं. व्यवहाराशीं समेट म्हणजे वस्तुनिष्ठा नव्हे. माणसाच्या व्यावहारिक पातळीवर तत्त्वानें उतरा-

वयाचें कीं तत्त्वाच्या उच्च भूमिकेवर व्यवहारानें सरकत जायचें, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ज्याला आपण हल्लीं वस्तुनिष्ठ तत्त्वज्ञान म्हणतों, त्याच्याशीं याचा कांहींहि संबंध नाहीं. महाराष्ट्रामध्यें व्यवहारनिष्ठेच्या नांवावर तत्त्वाला व्यवहारानुगामी बनविण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळें व्यवहार उन्नत होण्याचें एकीकडेच राहून तत्त्वत्याग मात्र नकळत घडत गेला आणि आपण हलके हलके व्यवहारपूजक बनलों.

दुसराहि एक प्रकार घडून आला. समन्वय व समेट यांच्यांत गल्लत झाली. समन्वयांत विरोध-परिहाराचें, एकीकरणाचें तत्त्व असतें; पण समेटांत तडजोड असते, घेवाणदेवाण असते. निरनिराळ्या निष्ठांचा व तत्त्वज्ञानांचा समन्वय नेहमीं साधतोच असें नाहीं. पण त्यांच्यांत तात्पुरती तडजोड किंवा समेट नेहमीं होऊं शकतो. व्यवहार-निष्ठ माणसाची दृष्टि तात्कालिक फायद्याकडे असल्यामुळें तो समन्वयाच्या गोंडस नांवाखालीं समेटांचा आश्रय करतो. दुर्दैवानें महाराष्ट्रामध्यें हा प्रकार पुष्कळच प्रमाणांत झालेला आहे.

## अभिमानगंडांतून निर्माण झालेला अपमानगंड

वर म्हटल्याप्रमाणें आजहि महाराष्ट्रीयांच्या बुद्धिमत्तेबद्दल, चारित्र्याबद्दल व राहणींतील आचारनिष्ठेबद्दल इतर लोकांत कांहीं कमी आदर नाहीं. घटना परिषदेंत आंबेडकरांच्या बुद्धीच्या असंदिग्धतेबद्दल सार्वत्रिक आदर आहे. इतर क्षेत्रांतहि तसेंच आढळून येईल. पण महाराष्ट्राची ही कुशाग्र व टणक बुद्धिमत्ता व्यवहारवादामुळें परिमित व सीमित झाली आणि त्यामुळें तिचें तेज फांकेनासें झालें. महाराष्ट्रीय मनावर याची अशी प्रतिक्रिया झाली कीं, आपण इतरांपेक्षां श्रेष्ठ असल्यामुळें इतर सर्व एकवटून आपला पाडाव करण्याकरितां सरसावले आहेत. अभिमानगंडांतून हा अपमानाचा भ्रम निर्माण झाला आहे. आणि आज त्याची लक्षणें आपल्या एकंदर व्यवहारांत दिसूं लागलीं आहेत. आपल्याला चिरडायला सगळे उभे आहेत, अशी भावना एकदां झाल्यानंतर बचावाची वृत्ति निर्माण होते. आणि बचावाची वृत्ति निर्माण झाली कीं, माणूस पुरोगामित्वाला अंतरतो.

हा भास होण्याचें आणखी एक कारण आहे. मध्यवर्ती सरकारच्या कारभारांत ऐयर, अय्यंगार, मेनन यांचें वर्चस्व असल्याचें दिसून येतें. कारण स्पष्ट आहे. दक्षिण भारतीयांचें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व अद्भुत आहे आणि अखिल भारतीय प्रतिष्ठेचें, अजून देखील, इंग्रजी भाषेसारखें दुसरें साधन नाहीं. या बाबतींतील महाराष्ट्रीयांचें वैगुण्य प्रसिद्धच आहे. त्यांच्या ठिकाणीं चुकीचें इंग्रजी बोलण्याची व लिहिण्याची धडाडी असेल, पण तेवढ्यानें कार्यभाग साधत नाहीं. यापुढें हिंदी किंवा हिंदुस्तानी ही अखिल भारतीय भाषा होणार, त्या भाषेंत तरबेज होण्याचा जर महाराष्ट्रीयांनीं संकल्प केला तर, अखिल भारतांत पुन्हां त्यांची प्रतिष्ठा वाढेल. पण तसें करण्याकरितां स्वभाषाभिमान किंचित् मर्यादित करावा लागेल.

## धडाडी नाहीं, हिंमत नाहीं !

औद्योगिक बाबतींतहि आमचे कांहीं स्वभावगुण आम्हाला भोंवले. व्यापाराला एक प्रकारचा व्यवहारवाद व सौदेगिरीची वृत्ति लागते हें खरें आहे. पण धडाडी आणि विश्वास ठेवण्याची हिंमत यांची त्याहिपेक्षां अधिक गरज असते. अति सावधगिरी, अतिहिशेबीपणा यांचें व्यापारालाहि वावडें आहे. रणांगणांत उभा ठाकलेला शिपायी ज्याप्रमाणें मृत्यूची जोखीम पत्करतो, त्याचप्रमाणें बाजारांत आलेल्या माणसाला सर्वस्व गमविण्याची तयारी ठेवावी लागते. मारवाडी व गुजराती व्यापाऱ्यांमध्यें ती तयारी दिसून येते. लक्षावधि रुपयांचा व्यवहार तो रुमालाखालीं हातात हात घालून करतो. 'कोरा कागद' नाहीं; 'काली स्याही' नाहीं; 'लिखापढी' नाहीं, तिकिट नाहीं, साक्ष नाहीं. इतका विश्वास एकमेकांवर टाकावा लागतो. व्यापार हें एक प्रकारचें द्यूत आहे. आणि त्यांत निराळ्या अर्थानें क्षत्रियांच्य

इतकीच ' बेफिकी 'ची वृत्ति लागते. पण महाराष्ट्रीय माणसाचें आपलें सगळेंच माफक. त्याला व्यवहारवादानें झपाटलेलें असल्यामुळें तो म्हणतो, ' अरे, सद्गुणांचा देखील अतिरेक नको. ध्येयवादाचाहि अतिरेक नको. ' त्यामुळें त्याला सिद्धिहि माफक प्रमाणांत लाभते.

## उत्कर्ष कशाकरितां ?

हें फायद्याचें तत्त्वज्ञान मोठें वांकडें आहे. विनोबांनीं त्याची थोडीशी टिंगल केली आहे. ' अमक्यापासून काय फायदा ? तमक्यापासून काय फायदा ? ' असे विचारणाऱ्याला ते शेवटीं असा प्रश्न करतात कीं, ' फायद्यापासून काय फायदा ? ' हें फायद्याचें तत्त्वज्ञान फायद्याच्या एक पाऊल मागें राहून जातें. ' ततः किम् ततः किम् 'चा शेवटला प्रश्न तें विचारीत नाहीं. महाराष्ट्राला पुनरपि मानाचें व प्रतिष्ठेचें स्थळ प्राप्त करून द्यावयाचें तें कशाकरितां ? हा मुद्याचा प्रश्न आहे. फक्त महाराष्ट्रांतील जनतेच्या फायद्याकरितां कीं अखिल भारताच्या गौरवाकरितां ? अखिल भारतीय जनतेच्या हिताकरितांच जर महाराष्ट्राचा उत्कर्ष हवा असेल, तर महाराष्ट्रीयत्व हें अखिल भारतीयत्वापेक्षां विचारतः व व्यवहारतः गौण मानावें लागेल. आणि अखिल भारतीयत्वाशीं समेट नव्हे तर अखिल भारतीयत्वामध्यें परिसमाप्ति, ही परमसिद्धि मानावी लागेल.

सबंध भारतवर्षात महाराष्ट्राचें पूर्वीचें स्थान कां राहिलेलें नाहीं, याची माझी मीमांसा थोडक्यांत ही अशी आहे.

आतां आपल्या अंतर्गत दुःस्थितीचा थोडासा विचार केला पाहिजे. राष्ट्रीय चळवळींत बंगाल व महाराष्ट्र या दोन प्रांतांत जहाल पक्षाचे आचार्य जन्माला आले. पण बंगालांतील जहाल पुढाऱ्यांत एक महत्वाचा फरक होता. महाराष्ट्रांतील जहाल पुढारी सनातनी वळणाचे व समाज सुधारणेच्या बाबतींत स्थितिवादी होते. त्यामुळें महाराष्ट्रांतील राष्ट्रीयत्व सनातनी धाटाचें झालें. अर्थातच सत्यशोधक, ब्राह्मणेतर व बहुजनवाद या चळवळींच्या रूपानें प्रतिक्रिया निर्माण झाली. त्या प्रतिक्रियेचे दुष्परिणाम भाऊबंदकीच्या रूपानें आजपर्यंत भोंवत आहेत.

## संख्येचा वाढता महिमा

बुद्धि ही जेव्हां सत्तेचें व ऐश्वर्याचें साधन बनू लागते त्यावेळीं तिची स्वतंत्र प्रतिष्ठा कमी होते. बुद्धिनिष्ठेपेक्षां सत्तानिष्ठा व वैभवनिष्ठा यांचें प्राबल्य अधिक होतें. आणि मग बुद्धिव्यतिरिक्त इतर शक्तींच्या आधारानें बुद्धिजीवी वर्गाचा पाडाव करण्याची प्रवृत्ति बळावूं लागते. अशारीतीनें लोकशाहीची परिणति स्थूल संख्यावादांत होते आणि गुणाच्या ऱ्हासाला आरंभ होतो. पूर्वी गुण हा जातिनिष्ठ मानला गेला. म्हणून गुणापेक्षां जात जास्त मोठी ठरली. आतां सत्ता संख्यानिष्ठ मानली गेली आहे. म्हणून संख्येचा महिमा वाढणार हें उघड आहे. महाराष्ट्रांतहि या प्रवृत्तीचा परिणाम झाल्यावांचून कसा राहील ? तिचा प्रतिकार करण्याचा एकच उपाय आहे.

पूर्वी शिक्षण हें जातिनिष्ठ असल्यामुळें बौद्धिक योग्यता विशिष्ट जातीपुरतीच मर्यादित झालेली आहे. आणि बौद्धिक क्षेत्रांत त्या जातींचेंच प्राधान्य दिसून येतें. आतां बौद्धिक योग्यतेचा जातिनिरपेक्ष विकास करायचा झाल्यास, ज्या जातींना बौद्धिक विकासाची संधि जुन्याकाळीं मिळालेली नाहीं, त्यांना ती अधिक प्रमाणांत मिळण्याची सोय करून दिली पाहिजे. अर्थात त्यांना विशेष सवलती व विशिष्ट अधिकार द्यावे लागतील. कांहीं काळानें त्या जाती बुद्धिजीवी जातींच्या पातळीवर येतील आणि मगच समान संधीच्या धोरणाला आरंभ होऊं शकेल.

बुद्धिजीवी वर्गाला हें परवडणार नाहीं. पण बुद्धिनिष्ठ म्हणजे शहाण्या व समंजस लोकांनीं या प्रक्रियेची आवश्यकता ओळखली पाहिजे. बुद्धिजीवी वर्गाला समाजाच्या जातिनिष्ठ रचनेमुळें जो स्वभाविक लाभ झाला त्याचा त्याग त्यानें स्वखुषीनें केला तरच तरणोपाय आहे. स्वतःच्या त्यागानें

संपादन केलेल्या विपन्नावस्थेंतहि पराक्रमाची प्ररणा व ताकद असते. नाइलाजानें प्राप्त झालेल्या हीन स्थितींत पराक्रमाची रग आणि स्फूर्ति शिल्लक राहात नाहीं. म्हणून महाराष्ट्रांतील बुद्धिजीवी वर्गानें बौद्धिक योग्यतेच्या सार्वत्रिक विस्तारांत आत्मविसर्जनानें हातभार लावला पाहिजे.

## मुक्तीसाठीं भक्ती नको

तसें केल्यास सांवळागोंधळ माजेल, ही शंका आत्मसंभावित वृत्तीची द्योतक आहे. यांत सूक्ष्म बौद्धिक अहंकार व सामान्यजनावरील अविश्वास दडलेला आहे. निरपेक्ष व त्यागपरायण बुद्धिनिष्ठेची कदर हमखास होत असते. पण कदर व्हावी असा अभिसंधि मनांत ठेवून जो त्याग करील, त्याचा त्याग पोकळ व दांभिक स्वरूपाचा ठरेल. आणि अर्थातच त्यापासून कांहींच फलनिष्पत्ति होणार नाहीं. प्रस्तुत लेखकानें एकदां लोकमान्यांना विचारलें होतें, 'मी लोकमान्य व्हायला काय करूं ?' त्यांनीं उत्तर दिलें, 'लोकमान्य व्हायची इच्छा सोड. ही पहिली अट आहे.' महाराष्ट्रांतील बुद्धिजीवी वर्गाला त्याच्या लोकोत्तर पुढाऱ्याचा संदेश या शब्दांत सांठविलेला आहे. मनांत मुक्तीचा चोरटा हेतु धरून जो भक्ति करतो, वाणगट आहे, असें प्रल्हादानें म्हटलें आहे, आपली प्रतिष्ठा वाढवावी म्हणून जो त्याग करतो तो त्यागी नव्हे, सौदागर आहे. आपली प्रतिष्ठा कायम रहावी म्हणून नव्हे, तर समाजांत जातिनिष्ठा व संख्यानिष्ठा यांच्याऐवजीं गुणनिष्ठा वाढावी, म्हणून बुद्धिजीवी वर्गानें आत्मविसर्जन करावयाचें आहे.

ब्राह्मण म्हटला कीं तो इतरांहून अधिक त्यागी असायला पाहिजे, त्याची भूमिकाच त्यागाची व तपाची आहे. असा ताठा मनांत ठेऊन जर बुद्धिजीवी वर्ग राजसेवा व राजमान्यता यांपासून निवृत्त झाला, तर तो आत्मप्रतारणा व परवंचना करील. जातींच्या तत्त्वाचा समूळ उच्छेद करून गुणवत्तेची प्राणप्रतिष्ठा करण्याची दुसरी प्रक्रिया नाहीं, अशा बौद्धिक विश्वासानेंच त्यानें हें धोरण पत्करलें पाहिजे. तसें त्यानें केल्यास महाराष्ट्रांतील अंतर्गत अस्वस्थतेच्या अंताचा आरंभ होईल.

## नसते उपद्व्याप !

इतिहासांत महाराष्ट्रीयांच्या सत्तेनंतर इंग्रजांचें राज्य आलें त्यामुळें स्वराज्याच्या भावनेचा वारसा महाराष्ट्रीयांना मिळाला. व्यावहारिक राजकारणाचें बाळकडू ज्या महाराष्ट्रीयांना मिळालें त्यांनींच त्याचे वळसे आम्हालाहि पाजले असें इतर प्रांतांतील लोक मोठ्या कृतज्ञतेनें म्हणूं लागले. अखिल भारतीय नेतृत्वाचा मान लोकमान्यांच्या निधनानंतर गुजरातकडे गेला. महात्माजींचें तत्त्वज्ञान व धोरण महाराष्ट्रीय पुढाऱ्यांना आपल्या राजकीय परंपरेच्या विरुद्ध वाटलें; आणि त्यांनीं त्याचा उपहास व विरोध करायला सुरवात केली. बंगालच्या पुढाऱ्यांनींहि गांधींना विरोध केला पण गांधीविरोधाला महाराष्ट्रांत जें पद्धतशीर स्वरूप आलें तें दुसऱ्या कुठल्याहि प्रांतांत आलें नाहीं. अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा विरोध इतर प्रांतांतील पुढाऱ्यांनींहि केला पण अहिंसेची टर उडवून गांधीविरोधी वातावरण निर्माण करण्यांत महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनीं जी वृत्ति दाखविली ती कांहीं निराळीच होती. महाराष्ट्रांतील सामान्य जनता शाबूत असली तरी प्रतिसहकार पक्ष, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन, हिंदुसभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांनीं महाराष्ट्रांत गांधीविरोधी वातावरण निर्माण करण्यांत आपापल्या परी पराक्रमाची पराकाष्ठा केली. आजहि गोडसे प्रकरणांत व गांधी खून खटल्यांत निरनिराळे महाराष्ट्रीय नसते उपद्व्याप करीत आहेत. या सर्व कारणांमुळें महाराष्ट्रीयांच्याबद्दल इतर प्रांतीयांची मनें कलुषित झालीं आहेत. त्यांना वाटतें, हे महाराष्ट्रीय लोक उद्दाम बुद्धिवादी व घमेंडखोर आहेत. या महाराष्ट्रीयांची अशी समजूत आहे कीं, आमच्यासारखा निःस्पृह व स्पष्टवक्ता दुसरा कोणी नाहीं.

गुणवत्तेचें सर्वत्र चीज होत असतें. पण गुणवत्तेच्या अभिमानाची मात्र उलट प्रतिक्रिया

होते. आसाम, उडीसा व बिहार हे बंगालच्या शेजारचे प्रांत आहेत. या तिन्ही प्रांतांत बंगाल्याचें वर्चस्व असे. पुढें त्या त्या प्रांतांतील लोक जसजसे सुशिक्षित होऊं लागले तसतशी त्यांच्यांत स्वत्व-भावना जागृत झाली. अदूरदृष्टि बंगाली लोकांना याचें वैषम्य वाटलें. त्या प्रांतांतील लोकांना मदत करण्याऐवजीं त्यांनीं त्यांच्या विषयीं प्रच्छन्न तुच्छतेची वृत्ति पत्करली, त्या प्रांतांतील लोकांचा स्वाभिमान डिवचला गेला. बंगाली विरोधाची अजस्र लाट उसळली. महाराष्ट्रीयांच्याहि बाबतींत पुष्कळसें असेंच झालें आहे. इतर प्रांतीयांचा विकास होऊं लागल्यावरोबर त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेल्या स्वत्व भावनेचें, देशहिताकरितां, आपल्याला चीज करितां आलें नाहीं. उलट आज सगळीकडे महाराष्ट्रविरोधाचें वातावरण निर्माण होत आहे असा भास मात्र आपल्याला होऊं लागला.

## महाराष्ट्राचा प्रमुख दोष : अतिव्यवहारवाद

मी जवळ जवळ सबंध हिंदुस्तानांत हिंडलों आहे. महाराष्ट्रांतील बुद्धिजीवी वर्गाइतका सामाजिक बाबतींत पुढारलेला वर्ग मला इतरत्र आढळला नाहीं. पण त्यांत गोम एकच आहे. तो साऱ्या गोष्टी व्यवहाराच्या सोयीकरितां करतो. त्यामुळें तो इतरांच्या ठिकाणीं प्रत्यय उत्पन्न करूं शकत नाहीं. लोकांना वाटतें, जो सोयीकरितां सुधारक बनूं शकतो तो सोयीकरितां 'कट्टरपंथी'हि बनूं शकेल. अतिव्यवहारवाद हा आधुनिक महाराष्ट्राच्या प्रकृतींतील प्रमुख दोष आहे.

महाराष्ट्राची बौद्धिक सचोटी, भरीव व्यवहारज्ञता, राजकीय शहाणपणा, सामाजिक प्रगतिपरायणता आणि स्त्रीपुरुष संबंधांतील अनुपम सामंजस्य या गुणांचा विकास झाल्यास, अखिल भारताचें जीवन अधिक समृद्धशाली झाल्यावांचून राहाणार नाहीं. यापुढें सवाल महाराष्ट्र मोठा कसा होईल, गुजरात मोठा कसा होईल, केरळ मोठा कसा होईल हा नाहीं. अखिल भारतीय जीवन संपन्न व समृद्ध करण्याकरितां, जो जो आपल्या वैशिष्ट्याची जास्तींत जास्त खंडणी बिनशर्त व प्रतिदानाची अपेक्षा न ठेवतां भारतमातेच्या चरणीं अर्पण करील, भविष्यकाळ त्याचा आहे. बंगाल व महाराष्ट्र ज्या काळीं अखिल भारतीयत्वाच्या भावनेचे प्रवर्तक व प्रवक्ते होते, त्याकाळीं त्यांच्याकडे भारताचें मूर्धाभिषिक्त नेतृत्व आलें. आजहि ज्याच्या ठिकाणीं वैशिष्ट्यापेक्षां समग्रतेची भावना अधिक असेल, त्याचाच दिवस आहे.

सुरवातीला म्हटल्याप्रमाणें महाराष्ट्राविषयीं विज्ञतेनें लिहिण्याइतकी पात्रता माझ्या अंगीं नाहीं. पण महाराष्ट्रीय कुळांत जन्मास आलेल्या आणि अखिल भारतीय नागरिकत्वाचे संस्कार पावलेल्या, एका सामान्य नागरिकाला महाराष्ट्राविषयीं काय वाटतें, तें मी आपुलकीच्या बुद्धीनें व अंतःकरणाच्या तळमळीनें मांडलें आहे. त्यांत कांहीं उणें अधिक आलें असल्यास अत्यंत नम्र भावानें क्षमयाचना करीत आहें. अधिक तें सरतें । न्यून तें पुरतें । करोनि घ्यावें हें तुमतें । विनवीतसें ॥

स्नेहाकांक्षी,

**दादा धर्माधिकारी**

# : २४ :

नों. दि.

# या महाराष्ट्राचें होणार तरी काय ?

◆ लेखक : द्वा. भ. कर्णिक ◆

'मौज'कारांनीं फार सुरेख प्रश्न विचारला आहे. अर्थात् हा प्रश्न प्रत्येक प्रांत विचारीत असेल आणि हिंदुस्थानच काय, सारें जगहि तो भेसूर प्रश्न स्वतःला विचारीत आहे. पण प्रथम मी विचारतों, महाराष्ट्र म्हणजे काय ? तसेंच पहावयाला गेलें तर हिंदुस्थान म्हणजे तरी काय ? माझ्या कानांत यावेळीं एकच आरोळी घुमत राहते. " हिंदुस्थान हिंदुओंका । नहीं किसीके बापका. " तसेंच महाराष्ट्र म्हटलें कीं मला सेनापति बापटांचें गाणें आठवतें.

**" महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेलें**
**मराठ्यांविना राष्ट्रगाडा न चाले**
**खरा वीर वैरी पराधीनतेचा**
**महाराष्ट्र आधार या भारताचा ! "**

मला एक पुढारी आठवतात. महाराष्ट्राचें नुसतें नांव काढलें कीं, त्यांच्या अंगावर रोमांच उभे रहात, डोळ्यांत पाणी तरारून येई आणि भाषण करीत असतांना " माझा महा...... " एवढेच शब्द त्यांच्या तोंडांतून बाहेर पडत. पुढें त्यांना अक्षरशः गंहिवरून येत असे.

—आणि हा महाराष्ट्र मागें पडावा ? भारताचा आधार असलेल्या या महाराष्ट्रावर अवनतीची कळा यावी ? शिव शिव......(यावेळीं महाराष्ट्राच्या गतवैभवाचा इतिहास माझ्या डोळ्यांसमोर येत आहे. पण त्या इतिहासाचें चित्र काढावयाला माझी लेखणी असमर्थ आहे. वाचक हो, वीर सावरकरांच्या पुस्तकांतून किंवा भाषणसंग्रहांतून हीं वर्णनें तुम्ही उतरून घ्याल काय ? )

आतां प्रश्न असा आहे कीं शिवप्रभूंचा, ज्ञानेश्वर तुकारामांचा, टिळक गोखल्यांचा,...( ही मालिका मी वाढवीत नाहीं. कारण त्यानेंच सारा अंक भरून जावयाचा. ) हा महाराष्ट्र, जो सर्व दृष्टींनीं मागें पडला आहे, पडला नसल्यास पडत चालला आहे, पडत चालला नसल्यास पडण्याच्या मार्गावर आहे, त्याचा उद्धार कसा करावयाचा ? भारताच्या सर्व क्षेत्रांत महाराष्ट्राला त्याचें मानाचें स्थान कसें प्राप्त करून द्यावयाचें ?

## मोठीं माणसें पैदा करूं या

( १ ) प्रथम राजकारणाचेंच क्षेत्र घेऊं या. ही चर्चा खुलेपणानें चालली आहे. तेव्हां मी प्रथमच प्रांजळपणें सांगून टाकतों कीं,राजकारणाशीं बुद्धीचा संबंध नसतो, तत्त्वांचा त्याहीपेक्षां नसतो आणि ज्याला आपण निष्ठा किंवा प्रामाणिकपणा मानतों ती राजकारणांत ठेवली तर, तें राजकारण फक्त स्वतःच्या अक्कलखातींच जमा होतें. राजकारणांतील यश फक्त एका गोष्टीवर अवलंबून असतें, आणि ती म्हणजे, जी विभूति त्या राजकारणाच्या अग्रस्थानीं असते, ती होय. तुम्ही म्हणाल अशी विभूति आहे कोठें ? नसेल. पण ती पैदा होऊं शकते. महाराष्ट्र या बाबतींत उगाच चोखंदळ झाला आहे. स्वतःच्या बुद्धीची आम्हांला घमेंड फार. त्यामुळें आमच्यांतील जे मोठे लोक आहेत त्यांना आम्हीच मान द्यावयाला तयार

नाहीं. आपण एकदां स्वच्छ ठरविलें पाहिजे कीं, आमच्यामध्यें थोर लोक आहेत. मग त्यांचे देव्हारे माजविणें हें आपलें काम. नंबर एकचा पुढारी नेहमींच आपल्या गुणांवर पुढें येत नाहीं. त्याच्या गुणांचे ढोल पिटले, त्याचे फोटो सलून आणि पानपट्टीच्या दुकानांत दिसूं लागले,लोकांमध्यें त्याचा बोलबाला झाला कीं आपोआप लोकहि त्याला मानूं लागतात आणि त्यालाहि पुढारीपणाचे डोहाळे लागतात. पिकविलें म्हणजे पिकतें हें आपण नीट ध्यानांत ठेवलें पाहिजे.

## तत्त्वाची काळजी कशाला ?

आतां तुम्ही म्हणाल, तत्त्वाचें काय ? आधीं पहिली गोष्ट म्हणजे अगदीं एरंडेल प्यायल्या-सारखा कडवट चेहरा करूं नका, किंवा सूर्य थंड होत चालला आहे, त्यावेळचें गांभीर्य मुद्रेवर आणूं नका. तुमचें म्हणणें काय ? तात्त्विक भूमिका त्या पुढाऱ्याला पाहिजे एवढेंच ना ? बाबानो, हिंदुस्थान देश आहे हा.-नव्हे भारतवर्ष, आर्यावर्त. आपली प्राचीन संस्कृति, आपले वेद, आपलीं उपनिषदें, आपली गीता, आपलीं ब्राह्मणें...वगैरे वगैरे लक्षांत आहेत ना तुमच्या ? सुमारें एक हजार वर्षें या सामुग्रीवर, या आपल्या पूर्वजांच्या पुण्याईवर आपण जगूं शकतों. मनांत आणलें तर या पुण्याईवर आपण आशियाखंडहि पादाक्रांत करूं शकतों. कदाचित् जडवादी मानल्या जाणाऱ्या युरप खंडालाहि भारतीय संस्कृतीचा साक्षात्कार आपण घडवून आणूं शकूं ! मग आपल्या पुढाऱ्याच्या तात्त्विक भूमिकेबद्दल कां बरें चिंता करतां ? मला माहीत आहे, तुमच्या डोळ्यांसमोर निरनिराळे ' वाद ' उभे आहेत.. या वादांबद्दल सुद्धां इतके गंभीर होऊं नका. प्रश्न आहे तो घोषणांचाच ना ? सर्व साधारणपणें आपण जिला जनता म्हणतों, तिला उद्देशून काय घोषणा ( Slogans ) करावयाच्या हेंच या वादांतून ठरतें. खरा राजकारणी आहे, तो या वादाविदांना मुळींच जुमानीत नाहीं. लोकांची नस ज्या ठिकाणीं असते तिथें हात ठेवतां आला, म्हणजे या ' इझम ' किंवा ' वादा ' मुळें पुढारीपणाला धोका पोचत नाहीं. आमच्या काकासाहेब गाडगीळांनीं १९२८ सालींच एका जाहीर सभेंत सांगितलें कीं, " अहो हे थर्ड इंटर-नॅशनलवाले आहेत. मी फोर्थ इंटरनॅशनल-वाला आहें." धमक लागते ती अशी.

## असें केलें पाहिजे !

तात्पर्य काय कीं, महाराष्ट्र राजकारणांत मागें पडला असेल तर त्याला पुढें आणण्यासाठीं उगाच तात्त्विक चर्चेचे फड उभारूं नका, बौद्धिकांच्या मागें लागून तोंडची वाफ दवडूं नका, किंवा ' अहो, महा-राष्ट्र मेला हो मेला ' असा आक्रोश करून ऊरहि बडवीत बसूं नका. महाराष्ट्र राजकारणांत पुढें यावयाला पाहिजे आहे ना ? मग एक, दोन, तीन, चार साधारण पुढें येऊं शकतील असे पुढारी आपल्याच मनाशीं ठरवा. खणखणीतपणें त्यांचा प्रचार करा, रोज वर्तमानपत्रांत त्यांचे फोटो येऊं द्या, लोकांना ढास लागेपर्यंत त्यांना पत्रकें काढूं द्या, भाषणें देऊं द्या, मिरवणुकींतून नाचूं द्या. मग बघा महाराष्ट्र पुढें येतो कीं नाहीं तो ? पण आपण आपल्या मनाशीं स्वच्छ ठरविलें पाहिजे कीं, हे पुढारी आहेत. खरोखर भारताचा उद्धार करूं शकतील, असे हे पुढारी आहेत. मगच इतर प्रांत त्यांना मान देतील ना ? तेव्हां सर्व कांहीं आपल्याच हातीं आहे असें समजून आपण आजपासूनच कामाला लागूं या.

## लोकांचें भांडवल आणि आपली अक्कल

(२) दुसरें क्षेत्र व्यापाराचें. हें क्षेत्र आपलें आहे किंवा नाहीं, हाच मुळीं वादाचा विषय आहे. पण या क्षेत्रांत चढाई केल्याखेरीज महाराष्ट्राला दुसरी-कडे कोठेंच वर येतां यावयाचें नाहीं. या क्षेत्रांत महाराष्ट्राची स्थिति अशी आहे कीं, तो व्यापारांत पडला आहे म्हणजे आडवा पडला आहे. हें असें कां होतें ? व्यापारांत, उद्योगधंद्यांत महाराष्ट्राला यश कसें मिळेल ? याचें थोडक्यांत उत्तर देण्या-

८६३८

साठीं मी पूर्वी कोठेंतरी ऐकलेली एक गोष्ट सांगतों. दोन माणसांनीं भागीदारींत व्यापार करावयाचें ठरविलें. त्यापैकीं एकाजवळ भांडवल होतें. दुसऱ्याजवळ अक्कल होती. त्यांनीं धंदा सुरू केला. पांच वर्षानंतर त्यांचा जेव्हां हिशेब झाला तेव्हां असें आढळून आलें कीं, ज्याच्याजवळ फक्त अक्कल होती, त्यानें भांडवल गोळा केलें आणि ज्याच्या जवळ भांडवल होतें, त्यानें तें गमावून फक्त अक्कल पैदा केली होती. महाराष्ट्राजवळ अक्कल आहे. ती वापरून भांडवल गोळा करण्याकडे महाराष्ट्राला लक्ष देतां येणार नाहीं का? याबाबतींत भावनावश होऊन चालणार नाहीं. लोकांचें भांडवल आणि आपली अक्कल असाच आपल्या धंद्याचा पाया असला पाहिजे. त्या पायावर इमारत उभी राहिली आणि कळस चढलाच तर आपण आहोंतच तेथें. बरें पायाच कोसळून पडला तर आपल्या अकलेला धार चढली हें समाधान आहेच कीं!

## कृपा करून स्वार्थ साधा

राजकारणांत जशी नीति आणि शुचिता यांची फक्त तोंडी घोषणा करावयाची असते, तशाच, धंद्यांत सचोटी व इमान यांच्या फक्त पाट्या लावावयाच्या असतात. महाराष्ट्राला धंदा करावयाचा असेल तर मेहेरबानी करून त्यानें फक्त स्वार्थावर आपली दृष्टि केंद्रित करावयाला पाहिजे. तुम्हाला भावना आहेत का? मग धंद्यापासून चार पावलें दूर रहा. तुम्हांला जीवनांत कांहीं उच्च, उदात्त असें साधावेंसें वाटतें काय? मग दुकानाची, कारखान्याची पायरी चढूं नका. अर्थात धंदा करावयाचा म्हणजे दुसऱ्याला फसवावेंच लागतें, असा कांहीं नियम नाहीं. पण उगाच मनाची फणवणूक कशाला करतां? धंदा आणि भावना यांची गल्लत करू नका, हाच एक संदेश यशस्वी धंदेवाला तुम्हांला देईल. तुम्ही व्यापारांत खोट खात आहांत ना? मग इभ्रत बाजूला ठेवून माघार घ्या. माघार घेतांना आपला स्वार्थ फक्त डोळ्यांसमोर ठेवा. दुसऱ्याची फिकीर करू नका. योग्य वेळीं दिवाळें फुकण्याची महाराष्ट्राला अक्कल आली तरच महाराष्ट्र धंद्यांत पुढें येईल. आपल्या धंदेवाल्या लोकांची ओळख करून देतांना आपण अभिमानानें म्हटलें पाहिजे, "अहो हे ना! बारा वेळां दिवाळें काढलें त्यांनीं. असे धंद्यांत मुरब्बी आहेत ते!" राजकारणांत श्रेष्ठत्व केव्हां मिळतें? जेव्हां आपण इतर लोकांना मागें टाकून आघाडीवर एकटेच उभे राहतो तेव्हां. तसेंच धंद्याचें आहे. आपल्या प्रतिस्पर्ध्यांत व आपल्यांत योजनांचें अंतर उभें राहिलें म्हणजे खुशाल आपल्या यशाची ग्वाही द्यावी. तोंपर्यंत स्वतःच्या कंपनीचे शेअर्स पाडून ते स्वतः खरेदी केले पाहिजेत. आपल्या नातलगांच्या नांवावर निरनिराळ्या मॅनेजिंग एजन्सीज स्थापन करून त्यांचा रोख पगार व त्यांचें चोख कमिशन या रूपानें आपल्या भांडारांत गडगंज द्रव्य जमविलें पाहिजे आणि... पण अलमिति विस्तारेण.

## बा महाराष्ट्रा, जरा खालीं ये!

आपल्या आजूबाजूचे प्रांत चोख धंदा कसा करीत आहेत त्यावर एकदां दृष्टि टाका ना! महाराष्ट्राचें चुकतें आहे तें हेंच कीं, तो आपल्या सह्याद्रीच्या पठारावरून हालत नाहीं. बा महाराष्ट्रा, उंच गडावरून जरा खालीं पातळीवर ये. गुर्जरवीर अनहील कांहीं अबू पर्वताच्या दऱ्याखोऱ्यांत उगाच तरवारीचे हात करीत बसला नाहीं आज. त्यानें काळाची गति ओळखून, तरवार गंजत ठेवून आपल्या हातीं तागडी घेतली आहे. आणि त्या तागडीवर आपलें सारें लक्ष केंद्रित करून त्यानें माप चोरण्याचें अभिनव तंत्र आत्मसात् केलें आहे. त्याला तूं हातचलाखी म्हणशील आणि आपल्या चेहऱ्यावर सात्त्विक संताप आणून तूं नाक मुरडशील. असें नाक मुरडून आपल्या गुर्जरबंधूंची अवहेलना केल्याचें तुला समाधान लाभेल. पण तुझ्या या अवहेलनेची त्यांना काडीमात्र पर्वा नाहीं. धंद्यांत मानअपमान ते जाणीत नाहींत, हेटाळणीचें त्यांना भय वाटत नाहीं. तेव्हां नाक मुरडून खोट्या अहंकारांत दंग राहूं नको. तुला पुढें यावयाचें

आहे ना ? मग हातांत तागडी घे आणि माप चोरून धंदा कर. यशाचा मार्ग तोच आहे.

## आत्मसमाधान व पब्लिकसिटी

(३) तिसरें क्षेत्र कलेचें, वाङ्मयाचें, क्रीडेचें किंवा जीवनाचेंच म्हणाना. या बाबतींत एकच महामंत्र महाराष्ट्रानें जपला पाहिजे आणि तो म्हणजे प्रसिद्धी. भरपूर, बेफाट प्रसिद्धी. महाराष्ट्र पुढें यावयाचा असेल, तर त्याचा न्यूनगंड नाहींसा व्हावयाला पाहिजे. (अर्थात् आपण ही सारी चर्चा करतों आहों ती फक्त हिंदुस्थानालाच उद्देशून. इतर जगाशीं या चर्चेचा संबंध नाहीं.) मला माहीत आहे, तुमच्या चर्येवर एकच भाव याक्षणीं आहे आणि तुम्ही विचारीत आहां. म्हणजे काय ? म्हणजे असें कीं इतर प्रांत आपल्यापुढें आहेत; महाराष्ट्र मात्र मागें पडला आहे ही भावनाच आपल्या हृदयांतून काढून टाकली पाहिजे आणि उलट असें छातीठोकपणें जाहीर केलें पाहिजे कीं, शरद्बाबू हे बंगालचे मामा वरेरकर होत. हा खेळाडू म्हणे महाराष्ट्राचा अमरनाथ, हा म्हणे महाराष्ट्राचा दुलीपसिंग. असें कां म्हणता ? खुशाल म्हणा, हा लाला म्हणजे पंजाबचा देवधर होय. आम्हीच आपल्या साहित्यिकांकडे, विचारवंतांकडे, खेळाडूंकडे उणीवेच्या भावनेनें पाहूं लागलों,तर लोक तरी आमचा मान कां राखतील ? आधुनिक जग हें प्रसिद्धीचें जग आहे. आणि ज्याची प्रसिद्धी करावयाची त्याबद्दल आपल्याच मनांत संदेह असला तर आपण प्रसिद्धी काय करणार कपाळ ! महाराष्ट्र फार रडवा झाला आहे हेंच खरें. आम्ही स्वतःच आक्रोश करून जगाला जाहीर करीत आहों कीं, आम्ही मागें पडत चाललों, सर्व क्षेत्रांत आमची पीछेहाट होत चालली आहे. हा मानसिक दुबळेपणा नष्ट झाल्याखेरीज महाराष्ट्र पुढें येणार नाहीं. खरा प्रश्न आहे तो दृष्टिकोणाचा. आमचा दृष्टिकोण न्यूनतेचा राहिला तर आमचें भवितव्य अंधारमय आहे. पण हाच दृष्टिकोण आत्मविश्वासाचा, आत्मसमाधानाचा राहिला तर आम्हांला कोणी रोखूं शकणार नाहीं. स्वतःची, स्वतःच्या लोकांची वाटेल तितकी स्तुति करा, तोंडाला येईल त्या आंकड्यांत आपल्या संपत्तीची मोजदाद करा, राजकारण, उद्योगधंदे, क्रीडा, वाङ्मय, वाटेल त्या क्षेत्रांत आमचा हात धरणारा कोणी नाहीं असें उच्च रवानें जगाला जाहीर करा. बघा महाराष्ट्र किती वर चढतो तो.

## हिम्मत पाहिजे !

—आणि महाराष्ट्र मागें पडत चालला आहे ना ? तर आणखी एक गोष्ट करा. आपलें दैन्य, आपलें दारिद्र्य, यांची जाहिरात करूं नका. आणि दुसरें लोक मोटारींतून हिंडतांना दिसले, रेसला गेले, क्रिकेट क्लब ऑफ इंडियांत जाऊन बसले, रेडियो क्लबांतील झगझगाटांत नाचूं लागले तर आंबट तोंडें करूं नका. हिंमत असेल तर ऋण काढूनहि कां होईना, झकास कपडे करा, भाड्याच्या कां होईना, मोटारी उडवा, रेसला जाऊन खुशाल पैसे घालवा, बाहेर दारूबंदीचा प्रचार करूनहि इरॉसमध्यें निवडक शेठियांना व परदेशी व्यापाऱ्यांना छोटे, मोठे पेग द्या. बघा महाराष्ट्राची पत वाढते किंवा नाहीं ? मागें पडलेला महाराष्ट्र पुढें आणण्याचा मार्ग एकच आहे. " ऋणं कृत्वा घृतं पिबेत् "

पण हें जर तुम्हांला पटत नसेल, आणि नुसतें पटून उपयोगी नाहीं. तें आचरणांत आणण्याची तुमची हिम्मत नसेल, तर या महाराष्ट्राचें होणार तरी काय ? असें म्हणून उसासे टाकूं नका.

## हा आमचा खरा आणि अमर महाराष्ट्र

—कारण, खरी गोष्ट अशी आहे कीं महाराष्ट्राचें कांहींहि बरें वाईट झालेलें नाहीं. महाराष्ट्र जेथें होता तेथेंच आहे, जसा होता तसाच आजहि कायम आहे. हिंदुस्थानांत महाराष्ट्राला जें स्थान होतें तेंच आजहि कायम आहे. पुढेंहि राहणार आहे.आपलें जें जीवन आहे तें तसेंच राहणार आहे. आपली जी परंपरा आहे तीहि कायमच

टिकणारी आहे. पायांत वहाणा, अंगावर कांबळें, उशाखालीं धोंडा हेंच आपलें जीवन. टिळक आणि गोखले ज्या चंद्रमौळी घरांत राहिले, तेथेंच शंकरराव देव आणि मोरे-हिरे रहात आहेत. साने गुरुजी मांडीवर कागद घेऊनच आपलें लिखाण लिहीत आहेत. लक्ष्मणशास्त्री जोशी कृष्णाकांठच्या एका मोडक्या घरांत बसूनच धर्मकोशाचें कार्य करीत आहेत. एस. एम. जोशी आणि शिरूभाऊ लिमये पायदळींच रानमाळ तुडवीत आहेत. डांगे आणि रणदिवे पूर्वींच्या क्रांतिकारकांच्या इतक्याच असह्य परिस्थितींत जीवन कंठीत आहेत. अप्पासाहेब पटवर्धन, आत्मक्लेशाच्या मार्गानेंच समाजांत चैतन्य आणूं पहात आहेत आणि नवाकाळचे अप्पासाहेब खाडिलकर किंवा प्रभातचे श्रीपादराव नवरे, पूर्वींच्याच बाण्यानें पण आमिषांना भीक न घालतां आपलें लोकशिक्षणाचें पवित्र कार्य करीत आहेत. वर्तमानपत्री जगावर भांडवलशाहीची जी पकड बसूं पहात आहे, त्याबद्दल बोलतां बोलतां अप्पासाहेब खाडिलकर सहज एकदां म्हणाले, "दिवस कठीण आहेत खरे. पण आम्ही चढाओढीला सामना देऊं तो दारिद्र्यांतच. कदाचित आम्ही पडूं सुद्धां. पण आमची परंपरा, आमचा बाणा, आमची निष्ठा आम्ही सोडणार नाहीं. कोणताहि धनिक आमचें स्वत्व विकत घेऊं शकणार नाहीं."

हा आमचा महाराष्ट्र. या महाराष्ट्राला कदापिहि अवनति येणार नाहीं. तो अमर आहे.

---

# : २५ :

# निःपक्षपाती तज्ज्ञाचें चौकशी-मंडळ स्थापन करा

★ लेखक : म. म. प्रा. द. वा. पोतदार ★

संपादक मौज यांस, स. न. वि. वि.

रा. गोरे यांनीं एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. आणि आपण त्याचें महत्त्व ओळखून, आज अनेक महिने, विचारी व कर्त्या पुरुषांचीं मतें मागवून तीं लोकांपुढें ठेविलीं आहेत व मजकडेहि आपली टोचणी समक्ष आणि पत्रानें सतत चालू आहे. आतां मी अधिक वेळ लावणें म्हणजे आपला अंत पहाणें आहे. म्हणून या विषयाकडे बघण्याची माझी दृष्टि, आणि तत्संबंधीं माझे कांहीं विचार पुढें मांडण्याचें मी ठरविलें आहे.

## दीर्घ व खोल रुजलेली महाराष्ट्र-परंपरा

महाराष्ट्र ही एक कल्पना आहे किंवा विचारग्राह्य वस्तू आहे, याचें उत्तर इतिहासावरून असें घ्यावें लागतें कीं, एक प्रकारें कृत्रिम असली तरी महाराष्ट्र ही एक ग्राह्य झालेली वस्तू आहे. पर्यायानें बोलावयाचें झालें तर महाराष्ट्र या नांवानें ज्याच्याबद्दल बोलणें चालणें यापूर्वीं झालेलें आहे, आणि आज होत आहे, असा तो एक देश आहे किंवा मोठ्या देशाचा विभाग आहे. आणि त्या

नांवानें लोक त्याला ओळखीत आले आहेत. लोकांची ती ओळख किंवा तें बोलणें अजून सुटलेलें नाहीं, किंवा सुटण्याचा कांहीं संभवहि नाहीं. कमींत कमी सुमारें दोन हजार वर्षें, 'महाराष्ट्र' असें देशवाचक नाम आपल्या वाङ्मयांत रूढ असलेलें आढळून येतें. अदमासें सहाशें वर्षांपूर्वीं होऊन गेलेल्या महानुभावी वाङ्मयाच्या परंपरेंत 'महाराष्ट्र देश' अशी स्पष्ट आख्या आढळते व त्याच्या सीमा देखील सांगितलेल्या वाचावयास मिळतात. इतकेंच नव्हे, तर या देशाचे पोटविभाग, खंड, मंडळें या नांवानें महानुभावीयांनीं वर्णन केले आहेत.

त्या नंतरच्या काळांत महाराष्ट्र या देशापेक्षां तेथें रहाणारे म्हणून मराठे या नांवानें ओळखले जाणारे लोक, त्या लोकांचा अथवा मराठ्यांचा उच्चार वारंवार होतो. यानंतरच्या काळांत परदेशाहून आलेले, इंग्रज वगैरे, परकीय लोक 'मराठा नेशन' असा उल्लेख पदोपदीं करतांना आढळून येतात. इतकी दीर्घ आणि खोल रुजलेली ही महाराष्ट्र परंपरा आहे.

## भारतनिष्ठ दृष्टि

मराठे लोकांप्रमाणेंच त्या लोकांची जी भाषा मराठी, तिचीहि थोर परंपरा निदान सहाशें ते हज़ार वर्षांची आहे. इतक्या दीर्घ काळांत मराठे लोकांची कांहीं विशिष्ट घडण बऱ्याच पक्कतेला पावलेली आहे. भिन्न भिन्न परिस्थितीमुळें या घटनेच्या गाभ्याला विशेष धक्का पोंचलेला नाहीं.

मराठे काय, किंवा त्यांच्या शेजारील कन्नड किंवा आंध्र–गुर्जरादि जे दुसरे लोक आहेत त्यांपैकीं कोणीहि भारताच्या बाहेर आपली दृष्टि ठेवलेली नाहीं. त्यांचे सर्व व्यवहार भारतावरच केंद्रित झालेले आहेत. त्या केंद्रावरील त्यांचें लक्ष केव्हांहि कमी झालेलें नाहीं किंवा या केंद्रासंबंधानें त्यांच्या मनांत कसलाहि घातकी विकल्प केव्हांहि आलेला नाहीं.

महाराष्ट्राचें काय होणार, असा प्रश्न जेव्हां कोणी मराठे आपल्या मनाला करतात, तेव्हां भारताला सोडून फक्त आपलेंच तेवढें कसें होणार, अशा संकुचित भावनेनें हा प्रश्न आपल्या मनाला ते करीत नाहीत. आपण भारतांतलेच आहों, महाराष्ट्रीय किंवा मराठे असें कांहींसें निराळें नामाभिधान आपल्याला मिळालें असलें, तरीदेखील आपण भारतीय आहों, हें ते क्षणभरहि विसरलेले नाहींत.

## महाराष्ट्राचें –नव्हे, भारताचें काय होणार ?

महाराष्ट्राचें काय होणार या प्रश्नाचा विचार दोन दृष्टीनें करावयाचा आहे. पैकीं एक दृष्टि ही कीं, आजपर्यंत महाराष्ट्राची जी कांहीं बरीवाईट स्थिति दिसून आली त्या मानानें त्याची आजची स्थिति कशी आहे, भावी स्थिति कशी होण्याचा संभव आहे, आणि आजची स्थिति आणि संभाव्य भावी स्थिति यांच्याबद्दल काळजी करण्याजोगें कांहीं आढळून येत असल्यास कोणती उपाययोजना केली असतां बिघाड दूर होऊन इष्ट स्थिति प्राप्त होईल ? आणि दुसरी दृष्टि अशी : आपल्याबरोबरीचे शेजारीपाजारी यांच्याशीं तुलनेनें पहातां, आपल्यापेक्षां त्यांनीं आघाडी मारली आहे का ? आणि तसें असेल तर आघाडीला किंवा बरोबरीला येण्यासाठीं कोणते उपाय योजले पाहिजेत ? हें उघड आहे कीं, महाराष्ट्र आणि त्याचे दूरचे किंवा जवळचे शेजारी यांची स्थिति, त्याच्या त्यांच्या मानानें निराळा विचार करून तपासित असतात. त्यांच्या सर्वांच्या समुदायानें बनलेला जो भारत त्याची स्थिति किंवा प्रकृती यांचा विचार केव्हांच दृष्टिआड करतां नये. कारण ते भारताचे अवयव आहेत. आणि भारताशीं त्यांचा एकजीव झालेला आहे. भारताच्या या अवयवांपैकीं, कोणी एकादा दुबळा झाला किंवा जाया झाला, तर त्यामुळें भारताच्या स्वास्थ्यास धोका निश्चित आहे. म्हणून महाराष्ट्राचें काय होणार, असा प्रश्न, एका दृष्टीनें सगळ्या भारतीयांचे चिंतनाचा विषय होऊं शकतो. महाराष्ट्राप्रमाणें अंग, वंग, कलिंगादि भारतीय अव-

यवांच्या स्थितीसंबंधीं असाच प्रश्न उपस्थित करून तत्रस्थांनीं तसेंच महाराष्ट्रीयांनीं आणि सर्व भारतीयांनीं सदैव जागरुकपणें चिंतन केलें पाहिजे. महाराष्ट्राचें पुढें काय होणार तेवढेंच पहाण्यानें आपलें काम संपत नाहीं. महाराष्ट्रादि अवयवांनीं संपन्न असलेल्या भारताचें काय होणार या व्यापक प्रश्नाचा विचारहि गांभीर्यानें केला पाहिजे. पण भारतांत महाराष्ट्र मोडतो, म्हणून त्याचा निराळा विचार करणें अवश्य नाहीं, असें मानणें सदोष आहे. दोन्ही पक्षीं विचार केला पाहिजे. किंबहुना शेजाऱ्यापाजाऱ्यांचे सुस्थितीचाहि जागरुकपणें निराळा विचार करणें अवश्य होतें. या प्रकरणीं आपली दृष्टि, संकुचित ठेवतां नये.

## भारताचा बळकट दोरखंड किंवा दोरदंड

महाराष्ट्राचें पुढें काय होणार, म्हणजे त्याचें संभाव्य भविष्य काय दिसतें, असा आपला प्रश्न आहे. एकदां महाराष्ट्रीय बाजूनें आणि नंतर भारतीय बाजूनें असा दुहेरी विचार येथें संभवतो. आणि तसा तो करणें यांत वावगें तर कांहीं नाहीं. पण आपणा मराठे म्हणविणारांचें तें कर्तव्य आहे.

भारतीय दृष्टि आणि महाराष्ट्रीय दृष्टि स्वभावत: विरोधी असल्या पाहिजेत असें नाहीं. भारतीय दृष्टि ही एकाद्या ' कुळ 'पतीच्या दृष्टीसारखी आहे. आणि महाराष्ट्रीय दृष्टि ही एका महाराष्ट्र कुळाची दृष्टि.

महाराष्ट्र, आंध्र, गुर्जर, राजस्थान वगैरे जीं सुमारें पंधरा कुळें, त्या सर्व कुळांचें मिळून भारताचें महाकुळ झालेलें आहे. आणि आजच्या लोकशाहीच्या काळांत या महाकुळाची सामुदायिक जबाबदारी सर्व कुळांवर सारखीच पडली आहे. म्हणून भारतीय दृष्टीचा अभिनिवेश या प्रत्येक संघटक कुळांत तीव्रतेनें जागरुक असला पाहिजे. आणि या जागरुकतेबरोबरच, स्वत:च्या कुळाची जागरुकता, तितक्याच तीव्रतेनें त्यानें जागती ठेवली पाहिजे. याचा अर्थ असा कीं, ही इष्ट जागृती दुहेरी आहे. आणि तिचा पेड चांगला आणि घट्ट वळला गेला पाहिजे आणि टिकवला पाहिजे. कुळाचा प्रत्येक धागा स्वत: पिळदार असला पाहिजे आणि अशा पिळदार धाग्यांना बळकट पिळानें एकत्र पीळ घालून त्यांचा एकजीव झालेला बळकट दोरखंड किंवा दोरदंड वळला पाहिजे. आपल्या पुढील सर्व प्रश्न या क्रियेवांचून आपणांस समाधानकारक सोडवितां येणार नाहींत.

## महाराष्ट्र व इंग्रज

आतां महाराष्ट्राच्या बाजूनें, महाराष्ट्राकडे पाहूं. इंग्रज सत्ताधीश होण्यापूर्वी महाराष्ट्रीयांना जो कार्यभाग साधावा लागला त्यामुळें यांची प्रतिष्ठा भारतांतील इतर कुळांपेक्षां पुष्कळ अधिक वाढली. पण या प्रतिष्ठेंत महाराष्ट्रीयांचा इंग्रजांनीं मोड केल्यामुळें, पडलेले किंवा मोडलेले महाराष्ट्रीय हळुहळू इतर बंधुकुळांच्या मनांतून आपोआपच उतरत गेले. चतुर आणि धोरणी इंग्रजी सत्ताधाऱ्यांनीं आणि विद्वानांनीं या परिवर्तनाचा खूप फायदा घेतला. आणि मराठ्यांच्या प्रतिष्ठेची विकृत मीमांसा केली. त्याला त्यांनीं लुटारूंच्या वर्गांत लोटलें. आणि मग हीच मीमांसा इंग्रजांच्या द्वारानें आणि पुरस्कारानें चालू झालेल्या, नवशिक्षणप्रणालींतून क्रमाक्रमानें फैलावत गेली. आणि त्यामुळें महाराष्ट्रनिंदकांचा एक पक्ष नवशिक्षितांत तयार झाला. परंतु महाराष्ट्रानें संपादिलेली प्रतिष्ठा तशी दुर्बळ नसल्यानें प्रथम महाराष्ट्रीयांच्या मनांत तिचा प्रतिकार उद्भवला. आणि त्यांना उलट इंग्रज हे धूर्त, कावेबाज असल्याचें वाटूं लागलें. विरुद्ध असतांनाहि, हळुहळू प्रतिष्ठा आणि बल संपादन करीत चाललेल्या इंग्रजांविषयीं, जो एक आदरभाव मराठ्यांच्या इंग्रजसत्तापूर्व काळांत क्रमाक्रमानें प्रभावी होत चाललेला तत्कालीन इतिहासांत स्पष्टपणें प्रतीत होतो, तें इंग्रजांविषयींचें मत महाराष्ट्रांत बदलूं लागलें. इंग्रजांनीं केलेली अवास्तव महाराष्ट्रनिंदा, महाराष्ट्रीयांना बोचूं लागली. महाराष्ट्रियांच्या अवास्तव निंदेबरोबरच, रजपूत व मुसलमान वगैरेंची अवास्तव

आणि अप्रमाण स्तुति इंग्रजांनीं चालविली होती. तिचाहि महाराष्ट्रीयांस विचार पडला. आणि इंग्रजांच्या या खटाटोपाचें परीक्षण आणि तदुत्तर निराकरण करण्याची ईर्षा महाराष्ट्रीयांचे मनांत निर्माण झाली. या ईर्षेंतूनच इतिहाससंशोधन, शिवाजीउत्सव वगैरे उद्योगांना स्फूर्ति आणि बळ मिळालें. प्राप्त विकृती आणि दुःस्थिति यांचा मुळाधार जो इंग्रज त्याची बौद्धिक आणि राजकीय सत्ता क्षीण किंवा नष्ट केल्याशिवाय भारताचें आणि महाराष्ट्राचें कल्याण साधतां येणार नाहीं हा पक्का विश्वास महाराष्ट्रीयांचे मनाला वाटून त्याप्रमाणें त्यांचे उद्योग सुरू झाले. हळुहळू या इंग्रजविरोधी भावनांनीं आणि उद्योगांनीं विराट स्वरूप धारण केलें. हें असें विराट स्वरूप क्रमाक्रमानें साकार होत असतांनाच महाराष्ट्राप्रमाणेंच भारतांत अंतर्भूत असलेलीं, परंतु इंग्रज, मराठे आणि मुसलमान या सर्व शाह्यांच्या दीर्घ शतकावलींत जवळजवळ लुप्तनाम झालेलीं अशीं इतर कुलें हळूहळूं जागृत होऊं लागलीं. हीं सर्व कुलें किंवा अवयव यथाप्रमाण विकसित होऊं लागल्यावर ते परस्पर सापेक्षतेनें आपापल्या प्रतिष्ठा जागृत आणि सुस्थित करण्याविषयीं दक्षता प्रगट करूं लागले असल्यास तें स्वाभाविक आणि इष्ट आहे, इतकेंच नव्हे तर आवश्यकहि आहे. मात्र पूर्वीं वर्णन केलेली दुहेरी समन्वयी निष्ठा अद्यापि पक्केपणीं स्थापित झालेली नाहीं. इंग्रजांनीं टाकून दिलेला भारत पुन्हां सुव्यवस्थित आणि संघटित करण्याचा जो नवा उद्योग आपण सांप्रत करीत आहोंत, त्याविषयीं वर सांगितलेली समाजदृष्टि आपणांस संवर्धित आणि पुष्ट केली पाहिजे. प्रस्तुतच्या अनेक पुढाऱ्यांच्या मनोरचनेंत या निष्ठेविषयीं संशय आणि शंका दिसून येते. वस्तुस्थितीचें सम्यग दर्शन त्यांना संपूर्णपणें घडलेलें दिसत नाहीं. त्यांचे ठायीं निष्ठा आहे, परंतु तिनें वर सांगितलेलें समन्वयी आणि सम्यग् स्वरूप निश्चयानें धारण केलेलें नाहीं. ही डगडग आपणांस सांप्रत नडत आहे. आणि म्हणून ज्यांच्या ठिकाणीं ही समन्वयी सम्यग दृष्टि स्थिर झालेली आहे त्यांना ती दृष्टि इतरांचे ठायीं अवतरित करून स्थिर करण्याचें कार्य पुष्कळच जोरानें करीत रहाणें आवश्यक आहे.

## कुळराज्यें व संघराज्य

या समन्वयी दृष्टीचाच असा निर्णय आहे कीं भारत हें 'कुळ' घटित, 'मंडळ' घटित, अथवा प्रस्तुतच्या भाषेंत बोलावयाचें तर 'प्रांत' घटित अथवा 'राज्य' घटित असें एक 'संघ राज्य' स्पष्टपणें घोषित केलें जाईल. भारतांत एकता आहे, तें केवळ एक राज्य नाहीं किंवा एक राज्य होणार नाहीं. संघराज्यच होईल. संघराज्यांत कुळराज्यें राहतील पण तीं सार्वभौम होणार नाहींत. संघसत्ता सार्वभौम राहील. संघराज्य आणि कुलराज्य यांना एकमेकांना संभाळून एकमेकांचें संवर्धन करावें लागेल.

कुलराज्यांची बळकटी आणि संवर्धन संघराज्यानें केलें पाहिजे. आणि संघराज्याची बळकटी आणि संवर्धन कुलराज्यांनीं केलें पाहिजे. 'परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ' हा न्याय येथें लागू आहे. भारतांतील हीं कुलराज्यें भिन्न भिन्न भाषा बोलणारीं आहेत. या साऱ्या भाषा बऱ्याच प्रौढ दशेला आलेल्या आहेत. भारताचें संघराज्य लोकशाही असावयाचें आहे, आणि म्हणून लोकशाहीच्या यथायोग्य संवर्धनासाठीं, कुलराज्यांना आपापल्या भाषांच्या द्वारें लोकशाहीसंपन्न करूं दिलीं पाहिजे. त्याचप्रमाणें सर्व कुलराज्यें आणि त्यांचें मिळून झालेलें भारतीय संघराज्य यांच्या पारस्परिक व्यवहारासाठीं एक सामान्य भाषा असली पाहिजे. हें धोरण ठेवलें तरच संघराज्य आणि कुलराज्यें यांचें निरामय संवर्धन होईल. कुलराज्याच्या कल्पनेच्या आहारीं जाऊन, या पुढील पावलें टाकल्यास उभयतांतून कोणाचेंच हित होणार नाहीं. वर दर्शविलेल्या विचारपरंपरेंत आम्हास कसलाहि दोष दिसत नाहीं. आणि म्हणून महाराष्ट्रीय असें म्हणवून घेण्यांत आम्हास कसलाहि कमीपणा वाटत नाहीं. आम्ही भारतीय बनलों,

आम्हांस महाराष्ट्राचाच निराळा विचार करण्याचें आतां कांहीं कारण नाहीं, असें म्हणून अंग झटकून टाकणें यांत कांहीं अधिक मोठेपण आहे असें आम्हास वाटत नाहीं, किंबहुना तसें म्हणणाऱ्या लोकांचा स्वतःविषयीं तो एक भ्रम आहे, असेंच आम्ही मानतों. प्रांतीयतेचा शिक्का आमच्या माथीं मारणारांची आम्ही कींव करूं आणि आपल्या मार्गानें पुढें चालूं लागूं.

## बुद्धिजीवी वर्ग व जनता यांत पडलेलें भगदाड

अर्थात् महाराष्ट्राचें पुढें काय होणार, या प्रश्नाचा विचार आम्हास अवश्य कर्तव्य आहे. इंग्रजी अमदानींत आमच्या ठायीं जेव्हां नवी जागृती आली, त्या काळीं, रानडे, गोखले, टिळक वगैरे पहिल्या श्रेणींतील थोर पुरुष आम्हांला पुढारी म्हणून लाभले आणि या थोर पुरुषांच्या उंचीमुळें आपलीहि उंची वाढल्याचा आम्हांस भास झाला. सांप्रत या उंचीच्या कोटींतील कोणी पुढारी महाराष्ट्रांत नाहींत. त्यामुळें आम्हीं मागें पडलों असाहि भास आम्हास होतो. वरील पहिल्या श्रेणींतील पुढारी होते त्या काळीं आमची समग्र जनता जागृत झाली नव्हती. परंतु टिळकांच्या मृत्यूच्या दिवशीं ज्या वेळीं अचानकपणें महात्मा गांधी यांनीं टिळकांच्या शवाला खांदा दिला आणि टिळकांचें कार्य आपण पुढें चालवणार अशी घोषणा केली, इतकेंच नव्हे तर टिळकांच्या स्मारकासाठीं एक कोटी रुपयांचा निधी जमविण्याची अभूतपूर्व प्रतिज्ञा केली, तेव्हां आमचे सर्वांचे डोळे दिपून गेले आणि तेव्हांपासूनच महाराष्ट्र मागें पडला अशी शंका आम्हास येऊं लागली. टिळकांच्या मृत्यूनंतर जवळ जवळ तीस वर्षें भारतांत गांधीयुग या नांवानें यथार्थपणें ओळखलीं जातात. गांधींनीं आत्मविश्वासानें एका अभिनव तंत्राचा अवलंब करून अखिल भारतांत न भूतो न भविष्यति अशी जनतेची जागृती केली. या जागृतीच्या कामीं त्यांनीं मोठ्या आशेनें महाराष्ट्राची अनेकवार आळवणी केली. परंतु महाराष्ट्रांतील बुद्धिजीवी वर्गाला या आळवणीची विशेष ओढ दिसून आली नाहीं. तथापि महाराष्ट्रांतील सामान्य जनतेचा प्रचंड पाठिंबा गांधींना मिळाला. याचा परिणाम असा दिसून आला कीं, महाराष्ट्रांतील बुद्धिजीवी वर्ग आणि सामान्य जनता यांच्यामध्यें फार मोठें भगदाड पडलें. आणि ते दोन अवयव अत्यंत विलग झाले. या विलगपणामुळें महाराष्ट्राला साहजिकच मोठा दुबळेपणा प्राप्त झाला. बुद्धिजीवी वर्गाला जनतेचा पाठिंबा पाहिजे तसा मिळाला नाहीं. आणि जनतेला बुद्धिजीवी वर्गाचें नेतृत्व लाभलें नाहीं. यामुळें दोघेहि विकल आणि दुर्बल झाले. पूर्वीपासून बुद्धिजीवी वर्गानें आरंभिलेलीं कार्यें या कालांत जरी चालत राहिलीं, तरी जनतेचा जोम त्यांच्या पाठीशीं राहिला नाहीं. आणि जागृत झालेली महाराष्ट्रीय जनता, गांधींच्या परंपरेंत परिणामकारक प्रभाव करण्याइतकी समर्थ असल्याचें दिसून आलें नाहीं. महाराष्ट्रांतील या दोन वर्गांत पडलेलें भयंकर खिंडार बुजविल्याखेरीज महाराष्ट्राचें जीवन संपन्न आणि प्रभावी होऊं शकणार नाहीं. या उभय वर्गांतील कर्ते पुरुष हें खिंडार बुजविण्याचे कसून प्रयत्न जोंवर करणार नाहींत, आणि जोंवर एकमेकांचा पाडाव करण्याचे कळत किंवा न कळत उद्योग करीत राहतील, तोंवर महाराष्ट्र मागेंच राहील.

मतभेद, पक्षभेद, वृत्तिभेद, हे सर्वत्रच कमी अधिक प्रमाणांत आढळून येतात. परंतु या भेदांना अति तीव्र आणि उग्र स्वरूप येऊं दिल्यानें, आपलें पाऊल कधींच पुढें पडणार नाहीं, ही जाणीव या उभय वर्गांत तीव्रतेनें उत्पन्न झाली पाहिजे. आणि उभय वर्गांनीं आपल्या धोरणांचा आणि वर्तनांचा वरील दृष्टीनें त्वरित फेरविचार केला पाहिजे. दोघांनीं परस्परांच्या जवळ येण्याचे मनापासून प्रयत्न केले पाहिजेत. विशेषतः टिळकांसारख्या उंच कोटीच्या पुढाऱ्यांच्या अभावीं हें कार्य, अवघड असलें तरी, मनापासून करण्यासाठीं सर्वांनीं पुढें सरसावलें पाहिजे.

## फुगवटीला प्रगति मानण्याचा भ्रम

संघराज्यांतील इतर कुळांपेक्षां महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन कुळांना कांहीं विशेष अडचणींना तोंड द्यावें लागत आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि गुजराथ या तिघांना एकाच दावणींत गोवून मुंबईप्रांत किंवा मुंबई इलाखा, या विभागाच्या द्वारें, आपलें जीवन विकसित करणें भाग पडत आहे. इंग्रजी अमदानींत इंग्रजांची दृष्टि आपल्या लाभावरच होती म्हणून त्यांनीं वरील तीन्ही कुळांची बनवलेली दावण आपल्या हुकमतींत आपला लाभ साधेल अशा धोरणानें चालविली. सात बेटांचें त्यांनीं एक मोठें मुंबई बेट बनविलें. या मुंबईला त्यांनीं हिंदुस्थानाच्या महाद्वाराचें स्वरूप दिलें. आणि आपल्या अमदानींत भिन्न धर्मीय, असे प्रजाजन गुण्यागोविंदानें आपल्या छत्राखालीं, आपली कशी प्रगती करून घेत आहेत, तें दाखविण्यासाठीं, ते नेहमीं मुंबईकडे अभिमानानें बोट करू लागले.

या परिस्थितींत, या तीन्ही कुळांचा अथवा त्यांतील महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन कुळांचा, जो वास्तविक कोंडमारा होत होता, तिकडे कोणीच लक्ष दिलें नाही. उलट इंग्रजांची री ओढून मुंबईच्या या फुगवटीलाच आम्ही प्रगतीची बळकटी समजूं लागलों.

## इंग्रजींत झालेली विभागणी गांधीयुगांतहि कायम राहिली

कुळराज्यें आणि त्यांचें जीवन संपन्न करण्याची गरज महात्मा गांधी यांच्या नजरेंत आणि धोरणांत अचूकपणें प्रथमपासूनच दिसून येत होती. त्यांनीं भाषावार प्रांतरचनेचें म्हणजेच पर्यायानें कुळराज्य पोषणाच्या सिद्धांताचें जोरदार समर्थन केलें. या कल्पनेचा एवढा प्रभावी पुरस्कार करणारा अखिल भारतीय कीर्तीचा पुढारी, महात्मा गांधींवांचून अद्याप पावेतों कोणीहि झाला नाहीं. गांधींच्या प्रेरणेमुळें राष्ट्रीयसभेचें पुनर्घटन या भाषाघटकांच्या दृष्टीनें करावें, असें ठरलें. परंतु महाराष्ट्र आणि कर्नाटक यांची मांडणी भाषावार दृष्टीनें वास्तविक जशी होती त्या वस्तुस्थितीला धरून राष्ट्रीय सभेचें पुनर्घटन झालें नाहीं. म्हणून, महाराष्ट्रांत आणि मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या विभागांत, राष्ट्रीय सभेच्या चार प्रांतिक समित्या झाल्या. वास्तविक राष्ट्रीय सभेनें घोषिलेल्या भाषिक धोरणाला अनुसरून समस्त मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांची एक समिती राष्ट्रीय सभेंत समाविष्ट व्हावयास पाहिजे होती. तसें झालें असतें तर, गेल्या वीस, तीस वर्षांत, महाराष्ट्राचें स्वरूप पालटून गेलें असतें. आणि आजच्या अनेक अडचणी पूर्वींच सोडविल्या गेल्या असत्या. पण एकदां ही जी मोठी चूक झाली, तीमुळें इंग्रजांच्या अमदानींत विभागला गेलेला किंवा तुटलेला महाराष्ट्र सांधला गेला नाहीं. या विभागांचा निराळेपणा उलट वाढीस लागला आणि तो आज आम्हास भेडसावीत आहे. आमची प्रगती त्यानें खुंटून धरली आहे. आमची शक्ति क्षीण केली आहे. आमचें सामर्थ्य विभागून टाकिलें आहे. आणि आम्हास सर्वथा दुर्बळ करून टाकिलें आहे. महाराष्ट्राप्रमाणेंच, किंबहुना महाराष्ट्रापेक्षांहि, कर्नाटकाची स्थिति फारच वाईट आहे. महाराष्ट्राला मध्यंतरीं मुसलमानांच्या सत्तेशीं झगडा खेळत असतांना जें महत्व आलें, तेंहि कर्नाटकास न लाभल्यानें, कर्नाटक फारच मागें पडला. मराठी कुळाची छापहि याच काळांत कर्नाटकावर पडल्याशिवाय राहिली नाहीं. इंग्रजी अमदानींतहि त्याचें पाऊल फारसें पुढें पडलें नाहीं. तथापि गांधीयुगांत, कर्नाटक गांधीप्रणालीशीं अधिक समरस झाल्यामुळें, तारतम्यानें त्याचें महत्त्व या काळांत कांहींसें वाढलें येवढें खरें. कर्नाटकांतील म्हैसूर संस्थान जिवंत राहिल्यानें कर्नाटकाच्या परिस्थितींत महाराष्ट्रापेक्षां कांहीं निराळा परिणाम घडून आला. गुजराथ कुल, गांधी हे तत्रस्थत्र असल्यामुळें आपोआपच पुढें सरसावलें. वाणिज्य वृत्ताच्या समानतेमुळें इंग्रजांच्या कारकीर्दींतही गुर्जर कुळाची भरभराटच झाली.

तथापि सौराष्ट्रांतील शेकडों संस्थानांमुळें गुर्जर-कुळाच्या प्रश्नाला आणखी एक निराळें स्वरूप आलें. मुंबई विभागांतच, सिंधी कुळ जोडण्यांत आल्यामुळें मुंबईच्या विचित्रतेंत इंग्रजांच्या कारकीर्दीत भरच पडली या परिस्थितींत महाराष्ट्राचा कोंडमारा अधिकच तीव्र झाला असल्यास नवल नाहीं.

## इंग्रजी-पिछेहाटीचें आणखी एक क्षेत्र

महाराष्ट्रात मराठी भाषेची जोपासना इतर कित्येक कुळांच्या मानानें काहींशी जोरकस घडून आली. इंग्रजपूर्व काळांत महाराष्ट्रानें मिळविलेल्या भारतीय प्रतिष्ठेमुळें महाराष्ट्राच्या भाषोपासनेला एकप्रकारचा साहजिक उठाव मिळाला. निर्वाहासाठीं इंग्रजीची जोपासना यद्यपि महाराष्ट्रीयांनीं आस्थापूर्वक केली, तरी मद्रास किंवा बंगाल या कुळांतील प्रजेप्रमाणें ते इंग्रजीच्या आहारीं गेले नाहींत. याचा परिणाम असा झाला कीं, इंग्रजी भाषेच्या वाढत्या व्यवहाराच्या क्षेत्रांत महाराष्ट्रीय लोक मागें पडले. महाराष्ट्रांत महाराष्ट्रीयांनीं चालवलेलें एकहि इंग्रजी वृत्तपत्र प्रतिष्ठा पावलें नाहीं आणि यामुळें महाराष्ट्र चें हृद्गत महाराष्ट्राबाहेर कळविण्याचें कोणतेंहि साधन महाराष्ट्रीयांचे हातीं राहिलें नाहीं. महाराष्ट्राच्या विकासावर या घटनेचा अनिष्ट परिणाम झालेला स्पष्ट दिसून येत आहे. आणि त्याचीं फळें महाराष्ट्र भोगीत आहे. कदाचित् इंग्रजीचा फाजील जोर पुढील युगांत कमी होईल त्यावेळीं महाराष्ट्राला आपलें झालेले नुकसान भरून काढतां येईल आणि ह्या दृष्टीनें हिंदी-हिंदुस्थानीच्या जोपासनेकडे महाराष्ट्राचें जें हार्दिक लक्ष लागल्याचें दिसून येत आहे तें आशादायक आहे. मराठीची भूमिका न सोडतां हिंदी-हिंदुस्थानीची समयोजित परंतु जोरकस जोपासना महाराष्ट्रीयांनीं अशीच पुढें चालू ठेवल्यास त्याचा फायदा त्यास मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं.

## आपलें घर सुधारा

इतर कुळांच्या मानानें महाराष्ट्र मागें पडला आहे किंवा कसें हें मोघमपणानें सांगणें चुकीचें होईल. बंगाल, पंजाब आणि मद्रास इकडील जीं वृत्तें कानीं येतात, त्यांचें मनन करितां महाराष्ट्रानें विशेष खेद करण्याचें कांहीं कारण आहे असें वाटत नाहीं. पण यावरून समाधानाचा अर्थ काढणें योग्य होणार नाहीं. इतर कुळाची दुःस्थिती असेल तर तीहि दुःखाचीच गोष्ट आहे. आणि त्याचीहि चिंता आपल्यास टाळतां येणार नाही. तथापि आपलें घर आपण सुधरल्याशिवाय शेजाऱ्याचें घर सुधरूं पहाणें मूर्खपणाचेंच ठरेल. आपलें घर सुधरून आदर्श करून दाखविणें, हाच खरा प्रभावी उपाय होय. जिकडे तिकडे, आय्यंगार, मेनन, किंवा स्वामी दिसतात, अशा पुळचट तक्रारी करण्यांत काहीं भूषण नाहीं. मेनन, स्वामी आणि आय्यंगार हे झाले तरी आपलेच आहेत आणि ते गुणांनीं पुढें गेले असतील तर त्या घटनेचें आपण स्वागत केलें पाहिजे. उगाच विव्हळण्यानें काहीं लाभ नाहीं. आपण आपलें लक्ष आपलें घर सुधारण्यावर केंद्रित केलें पाहिजे.

## पोकळ अनुमानें नकोत !

असें करावयाचें तर रीतसर हिशेबी पद्धतीने चौकशी करून आढावा घेतला पाहिजे. पोकळ अनुमानें बधून कालक्षेप करण्यांत वेळ दवडूं नये. प्रत्येक कुळानें अशी ईर्षा धरली पाहिजे कीं, आपल्या घरचा कारभार तोलैदारीनें संभाळून आपण भारतास कर्तृत्वाचा भरपूर पुरवठा केला पाहिजे. भारताला शिपाई पाहिजेत, यंत्रविशारद पाहिजेत, शास्त्रज्ञ पाहिजेत, विद्वान् पाहिजेत, कलावंत पाहिजेत, व्यापारी पाहिजेत, कामकरी पाहिजेत, मुत्सद्दी पाहिजेत, संस्थाचालक पाहिजेत, कारभारी पाहिजेत, अर्थविशारद पाहिजेत, तत्त्वज्ञ पाहिजेत, असे विविध प्रकारचे कर्ते आणि कार्यक्षम लोक पाहिजेत. ते भरपूर प्रमाणांत उत्पन्न करून, भारतास पुरविण्याची ईर्षा प्रत्येक कुलराज्यानें धरली पाहिजे. आणि त्या दृष्टीनें आपली संघटना केली पाहिजे. आपल्याला कलहांनीं आणि विग्रहांनीं ग्रस्त केलें आहे. संशयांनीं क्षीण केलें आहे. अविश्वासानें एकमेकां-

पासून दूर केलें आहे. मत्सरानें एकमेकांची निंदा करण्यास जोर आणला आहे. गुणांची ओळख आपण विसरलों आहों. पात्रता अंगीं आणण्याची कळकळ आपणांस वाटत नाहीं. पोरकट तक्रारी, आणि कटकटी करण्याचा मोह सुटत नाहीं. हात दाखवून दुसऱ्यास अवलक्षण करण्याची आपली खोड कमी होत नाहीं. क्षुद्र काय आणि भरीव काय, यांतील विवेक शांतपणें आपण करीत नाहीं. या आणि अशा आपल्या वर्तनामुळें, आपणच आपलें नुकसान करून घेत आहोंत, हें आपणांस समजत नाहीं. येवढ्यासाठीं आपणच आपल्या मनाला इष्ट आणि योग्य वळण लावलें पाहिजे, तेव्हांच आपला कार्यभाग साधेल.

## सर्वांगीण चौकशीमंडळ असावें

गेल्या तीस वर्षांत अनेक वेळां माझ्या मनांत आलें कीं, महाराष्ट्रांत (आणि अर्थात् इतर कुरुराज्यांतहि) असें एक मध्यवर्ती मंडळ असावें कीं, जें प्रतिवर्षी महाराष्ट्रांतील सर्व घडामोडींचा तुलनात्मक, हिशोबी आणि सांगोपांग परामर्ष घेईल. जीवनाची, साहित्य, राजकारण, विद्या, व्यापार, कला वगैरे जीं विविध अंगें आहेत त्या विविध शाखांत महाराष्ट्राची प्रगति झाली किंवा कसें, याची प्रत्यक्ष चौकशी करून साधार आढावा या मंडळानें घ्यावा व तो प्रसिद्ध करावा. हा आढावा घेतांना इतर कुलराज्यांतील प्रगतीचीहि तुलनेनें विचार करावा. त्याचप्रमाणें जागतिक प्रगतीचेंहि मोजमाप घ्यावें, आणि त्या तुलनेनें, आपण कोठें आहों हें तोलून पहावें निरनिराळ्या शाखांतील निवडक तज्ज्ञ, आणि अनुभवी अशा विविध मतांचे प्रतिष्ठित प्रतिनिधि या मंडळांत असावे. कसलेहि पक्षभेद, किंवा मतभेद, किंवा बंधनें न मानतां, मोकळ्या मनानें, या मंडळानें काम करावें. आपलीं मूल्येंच निराळीं आहेत या सबबीवर या कामीं असहकार करू नये. एकमेकांचे दृष्टिकोन समजावून घेऊन, सप्रमाण माहिती मिळविण्याचे कामीं आळस करूं नये. संपूर्ण माहिती हातीं आल्यावर, कोणा तज्ज्ञाचें विभिन्न मूल्यमापन असल्यास तें या आढाव्यास पुरवणी म्हणून जोडण्यांत यावें. तात्पर्य, होतां होईल तों सर्वांनीं एकत्र येऊन हें कार्य यशस्वी करावें. आपले वैयक्तिक रागलोभ किंवा पक्षभेद घटकाभर बाजूस ठेवावे. सर्वांनीं हें चिंतावें कीं, क्षेत्र कोणतेंहि असो, पक्ष कोणताहि असो, मत कोणतेंहि असो त्यांत गेलेले महाराष्ट्रीय त्या त्या क्षेत्रांत आघाडीवर आहेत किंवा नाहींत, नसतील तर त्यांच्या अडचणीचा परिहार करून त्यांना आघाडीवर जाण्यास आपणास काय साह्य करतां येईल, याचा कळकळीनें विचार करावा कुस्ती मारावयाची असली म्हणजे ज्याप्रमाणें उभय पहलवानांना तयार करतात त्याप्रमाणें आपली दृष्टि असावी. रोडक्या आणि दुबळ्या पैलवानाची जोड कशी होईल? इतका खिळखिळेपणा न ठेवल्यास असलें मंडळ व्हावें तितकें फलदायी होणार नाहीं आणि अशी सशास्त्र चौकशी झाल्याशिवाय मोघम प्रश्न आणि पोकळ अनुमानें करण्यांतच आपला वेळ व्यर्थ जाईल. एका महाराष्ट्रीयानें दुसऱ्या महाराष्ट्रीयाचें तोंड पहावयाचें नाहीं या ऐवजी, प्रत्येक महाराष्ट्रीयाची दुसऱ्यानें प्रेमानें विचारपूस करावी आणि त्याला आपल्या मार्गानें जाण्यास सहाय्य द्यावें, निदान प्रोत्साहित करावें, किंवा आपल्या मार्गास वळवावें, पण उदासीन राहूं नये.

## चर्चेला सक्रिय वळण

राजश्री गोरे यांनीं उपस्थित केलेल्या आणि आपण पुरस्कारिलेल्या प्रश्नाविषयीं मी माझा दृष्टिकोन आणि माझे काहीं विचार येथें मांडले आहेत. एखादी निश्चित प्रश्नवही तयार करून तिच्या आधारें, पद्धतशीर आणि आकडेवार मोजदाद करण्याचें साधन हातीं असल्याशिवाय, चर्चेला निश्चितपणाचें वळण लागणें शक्य नाहीं. तथापि आपण जी अनेक विद्वानांचीं व कर्त्या, अनुभवी पुरुषांचीं मतें मागवून प्रसिद्ध केलीं आहेत तीं सर्व एकत्र वाचावयास मिळण्याची सोय झाल्यास विचाराला चालना मिळेल आणि त्यांतून मी सुचविलेलें चौकशी–मंडळ स्थापन होण्याचा योग आल्यास, या चर्चेला सक्रिय वळण लागलें, असें मी तरी समजेन. महाराष्ट्राचें प्रत्यक्ष कुलराज्य आज न झालें तरी उद्यां तरी होईलच. किंबहुना तसें तें आपण घडवून आणलेंच पाहिजे. हा दृढ विश्वास सर्वांनीं मनात धरावा. आणि चौकशी–मंडळासारखा उद्योग, जणू राज्य झालेंच आहे असें समजून, हातीं घ्यावा.

# : २६ :

# महाराष्ट्र मागें पडला आहे का ?

★ लेखक : मधु गजानन कर्णिक ★

देशाच्या राजकारणामध्यें महाराष्ट्राला कांहीं स्थान राहिलें नाहीं, महाराष्ट्राचें नांव मागें पडत चाललें, अशा अर्थाचे जे निराशेचे उद्गार श्री. बाबासाहेब जयकर यांनीं कांहीं दिवस पूर्वी लोणावळ्यास काढले, त्याबद्दल लिहितांना समाजवादी पक्षाचे श्री. ना. ग. गोरे म्हणतात कीं, महाराष्ट्राच्या उत्कर्षाची आस्था ज्यांच्या चित्तांत वसत असेल ते सर्व श्री. जयकरांच्या मताशीं सहमत होतील.

मला तसें वाटत नाहीं. महाराष्ट्र जर खरोखरीच मागें पडत चालला असेल तर, त्याचा सर्व बाजूंनीं उत्कर्ष व्हावा असें कांहीं लोकांना वाटतें व बाकीचे लोक त्याबाबत निरुत्साही आहेत असें म्हणण्याचें कारण नाहीं. सारे महाराष्ट्रवासी जयकरांच्या मताशीं सहमत होतील असें मला वाटत नाहीं; कारण जयकरांचें मत बरेंचसें एकांगी आणि सामान्य माणसाला चुकीच्या माहितीकडे बोट दाखविणारें आहे असें मला वाटतें.

महाराष्ट्राच्या हातून आज देशाच्या राजकारणाचें मुख्य सूत्र हलत नाहीं हें खरें असलें, तरी आम्हाला देशाच्या राजकारणाच्या आखाड्यांत कांहींच स्थान नाहीं अशी हाकाटी करणें म्हणजे सत्य गोष्टींचा विपर्यास करण्यासारखें आहे. महाराष्ट्र सर्व प्रांतांत आजहि आघाडीवरच आहे. महाराष्ट्राचा सेनापती आज राष्ट्रास मार्ग दाखवीत नसला म्हणून काय झालें! आपणच देशाचें आधिपत्य करणार हा अहंकार कुचकामाचा आहे. महाराष्ट्राला अशी मुखत्यारी कोणी बहाल केली आहे? हा अति आत्मविश्वासाचा पोकळ बडिवार सोडल्याशिवाय महाराष्ट्राची दृष्टि साफ होणार नाहीं.

## हा पहा पुढारलेला महाराष्ट्र

महाराष्ट्राची पिछेहाट होत आहे या घोषणेमागें अशी कल्पना आहे कीं, देशाच्या राजकारभारांत महाराष्ट्रवासीयांना पक्षपाती वागणूक मिळत आहे. त्याच्या कर्तबगारीला योग्य तो वाव वा उत्तेजन दिलें जात नाहीं. त्याचे पाय खालीं ओढण्याचा सतत प्रयत्न चाललेला असतो. मला ही कल्पना हास्यास्पद वाटते. आज टिळक, आगरकर, भांडारकर, गोखले, रानडे, तेलंग यांच्याइतका बुद्धिमत्तेचा व प्रभावी व्यक्तिमत्वाचा कोणीहि महाराष्ट्रांत दिसत नाहीं. तरीसुद्धां आज कितीतरी महाराष्ट्रीय मोठमोठ्या जागा भूषवितांना दिसत आहेत. तीस वर्षांपूर्वी महाराष्ट्र जितक्या हिरीरीनें देशसेवा करीत होता तितक्याच आत्मीयतेनें आजहि महाराष्ट्र खडा उभा आहे. तीस–पसतीस वर्षांपूर्वी पहिल्या दर्जाचे पांच सहा पुढारी देशाचें राजकारण चालवीत होते; आज दुय्यम दर्जाचे पन्नास जण आघाडीवर आपणांस दिसत आहेत. डोळे मात्र उघडे ठेवले पाहिजेत आणि स्वतःच्या योग्यतेबद्दल साशंकता निर्माण होतां कामा नये. ज्यांनीं स्वतंत्र भारताची घटना तयार केली ते

डॉ. बाबासाहेब आंबेडकर; वीज, खाणीकामाचे उत्साही मंत्री श्री. काकासाहेब गाडगीळ; हिंदी पार्लमेंटचे निःपक्षपाती स्पीकर श्री. दादासाहेब मावळणकर; कॉंग्रेसच्या अध्यक्षस्थानासाठीं ज्यांचें नांव सुचविलें गेलें होतें व जे त्याचे गेलीं दोन वर्षे सर चिटणीस आहेत ते श्री. शंकरराव देव; कॉंग्रेस कमेटीचे एक सभासद श्री. स. का. पाटील, हे साऱ्या देशाच्या विश्वासाला पात्र झालेले राष्ट्रीय सभेचे सेवक महाराष्ट्रीयच आहेत. ऑस्ट्रेलियाचे माजी हायकमिशनर रँ. र. पु. परांजपे, पूर्व ऑफ्रिकेचे सध्यांचे हायकमिशनर श्री. आप्पासाहेब पंत, जपानला गेलेले हिंदुस्थानचे ट्रेड कमिशनर श्री. मुल्हेरकर ही आंतरराष्ट्रीय राजकारण चालवणारी मंडळी महाराष्ट्रीय नव्हेत का ? हैद्राबादचे चीफ सिव्हिल अॅडमिनिस्ट्रेटर श्री. बखले व जॉईंट अॅडमिनिस्ट्रेटर श्री. प्रधान, रेल्वेचे मॅनेजर श्री. बखले, कालपर्यंत रिझर्व्ह बॅंकेचे गव्हर्नर व आपल्या बुद्धिमत्तेनें व कर्तबगारीनें जगमान्य होऊन जागतिक बँकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आलेले श्री. चिंतामणराव देशमुख ही हुषार मंडळी महाराष्ट्रांतीलच आहेत !

## पक्षोपपक्षांचे पुढारी महाराष्ट्रीयच

श्री. गोरे म्हणतात कीं, १९२० सालानंतर पांढरपेशा मध्यमवर्गीय महाराष्ट्रीयांचें संपूर्ण पाठबळ राष्ट्रसभेला कधींच मिळालें नाहीं. ही गोष्ट खरी आहे. महाराष्ट्राच्या राजकारणामध्यें त्या काळीं जी त्रिफळी निर्माण झाली ती झाली नसती तर आज महाराष्ट्राच्या बुद्धिवैभवाचा, शौर्याचा व त्यागाचा डंका वाजत असता. परंतु दुर्दैवानें तसें तें व्हावयाचें नव्हतें. सगळे मतभेद बाजूला सारून राष्ट्रसभेच्या हाकेला महाराष्ट्रानें एकमुखानें साद दिली असती, तर आमचें महाराष्ट्र अग्रेसर म्हणून गणलें गेलें असतें. परंतु या प्रश्नाकडे वेगळ्या तटस्थ दृष्टीनें पाहूं गेलें असतां असें आढळून येईल कीं, राष्ट्रसभेला विरोध करणारे जे जे पक्ष आहेत, त्यांचे देखील कर्णधार बहुधा सारे महाराष्ट्रीयच आहेत. पूर्वी एके काळीं कॉंग्रेसमध्यें असलेले पण आतां तीमधून फुटून निघालेल्या समाजवादी पक्षाचे अध्वर्यू अच्युतराव पटवर्धन, स्वतः गोरे, युसुफ मेहेरअली; त्याचप्रमाणें १९२८ पासून आपल्या प्रतिगामी धोरणांनीं मशहूर झालेल्या हिंदुमहासभेचे कर्णधार श्री. तात्याराव सावरकर आणि श्री. अण्णाराव भोपटकर; रा. स्व. संघाचे गोळवलकर व सर्व प्रमुख कार्यकर्ते; त्याचप्रमाणें राष्ट्रविघातक चळवळ करणाऱ्या कम्युनिस्टांचे नेते श्री. डांगे व श्री. रणदिवे हे बुद्धि, कर्तृत्व वा दुसऱ्या कोठल्याहि क्षेत्रांत कॉंग्रेसवादी महाराष्ट्रीयांच्या पाठीमागें नाहींत.

आज हिंदुस्थानांतील तीन प्रमुख विश्वविद्यालयांचे व्हाईस चॅन्सेलर्स महाराष्ट्रीय आहेत, हा महाराष्ट्राच्या बुद्धिवैभवाचा केवढा तरी गौरव आहे. बिहार प्रांताचे गव्हर्नर लोकनायक अणे त्या परकीय प्रांतातहि लोकप्रिय झाले आहेत. बाबासाहेब जयकर तर आतांपर्यंत प्रिव्ही कौन्सिलचे मेंबर होते. आणि उरलेल्या भारतांत जितके रँगलर्स आहेत तितके तर आमच्या पुण्यांत म्हणजे महाराष्ट्राच्या राजधानींत सांपडतील.

## राजकारणेतर क्षेत्रांतील महाराष्ट्रीय कर्तबगारी

राजकारणांत आणि मोठमोठ्या हुद्यांवरच फक्त महाराष्ट्रीय आहेत असें नव्हे, तर इतर कार्यक्षेत्रांतहि महाराष्ट्रानें मर्दुमकी गाजवलेली आहे. विज्ञानांत महाराष्ट्रानें नोबेल प्राईज मिळवलें नसलें, तरी अॅटोमिडीनचा शोध लावून अमेरिकन लोकांचे धन्यवाद मिळवणाऱ्या डॉ. भिसे यांना जन्म दिला आहे. सर रामन् यांच्या तोडीचे आमच्याकडे गोखले, लिमये यांसारखे संशोधक आहेत, व लवकरच ते जगापुढें आल्याशिवाय रहाणार नाहींत. वाङ्मयप्रांतांत मराठी भाषेकडे जगाचें मन आकर्षण करून घेईल असा स्वयप्रकाशी तेजस्वी कादंबरीकार अजून जन्मास यावयाचा असला तरी ज्यांना मराठी वाचतां येतें त्या परप्रांतीयांना हरि नारायण आपटे, बालकवि, गडकरी, केशव-

सुत यांच्यावद्दल कौतुक वाटतें. श्री. खांडेकर व श्री. फडके यांच्या कांहीं कादंबऱ्यांचीं भाषांतरें गुजराथी व हिंदी भाषांतून झालेलीं असून तीं फार लोकप्रिय झालेलीं आहेत. काका कालेलकरांचें स्पृहणीय उदाहरण आपणांपुढें आहेच. गुजराथी भाषेवरील त्यांचें प्रभुत्व वाखाणण्यासारखें आहे. "काका शैली" म्हणून भाषेचा एक प्रकार गुजराथी वाङ्मयांत प्रचलित झालेला आहे, हें महाराष्ट्राला निःसंशय भूषणास्पद आहे. भारतीय संगीताचे पडसाद पाश्चात्य देशांत उमटविणारे संगीत कलावंत श्री. जोशी, हिराबाई बडोदेकर, शाहीर नानिवडेकर यांनीं भारतीय संगीताचें व पर्यायानें महाराष्ट्राचें नांव उज्ज्वल केलें. क्रीडाक्षेत्रांतहि महाराष्ट्र एक पाऊल पुढेंच आहे. अमरावतीला झालेल्या मागील वर्षाच्या अ. भा. सामन्यांत महाराष्ट्रानें नांव गाजविलेलें आहे. इंडियाच्या जगत्विख्यात हॉकी संघांत पांच-सहा खेळाडू मुंबईचे, म्हणजे पर्यायानें महाराष्ट्राचे होते. टॉमस कपसाठीं गेलेल्या बॅडमिंटनच्या संघांत आपले माडगांवकर, उल्लालबंधू होते. क्रिकेटमध्यें विजय हजरे, अधिकारी, फडकर, भाडारकर, रांगणेकर, रेगे, सोहोनी वगैरे पहिल्या दर्जाचे खेळाडू महाराष्ट्रीयच आहेत. रणांगणावरहि महाराष्ट्रानें अतिउत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. आठव्या फलटणींतील मराठ्यांनीं गाजवलेली मर्दुमकी आज रोमेल जिवंत असता तर तो विसरला नसता. मागील युद्धांत व्हिक्टोरिया क्रॉस मिळविणाऱ्यांपैकीं आपला नामदेव जाधव वयानें सर्वांत लहान आहे, ही महाराष्ट्रास केवढ्या अभिमानाची गोष्ट आहे. 'दांडीयात्रेच्या वेळीं मी तुरुंगात गेल्यावर तुम्ही त्याचें धुरीणत्व सांभाळा' म्हणून महात्माजींनीं बापुकाका जोशी यांना विनंति केली होती, हें महाराष्ट्रानें विसरूं नये. महात्माजींचे मार्ग टिळकांच्या मार्गापेक्षां निराळे असले, तरी टिळकांची थोरवी ते ओळखून होते. नामदार गोखल्यांना तर ते आपले गुरु मानीत. महाराष्ट्राची योग्यता शेवटपर्यंत बापूजी पूर्णपणें जाणून होते. पहिला सत्याग्रही म्हणून त्यांनीं विनोबाजींनाच मान दिला होता. आणि आज बापूजींनंतर सर्वोदय समाजाची कल्पना मूर्त स्वरूपात आणून त्यांचें अपुरें राहिलेलें कार्य पूर्ण करण्यास विनोबाजीच समर्थ आहेत.

## प्रथम दृष्टि साफ हवी

धर्मराजाला धृतराष्ट्राच्या दरबारांत एकहि कुटिल इसम सांपडला नाहीं, कारण तो स्वतः सच्छिल, उदार, निःस्पृह होता. उलट त्या दरबारांत द्रोण, कृप, भीष्म, कृष्ण यांच्यासारखे एकापेक्षा एक थोर थोर गृहस्थ असताना दुर्योधनाला एकहि चांगला माणूस दिसला नाहीं. कारण स्वतः उच्च गुणांना पारखा असल्यामुळें उदात्त गुणांची तो पारख तरी काय करणार? स्वतः ज्या दृष्टिकोनांतून जगाकडे बघूं तसें जग आपणाला दिसतें. जगाच्या जीवनकलहांत कांहीं चमत्कारिक दिसूं लागलें कीं, आपण आपली दृष्टि प्रथम तपासली पाहिजे. महाराष्ट्राला ही माझी सूचना आहे कीं, त्यानें आपली दृष्टि सरळ आहे कीं नाहीं, वागणूक स्वच्छ आहे कीं नाहीं, याची प्रथम खात्री करून घ्यावी. महाराष्ट्र परक्या भावनेनें दुसऱ्या प्रांतांकडे बघणार असेल, तर त्याला मिळणाऱ्या वागणुकीविरुद्ध पक्षपातीपणाचा आरोप करावयास काहींच नैतिक अधिकार पोंचत नाहीं.

एक राष्ट्र म्हटलें कीं, त्यांतील प्रांतांना स्वतंत्र असें अस्तित्वच असूं शकत नाहीं. शिवाय प्रत्येक प्रांताचें जीवित इतर प्रांतांशीं इतक्या निगडितपणें गुंफलेलें असतें कीं, एका प्रांताचा अधःपात वा अभ्युदय साऱ्या राष्ट्रावर परिणामकारक ठरल्याशिवाय रहात नाहीं. महाराष्ट्राची सर्व बाजूनें उन्नति होणें म्हणजे सारा भारत उत्कर्षाप्रत जाण्यासारखें आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रानें हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, आपली उन्नति करून घ्यावयाची ती आपल्या देशाचें वैभव व सुबत्ता वाढवण्यासाठींच! आम्हाला गुजराथवर वा आंध्रप्रदेशावर मात करावयाची नसून त्यांच्या हातांत हात घालून देशाच्या सुसंपन्नतेसाठीं आम्हीं आमची प्रगती करून घेतली पाहिजे.

## निष्कारण हळहळतां कशाला ?

दुहीनें पोखरला असतांहि राष्ट्राच्या हांकेला महाराष्ट्रानें दिलेली साद देश विसरणार नाहीं. आणि म्हणून ज्या प्रांतीय घटकानें टिळक, गोखले, रानडे यांच्यासारखीं नररत्नें एके काळीं निर्माण करून देशाला स्वातंत्र्याच्या मार्गावर आणून सोडलें, त्याच्या कर्तृत्वाचा विसर पडून त्यास पक्षपाताची वागणूक मिळते आहे ही तक्रार बिल्कुल पटण्यासारखी नाहीं. पण राजकीय स्वातंत्र्याकरितां महाराष्ट्रानें एकट्यानें कांहीं लढा दिला नव्हता. इतर प्रांतांनींहि आपआपला वाटा उचलला होता. टिळकांची कणखर परंपरा राखणारे राजकारणधुरंधर महाराष्ट्रानें निर्माण केलें असते, तरी इतर प्रांतनिवासींची मदत घेतल्याशिवाय चाललें नसतें. म्हणून आज आपण मागें पडत चाललों आहोंत, अशी हाकाटी पिटून हळहळत बसण्यापेक्षां देशस्वातंत्र्याच्या लढ्याला महाराष्ट्रानें सुरवात केली आणि पुढील चळवळीचा पाया घट्ट बसविला याबद्दल आम्ही समाधान मानलें पाहिजे.

## गंगाजमनी राज्यव्यवस्थेचे तोटे आणि फायदेहि

महाराष्ट्राजवळ गुजराथसारखा पैशाचा जोर नाहीं, हें खरें. पण पैसा हें एकच कांहीं राष्ट्राची सेवा करावयाचें साधन नव्हे. गुजराथ आपला पैसा, बिहार-ओरिसा आपलीं खनिज-द्रव्यें, पंजाब, संयुक्त प्रांत, बंगाल गहूं व तांदुळ, मद्रास गणितज्ञ व संशोधक आणि महाराष्ट्र राजकारणी व त्यागी माणसें राष्ट्रास देईल. प्रत्येक प्रांत आपापल्या कुवतीप्रमाणें राष्ट्रकार्य करील. त्यांत कोणी कमीजास्त सेवा केली, असें समजण्याचें कारण नाहीं. आणि प्रांत तरी काय ? एखाद्या खंडप्राय देशाची व्यवस्था सुरळीतपणें लागावी याकरितां त्याचे लहान लहान घटक करणें अवश्य होऊन बसतें. मोगल साम्राज्यांत सुद्धां हिंदुस्थानचे असेच तुकडे पाडण्यांत येऊन त्यावर नवाब नेमले होते. इंग्रजांनीं पाडलेले अखंड हिंदुस्थानचे प्रांत कोणत्याहि तत्त्वावर आधारलेले नव्हते. जसजसा मुलूख अंमलाखालीं येत गेला, तसतसे ते प्रांत निर्माण करीत गेले. त्यांनीं राज्यव्यवस्थेची सुकरता पाहिली हें त्यांच्या दृष्टीनें ठीक झालें, पण धर्म, भाषा, संस्कार यांचा एकमेकांशीं मेळ न बसणारे समाजाचे घटक एकाच प्रांतांत कोंबल्यामुळें कोणत्याच समाजघटकास वाव न मिळून त्याचा उत्कर्ष झाला नाहीं. ही गंगाजमनी राज्यव्यवस्था एक प्रकारें स्वातंत्र्येच्छु राष्ट्रवादाला पोषकच ठरली यांत वाद नाहीं. एकाच प्रांतांत एकाच धर्माचे, एकाच आचार-विचाराचे लोक रहात असतील व त्यांचा प्रदेश सर्व दृष्टीनें स्वयंपूर्ण व स्वायत्त होण्याचा प्रयत्न करणार असेल तर तेथें प्रांतीयतेची संकुचित भावनाहि निर्माण होणें संभवनीय आहे. आणि ती होण्याचा संभव दिसूं लागला कीं, राष्ट्रवादाला सुरुंग लागलाच म्हणून समजावें मग देशाची शांतता व स्वातंत्र्य सुरक्षित रहाणें दुरापस्त ! राष्ट्रीयवादी लोकांना जुन्या प्रांतरचनेपासून हिंदुस्थानचा कोणता फायदा झाला असें वाटत असेल, तर तो हा कीं, निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांचा एकमेकांशीं जास्त निकट संबंध आला व राष्ट्रीयत्वाची, हिंदुस्थानच्या सलगत्वाची भावना बीजरूपानें याच प्रांतरचनेपासून निर्माण झाली. मुंबई प्रांतांत मराठी, गुजराथी व कानडी लोक जवळ जवळ आले. गुजराथ्यांच्या व्यापारामुळें, महाराष्ट्राच्या राजकारणामुळें आणि कानडी लोकांच्या सुपीक शेतीमुळें त्यांचा एकमेकांशीं व इतर प्रांतांशीं निकटचा संबंध आला. कोणी म्हणेल कीं, राष्ट्रीयत्वाच्या स्थंडिलासमोर वैयक्तिक घटकांच्या उत्कर्षाचा आम्हांस बळी द्यावा लागला. एवढी जबर किंमत देणें रास्त नव्हतें. याला उत्तर एवढेंच कीं, द्यावी लागलेली किंमत जें साध्य झालें त्याच्यापुढें कांहींच नाहीं. फलश्रुति होणार नाहीं अशी खात्री असतांना केलेला त्याग सर्वश्रेष्ठ होय.

## एकजुटीचे प्रयत्नांचा डोंगर उभारा

आज महाराष्ट्राची स्थिति बिल्कुल निराशाजनक नाहीं. आणि निराशवृत्तीहि महाराष्ट्राला ठऊक नाहीं. बुद्धीच्या जोरावर, मर्दानी कुवतीवर आणि विशाल दृष्टिकोनाच्या मदतीनें महाराष्ट्र आदर्शवत झाल्याशिवाय राहाणार नाहीं बुद्धि आणि कटकपणा या दोघांचाहि समन्वय महाराष्ट्रीय रक्तांत झालेला आहे. पण ज दूर्ने पक्वान्नें भरलेलें ताट अचानक पुढें यावें, तद्वत भाविकालांत आपला अचानक अभ्युदय होणार आहे, असा वेडा आशावाद आपण बाळगू तर साफ फसूं ! हिंदुस्थानला साठ वर्षांच्या लढ्यानंतर स्वातंत्र्य मिळालें. रक्तच्या बलिदानानें रणांगणावर विजयश्री खेंचून आणाची लागते. महाराष्ट्राला याच्याहि पुढें प्रगती करून घ्यावयाची असेल तर आपआपसातील वर्गकलह व तत्त्वकलह बाजूला सारून एकजुटीनें व एकभावानें प्रयत्नांचा डोंगर रचला पाहिजे. परंतु बुद्धि आणि शक्ति यांचा अमक संयोग आकुंचित प्रांतीयतेच्या गर्तेत महाराष्ट्राला नेल्याशिवाय रहाणार नाहीं. लहान लहान डबक्यांत डुंबत लहान बेडक्या अहंकारानें डरांव करीत असतात. महाराष्ट्राला त्यांच्यासारखें व्हावयाचें नाहीं. मानवतेच्या विशाल सागरांत महाराष्ट्रानें सदैव डुंबलें पाहिजे.

आपलें राष्ट्र पुढें आलें पाहिजे, या हेतूनें प्रेरित होऊन प्रत्येक प्रांतानें आपली प्रगती करून घेण्याचा चंग बांधला पाहिजे. प्रांतांतील लोकांच्या ज्या ज्या गरजा आहेत त्या त्या शक्य तों त्या प्रांतातच निर्माण व्हाव्यात. कोणताहि प्रांत अन्नाकरितां वा वस्त्राकरितां शक्यतों दुसऱ्या प्रांतावर अवलंबून रहातां कामा नये. ( पूर्णपणें ही गोष्ट प्रत्यक्षांत साध्य होणारी नाहीं ) पण कांहीं राष्ट्रीय गरजा अशा असतात कीं त्या कार्यक्षेत्रांत कांहीं प्रांत जास्त प्रामुख्यानें चमकतात. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें पाहिलें असतां तीं क्षेत्रें सर्वांना सारख्याच प्रमाणांत खुलीं ठेवणें फायदेशीर न होतां तोट्याचेंच होतें. त्यांत राष्ट्रीय संपत्तीचा अनाठायीं व्यय होऊन हुषार तरुणांच्या कर्तृत्वाला वाव मिळत नाहीं. तेव्हां अशा कांहीं क्षेत्रांत योग्य त्या वर्गाच्या लायक उमेदवारांना जास्त सवलती वा प्रवेश देणें राष्ट्राचें हित डोळ्यापुढें ठेवून, हेंच अंतिम हितावह आहे.

## महाराष्ट्राच्या रक्तांत भिनलेलें बुद्धिबळ व शौर्य

आजपर्यंत महाराष्ट्र दोन क्षेत्रांत प्रामुख्यानें चमकलेला दिसून येईल. राजकारणामध्यें महाराष्ट्रानें आपल्या बुद्धीचें तेज फार पूर्वीपासून दाखविलें आहे. आणि शूरत्व हा महाराष्ट्राच्या बाल्यावस्थेपासूनचा एक स्वभावविशेष आहे. राजकारण हा विषय महाराष्ट्राच्या रक्तांत भिनलेला आहे. आदिकालापासून दंडकारण्यानें त्या त्या कालांचा इतिहास तयार करतांना मोठी कामगिरी केली आहे. उत्तरेकडून आलेल्या अल्लाउद्दीन खिलजीनें दौलताबादचा किल्ला घेऊन यादववंश निर्वंश केला, तेव्हां त्याला कोठें स्वस्थता लाभली. नंतरची चार–पांच शतकें दक्षिणेवर यवनांची आक्रमणें झालीं. प्रत्येक वेळीं उत्तर हिंदुस्थान जिंकावयास यवनांना जड गेलें नव्हतें. पण दक्षिणेंतील डोंगरांतील उंदीर नरम आणावयास त्यांना त्यांच्या हयाती खर्च कराव्या लागल्या. आणि शेवटपर्यंत महाराष्ट्राचें खच्चीकरण कोणत्याच परकीय सत्तेला करतां आलें नाहीं. पुन:पुन्हा डोकें वर काढून महाराष्ट्रानें आपली संस्कृति कायम राखली. शिवाजीनें आपल्या बुद्धिचातुर्यानें औरंगजेबाला चकित केलें. बाजीरावानें हिंदुस्थानची सूत्रें पुण्यातून हलविलीं. नाना फडणवीस जिवंत होता तोंपर्यंत मराठ्यांच्या वाटेस जाण्याची इंग्रजांची छाती झाली नाहीं. इंग्लंडमध्यें आठ वर्षें राहून प्रतापसिंहाला परत गादी मिळवून देण्याची खटपट रंगो बापूजीनें केली. या चोघांनीं भूतकाळीं राजकारणांत जो अभूतपूर्व पराभव केला, तसा

आजहि करण्याची महाराष्ट्राची पात्रता आहे. शौर्याच्या बाबतींत महाराष्ट्राला जगांत तोड नाहीं. ' आधी कोंडाण्याचें लगीन मग रायाचें ' म्हणत सिंहगड सर करतांना हसत मरण झेलणारा तानाजी मालुसरे, शिवाजीची लाज राखण्याकरितां हत्तीशीं झुंज खेळणारा येसाजी कंक, स्वामीचें रक्षण करतांना जीवदान करणारा बाजीप्रभु देशपांडे, औरंगजेबाच्या तंबूचे कळस कापणारा संताजी घोरपडे, प्रत्यक्ष मरण दिसत असतांना कर्तव्यांत कसूर न करणारा बापू गोखले यांचें सळसळणारें रक्त आजहि महाराष्ट्राच्या नसानसांतून वहात आहे. त्यांची परंपरा कायम राखणारे नामदेव जाधव आजहि महाराष्ट्रांत जन्माला आले आहेत.

## बेहिम्मत लोक मागें पडले, महाराष्ट्र नव्हे !

वरील विवेचनांतून एवढाच निष्कर्ष काढणें जरूर आहे कीं, महाराष्ट्र आज कोणत्याहि क्षेत्रांत पाठीमागें पडलेला नाहीं आणि म्हणून निराश होण्याचें कारण नाहीं. लोकमान्य टिळकांनंतर सबंध महाराष्ट्र राष्ट्रसभेस मिळाला नाहीं. राष्ट्रसभेच्या महापुराबरोबर जे गेले ते राष्ट्रसभेला मिळालेलें यश व वैभव भोगीत राहिले. बाजूला तटस्थ राहिले वा ज्यांनीं या पुराला विरोध केला त्यांना राष्ट्रसभेचें यश वा वैभव कसें लाभणार ? भागीरथींत उडी घेतलेल्या यमुनेच्या प्रवाहाला संगमानंतर भागीरथीइतकेंच महत्त्व प्राप्त होतें. जो प्रवाह गंगेंत स्वतःला सामावून घेत नाहीं त्या प्रवाहानें मला जग गंगेइतका मान देत नाहीं म्हणून कुरकुरण्याचें कारण नाहीं. साध्या प्रवाहाचें भाग्यच त्याच्या वांट्यास येणार. महाराष्ट्र मागें पडला आहे, असें आज राष्ट्रीय पक्षाच्या लोकांना वाटत नाहीं. कारण राष्ट्रसभेबरोबर ते पुढें गेले आहेत. त्यांचा दृष्टिकोन विशाल झाला आहे. कम्युनिस्ट, सोशॅलिस्ट, हिंदुमहासभा वगैरेंची स्थिति लोकमान्यांच्या वेळच्या मवाळ पक्षासारखी झाली आहे. राजकारणाच्या धांवत्या गाड्यांत खीळ घालण्याचें त्यांनीं धोरण ठेवलें म्हणून ते मागें पडले व अखेर नामशेष झाले. महाराष्ट्र मागें पडत चालला, ही हाकाटी या लोकांनीं करण्यास सुरवात केली आहे. कारण हे लोक मागें आहेत, आमचा महाराष्ट्र मागें नाहीं ! राष्ट्रसभेस विरोध पण करावयाचा आहे व राष्ट्रसभेस मिळणारें वैभव तर मिळवण्याची इच्छा आहे. या दोन्ही आज एकदम कशा साधणार ! त्यांच्या वांट्यास येणारें भाग्य हें नेहमीं दुय्यम दर्जाचेंच राहाणार. नैराश्य हें या लोकांना आलेलें आहे; कारण राजकारणाचा गाडा स्वतःच्या हिंमतीवर चालविण्याची यांची आज धमक नाहीं. जे राष्ट्रसभेच्या बरोबर गेले आहेत त्या लोकांना नैराश्य येण्याचें कारण नाहीं; कारण महाराष्ट्र मागें पडत चालला यावर ते विश्वास ठेवण्यास कदापि तयार होणार नाहींत.

: २७

# महाराष्ट्र-महोदय

अनुक्रम १७४०.५
विभाग रां. नि.
क्रमांक ८८९
नों. दि. ७।१२।५५
वाचनालय

लेखक : नारायण गणेश गोरे

महाराष्ट्रीय विचारवंतांना उद्देशून मी ज्या वेळीं माझें अनावृत पत्रक लिहिलें त्यावेळीं मला कल्पनाहि नव्हती कीं, त्यावर एवढा दीर्घ काळ चर्चा होईल आणि एवढी थोर थोर मंडळी त्यांत उतरतील. प्रांतांतील विचारवंतांचें लक्ष या प्रश्नाकडे वेधण्याचें श्रेय माझ्या पत्रकांतील विषयवस्तूपेक्षां 'मौज'कारांच्या कुशल संपादकत्वाकडेच अधिक आहे, हें मी जाणून आहें. म्हणून या प्रश्नावर नाना दृष्टिकोन व्यक्त करणाऱ्या या विचारवंतांसमवेतच 'मौज'कारांचेहि आभार मानणें मला केवळ उचितच नव्हे तर अगत्याचें वाटतें.

## 'दिल्लीचें तख्त पाहिजे' म्हणून ?

काहीं लेखकांनीं मी मांडलेले मुद्दे संपूर्णतया मान्य केलेले आहेत तर कांहींना महाराष्ट्र मागें पडला आहे हें विधानच बरोबर वाटत नाहीं. माझ्या वाचनांत श्री. काकासाहेब गाडगीळांच्या एका व्याख्यानाचा जो अहवाल आला त्यांत महाराष्ट्र मागें पडला असें म्हणणाऱ्या माझ्यासारख्यांना अशा प्रकारें महाराष्ट्राचा तेजोभंग करणारी शल्यनीति न अवलंबिण्याचा त्यांनीं सल्ला दिलेला होता ! इतिहासाचार्य सरदेसाईंनींदेखील मी माझी मतें "ठोकून दिलीं" आहेत असाच कठोर शेरा मारलेला आहे ! तेव्हां महाराष्ट्र मागें पडला आहे आणि महाराष्ट्र मागें पडलेला नाहीं असे मुळांतच दोन पक्ष पडतात. अर्थातच समारोपाच्या या लेखांत, माझ्या मूळ विधानालाच ज्यांना विरोध आहे त्यांच्याशीं मला हुज्जत घालायची नाहीं; कारण तें आतां शक्य नाहीं समाधानाची गोष्ट अशी आहे कीं आपला प्रांत मागें पडलेला आहे, त्याच्या हातून गेल्या पंचवीस तीस वर्षांत बरेच प्रमाद घडले आहेत आणि ते दूर करण्याचा प्रयत्न न केल्यास प्रस्तुतच्या दुरवस्थेंतून आपल्या प्रांताची सुटका होणें अशक्य आहे, ही विचारसरणी मान्य करणारे विचारवंतहि थोडे थोडके नाहींत आणि त्यांचें व्यक्तिमत्त्वहि किरकोळ नाहीं. पण महाराष्ट्रभूमींत राहणाऱ्या जनतेच्या प्रगतीविषयीं आस्था बाळगणाऱ्या या थोर मित्रांपैकीं कांहींनीं माझ्या सरळ साध्या प्रतिपादनांतून भलताच ध्वनि काढावा हें पाहून मात्र माझें मन थोडें खरचटल्यावांचून राहिलें नाहीं देशाची उन्नति झाल्याविना महाराष्ट्राचीच तेवढी उन्नति कशी होणार ?—असा प्रश्न कोणी उपस्थित केला आहे, तर तर्कतीर्थांसारख्या सूक्ष्मदृष्ट तर्किकानें म्हटलें आहे कीं, "श्री. गोरे यांच्या प्रश्नाच्या मुळाशीं सुद्धां जी विवंचना वा काळजी दडली आहे त्यास त्यांची महाराष्ट्रीय परंपराच नकळत कारण आहे. 'हिंदुस्थानचा अग्रेसर महाराष्ट्र व्हावा' ही वासना तेथें धगधगत आहे....कोणाचा शिवाजी कम्युनिस्ट झाला आहे, कोणाचा बाजीराव समाजवादी झाला आहे, कोणाचा भाऊसाहेब संघवाला झाला आहे, कोणाचा रामदास गांधींची

लुंगी नेसून दिल्लीच्या तख्ताजवळ बसला आहे. इतर कोणत्याहि प्रांतापेक्षां या प्रांतात राजकीय वैचारिक असंतोष फार धगधगत आहे. कारण दिल्लीचें तख्त पाहिजे." (जाड ठसा माझा) तर्कतीर्थांना मी विनतिपूर्वक एवढेंच आश्वासन देऊं इच्छितों कीं, महाराष्ट्राच्या अवनतीची अथवा पिछेहाटीची मी ज्या वेळीं विवंचना करतों तेव्हां त्याचें कारण 'दिल्लीचें तख्त पाहिजे' हें नसून निराळेंच कांहीं तरी असतें. महाराष्ट्राच्या सुप्त शक्तींचा मला परिचय झालेला असल्यानें ही शक्ति नासून वायां जात आहे हा विचार मनाला सहजच अस्वस्थ करून सोडतो आणि मग समविचारी माणसांना हांक मारावी असें वाटतें. आपल्या कुटुंबांतला एखादा होतकरू तरुण वाममार्गास लागत चाललेला पाहिल्यावर आपणाला स्वस्थ बसवेल काय? हिंदुस्थानांतील सर्व तरुणांची उन्नति झाल्याविना आपल्या घरांतील ही व्यक्ति सुधारणार नाहीं असें तर्कशास्त्र कोणी तरी व्यवहारी मनुष्य लढवील काय? इतर प्रांतांची तरी काय मोठी अशी प्रगती झालेली आहे, हा विचारहि मला समाधान देऊं शकत नाहीं. महाराष्ट्र आणि बंगाल हे आघाडीचे दोन प्रांत आज आघाडीवर राहिलेले नाहींत, त्यांच्यामध्यें उत्कृष्ट गुण असूनहि त्यांचा उपयोग होत नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यांचा दुरुपयोग होत आहे, ही जाणीव कांहीं सुखकारक नव्हे. महाराष्ट्राबद्दल मी लिहिलें त्यावेळीं बंगालबद्दलहि एक समान व्यसनांत फसलेला प्रांत म्हणून लिहिण्याचें माझ्या मनांत होतें. पण मी तो मोह टाळला. ज्या भूमीला आपण आपली कर्मभूमी बनवलेली आहे तिच्याचबद्दल लिहिणें योग्य असें मनाशीं ठरवलें. शिवाय महाराष्ट्रामध्यें राष्ट्रांतील मुख्य प्रवाहापासून अलग राहाण्याच्या प्रवृत्तीची जोपासना लोकमान्यांच्या निधनानंतरच्या गेल्या तीस वर्षांच्या कालांत जशी जाणून बुजून होत आलेली आहे तसा बंगालमध्यें प्रकार घडलेला नाहीं. बंगालचें दुखणें निराळें आहे आणि त्याचीं कारणेंहि निराळीं आहेत.

## सांप्रतची युगप्रेरणा : समाजवाद

महाराष्ट्राच्या पिछेहाटीचें दुखणें वेशीवर टांगण्यास मी प्रवृत्त झालों तो अशा हेतूनें कीं, स्वातंत्र्योत्तर काळामध्यें महाराष्ट्रानें कोणत्या मार्गानें गेलें असतां देशहिताशीं अविरोधी अशी उन्नति त्याला साधतां येईल याबद्दलच्या विचारविनिमयास प्रारंभ व्हावा, आणि मतभिन्नता अपरिहार्य असली तरी त्यांतून मतसाम्यतेचा धागा कोठें प्रकट होत असल्यास तो लक्षांत यावा. कॉंग्रेस, शेतकरी-कामगार पक्ष, दलित फेडरेशन व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटनांच्या प्रवक्त्यांनीं या चर्चेच्या निमित्तानें जर आपापले विचार प्रकट केले असते तर पुढचें पाऊल ठरवण्याच्या दृष्टीनें फार सहाय्य झालें. असतें पण त्यांनीं या चर्चेत उतरण्याचें कटाक्षानें टाळलें तरी असावें अथवा त्यांना या चर्चेला कांहीं महत्त्व आहे असें वाटलें नसावें. कसेंहि असो. त्यांच्या विचारसहाय्यावाचूनच आपणांस कांहीं मार्ग हुडकतां येतो किंवा काय तें पाहिलें पाहिजे.

महाराष्ट्राची उन्नति व्हावयाची असेल तर आपण ज्या काळांत वावरत आहों त्या काळांतील युगप्रेरणा कोणती आहे याचा आपण कांहीं अंदाज करावयास नको काय? मराठेशाहीचा काळ हा धर्माधिष्ठित अथवा धर्मान्वित सरंजामदारीचा काळ होता, आणि १८५७ ते १९४७ पर्यंतचा कालखंड भांडवलशाहीप्रधान राष्ट्रीय स्वातंत्र्याचा होता, असें आपण मानलें, तर १९४७ नंतरच्या शेंपन्नास वर्षांच्या कालपर्वांतील प्रधान प्रेरणा कोणती राहाणार आहे याचाहि आपण विचार केलाच पाहिजे. माझ्या मतें हें युग समाजवादी लोकसत्ताच्या प्रयत्नाचें युग ठरणार आहे. या युगप्रवाहाला कोठें डावीं तर कोठें उजवीं वळणें येतील; नाहीं असें नाहीं. पण या युगप्रवाहाची प्रगति भांडवलदारी उत्पादनपद्ध-

तीच्या चतुःसीमा ओलांडून जाण्याच्या दिशेनें होत जाईल याबद्दल शंका नको.

भांडवलदारी उत्पादनाच्या चौकटींत मानव समाजाच्या नव्या गरजा आतां मावेनाशा झालेल्या आहेत, हें अर्थव्यवस्थेबाबत जसें खरें आहे, तसेंच एकंदर समाजरचनेबद्दल ही गोष्टहि प्रत्ययास येत आहेच कीं कोणत्याहि प्रकारच्या हुकुमशाही राजवटींत मानवाच्या अर्थेतर गरजा म्हणा अथवा सांस्कृतिक क्षुधा म्हणा, संतृप्त करण्याचें सामर्थ्य नाहीं. तेव्हां नफेबाजीवर आधारलेल्या भांडवलशाहीपासून विमुक्त आणि मानवी स्वातंत्र्यें अबाधित ठेवणाऱ्या समाजाच्या दिशेनें मानवसमाजाचा हा गाडा यथाशक्ति हाकारण्याचा यत्न केल्यावाचून तरणोपाय राहिलेला नाहीं, असें मला तरी वाटतें. पण अशा प्रकारच्या समाजवादाचें नांव उच्चारल्याबरोबर मी माझ्या पक्षाची तरफदारी करीत आहें असें मात्र कृपा करून समजू नये. युगधर्मासंबंधीं माझी कल्पना मांडीत असतां आपल्या पक्षाचें तट्टू पुढें ढकलण्याचें कार्पण्य निदान बुद्धिपुरःसर तरी मी करणार नाहीं खास.

हिंदुस्थानालाहि त्याच मार्गानें जावें लागणार आहे. नव्हे, आपण त्याला त्याच मार्गापुढें नेलें पाहिजे. हिंदुस्थानच्या उत्कर्षाचें सूत्र युगधर्माच्या पटामध्यें अशा प्रकारें बेमालूम गोंवून टाकण्यामध्यें महाराष्ट्रीयानीं अग्रेसर रहावें अशी माझ्या मनांतली खरी तळमळ आहे–दिल्लीचें तख्त मिळवण्यासाठीं चाललेली ही धडपड नव्हे! महाराष्ट्राला या बाबतींत अग्रेसर राहतां येण्याजोगी परिस्थिति प्रांतामध्यें असूनहि आम्ही कोत्या मनामुळें ही संधि व्यर्थ दवडीत आहों याचें दुःख होतें.

## महाराष्ट्रांतील कारखानदारांनीं काय करावें ?

हिंदुस्थानांतील भांडवलशाही स्वतःच्याच गुणांनीं आज इतकी बदनाम झालेली आहे कीं जनतेमध्यें या उत्पादनपद्धतीविषयीं तिटकारा उत्पन्न करण्याचें कार्य तिनें अगदीं चोखपणें बजावलें आहे. आज पूर्णपणें नापत ठरलेल्या भांडवलशाहीला हिंदुस्थानांत सुप्रतिष्ठित करण्याचे प्रयत्न जर इतःपर सरकारकडून होणार असतील तर तें सरकार पराभूत झाल्याविना रहाणार नाहीं, मग तें नेहरू–सरकार कां असेना! तक्षकाला पाठीशीं घालणाऱ्या इंद्राप्रमाणेंच त्याची स्थिति होणार ! असें जर आहे तर मी म्हणतों कीं, महाराष्ट्रांतील उदित व उदयोन्मुख कारखानदारांनीं अथवा धंदेवाल्यांनीं वालचंदशेठजी अथवा डालमियाशेठजींचें अनुकरण न करतां कारखानदारीची व्यवस्था नव्या पायावर कां उभारूं नये ? आमच्याकडे मॅनेजिंग एजन्स्या कशाला हव्या ? आमच्याकडे कारखान्यांतील कामें आंखण्यासाठीं आम्ही प्रत्यक्ष कामगारांच्या सहकारी समित्या कां स्थापूं नये ? कामगारांना शंका येण्यास जागा उरणार नाहीं अशा प्रकारें जमाखर्च कां ठेवूं नये ? देशांत कापडाचे व नाना धंद्यांचे काळे बाजार झाले; साखरेचा, गुळाचा, तेलाचा काळाबाजार भर जोसांत चालू आहे; या वेळीं महाराष्ट्रांतील कारखानदार व व्यापारी जर असें जनतेला कृतीनें पटवतील कीं, देशांत कांहींहि घडो आम्ही जनतेशीं बेइमान होणार नाहीं, आम्ही रास्त दरानेंच विक्री चालू ठेवूं, तर महाराष्ट्रांत एक नव्या उत्साहाचें व दिलजमाईचें वारें खेळूं लागणार नाहीं काय ? महाराष्ट्राच्या तोंडावर एक नव्या तेजाचा उजाळ दिसूं लागणार नाहीं काय ? महाराष्ट्र व्यापारी परिषद आणि मराठा चेंबर ऑफ कॉमर्स याच्यासारख्या संस्थांचे कार्यकर्ते नव्या रक्ताचे तरुणच आहेत. त्यांना जगातील आणि देशांतील उत्पाताकडे पाहून कांहीं नव्या वाटा पुमटदेखील दिसूं लागल्या नसतील तर तें आमचें दुर्दैव ! मग वर्गसंघर्ष चालवावयाचे तसे चालतील. आणि महाराष्ट्रातील वर्गीय रचना जातिरचनेशीं मिळतीजुळती असल्याकारणानें वर्गसंघर्षांतून जातिसंघर्षाच्या ज्वाळा भडकणें अपरिहार्य ठरेल. म्हणजे होईल इतकेंच कीं महाराष्ट्रानें कारखानदारींत उशीरां पाऊल टाकल्याकारणानें तो

हिंदुस्थानांतील देवमाशासारख्या वाढलेल्या भांडवलदारांसमोरहि टिकणार नाहीं आणि नव्या चाकोरीनें गाडा नेण्याची हिंमत नसल्यामुळें त्याला वर्गसघर्षाचे फटकारेहि चुकवतां येणार नाहींत !

## सहकारी शेती व्हावी

कारखानदारीप्रमाणेंच महाराष्ट्रांतील शेतकीचेंहि परिवर्तन होणें जरूर आहे. महाराष्ट्रात जमीनदाऱ्या नाहींत. त्यामुळें अत्यंत नागवलेला, कमालीचा अडाणी असा शेतकरी, महाराष्ट्रातले रत्नागिरी, कुलाबा व ठाणें हे तीन जिल्हे सोडून दिले तर, बऱ्याच कमी प्रमाणात आढळतो पण हा शेतकरी समाजवादी पद्धतीनें शेती करण्यास तयार होईल कीं नाहीं, अशी शंका पुष्कळानीं प्रदर्शित केलेली आहे. समाजवादी शेती म्हणजे शेतीवरील मालकी संपूर्ण नष्ट करून सामुदायिक पद्धतीची शेती असा असा अर्थ अभिप्रेत असेल, तर महाराष्ट्रीय शेतकरी त्यासाठीं बहुसंख्येनें तयार होईल असें वाटत नाहीं. ( कांहीं ठिकाणीं तेंहि शक्य आहे हें मात्र विसरू नये. ) तरीहि सहकारी शेतीच्या बाबतींत प्रयत्न करून पाहाण्यासारखा आहे. पण कारखानदारीप्रमाणें याहि बाबतींत समाजांतील तरुण, कमबी व धडाडीच्या कार्यकर्त्यांनीं—मग ते कोणत्याहि जातीचे असोत—शेतकरीवर्गाचें मार्गदर्शन करण्यासाठीं त्या वर्गांत समरस होण्याची तयारी दर्शविली पाहिजे. येथेंहि बुद्धिपुरःसर प्रयत्नाचीच आवश्यकता आहे. बिहार अथवा संयुक्त प्रांतात मोठमोठ्या जमीनदाऱ्या नष्ट केल्यानंतर तथें सरकारनें सहकारी वा सामुदायिक शेती सुरू केली, तर शेतकऱ्यांचा फारसा विरोध होण्याचें कारण नाहीं; ( आता कॉंग्रेस सरकार तसा उपक्रम करील कीं नाहीं ही गोष्ट वेगळी )कारण पूर्वी जमीनदाराच्या आसुडाखालीं राबणारे शेतकरी सामुदायिक शेतीवर काम करण्यास नाखुष असण्याचें कांहींच कारण नाहीं. पण महाराष्ट्रांत स्वतन्त्रपणें शेती करण्याची संवय झालेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष उदाहरणानें व प्रचारानें समजूत पाडूनच नव्या शेतीपद्धतीला अनुकूल करून घ्यावें लागेल. आतापर्यंतचे सहकारी पतपेढ्यांचे प्रयोग अयशस्वी झाले आहेत, म्हणून आपण निराश होण्याचें कारण नाहीं. जीवनातील हरएक व्यवहारांत सहकारी तत्त्वाचा प्रचार करण्याचा जो सल्ला श्री. ना. म. जोशी यांनीं दिलेला आहे तो मला स्वागतार्ह वाटतो. व्यापारीवर्गानें चालवलेल्या ससेहोलपटीमुळें शेतकरी–कामगारांना सहकारी दुकानांचे व विविध कार्यकारिणींचें महत्त्व अंधुक अंधुक उमगू लागलेलें आहे. ह्या नवीन जागृतीचा फायदा घेऊन प्रांतभर सहकारी जीवनाची बाग फुलवण्याकरितां ही नामी संधि चालून आलेली आहे. मात्र सर्व संघटनांनीं त्या प्रयत्न करावयास हवा.

## विधायक अस्मिता जागवा

अर्थात् हा प्रयत्न करावयाचा तर राजकीय पक्षांनीं व तरुणसंघटनांनीं आपल्या आतापर्यंत चालत आलेल्या कार्यक्रमांत भर घालण्याची तयारी दाखवली पाहिजे माझ्या अनावृत पत्रांत मी असें म्हटलें होतें कीं, “ माझ्या ठिकाणीं खरोखरच प्रांतीय दुरभिमान नाहीं. पण हिंदुस्थानांतील इतर सर्व प्रांतांत फिरून आल्यावर मला ही गोष्ट मनोमन पटलेली आहे कीं, महाराष्ट्रांतल्या अस्पृश्य वर्गापासून सर्व थर मध्यें जितकीं बुद्धिवान्, कर्तृत्ववान्, त्यागी, कामसू व जागृत माणसें आढळतात तितकीं इतरत्र आढळत नाहींत.” हें माझें विधान मला अजूनहि वास्तविकच वाटतें डॉ. मुरंजन यांनीं या विधानाचें समर्थन करून जी पुस्ती जोडलेली आहे तीहि मी भगिनीवर्गाची क्षमा मागून पण आनदानें मान्य करतों. ते म्हणतात : “ ह्यापेक्षांहि अत्यंत मौल्यवान् परंपरा म्हणजे इतरांच्या मानानें स्वतंत्र वातावरणात वाढणारा पुरुषांच्या बरोबरीनें खासगी व सार्वजनिक कार्यांत भाग घेणारा, परंतु कुटुंबव्यवस्थेंत श्रद्धेनें व टापटिपीनें चिकटून रहाणारा असा इतर प्रांतांत क्वचित् आढळून येणारा आपला स्त्रीवर्ग आहे.” आचार्य दादासाहेब

धर्माधिकाऱ्यांनींहि हें वैशिष्ट्य आपल्या ले
उल्लेखिलेलें आढळेल. ही कर्तबगार स्त्रीपुरुष मं
म्हणजेच नव्या महाराष्ट्राचे शिल्पकार. यांच्
आर्थिक भेद फारसे तीव्र नाहींत ही एक अत्
उपकारक ठरणारी गोष्ट आहे. मात्र आतांप
आम्ही असंतोषात्मक राजकारणावर व संघट
वर सर्व लक्ष केंद्रित करीत आलों तो मार्ग दुर
करून आम्ही जर महाराष्ट्रांतील जनतेंत अ
कांत अधिक सामुदायिक कर्मनिष्ठा आ
विधायक अस्मिता जागवण्यावर भर देण्य
ठरवलें तर सरकारी उद्योगाचे नाना
ताटवे आम्हांला फुलवतां येण्यास अडचण प
नये. हजारों–लाखों लोकांच्या सभा जर आम्
करूं शकतों, शेकडों लोक तुरुंगांत पाठवूं शकत
तर सहकारी उद्योगधंदे आम्ही कां करू शकणा
नाहीं? असंतोषात्मक राजकारणाला विधाय
प्रवृत्तींची जोड देऊन वादळाला दावें बांधण्या
यत्न गांधीजींनीं आयुष्यभर केला. त्यांतलें म
आम्ही ओळखलें पाहिजे आणि नवीन परिस्थितीं
नव्या विधायक प्रवृत्तींची जोपासना करण्या
कंटाळा आम्ही करतां कामा नये. तामिलनाड
केरळ या प्रांतांतील मंडळी सहकारी प्रयत्नांपासू
उत्तम लाभ करून घेत आहेत. त्यांचें अनुकर
महाराष्ट्रीयांनीं जरूर करावें.

## सामान्य जनांच्या खांद्यावर नको, खांद्याला खांदा भिडवून...

कोणी म्हणतील कीं ह्या कल्पना रम्य आहेत, पण हें व्हावें कसें? मांजराच्या गळ्यांत घंटा बांधावी कोणी? यावर उत्तर इतकेंच देतां येईल कीं, महाराष्ट्राच्या अभ्युदयाची आम्हांस जर खरोखरीच चिंता वाटत असेल आणि तो संघर्षाविना अथवा निदान पक्षीं किमान संघर्षानें व्हावा अशी तळमळ लागलेली असेल तर कालाच्या दडपणाची वा दटावणीची वाट पाहात न बसतां आम्ही आपण होऊन युगप्रेरणेसमोर लव्हाळ्याप्रमाणें वाकलें पाहिजे आणि तिला वाट करून दिली पाहिजे. संस्थानें खालीं करून देण्याचें शहाणपण जर संस्थानिकांनाहि सुचतें तर आम्हा महाराष्ट्रीयांनीं भविष्यकाळाची चाहूल वेळींच ओळखून त्याप्रमाणें वागण्यास हरकत कोणती? स्वेच्छेनें कुलोत्पन्न व धनोत्पन्न श्रेष्ठपणा सोडण्याची तयारी दर्शविल्यास मार्क्सच्या आर्थिक मीमांसेची काय गत होईल अशी खंत आपण करण्याचें कारण नाहीं! धनोत्पन्न श्रेष्ठपणा कसा सोडावा त्याची कल्पना लोकांना थोडी तरी येऊं शकते, पण कुलोत्पन्न मोठेपणा सोडावा म्हणजे काय अशी शंका अनेकांकडून विचारण्यांत येते. पांढरपेशा म्हणून ज्याना परंपरेनें म्हणण्यांत येतें त्यांनीं इतरेजनांबरोबरचें आपलें वर्तन व इतरेजनांविषयींच्या आपल्या मनांतील भावना या अन्तर्मुख होऊन तपासल्यास आपल्या ठिकाणीं अजूनहि केवढी आढ्यता भरलेली आहे तें लक्षांत येऊन त्यांचें त्यानाच आश्चर्य वाटेल. ही श्रेष्ठ भावना काढून टाकण्याचा प्रयत्न व्हावयास हवा आहे. माझा अनुभव असा आहे कीं, तसा प्रयत्न होत आहे असा प्रत्यय येत गेल्यास त्या प्रयत्नाचें मनमोकळें स्वागत जनतेकडून झाल्याविना कदापि राहात नाहीं. आपण सामान्य जनांच्या खांद्यावर बसलों आहोंत या भावनेहून आपण सामान्य जनांच्या खांद्याला खांदा लावून चाललों आहोंत ही भावना मनात निर्माण होतांच आपणामध्यें एक केवढें अभिनव सामर्थ्य व सामाजिक उत्साह स्फुरूं लागल्याचा प्रत्यय येतो याचा ज्याचा त्यानें अनुभव घेऊन पाहावा! आज महाराष्ट्रांतील पांढरपेशा वर्ग आणि इतर जनता यांचें दृश्य सावज व शिकारी यांच्यासारखें दिसतें आहे! एक भेदरलेला तर दुसरा संतापानें बेहोष त्यामुळें महाराष्ट्र-समाजांतील हे धन आणि ऋण विद्युत्प्रवाह कायमचे वेगळे वहात राहिल्याप्रमाणें झालें आहे आणि साहजिकच आमचा प्रकाश कोठेंच न पडतां आमची सारी सृजनशक्ति व्यर्थ जात आहे. आणि ही परस्परसाशंकता इतक्या थराला गेलेली आहे कीं, इतरेजनांचें बहुमत हमखास झाल्यास आपली काय दशा होईल

याची धास्ती वाटून संयुक्त महाराष्ट्रास विरोध करणारे लोक पांढरपेशांत मला आढळलेले आहेत, तर त्याबरोबर ओलेंहि जाळ,वें अशा प्रवृत्तिनें पांढ·पेशांतील कष्टकरी, प्रगतिवादी, आणि जननेशीं पूर्णतया एकरूप होऊं पाहाणाऱ्या गटाकडे व व्यक्तीकडेदेखील सदैव दुस्वासानें आणि कलुषित दृष्टीनें पाहाण्याची खोड बहुजन-समाजांतील कांहीं मंडळींच्या ठिकाणीं मला पाहावयास मिळालेली आहे. मनांतील हे तेढे काढून टाकण्याचा प्रयत्न पांढरपेशांनीं आणि तद्दितरांनीं आपल्या मनाला साक्षी ठेवूनच करावयास हवा. कारण हे प्रयत्न मोजण्याची फूटपट्टी बाजारांत अजून मिळू लागलेली नाहीं! परंतु पौष्टिक औषध पचनीं पडल्याचें अनुमान ज्याप्रमाणें देहाच्या बाह्य कांतीवरून करतां येतें त्याचप्रमाणें असा प्रयत्न होऊं लागला कीं नाहीं तें महाराष्ट्रीय समाजाच्या कांतीवरून लक्षांत येईल. ब्राह्मण, मराठा व अस्पृश्य या तीन वर्गांतील मध्यमवर्गीय व कनिष्ठ-वर्गीय तरुण पिढी ज्या दिवशीं आपआपल्या परंपरागत कोंड्या फोडील आणि आपल्या कर्तृत्वाचे प्रवाह एकत्र मिसळून काम करूं लागेल त्यावेळीं ही त्रिवेणी महाराष्ट्राच्या भवितव्याचें आनंदवनभुवन बनल्यावचून राहाणार नाहीं. पण त्यासाठीं आचार्य जावडेकरांनीं सुचविलेला मार्ग कितपत उपकारक ठरेल याविषयीं मी साशंक आहे. त्याचें कारण इतकेंच कीं, तो मार्ग माझ्या कांहीं मित्रांनीं चांचपून पाहिलेला आहे पण ज्या व्यक्तींना एकत्र आणावें, असें ते सुचवतात त्यांच्या व्यक्तित्वाचे कंगोरे आतां असे मजबूत बनलेले आहेत कीं, त्यांची सांधेजोड इतक्या सहजासहजीं होणें असंभवनीय दिसतें तथापि आचार्यांनीं सुचवलेला मार्ग अजिबात वर्ज्य मानून चालावें, असेंहि मला म्हणावयाचें नाहीं.

## सांस्कृतिक कार्यहि महत्त्वाचेंच

आतापर्यंतच्या प्रतिपादनाचा भर आर्थिक व वर्गीय मुद्द्यावरच होता. याचा अर्थ असा कोणी करूं नये कीं, मी इतर गोष्टींना गौण लेखतों. त्यांतल्या त्यांत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची महती तर मी अत्यंत थोर मानतों. ज्या शुभदिनीं ज्ञानदेवांना ज्ञानेश्वरी मराठींत लिहिण्याचा संकल्प स्फुरला आणि पंढरीच्या वाटेनें वारकऱ्यांच्या फौजा नेण्याची कल्पना सुचली तो दिवस मी शिवाजीमहाराजांना हिंदवी स्वराज्याचा साक्षात्कार करवणाऱ्या दिवसाइतकाच मंगल व मोलाचा मानतों. त्या काळच्या युगधर्माला पोषक अशी सामाजिक अस्मिता महाराष्ट्राला देण्याचें कार्य ज्ञानेश्वरांनीं सुरू केलें आणि त्या मंदिरावर शिवरायांनीं सोन्याचा कळस चढविला. अमेरिकन व फ्रेंच राजक्रांत्याप्रमाणेंच रशियन राजक्रांतीच्या अगोदर कित्येक दशकांपासून केवढें विचारमंथन सुरू होतें. व्यक्तिस्वातंत्र्यवादी रूसो, पेन वगैरेंनीं ज्याप्रमाणें तत्कालीन नवोदित मध्यमवर्गाला नवीन अस्मितेची जोड करून दिली, त्याचप्रमाणें मार्क्स-लेनिननीं कामगारांना त्यांच्या इतिहासदत्त कर्तव्याची ललकार ऐकवली. गांधीजींनीं देशांतील जनतेमध्यें एका नवीन अभिमानाची ज्योत चेतवली. हीं सर्व अत्यंत थोर अशीं सांस्कृतिक कार्येंच होत. नव्या जमान्याचा पुकार तितक्या समर्थ वाणीनें महाराष्ट्राला ऐकवील असा कोणीतरी आम्हांस लाभेल तर फारच उत्तम होईल. संधिकालांत व संघर्षकालांत निपजणारीं नवीन मूल्यें ही सायंतनीय ताऱ्याप्रमाणें अंधुक आणि भट्टींतून बाहेर येणाऱ्या धातुरसप्रमाणें लाल लाल व लिबलिबीत असतात. त्यांचें पूर्ण तेज प्रकट करून त्यांना पथदर्शक नक्षत्राचें स्वरूप आणून देण्याचें आणि त्या लाल लिबलिबीत रसामधून नवयुगाला अनुरूप अशीं सांस्कृतिक उपकरणें बनवण्याचें कार्य बुद्ध, ख्रिस्त, पैगंबर, ज्ञानेश्वर यांच्यासारख्या महात्म्यांनींच करावयाचें असतें. पण इतिहासाचार्य सरदेसायांनीं “ अलौकिक माणसाचा कारखाना नसतो ” हा जो इषारा दिलेला आहे त्याचें मर्म विसरून कसें चालेल?

L8३८ १२३

१५४०६ अनुक्रम ४१.वि. ८८९ ९३।९

## विचारवंतांच्या मंडळाची जरूरी

म्हणून डॉ. मुरंजन आणि म. म. पोतदार यांनीं ज्या कल्पना मांडलेल्या आहेत त्यांचें मी स्वागत करतों. संयुक्त महाराष्ट्र कुळाची सर्व दिशांनीं वाढ व्हावी म्हणजे उन्नति व्हावी, तें कुळ, लोकसत्तक व समरस बनावें. आणि त्याच्या सुप्त सामर्थ्याला शोभेल असा प्रकट पुरुषार्थ त्याच्या हातून घडावा, यासाठीं त्याच्या शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक विकासाचें चिंतन करणाऱ्या विचारवंतांचें मंडळ बनवण्याची कल्पना मला उचित वाटते. मात्र ह्या विचारवंतानीं कांहीं मूलभूत गोष्टी मान्य केलेल्या असल्या पाहिजेत आणि त्यांच्या मनांत जनतेविषयीं अखंड जिव्हाळा असला पाहिजे. धर्मानीत राज्याची कल्पना उलटवून ज्यांना धर्माधिष्ठित राज्य स्थापावयाचें आहे, भांडवलदाऱ्या व वतनदाऱ्या पुन्हां स्थापावयाच्या आहेत, वर्णविषमता ज्यांना मनाच्या कोणत्या तरी कोपऱ्यात मान्य आहे, त्यांना या विचारमंडळांत स्थान नसावें. त्याचें कार्य स्वतंत्रपणें चालू दे. पण हिंदुस्थान आज ज्या टप्प्यापर्यंत आलेला आहे तेथून त्यानें पुढें कूच करावें, आणि त्यांत महाराष्ट्रानें बिनीवर राहावें असें ज्यांना ज्यांना वाटत असेल अशा सर्व विचारवंतांना एकत्र बोलावून महाराष्ट्रीय जनतेसाठीं एक अनुशासन म्हणा अथवा एक व्यवहारशास्त्र म्हणा बनवण्याचा प्रयत्न करावा. नागपूरपासून कारवारपर्यंत निरनिराळ्या क्षेत्रात कार्य करणारे असे अधिकारी लोक निदान वीस पंचवीस तरी आपणांस मिळतील. त्यांत निरनिराळ्या पक्षाचे नेते नसतील, तर कांहीं बिघडणार नाहीं; बरेंच होईल. ते नमल्यावर आपलें कोण ऐकणार, आपला आक्रोश व्यर्थ जाईल, असा विचार या मंडळानें मनात आणण्याचें कारण नाहीं. त्यांनीं हर एक क्षेत्रात आपले विचार वेळोवेळीं निर्भीडपणें मांडण्याचें काम जर चालू ठेवलें, तर महाराष्ट्रांतील सर्व पक्षप्रवृत्तींना हळुहळू वळण लागत गेल्याशिवाय राहणार नाहीं. असल्या आयोजन–समित्या संख्येच्या दृष्टीनें दुर्बळ वाटल्या, तरी

[ पान ६ वरून ]

श्री. गोरे यांनीं आपापले पक्ष सोडून केवळ संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठीं एक नवा पक्ष निर्माण करण्याचें कारण नाहीं. तसें त्यांनीं केलें अशी कल्पना केली, तर त्यामुळें महाराष्ट्र आपलें अखिल भारतीय राजकारणांतील आहे तें स्थान मात्र गमावून अधिकच मागें पडेल, व पुढें तर मुळींच जाणार नाहीं. म्हणून ज्यांना संयुक्त महाराष्ट्राची तळमळ आहे, त्यांनीं असा सल्ला त्यांना देऊं नये व त्यांच्याकडून तशी अपेक्षाहि करूं नये. तसेंच इतर पक्षांनीं आपापले पक्ष मोडून कॉंग्रेसपक्षात विलीन झाल्यानें संयुक्त महाराष्ट्र अधिक लवकर मिळेल, असाहि प्रचार कॅांग्रेसवाल्यांनीं करूं नये. संबंध मुंबई इलाखा समाजवादी पक्षाच्या हातीं येईल, निदान कॅांग्रेसपक्षाच्या हातून निसटून वर दर्शित केलेल्या संयुक्त आघाडीच्या हातीं जाईल, तर गुजराती लोक व श्री. मुन्शींसारखे महागुजरातवाले, आपला प्रांत स्वतंत्र करावा असें म्हणू लागतील. पण जोंपर्यंत मुंबई इलाखा कॅांग्रेस पक्षाच्या हातीं राहील, तोंपर्यंत त्यांना तसें वाटणार नाहीं.

वरीलप्रमाणें या विषयासंबंधीं माझे विचार असल्यानें श्री. गोरे यांच्या लेखास माझा सामान्य पाठिंबा आहे. आणि जे कॅांग्रेसवाले समाजवादी पक्षाची शक्ति क्षीण झाल्यानें संयुक्त महाराष्ट्र अधिक लवकर निर्माण होईल असें मानतात त्यांचें मत मला पटत नाहीं. कारण आज संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती लांबणीवर पडण्यास कॅांग्रेसश्रेष्ठीच कारण आहेत, समाजवादी किंवा इतर पक्ष त्यास कारण नाहींत, हें उघड आहे.

---

सर्व पक्ष त्यांच्यापासून आपलें वैचारिक पोषण मिळवीत असतात, हें मी स्वानुभवावरून सांगतों. तेव्हां डॉ. मुरंजन, म. म. पोतदार अथवा आचार्य भागवत यांच्यासारख्यांनीं याबाबत जरूर पुढाकार घ्यावा आणि महाराष्ट्र–महोदयाचें नवें पर्व सुरू करण्याचें श्रेय संपादावें, अशी माझी त्यांना विनति आहे.

चर्चा खूप लांबली. माझा समारोपहि लांबला. पण त्यामधून वरीलप्रमाणें कांहीं योजना प्रकटल्यास हा प्रदीर्घ वाग्यज्ञ सफल झाल्याचें समाधान लाभेल. तसें होवो, हीच इच्छा.

REFBK-0008539

मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४.